# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १७/१/२००८

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १७/१/२००८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

११

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक १७/१/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ३ | श्री. गायकवाड दिलीप | ३८ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ४ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३९ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ५ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४० | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४१ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४२ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ८ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४३ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ९ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४४ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. विजय खंडु सुपाळे | ४५ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४७ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४८ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४९ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५० | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५१ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्री. राजू जग्यासी | ५२ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १८ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५३ | श्री. किशोर जग्यासी |
| १९ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५४ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५५ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २१ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५६ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २२ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५७ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २३ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ५८ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २४ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६० | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६१ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ६२ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६३ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६४ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ३० | श्रीमती शकुंतला पाटील | ६५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३१ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६६ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३२ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६७ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३३ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६८ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३४ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६९ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३५ | श्री.एडके गणपत गोविंद | ७० | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३६ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | | |

तर,

१. उप–महापौर–– श्री. चव्हाण रमेश महादेव हे व खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
२. श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील, ३. श्री. रामसागर जनार्दन यादव, ४. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज), ५. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम, ६. श्री. मोहन साधवानी

तसेच खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
४. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
५. श्री. मिलिंद सावंत, उप–आयुक्त
६. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
८. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
९. श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
१०. श्री. सेलवन, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सकाळी ११.५५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** ५ पालिका सदस्य नामनिर्देशित करणे.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**मा. महापौर महोदया, सभेचे कामकाज सुरु होण्याअगोदर मी एक श्रध्दांजली प्रस्ताव मांडु इच्छितो. उल्हासनगर महानगरपालिकेचे सभागृह नेता श्री. मोहन साधवानी यांचे बंधु श्री. महेश साधवानी यांचे दिनांक १४/१/०८ रोजी निधन झाले आहे. त्यांना सभागृहाच्यावतीने श्रध्दांजली अर्पित केली जावी.

---

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. तुलसीदास वसिटा

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर नगरपालिकेतील सभागृह नेता श्री. मोहन साधवानी यांचे बंधु श्री. महेश साधवानी यांचे दिनांक १४/१/०८ रोजी निधन झाले.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. महेश साधवानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. रविंद्र बागुलः—**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आम्हां नगरसेवकांना काही दिवसापुर्वी महाबळेश्वर येथे प्रशिक्षणास पाठविले होते. त्याबद्दल आम्ही सर्व नगरसेवक आपले आभारी आहोत. यापुढे जर प्रशिक्षणाचा असा कार्यक्रम कुठे आयोजित केला तर आम्हांला मार्गदर्शन करण्यासाठी संबंधीत विभागाच्या अधिका—यांना आमच्या बरोबर पाठविण्यात यावे. धन्यवाद।

**महापालिका सचिवः—**मा. महापौरांच्या संमतीने जेव्हा सभासूचना काढण्यात आली होती. त्यावेळेस त्या सभा सूचनेबरोबर निवडणूक कार्यक्रम सुध्दा दिला होता. तो कार्यक्रम टप्पानिहाय होता. आता ते सर्व टप्पे पार पडले असून आजचा हा अंतिम टप्पा आहे. मा. आयुक्त साहेबांनी या अगोदर मा. सभागृहनेता, विरोधी पक्ष नेता, सर्व पक्षांचे गटनेते यांच्याशी विचार विनिमय केल्यानंतर ज्या पाच व्यक्ती नामनिर्देशित पदासाठी पात्र आहेत त्यांची नावे सुचविली आहेत. याचबरोबर या पाचही व्यक्तींना त्यांच्या पक्षाच्या वतीने समर्थन आहे. त्यांच्या गटनेत्याकडुन मा. आयुक्त साहेबांना लेखी सूचना दिलेली आहे. व त्याबाबत आजपर्यंत कुणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही. तरीसुध्दा नामनिर्देशित सदस्य पदासाठी शिफारस करण्यात आलेल्या पाच व्यक्तींची नावे मा. महापौरांच्या वतीने मी वाचुन दाखवितो. या पाच व्यक्ती जर उपस्थित असतील तर कृपया त्यांनी सभागृहातील अधिका—यांच्या कक्षात उपस्थित व्हावे.

१. श्री. सुनिल साहेबराव गंगवानी, यांच्याबाबतीत लोकभारतीचे गटनेते श्री. जीवन इदनानी यांनी लेखी सूचना दिली होती.
२. श्री. प्रकाश सावंत, यांच्या नावाबाबत शिवसेना गटाच्या वतीने गटनेते श्री. धनंजय बोडारे यांनी सूचना दिली होती.
३. श्री. नरेंद्र राजानी, यांच्या नावाबाबत भाजपा गटाच्या वतीने गटनेते श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सूचना दिली होती
४. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, यांच्या नावाबाबत कॉग्रेसपक्षाच्या वतीने गटनेते श्री. तुलसीदास वसिटा यांनी सूचना दिली होती.
५. श्री. राजेश नानीकराम वधारिया, यांच्या नावाबाबत राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या वतीने श्रीमती सुरेखा वेलकर व श्री. राजु जग्यासी यांनी सूचना दिली होती.

ही पाचही नावे नामनिर्देशित सदस्य पदासाठी निश्चित झालेली आहेत. या सभागृहामध्ये या पाचही व्यक्तींची नावे वाचुन दाखविण्यात आलेली आहेत. आपणामधील कुणाची काही शंका किंवा हरकत असेल तर ती त्याने मांडावी आणि कुणाची काही हरकत नसेल तर ही पाचही नावे या पदासाठी अंतिम समजली जातील.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, अनेकतामध्ये एकता ही हिंदची विशेषताःअसे म्हंटले जाते त्यानुसार अनेक पक्षांचे लोक येथे आहेत. व प्रत्येक पक्षाने बराच विचार विनिमय केल्यानंतर चांगल्यात चांगल्या लोकांची नावे येथे प्रस्तावित केली आहेत. यासाठी सर्व पक्षांचे मी स्वागत करतो. व सर्व संमतीने हा प्रस्ताव आपण पारीत करु या. शहरात विकास कामे करण्यासाठी प्रत्येक राजकिय पक्षानें नामनिर्देशित सदस्य म्हणुन या व्यक्तींची शिफारस केलेली आहे. त्या सर्वांचे मी अभिनंदन करु

इच्छितो. शहरातील सर्व राजकिय पक्षांची ज्या अगोदरची अशी स्थिती राहिली आहे की श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांना सर्व राजकिय पक्षांनी नामनिर्देशित सदस्य पदासाठी समर्थन दिले होते व ते बिनविरोध त्या पदावर निवडून आले होते. तर अशा चांगल्या चांगल्या लोकांना नामनिर्देशित सदस्य म्हणुन आणण्यासाठी आमच्या पक्षाने कधीही भेदभाव केलेला नाही. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांना सर्व राजकिय पक्षांनी पाठींबा दिला होता. नंतर ते एका राजकिय पक्षात सहभागी झाले. परंतु सुरुवातीला सर्व राजकिय पक्षांनी समर्थन दिले होते. म्हणुन या पाचही व्यक्तींचे मी स्वागत करतो. व ते या शहरासाठी चांगल्यात चांगले कार्य करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, सचिव साहेबांनी सांगितल्यासारखे हा ठराव पारीत झाल्यासारखेच आहे. पाचही नामनिर्देशित सदस्यांचे येथे स्वागत करण्यात येत आहे. आणि नामनिर्देशित सदस्य म्हणून बुध्दीजीवी, विचारवंत व्यक्तींची प्रत्येक राजकिय पक्षांकडुन शिफारस करण्यांत आलेली आहे. या उल्हासनगर महानगरपालिकेला फायदा देणारे, असे हे पाच विचारवंत आहेत, यांचेकडे सरस्वती व लक्ष्मी आहे असे पाच नामनिर्देशित सदस्य या शहरास लाभले आहेत. या शहरास व या महानगरपालिकेस ख—या अर्थाने यांचा फायदा होणारच आहे. त्यासाठी त्यांना शुभेच्छा।

<u>सदस्य श्री. राजु जग्यासीः—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब व सचिव साहेब, मी असे समजतो की, राजकिय पैलुमध्ये हा पहिलाच असा विषय असेल आज सर्वच पक्ष आनंदीत आहेत, म्हणजेच आज कुणाची हार किंवा जीत होणार नाही. हे जे पाचही नामनिर्देशित सदस्य आहेत हे सदस्य चांगले विचार ठेवणारे व्यक्ती आहेत. त्यामुळे आज अतिशय आनंदाचा दिवस आहे, कुणाही राजकिय पक्षाची हार किंवा जीत होणार नाही. आज सर्वांची जीत होणार आहे. मी या पाचही नामनिर्देशित सदस्यांना शुभेच्छा देतो व आपणांस विनंती करतो की नामनिर्देशित सदस्य म्हणून निवड झाल्या बददल या पाचही सदस्यांची नावे एकमताने घोषित करावीत धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>मा. महापौरजी, आम्ही सभागृहातील सर्व सदस्य नविन पाच नामनिर्देशित सदस्यांच्या स्वागतासाठी आतुर आहोत.

<u>सदस्य श्री. दिलिप गायकवाडः—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी व आयुक्त साहेब, आज या ठिकाणी ५ नामनिर्देशित सदस्यांची निवड करण्यासाठी घोषणा होणार आहे. सर्वात प्रथम मी माझ्या शिवसेना पक्षाच्यावतीने त्यांचे याठिकाणी स्वागत करतो. तसेच हे पाचही पांडव या उल्हासनगर शहराच्या विकास कामाच्या आघाडीमध्ये आमच्याबरोबर सहभाग घेतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. व या महापालिकेमध्ये जास्तीत जास्त समाजकार्य करण्यामध्ये व समाजबांधीलकीमध्ये सहभाग देतील अशीही अपेक्षा याठिकाणी व्यक्त करतो. त्यांचे मनपुर्वक अभिनंदन करतो व शुभेच्छा देतो.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरेः—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी व आयुक्त साहेब, मी प्रथमच असे पाहतो की, पाचही उमेदवार हे बिनविरोध निवडून आले आहेत, असे एकमत कधी झाले नव्हते. परंतु यावेळेस हा चांगला फायदा उल्हासनगर महानगरपालिकेस झालेला आहे. व सर्व नगरसेवकांनी विचार विनिमय करुन, संख्याबळानुसार नामनिर्देशीत सदस्य पदासाठी ज्यांच्या नावाची शिफारस केली आहे त्यांचे आज येथे हार्दिक स्वागत होत आहे. या पाच सदस्यांमध्ये आमचा सदस्य नसला तरी आम्ही येथे नाराज नाही , काहीही असो काळ, वेळ आणि शासनाचा नियम हा नेहमी बदलत असतो. परंतु यावेळेस आरपीआय पक्षाचे हे दुर्भाग्य आहे की शासनाचा नियम हा सहाच्या संख्याबळावर राहिला आणि आम्ही पाच असल्यामुळे आमच्या पक्षाच्या व्यक्तीची नामनिर्देशित सदस्यपदासाठी शिफारस होवु शकली नाही , हे पाच नामनिर्देशित सदस्य आमचेच बांधव आहेत. त्यांना मी आरपीआय पक्षाच्या वतीने व गटनेता या नात्याने हार्दिक हार्दिक व लाख लाख शुभेच्छा देतो. ७६ नगरसेवकांनी ५ नामनिर्देशित सदस्य निवडुन दिले असल्याने आता ८१ नगरसेवक झाले आहेत. त्यांनी खेळीमेळीच्या वातावरणात उल्हासनगर महानगरपालिकेत आणि शहरात चांगल्याप्रकारे काम करावे अशी मी त्यांच्याकडुन अपेक्षा व्यक्त करतो. जय हिंद।

<u>महापालिका सचिवः—</u>कुणाची काही हरकत तर नाही ना? प्रस्ताव कायम समजायचा ना? आता मा. महापौर एक—एक उमेदवारास व्यासपीठावर बोलावतील व त्यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन व स्वागत करतील. त्यानंतर मा. उप—महापौर, मा. आयुक्त व महापालिका सचिव हे सुध्दा नामनिर्देशित सदस्यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन व स्वागत करतील.

श्री. नरेंद्र राजानी यांनी कृपया व्यासपीठावर यावे.

यावेळी प्रथम मा. महापौरांनी व त्यानंतर अनुक्रमे , मा. उप–महापौर, मा. आयुक्त व महापालिका सचिव यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन व स्वागत केले.

श्री. गोधु क्रिष्णानी यांनी कृपया व्यासपीठावर यावे.

यावेळी प्रथम मा. महापौरांनी व त्यानंतर अनुक्रमे , मा. उप–महापौर, मा. आयुक्त व महापालिका सचिव यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन व स्वागत केले.

श्री. प्रकाश सावंत यांनी कृपया व्यासपीठावर यावे.

यावेळी प्रथम मा. महापौरांनी व त्यानंतर अनुक्रमे , मा. उप–महापौर, मा. आयुक्त व महापालिका सचिव यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन व स्वागत केले.

श्री. राजेश वधारीया यांनी कृपया व्यासपीठावर यावे.

यावेळी प्रथम मा. महापौरांनी व त्यानंतर अनुक्रमे , मा. उप–महापौर, मा. आयुक्त व महापालिका सचिव यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन व स्वागत केले.

श्री. सुनिल गंगवानी यांनी कृपया व्यासपीठावर यावे.

यावेळी प्रथम मा. महापौरांनी व त्यानंतर अनुक्रमे , मा. उप–महापौर, मा. आयुक्त व महापालिका सचिव यांनी त्यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे अभिनंदन व स्वागत केले.

काही सदस्य :–पास–पास......

महापौर :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :–** ५ पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करणे.

प्रस्तावना

सन–२००७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७६ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम चे कलम ५ (३) सह महाराष्ट्र महानगरपालिका नामनिर्देशन सदस्यांची अर्हता व नियुक्त्या नियम २००७ च्या नियम ५ अन्वये ५ पालिका सदस्यांच्या नियुक्त्या ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | भाजपा | कॉग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १७ | १६ | १२ | ६ | ५ | २ | १ |

| | |
|---|---|
| ७६ | = १५.२० |
| ०५ | |

एका पालिका सदस्याचे नामनिर्देशनासाठी मतांचे प्रमाण– १५.२० असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | १७ –– X ०५ ७६ | =१.११ | (५) | कॉग्रेस | ६ –– X ०५ ७६ | = ०.३९ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (२) | शिवसेना | १७<br>—— X ०५<br>७६ | =१.११ | (६) | आरपीआय | ५<br>—— X ०५<br>७६ | = ०.३२ |
| (३) | रा.का.पा. | १६<br>—— X ०५<br>७६ | = १.०५ | (७) | म.न.से. | २<br>—— X ०५<br>७६ | = ०.१३ |
| (४) | भाजपा | १२<br>—— X ०५<br>७६ | = ०.७८ | (८) | अपक्ष | १<br>—— X ०५<br>७६ | = ०.०६ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | एकूण |
|---|---|---|---|
| १ | १ | १ | ०३ |

यानंतर रिक्त राहणा—या दोन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

(१) लोकभारती ०.११ (२) शिवसेना ०.११ (३) रा.का.पा. ०.०५

(४) भा.ज.पा. ०.७८ (५) कॉंग्रेस ०.३९ (६) आरपीआय ०.३२

(७) म.न.से ०.१३ (८) अपक्ष ०.०६

वरील परिस्थिती पहाता भाजपा आणि कॉंग्रेस या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे त्यामुळे दोन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाच्या सदस्याचे प्रमाणाशिर प्रतिनिधीत्वाद्वारे खालील प्रमाणे नामनिर्देशन करण्यास प्रस्तावित.

| लोकभारती | शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ० | ० | ० | ०५ |

मा. महापौरांच्या आदेशान्वये महापालिका सचिव तर्फे दिनांक २६/१२/२००७ च्या सूचनेद्वारे दिनांक १७/१/२००८ रोजी ५ पालिका सदस्य नामनिर्देशित करण्यासाठी महासभा बोलविण्यांत आलेली आहे. त्या सूचनेसह नामनिर्देशनाचा कार्यक्रम सुध्दा जारी करण्यात आला होता. त्या अनुषंगाने महापालिका सचिव कार्यालयात दिनांक ९/१/२००८ रोजी एकुण १२ व्यक्तींनी नामनिर्देशित पालिका सदस्य पदासाठी आपले अर्ज दाखल केले. त्या सर्व अर्जांची छाननी उपस्थित अर्जदारांसमोर दिनांक १०/१/२००८ रोजी दुपारी १ ते २ वाजेपर्यंत आयुक्तांतर्फे करण्यात आली. आयुक्त कार्यालयात छाननीच्या वेळी उपस्थित असलेल्या अर्जदारांपैकी कुणीही कोणत्याही अर्जदाराविरुध्द आक्षेप घेतला नाही त्यामुळे आयुक्तांनी अर्जातील सर्व कागदपत्रांची व अर्जदाराच्या अर्हतेची खात्री करुन सर्व १२ अर्ज वैध असल्याची घोषणा केली त्यांची नावे पुढीलप्रमाणे..........

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता |
|---|---|
| १ | श्री. असरोंडकर राजेश जयसिंग<br>५२७, जय निवास, त्रिवेणीनगर, उल्हासनगर—४ |
| २ | श्री. किशनानी गोदुमल नारायणदास<br>आर्शिवाद बंगला, २ रा माळा, दसरा मैदान जवळ, राधाबाई चौक, सेक्शन २३, उल्हासनगर—३ |
| ३ | श्री. गंगवानी सुनिल साहेबराव<br>साई कुंज कॉ.ऑप. हौ.सोसायटी, १०२, अमन टॉकीज जवळ, उल्हासनगर—३. |
| ४ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |

| | |
|---|---|
| | फ्लॅट नं. १२, दुसरा माळा, श्रीराम टॉवर बिल्डींग, उल्हासनगर–४. |
| ५ | श्री. धरमदासानी बलराम पेसुराम<br>बॅ.नं.१०६५/३७ स्वामी धरमदास नगर, ओटी सेक्शन, उल्हासनगर–३. |
| ६ | सौ. बेहरानी ज्योती ठाकुरदास<br>बेहरानी हाऊस, बॅ. १००२/१०, सेक्शन क्र. २३, उल्हासनगर–३. |
| ७ | श्री. राजानी नरेंद्र रामचंद्र<br>कृष्णविला, बॅरेक नं. १४८२, सेक्शन–३०, उल्हासनगर–४ |
| ८ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद<br>बॅ. नं. ४२७/१७, उल्हासनगर–१ |
| ९ | श्री. लुंड शंकर गोविंदराम<br>प्लॉट नं. सी ६२८/१२५५/५६, नेताजी रोड, दिपक मंदिरा जवळ, उल्हासनगर–४ |
| १० | श्री. वधारिया राजेश नानीकराम<br>२०५, रॉयल सफायर रॉयल रेसी डेन्सी कॉम्पलेक्स, उल्हासनगर–१. |
| ११ | श्री. वाघमारे मनोज भागवत<br>सुलोचना कुंज, हनुमान मंदिराजवळ, लालचक्की, उल्हासनगर–४. |
| १२ | श्री. सावंत प्रकाश गणपत<br>सावंत चाळ, शिवकॉलनी, उल्हासनगर–३. |

दिनांक १०/१/२००८ रोजी दुपारी ३ ते ४ वाजेपर्यंत नामनिर्देशित पालिका सदस्य पदासाठी तौलनिक संख्याबळा नुसार कॉग्रेस, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी, शिवसेना, भाजपा व लोकभारती या पक्षांनी खालील व्यक्तींच्या नावाची नामनिर्देशित सदस्य पदाचे नेमणुकीबाबत आयुक्तांकडे सचिवामार्फत परिशिष्ट–१ च्या नमुन्यात सूचना दिली.

| अ.क्र. | व्यक्तीचे नाव | राजकीय पक्षाचे नाव | गटनेत्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी | लोकभारती | श्री. जीवन इदनानी |
| २ | श्री. प्रकाश गणपत सावंत | शिवसेना | श्री. धनंजय बोडारे |
| ३ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी | भा.ज.पा. | श्री. जमनादास पुरस्वानी |
| ४ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी | कॉग्रेस | श्री. तुलसीदास वसिटा |
| ५ | श्री. राजेश नानीकराम वधारीया | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | श्रीमती सुरेखा वेलकर<br>श्री. राजु जग्यासी |

दिनांक ११/१/२००८ रोजी सायंकाळी ४ वाजता सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, व सर्व राजकीय पक्षांचे गटनेते यांच्याशी आयुक्तांनी विचारविनिमय केला असता गटनेत्यांनी नामनिर्देशित सदस्य पदासाठी सुचविलेल्या व्यक्तींबाबत कुणी काहीही आक्षेप घेतला नाही. म्हणुन गटनेत्यांनी सुचविलेल्या ५ व्यक्तींची नावे कायम केली. त्या अनुषंगाने वरील ५ व्यक्तींची उल्हासनगर महानगरपालिका नामनिर्देशित सदस्य म्हणुन नेमण्यास महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.:– ६०</u>　　　　　　　　<u>दिनांक :– १७/१/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :–श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा आयुक्तांनी नामनिर्देशित सदस्य म्हणुन नेमणुक करण्यासाठी शिफारस केलेल्या खालील पाच व्यक्तींच्या नेमणुकीस मान्यता देत आहे.

| अ.क्र. | व्यक्तीचे नाव |
|---|---|
| १ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| २ | श्री. प्रकाश गणपत सावंत |

| | |
|---|---|
| ३ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ४ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ५ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १२.१५ वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–
२०/२/२००८

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/२/२००८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१२

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०/२/२००८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

२. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

३. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३९ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४० | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४१ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४२ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४३ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४४ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४५ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४६ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४७ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४८ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४९ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५० | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. दिलिपकुमार देविदास जग्यासी | ५१ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५३ | श्री. किशोर जग्यासी |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५४ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५५ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २० | श्री. राजू जग्यासी | ५६ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २१ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५७ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५८ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ६० | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २५ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | ६१ | श्री. मोहन साधवाणी |
| २६ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ६२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६३ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २८ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६४ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २९ | श्री. लाल पंजाबी | ६५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३० | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६६ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३१ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६७ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३२ | श्रीमती शकुंतला पाटील | ६८ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३३ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६९ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३४ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७० | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३५ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७१ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३६ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७२ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३७ | श्री.एडके गणपत गोविंद | ७३ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ७४ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान, २. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ३. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ४. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, ५. श्रीमती विद्या विजय निर्मले, ६. श्री. सुनिल साहेबराव गंगवानी, ७. श्रीमती सरोजीनी टेकचंदानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

११. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
१२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
१३. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
१४. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
१५. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
१६. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
१७. डॉ. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१८. श्री. बी. सुंदरेश्वरन, शहर अभियंता, सार्व.बांध. विभाग
१९. श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत
२०. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
२१. श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :—</u> स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००८—०९ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००७—०८ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

---

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:—</u>स्थायी समितीचे सभापती कुठे आहेत?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्तजी, आजची ही अर्थसंकल्पावरील सभा असतांनाही आपले अधिकारी सभेत उपस्थित नाहीत. हे दु:खदायक आहे. माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की, त्यांनी सर्व विभागप्रमुखांना या सभेत बोलवावे कारण की प्रत्येक विभागाशी संबंधीत असा हा अर्थसंकल्प आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांच्या वतीने स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांना व्यासपीठावर आमंत्रित केले जात आहे. त्यांनी कृपया व्यासपीठावर यावे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>सभेचे कामकाज सुरु होण्याअगोदर मी पुन्हा एकदा आयुक्त साहेबांना विनंती करतो की, सर्व अधिका—यांना सभेत बोलवावे.

<u>महापालिका सचिव :</u>—स्थायी समितीच्या वतीने जो अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे तो मा. स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी हे मा. महापौर महोदयांना सादर करतील.

**सदस्या श्रीमती मालती करोतिया, श्रीमती निना नाथानी या सभागृहातुन बाहेर गेल्या.** 

**यावेळी स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांनी अर्थसंकल्पीय अंदाज मा. महापौरांना सादर केला.**

<u>स्थायी समिती सभापती, श्री. राम पारवानी:</u>—मा. महापौर , मा. उप महापौर , मा. आयुक्त , मा. सभागृह नेता , विरोधी पक्षातील सर्व नेतेमंडळी, सर्व पक्षांचे गटनेते, सर्व समित्यांचे सभापती, सर्व सन्माननिय नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी व पत्रकार बंधु तसेच उपस्थित नागरीकांचे सन २००८—२००९ च्या अर्थसंकल्पीय विशेष महासभेमध्ये स्वागत आहे.

स्थानिक विभागात राहणा—या लोकांच्या नागरी समस्यांची सोडवणुक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली महानगरपालिका ही राज्य शासनाचा एक भाग आहे. उल्हासनगर शहरासाठी स्थापित झालेल्या या उल्हासनगर महानगरपालिकेत नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी शहरवाशियांनी ज्या सदस्यांना निवडुन दिले आहे ते सर्व सदस्य येथे उपस्थित आहेत. तसेच आपण सर्वांनी मिळुन स्थायी समितीच्या ज्या १६ सदस्यांची निवड केली आहे त्या स्थायी समिती सदस्यांकडुन तयार करण्यात आलेला अर्थसंकल्प आपणासमोर सादर करत आहे.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमुळे सन २००७—२००८ या वित्तीय वर्षाच्या पहिल्या चार महिन्याचा अर्थसंकल्प प्रशासनाच्या वतीने तयार करण्यात आला होता याची आपणांस माहिती असेलच. आपण जो अर्थसंकल्प तयार केला होता तो ऑगस्ट महिन्यापासुन लागु करण्यात आला होता. याचाच अर्थ विकास कामांची जबाबदारी हाती घेवुन आपणांस फक्त ६ महिने झाले आहेत. या अल्पशा काळात विकास कामांसाठी आम्ही जे प्रयत्न केले त्याबाबत सभागृहाला माहिती देणे जरुरीचे आहे. सर्वात प्रथम ज्या रस्त्यांच्या विकास कामाचे प्रस्ताव मंजुर झाले आहेत व ज्यांचे विकास कामास सुरुवात झाली आहे ते खालील प्रमाणे आहेत.

१) बॅ. नं. १७०० ते व्हीटीसी ग्राउंड
२) **ESI** हॉस्पीटेल ते हनुमान मंदिर
३) संत रोहिदास नगर शेजारील अंबा अपार्टमेंट ते मंगलमुर्ती अपार्टमेंट,
४) भैयासाहेब आंबेडकर नगर सोडी हाउस ते शिवसपाते पर्यंत
५) शिवसेना कार्यालय, भैयासाहेब आंबेडकर नगर ते इस्माईल यांच्या घरापर्यंत
६) आकाश चाळ ते औदयोगिक वसाहत
७) डॉ. आंबेडकर चौक ते गुरुचरण अपार्टममेंट

या सर्व रस्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरण करण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळालेली आहे.

या व्यतिरिक्त ,
१) सिरु चौक ते सोनी ड्रेसेस पर्यंतच्या रस्त्यावर पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामास सुरुवात झाली आहे.
तसेच
१) डॉ. आंबेडकर चौक ते ब्लॉक ३८० पर्यंत
२) चार्ली वेफर ते सेंचुरी रेयॉन मटेरिअल गेट पर्यंत
३) नारायणदास जग्यासी मार्ग .

या रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले आहे.

पावसाळयापुर्वी शहरातील सर्व रस्त्यांची दुरुस्ती करुन ते वाहतुकीस योग्य असे बनविण्यात आले आहेत.

- १) कृष्णमंडल समोरील भाजी मार्केटचे नुतनीकरणाचे काम शुरु झाले आहे.
- २) **उल्हासनगर १ ते ५ पर्यंतच्या सर्व रस्त्यांवर झेब्रापेटींग चा प्रस्ताव मंजूर झाला आहे.**

➢ ३) दाभाडे चौकाचे सुशोभिकरण आणि तेथे कारंजे बसविण्याचे काम सुरु झाले आहे.

१) जिजामाता उदयान
२) लाललोई उदयान
३) त्रिलोकदास उदयान
४) रोटरी उदयान
५) मनपा मुख्यालय परिसर उदयान
६) स्वामी बोधराज उदयान

या सर्व उदयानांच्या सौदर्यीकरणाचे काम सुरु झाले आहे. जिजामाता उदयान, लाललोई उदयान ही उदयाने विकसित करण्याकामी संबंधित नगरसेवकांनी जी आस्था दाखविली आहे त्यावरुन असे वाटते की, कॅम्प नं. ४—५ मध्ये राहणा—या लोकांच्या मनोरंजनासाठी लवकरच अतिशय चांगले असे ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

डॉल्फीन क्लब पासुन साईबाबा मंदिर शांतीनगर पर्यंत तयार करण्यात आलेल्या रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकरणा मार्फत आयोजित केलेल्या उर्जा विकास स्पर्धेत उल्हासनगर महानगरपालिकेस सन २००७—२००८ चे पारितोषिक प्राप्त झाले आहे ही आपणा सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.**

शहरवासीयांकडे पाणी बिलाची रक्कम प्रदिर्घ काळापासुन थकित आहे. या रक्कमेवर व्याज आकारल्याने नागरीक बिलाची रक्कम भरण्यास मागेपुढे करतात. हे लक्षात घेता सन २००७—२००८ मध्ये व्याजाची रक्कम माफ करण्याचा महत्वपुर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सर्व नगरसेवकांना विनंती आहे की याबाबतची माहिती आपल्या प्रभागवाशियांना दयावी जेणेकरुन त्यांना सुविधा मिळेल. व महापालिकेची थकित रक्कम ही वसुल होवु शकेल.

साफसफाई, पाणी, रस्ते, विद्युत या सर्व नियमित सुविधा आहेत. शहरवाशियांकडुन या संबंधी तक्रारी येणे स्वाभाविक आहे. ही गोष्ट लक्षात घेवुन एक महत्वपुर्ण निर्णय घेतला गेला आहे तो म्हणजे कॉल सेंटरची स्थापना करणे. या योजनेद्वारे आपण एक विशेष नंबरवर फोन करुन आपली तक्रार नोंदवु शकतो. या सुविधेमुळे कागदावर तक्रार लिहुन पाठविणे, ही बाब भुतकाळात विलीन होणार आहे.

याबरोबरच नागरी सुविधा केंद्राचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेत टॅक्स भरण्यासाठी लोकांना लांब लांब जावे लागते किंवा लांबच लांब रांगेत उभे रहावे लागु नये म्हणुन शहराच्या कित्येक भागांमध्ये संगणकीय सुविधा प्रदान करुन देण्याचा निर्णय घेतला आहे.

नगररचना विभागामध्ये प्राप्त होणा—या बांधकाम परवानगी अर्जाची छाननी तसेच परवानगी देण्यास सुध्दा संगणकीय योजना सुरु करण्याची योजना आहे.

वरील सर्व कामांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत व लवकरच सर्व सुविधा शहरवासियांना प्रदान केल्या जातील.

शहर विकासासाठी कर्मचारी वर्ग हा कार्यतत्पर असणे आवश्यक आहे. ही गोष्टी लक्षात घेता कर्मचा—यांच्या प्रदिर्घ काळापासुन प्रलंबित असलेल्या काही मागण्या आम्ही पुर्ण केल्या आहेत, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.........

१) रजा प्रवास भत्ता प्रतिवर्षी १०००/— वरुन १६००/— रुपये करण्यात आला आहे.
२) वैदयकीय भत्ता प्रतिमाह ५०/— वरुन १००/— रुपये करण्यात आला आहे.
३) धुलाई भत्ता प्रतिमाह ३०/— वरुन ७५ /— रुपये करण्यात आला आहे.
४) घाणकाम भत्ता प्रतिमाह ३०/— वरुन ७५/ रुपये करण्यात आला आहे.

कित्येक वर्षापासुन बंद असलेल्या व्हिनस चौकातील कारंज्याचे नविनीकरण करण्यात आले आहे व त्याचे लवकरच उद्घाटन केले जाईल. त्याचे सौंदर्यीकरण पाहुन मन प्रफुल्लीत होवुन उठते. त्याबाबत श्री. आयलानी साहेब व श्री. शिर्के साहेब यांना धन्यवाद दयावे तेवढे थोडेच आहेत.

संपुर्ण महाराष्ट्रात विज भारनियमनाची समस्या आहे, हे आपणांस माहित आहेच. आणि त्यामुळे पंपींग स्टेशन कार्यक्षमतेने काम करु शकत नाही, ज्याचा परिणाम पाणी पुरवठयावर होत होता. आणि ही समस्या सोडविण्यासाठी आम्ही आनंद नगर पंपिंग स्टेशन, नेताजी पंपिंग स्टेशन, चोपडा पंपिंग स्टेशन, दसहरा मैदान उत्तर व तक्षशिला पंपिंग स्टेशन या सर्व पंपींग स्टेशनावर ७७ लाख रुपये खर्चुन डबल फिडरची व्यवस्था

केली आहे. आणि त्यामुळे पाणी पुरवठा व्यवस्थेमध्ये मोठया प्रमाणावर सुधारणा झाली आहे. पुढील वर्षी म्हणजे सन २००८–०९ मध्ये दसहरा मैदान (दक्षिण) व पटेल नगर या ठिकाणी सुध्दा डबल फिडरची व्यवस्था केली जाईल.

आपल्या शहरात आधुनिक सुविधा असलेले रुग्णालय नाही. अशा वेळी रुग्णास आवश्यकता पडल्यावर ठाणे किंवा मुंबई येथिल मोठया रुग्णालयात धाव घ्यावी लागते. मागील अर्थसंकल्पात दिलेल्या आश्वासनानुसार रुग्णवाहिका खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजुर केला आहे. महापालिकेचे आवश्यक कार्य व कर्तव्य लक्षात घेता एक शववाहिनी खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजुर केला आहे. थोडयाच दिवसांनी या दोन्ही सुविधा शहरवासियांना प्राप्त होतील.

शहरामध्ये परिवहन सेवा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला होता, त्यानुसार निविदा सुध्दा मागविण्यात आल्या होत्या, परंतु संपुर्ण मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रासाठी एकत्रित परिवन सेवा सुरु करण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने आमच्या प्रस्तावास मंत्रालयातुन मंजुरी अप्राप्त असून मंजुरी प्राप्त होताच बस सेवा सुरु करण्यात येईल.

सन २००७–०८ च्या अंदाजपत्रकातील मुख्य योजना होती जेएनएनयुआरएम योजना या योजनेत १८७ कोटी रुपयांची विकास कामे समाविष्ट करण्यांत आली होती परंतु काही दिवसापुर्वी या योजनेतील एक भागास महाराष्ट्र शासनातर्फे मान्यता प्राप्त झाली आहे व तीला अंतिम मान्यतेसाठी केंद्रशासनाकडे पाठविले आहे. आम्हांला अशी आशा आहे की या योजनेनुसार विकास कामे लवकरात लवकर चालु होतील. या विलंबामुळे सन २००७–०८ चा सुधारित अर्थसंकल्प १४७.८० कोटी पर्यंत आणण्यात आला आहे.

<u>आता जावु या सन २००८–२००९ कडे,</u>

सन २००८–०९ साठी उत्पन्न व खर्चाचा जो अंदाज स्थायी समिती समोर प्रशासनातर्फे ठेवण्यात आला होता तो याप्रकारे आहे.....

**A-B-C बजेट उत्पन्न : ३२६.७६ कोटी**
**A-B-C** बजेट खर्च : ४१६.६४ कोटी

प्रशासनाच्यावतीने सादर करण्यांत आलेल्या खर्चाच्या अंदाजात एमआयडीसी चे थकित पाणी बील, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे कर्ज व अन्य देणी यांचा समावेश आहे. उत्पन्न व खर्चाचे अंदाजाबरोबर प्रशासनाने जकात, मालमत्ता कर, पाणी व अन्य दरांमध्ये वाढ करण्याचे प्रस्ताव सुध्दा ठेवले होते. स्थायी समितीच्या सदस्यांनी या सर्व मुद्दयांवर विचार करुन व दरांमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव नामंजुर करुन जो अर्थसंकल्प तयार केला आहे, तो याप्रकारे आहे....

<u>उत्पन्न</u> :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जकात | : | ९४.५१ कोटी |
| २) | हाउस टॅक्स | : | ५५.०० कोटी |
| ३) | पाणी पटटी | : | ५०.५० कोटी |
| ४) | अनुदान | : | ४.६० कोटी |
| ५) | Miscl.संकिर्ण | : | ५९.७७ कोटी |
| | Total एकुण | : | २६४.३८ कोटी |
| | JNNURM योजना | : | १७१.९८ कोटी |
| | Total एकुण | : | ४३६.३६ कोटी |

<u>खर्च</u> :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पगार भत्ते आणि प्रशासकीय खर्च | : | ४३.२३ कोटी |
| २) | **MIDC** | रू | ३३.४० कोटी |
| ३) | **Loan Repayment** | रू | ३३.६९ कोटी |
| ४) | लाईट बील | रू | ३.२५ कोटी |
| ५) | सार्वजनिक आरोग्य | : | ७.३६ कोटी |
| ६) | शिक्षण मंडळ | : | ७.४९ कोटी |
| ७) | Govt – other dues | : | १६.८५ कोटी |
| ८) | दिवाबत्ती विभाग | : | २.०९ कोटी |
| ९) | गार्डनस | : | २.५२ कोटी |
| १०) | अग्निशमन | : | ०.८७ कोटी |

| | | | |
|---|---|---|---|
| ११) | डिस्पेन्सरी आणि आरोग्य विषयी कार्यक्रम | : | १.४८ कोटी |
| १२) | पाणी पुरवठा | : | ६.१३ कोटी |
| १३) | भुयारी गटार | : | २.१६ कोटी |
| १४) | जल नि:सारण | : | ३७.४६ कोटी |
| १५) | बांधकाम | : | ४७.४३ कोटी |
| १६) | प्रभाग समिती | : | ५.२४ कोटी |
| १७) | Miscl. | : | ६.८९ कोटी |
| १८) | Total | रू | २५७.५४ कोटी |
| | JNNURM योजना | रू | १७८.७९ कोटी |
| | Total | रू | ४३६.३३ कोटी |

कर वाढीसंबंधीचा जो निर्णय घेतला आहे त्याची माहिती याप्रकारे आहे.....

१) मालमत्ता कर : प्रॉपर्टी टॅक्स मधील वाढ नामंजुर करण्यात आली आहे.

२) पाणी और टॅंकर चार्ज : या दोन सेवेमध्ये कुठलीच वाढ होणार नाही.

३) **फायर फायटिंग चार्जेस : या सेवेचे महत्व लक्षात घेवुन कुठलीच वाढ केलेली नाही.**

४) जकात : मागील वर्षी वेगवेगळया वस्तुच्या पाच गटांमध्ये वाढ केली होती.
ही वाढ कमी करण्यासाठी उल्हासनगर मॅनीफॅक्चर्स असोसिएशन तसेच अन्य व्यापारी मंडळांच्या वतीने विनंती प्राप्त झाली होती. या सर्व प्रतिनिधींचा मान ठेवुन तसेच व्यापा—यांचे हित लक्षात घेवुन आम्ही काही दरात घट केली आहे, परंतु शहराच्या हितासाठी **JNNURM** योजनेचे महत्व लक्षात घेवुन तुटीची भरपाई करण्याच्या हेतुने इतर काही वस्तुंच्या दरांमध्ये वाढ करुन त्याची पुर्तता केली आहे. जकात विषयीची माहिती स्थायी समितीच्या ठरावात दिली आहे आणि त्याच्या प्रती आपणा सर्वांना प्राप्त झाल्या आहेत.

सन २००८—२००९ च्या अंदाजपत्रकामध्ये विकासाचे जे मुद्दे समाविष्ट आहेत ते याप्रकारे आहेत.......

१ ) रस्ते विकास : शहराची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी पायाभुत सुविधा तसेच रुंद रस्ते, नाली व पुल इत्यादी तयार करणे आवश्यक आहेत, आणि यासाठी अंदाजे ५३ रस्ते तयार करण्याची योजना आहे त्यापैकी काही रस्ते पुढीलप्रमाणे आहेत.......

१) फकड मंडली ते डॉ. राय यांचा दवाखाना
२) बस स्टाप ते बिर्ला गेट
३) साई कला अपार्टमेंट ते ब्लॉक ६३०
४) बॅरेक १९३९ ते १९६७
५) बॅरेक २०५८ ते २०५९ तसेच बॅरेक २१०१ ते २१०८
६) स्वामी शांती प्रकाश हॉल ते श्री किशन यांचे दुकान
७) सोनी ड्रेसेस ते बस स्टॉप पर्यंत एम—३५०—रस्ता.
८) बॅरेक नं. ६७४ शांती व्हीला पासुन साई द्वार अपार्टमेंट पर्यंत एम—३५० रस्ता.
९) धीरज टॉवर ते बॅक ऑफ बडोदा पर्यंत एम—३५० रस्ता
१०) ४४४ गार्डन भाजी मार्केट उल्हासनगर १ ते पिंकी अपार्टमेंट एम—३५० रस्ता
११) जवारक हुसेन लाल खान यांचे घरापासुन ते पंजाबी कॉलनी रिक्शा स्टॅंड एम—३५० रस्ता
१२) पंजाबी कॉलनी रस्ता ते शिवगंगा शिवसागर ते पंचायत हॉल पर्यंत एम—३५० रस्ता
१३) सेवल ठाकूर हाउस ते बॅरेक नं. १९११ ओटी सेक्शन पर्यंत एम—३५० रस्ता
१४) झुलेलाल चौक ते हरी ओम अपार्टमेंट मार्गे अनंदपुरी दरबार सेक्शन ३९ पर्यंत एम—३५० रस्ता
१५) डॉ. आंबेडकर यांच्या पुतळयापासुन ते गॅस गोडाउन पर्यंतचा एम—३५० रस्ता
१६) ब्लॉक ७०७ लक्ष्मी विला ते ब्लाक ७७८ श्री राम भवन पर्यंतचा रस्ता एम—३५० रस्ता
१७) स्टेशन रस्ता ते नंदलाल आहुजा कारखाना पर्यंत तसेच नारायण जग्यासी मार्ग एम—३५० रस्ता
१८) साई पार्क ते दशहरा मैदना पर्यंत एम—३५० रस्ता
१९) उल्हासनगर स्टेशन ते नंदलाल फॅक्टरी एम—३५० रस्ता
२०) बॅ.नं. १०७४ ते वडोलगाव चर्च पर्यंत , सेंट जोसेफ चर्च ब्रीज जवळ एम—३५० रस्ता
२१) न्यु सिध फॅक्टरी ते आशा सिलीकेट
२२) नागेश्वर मंदिर ते ओ.टी. चौक
२३) गायकवाड पाडा ते नाका नं. ११ टॅंकर रस्ता
२४) कुर्ला कॅम्प चौक ते हनुमान मंदिर
२५) गणेश नगर ३९ सेक्शन ते रविंद्रनगर
२६) मराठा सेक्शन —तळेकर यांच्या घरापासून माळकर यांच्या घरापर्यंत
२७) सरस्वती नगर ते काजल पेट्रोल पंप
२९) साई कला अपार्टमेंट ते मुद्रा
३०) गुरुव्दारा ते बाबासाहेब आंबेडकर चौक , उल्हासनगर
३१) बाबासाहेब आंबेडकर चौक ते रेल्वे रुळा पर्यंत, उल्हासनगर —४
३२) इंदिरा गांधी मार्केट ते राधा कृष्णा चौक
३३) राम मंदिर पासुन शहाड गावठाण रिटेनिंग वाल आणि सौदर्यीकरण

३४)	हिरा घाट टेम्पो स्टॅन्ड ते स्मशान भुमी चौक पर्यंत
३५)	झुलेलाल चौक (गाउन बाजार) ते हरिओम अपार्टमेंट मार्गे आनंदपुरी दरबार
३६)	कॅम्प नं. १ बस स्टॉप पासुन बिर्ला गेट रस्त्याचे रुंदीकरण आणि कॉक्रीटीकरण
३७)	प्रभाग क्र. ७० मधील गुरुद्वारा ते शिवसेना शाखा, तानाजी नगर, उल्हासनगर–५
३८)	तानाजी नगर, शिवसेना शाखा ते सेक्शन ४० पर्यंत एम २५० रस्ता
३९)	प्रभाग क्र. ६४, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर–४ येथिल ब्लॉक नं. ए–८९ ते ब्लॉक नं. ए १०१ पर्यंत एम २५० रस्ता
४०)	प्रभाग क्र. ५ मधील घुले हाउस ते मराठे हाउस (कल्व्हर्ट) पर्यंत एम २५० रस्ता
४१)	प्रभाग क्र. ७६ मधील राजेश शेलार हाउस ते शिवसेना शाखा गायकवाड पाडा पर्यंत एम २५० रस्ता
४२)	प्रभाग क्र. ६४ मधील ब्लॉक नं. १२९ ते ब्लॉक नं. १३५ पर्यंत एम २५० रस्ता
४३)	प्रभाग क्र. ७५ मधील संतोष पाटोले शॉप ते लोखंडे हाउस पर्यंत
४४)	प्रभाग क्र ७६ अकाश किराणा स्टोअर्स ते विठ्ठल मंदिर
४५)	आंबेडकर पुतळयापासुन गॅस गोडाउन पर्यंत, आंबेडकर नगर, लालचक्की शेजारी, उल्हासनगर–५
४६)	प्रभाग क्र. ६४ मधील कुर्लाकॅम्प ब्लॉक ३३६ ते ३५३ पर्यंत विकास आराखडयातील रस्ता
४७)	प्रभाग क्र. ४८ मधील वाको कंपाउड मधील अंतर्गत रस्ता
४८)	बॅरेक क्र. १८७६ ते बलविरसिंग गुरुद्वारा प्रभाग क्र १७
४९)	एकता नगर ते चोडेकर पाडा/दुर्गादेवी पाडा
५०)	उल्हासनगर–४ येथिल संभाजी चौक ते संतोष सिंग यांच्या वरवाटी पर्यंतचा ३५० चा रस्ता
५१)	परमानंद यांच्या वरवारी पासून ते संभाजी चौक पर्यंतचा रस्ता
५२)	दुनिचंद कॉलेज ते महात्मा फुले चौक, उल्हासनगर–१
५३)	निलकंठ पॅलेस, गार्डनच्या सभोवतालचा परिसर, उल्हासनगर–१ एम २५० रस्ता

महानगरपालिकेस शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करण्यासाठी जवळ जवळ ५ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. पुढील वर्षी सुध्दा ५ कोटी प्राप्त होतील अशी अपेक्षा आहे. या पैश्यातुन शहरातील मुख्य रस्ते, हिराघाट उल्हासनगर–३ पासुन मठमंदिर उल्हासनगर–५ पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करुन पायाभुत सुविधा अधिक बळकट केल्या जातील.

उल्हासनगर शहरातील सीमेस लागुन असलेला प्रभाग क्र. ७६ जो नागरीक सुविधांपासुन वंचित होता, त्या प्रभागात आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यासाठी २५ लाख रुपयाचे विशेष तरतुद करण्यात आली आहे.

शहरातील रस्त्यांचे पावसाळयापुर्वी डांबरीकरण करण्यासाठी तसेच रस्त्यांच्या लहान मोठया दुरूस्तीसाठी १ कोटी रुपयांची तरतुद तसेच मुख्य रस्ते तयार करण्यासाठी साडे चार कोटी रुपयांची तरतुद ठेवण्यात आली आहे.

शहर विकास आराखडयानुसार पुलाचे रस्ते व इतर रिझर्वेशनची अंमलबजावणी करण्यासाठी १.२५ कोटी रुपय ठेवण्यात आले आहे. **महापौर व आयुक्तांच्या बंगल्यासाठी ५० लाख रुपयाची तरतुद ठेवली आहे.**

श्री. गणेश उत्सवाच्या वेळी गणेशमुतीच्या विसर्जनाच्या सुविधेसाठी १० लाख रुपयाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

<u>नगरसेवक निधी</u> :

नागरी सुविधेसंबंधीत नागरीकांच्या प्रभागातील प्रतिनिधींकडुन असलेल्या अपेक्षिानुसार नगरसेवक निधीमध्ये ५ लाखाची वाढ करण्यात आली आहे. हा निधि आता १० लाख झाला आहे. या व्यतिरिक्त प्रभाग समितीमध्ये वेगवेगळया सुविधांसाठी वेगवेगळी रक्कम दर्शविली जाते त्याबाबत कार्यवाही करण्यासाठी होत असलेली अडचण लक्षात घेता प्रभाग समितीमध्ये एकच मुख्य लेखाशिर्ष ठेवला आहे. ''अ'' अंदाजपत्रकामध्ये ३ लाख रुपये व ''क'' अंदाजपत्रकामध्ये २ लाख रुपये याप्रमाणे प्रत्येक नगरसेवक आपल्या प्रभागात १५ लाख खर्चाचे विकास काम करु शकतो.

नगरसेवक निधी वापरण्यासाठी जो निर्णय या वेळी घेतला आहे ते असे आहेत.... प्रत्येक नगरसेवकास लॅपटॉप उपलब्ध करुन दयायचा आहे या सुविधेमुळे सभेशी संबंधीत सूचना, ठराव व इतिवृत्त तसेच इतर माहिती इ–मेलच्या माध्यमातुन दिली जाईल त्यामुळे स्टेशनरी व छपाईचा खर्च बंद होईल.

<u>निर्मल **MMR** अभियान</u> : आपणा सर्वांना हे ऐकुन आनंद होईल की, महानगर (एमएमआरडीएचे) आयुक्त श्री. रत्नाकर गायकवाड साहेब यांच्या अथक प्रयत्नांने उल्हासनगर शहरातील वेगवेगळया भागात जवळ जवळ २४०० बैठकीचे शौचालय बांधण्याचा प्रस्तावास मंजुरी मिळालेली आहे. ज्यासाठी जवळ जवळ ३५ कोटी रुपये सन २००८–२००९ मध्ये अनुदानाच्या रुपाने आपणांस प्राप्त होण्याची शक्यता आहे.

ज्या नागरीकांच्या घरात शौचालय नाही अशा नागरीकांना आपल्या घरात शौचालय बांधण्यासाठी एमएमआरडीए तर्फे ४५०० रुपये अनुदानाच्या रुपाने मंजुर करण्याची योजना लवकरात लवकर सुरु केली जाईल. या योजनेस प्रोत्साहन देण्यासाठी महानगरपालिकेच्यावतीने प्रत्येक शौचालयासाठी २५०० रुपये अनुदान देण्याची तरतुद अर्थसंकल्पात ठेवली आहे.

<u>लाईट व्यवस्था</u> : शहरात लावण्यात आलेल्या पथदिव्यांचे स्वंयचलन करण्यात आलेले आहे. उर्वरीत पथदिव्यांचे पुढील वर्षी स्वंयचलन करण्याची योजना आहे. या सुविधेमुळे निर्धारीत वेळेत रस्त्यावरील दिवे आपोआप लागतील व निर्धारीत वेळेत बंद होतील त्यामुळे मनुष्य शक्तीचा वापर ब–याच अंशी कमी होईल.या

स्वंयचलित योजनेस प्रोत्साहन देण्यासाठी पुढील वर्षी मध्यवर्ती स्वंयचलन करण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना यशस्वी करण्यासाठी महापालिका मुख्यालयातुन संपुर्ण शहरातील पथदिवे चालु तसेच बंद केले जावु शकतील. यासाठी ७० लाख रुपयांची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.

महिला बाल कल्याण : आम्ही मागीलवर्षी अर्थसंकल्पात म्हटले होते की, आमच्या नगरसेविका श्रीमती मीना सोंडेजी यांच्याकडे फार मोठया योजना आहेत. त्यानुसार श्रीमती मीना सोंडेजी यांनी महिलांना संगठित करुन '' चक दे युएमसी संघ '' निर्माण केला आहे. हा संघ प्रत्येक दिवशी महिला व बालकल्याणसाठीएखादी नविन योजना कशी सुरु करता येईल हे शोधत असते. श्रीमती मिनाताई सोनेजी यांच्या अध्यक्षतेखाली ज्या योजना सुरु करण्यात आली आहे ती याप्रकारे आहे १) गरीब व विधवा महिलांना शिलाई मशिनचे वाटप २) दारिद्रय रेषेखाली राहणा—या महिलांसाठी वेगवेगळे व्यवसायिक प्रशिक्षण देणे. ३) बालवाडी चालविणे ४) विधवा महिलांचे पुर्नविवाह करण्यासाठी अनुदान ५) बालकामगार प्रथा बंद करणे ६) १ ते १० वर्षापर्यंतच्या लहान मुलांना दत्तक घेणा—या कुटुंबास अनुदान देणे. ७) बाल सुधार गृहात इन्व्हर्टर या सर्व योजनेस बढावा देण्यासाठी यावर्षी सुध्दा ३५ लाख रुपयांची तरतुद ठेवली आहे.

अग्निशमन : अग्निशमन दला मध्ये नविन वाहन दाखल करण्यासाठी २५ लाख रुपये तसेच फायर स्टेशनच्या दुरुस्तीसाठी १० लाख रुपये ठेवले आहेत.

कल्याणकारी योजना , खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम : सामाजिक दृष्टीकोनातून आवश्यक कल्याणकारी योजना व खेळ सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी जो निधी उपलब्ध केला गेला आहे तो याप्रकारे आहे.....

| | | |
|---|---|---|
| १) | दुर्बल घटक वसाहतींमधरील सुविधा | २०३ लाख |
| २) | अपंग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना | २० लाख |
| ३) | मनोरुग्ण व कुष्ठरोगी कल्याण | ५ लाख |
| ४) | एडस, टि.बी. तसेच इतर रोगांचे निवारण | ५ लाख |
| ५) | मलेरिया व डेंग्यु प्रतिबंधात्मक उपाय | ५० लाख |
| ६) | एन्टीरॅबिक उपचार | २० लाख |
| ७) | फॅमिली प्लानिंग व वॅक्सीनायझेशन | १८ लाख |
| ८) | खेळ | १५ लाख |
| ९) | पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण | १५ लाख |
| १०) | राष्ट्रीय युवा धोरण | १५ लाख |
| ११) | सांस्कृतिक कार्यक्रम | १० लाख |

या व्यतिरिक्त शहरातील वेगवेगळया सेवा चालविण्यासाठी प्रत्येक विभागातुन आवश्यक योजना तयार केल्या आहेत. ज्याची माहिती आपणांस दिलेल्या अंदाजपत्रकामध्ये उपलब्ध आहे. ज्याप्रकारे स्थायी समितीमध्ये सर्व पक्षांच्या सदस्यांनी कोणत्याही प्रकारचा विरोध न करता हा अर्थसंकल्प सर्वानुमते मंजुर केला आहे, त्यास अंतिम मंजुरी सुध्दा सर्व संमतीने दिली जाईल, अशी आशा ठेवुन मी आपले निवेदन संपवितो.

जय हिंद । जय महाराष्ट् । जय भिम । जय झुलेलाल ।

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांचे मी अभिनंदन करु इच्छितो. कारण की ते असे एक सभापती आहेत जे दुस—यांदा आमच्यासमोर अर्थसंकल्प सादर करत आहेत.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांचे मी अभिनंदन करु इच्छितो त्यांनी एका वर्षात दोन वेळा अर्थसंकल्प सादर केला आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—मा. महापौरजी, स्थायी समितीच्या सभापतींचे या बाबीकडे लक्ष वेधु इच्छितो की, उल्हासनगर—५ येथे जे भाजी मार्केट आहे, त्याची स्थिति अतिशय खराब आहे. या अर्थसंकल्पामध्ये त्याच्या दुरुस्तीसाठी सुध्दा तरतुद केली जावी. कॅम्प नं. ४ येथिल भाजी मार्केटच्या दुरुस्तीचे काम आता सुरु झाले आहे. कॅम्प नं. ३ येथे पप्पु गार्डन आहे त्याची स्थिती फारशी चांगली नाही. त्यासाठी सुध्दा अर्थसंकल्पात तरतुद केली जावी.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**सन्माननिय महापौरजी आणि आयुक्त साहेब, आपण संपुर्ण उल्हासनगर शहरातील विकास कामांवर अर्थसंकल्पामध्ये भर दिला आहे त्याबद्दल आपले अभिनंदन करु इच्छितो. त्याचबरोबर माझी एक नम्र विनंती आहे की, गुलशन नगर करिता काही तरतुद नाही. तसेच चार्ली वेफर्स ते सेंच्युरी रेयॉन पर्यंतचा रस्ता जास्तीत जास्त ४०० ते ५०० फुट लांबीचा आहे. त्या रस्त्यावर नागरीकांची फारशी ये—जा नाही. वाहतुकीची वर्दळ नाही. वाहतुकीची वर्दळ नसतांनाही तो रस्ता तयार केला जात आहे. जे मुख्य रस्ते आहेत, ज्यावरुन नागरीकांची ये—जा आणि वाहतुकीची वर्दळ असते. ते रस्ते अतिशय खराब स्थितीत आहेत. त्यांची दुरुस्ती केली जात नाही. चार्ली वेफर्स ते सेंच्युरी रेयॉन पर्यंतचा रस्ता का तयार केला जात आहे. मी वारंवार आपणाकडे तक्रार केलेली आहे. तरीही आणखी हे एक निवेदन मी मा. महापौर व आयुक्त साहेबांना देत आहे.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**श्री. बागुल साहेब, गुलशन नगर बरोबर आणखीही काही नगर आपल्या प्रभागात आहेत. त्यांच्याकडेही लक्ष असु दया. शहरामध्ये केवळ गुलशन नगरच नाही. जेव्हा—तेव्हा आम्ही गुलशन नगरबाबतीतीलच तक्रार ऐकत असतो. आपल्या प्रभागामध्ये बरेचसे विभाग येतात. त्यांच्याकडेही आपले लक्ष असु दया.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**प्रशासनाने उल्हासनगरमधील सर्व विभागांकडे लक्ष दिले आहे. मात्र गुलशन नगरमध्ये गेल्या १५ वर्षापासुन लक्ष दिले नाही. म्हणुन मी बोलत आहे. कॅम्प नं. ५ येथे आशेळे गाव आहे तेथिल रस्त्यासाठी २५ लाख रुपयांची तरतुद करण्याची आपणांस आठवण झाली. म्हणुनच मी गुलशन नगरची आठवण करुन दिली.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**मा. महापौरजी, मा. सदस्य श्री. रविंद्र बागुल यांना मी आठवण करुन देवु इच्छितो की, गुलशन नगर, गुलशन नगर असा उल्लेख करत दोन तीन वेळा त्यांनी विकास कामांबाबत येथे मुद्दा उपस्थित केला. त्याबद्दल मी त्यांचे खरोखरच अभिनंदन करतो. व त्यांना धन्यवादही देतो. त्यांना कदाचित माहिती नसेल.

यावेळी श्री. रविंद्र बागुल यांनी टाळया वाजवुन त्यांना प्रतिसाद दिला.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**टाळया वाजवु नका. नंतर तुम्हांला त्या वाजवता येणार नाहीत. तुमच्या माहितीसाठी सांगतो. सन्माननिय माजी सदस्य श्री. चंदाराम मोकल, श्री. वाघे शामु व मी असे तीन सदस्य पॅनलमध्ये होतो. मंलगगड यात्रेच्या दिवशी मा. आमदार श्री. पप्पु कालानी यांच्या हस्ते नारळ फोडुन रस्त्याच्या कामाची सुरुवात झाली होती. गुलशन नगरच्या त्या रस्त्याचे काम मंजुर केले आहे. तो रस्ता अजुनपर्यंत का झालेला नाही? मा. आमदारांनी नारळ वाढवुन कामाचा शुभारंभ केलेला असतांनाही त्या रस्त्याचे काम सुरु झाले नाही. हे फार मोठे गुढ आहे. त्यासाठी श्री. बागुल यांना मी सांगु इच्छितो की गुलशन नगर पुढील चार्ली वेफर्स ते सेंच्युरी रेयॉन मटेरियल गेटपर्यंतच्या या रस्त्याचे काम मंजुर झालेले आहे. त्याबाबत गेल्या चार वर्षापासुन सातत्याने मी प्रयत्न करत आहे. तत्कालीन आयुक्त श्री. पोखरकर साहेब, श्री. रामनाथ सोनवणे साहेब, श्री. डी.एस. पाटील साहेब, त्यानंतर आलेले श्री. सदाशिव कांबळे साहेब, यांचेकडे तर हिंगोली ते उल्हासनगर असा, मी सातत्याने प्रयत्न करत होतो तरी सुध्दा ते काम मंजुर झाले नाही, त्या कामाचा शुभारंभ झाला नाही. परंतु आता सन्माननिय आयुक्त श्री. समीर उन्हाळे सो. आल्यानंतर त्या रस्त्याच्या कामाची निविदा मंजुर होवुन कामास सुरुवात करण्यात येत आहे. कारण की, त्या रस्त्यावर दोन दोन फुट खोल खड्डे आहेत. सभोवताली झोपडपट्टीचा विभाग आहे. चार्ली वेफर्स ते आयडीआय कंपनीच्या गेटपर्यत जवळ जवळ ७० ते ८० कुटुंबे राहतात. रात्रीच काय परंतु दिवसासुध्दा त्या ठिकाणी रिक्षाच काय कोणतेही वाहन जावु शकत नाही. तेथुन विदयार्थांना आणि लोकांना कॉलनीमधुन पायी जावे लागते. म्हणुनच त्या रस्त्याचे काम मंजुर करुन घेतलेले आहे. त्याबद्दल मा. महापौर व आयुक्त साहेबांना मी धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे सन्माननिय नगरसेविका श्रीमती नेहा भोईर यांच्या प्रभागातील राम मंदिरापर्यंतच्या रस्त्याबाबत स्थायी समिती सभापतींना माझी एक विनंती आहे की, राम मंदिर परिसराचे सुशोभिकरण करण्याकरिता काही ना काही तरतुद करावी.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:—**सन्माननिय महापौरजी व आयुक्त साहेब, श्री. दिलीप गायकवाड साहेबांनी ही जी चर्चा केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मा. महापौर व आयुक्त साहेबांनी स्वत: एक वेळ गुलशन नगरला भेट दयावी अशी मी त्यांना विनंती करतो.

**सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, स्थायी समिती सभापती, सर्व नगरसेवक बंधु व भंगिनींनो, आयुक्त साहेब, मी तुम्हांला हे सांगु इच्छितो की, शहरातील एक मुख्य रस्ता जो सेवा सदनापासुन मयुर हॉटेल पर्यंत येतो. या रस्त्यावर पावसाळयामध्ये तीन फुट उंचीपर्यंत पाणी साठते. या रस्त्यावरुन आमचे जे नगरसेवक बंधु पावसाळयामध्ये जा ये करतात त्यांना हे माहित असेलच. स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी ही वस्तुस्थिती पाहुन सुध्दा न पाहिल्यासारखे करत आहेत. हा जो रस्ता आहे तो शहराच्या मधोमध आहे. त्याचे काम होत नसल्यामुळे आमच्यावर फार मोठा अन्याय होत आहे. जेथे आवश्यकता नाही तेथे रस्त्याचे काम होत आहे. सिरु चौक येथे पेवर ब्लॉक बसविले जात आहे काय तेथे पावसाळयात पाणी भरते काय? तो टेकडीचा विभाग आहे. परंतु मयुर हॉटेल जवळ तीन तीन फुट उंचीपर्यंत पाणी साठते. स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी हे बोगस अर्थसंकल्प सादर करत आहेत. शहरात कोठे आणि किती पाणी भरते हे त्यांना काही दिसत नाही काय? माझ्या या प्रश्नाचे जर कुणी उत्तर देवु इच्छित असेल तर त्यांनी उभे राहुन उत्तर दयावे. हे बोगस रस्त्यांची कामे करत आहेत. यासाठी यांच्याविरुध्दात चौकशी बसविली जावी.

**सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर / सदस्य श्री. राजु जग्यासी:—** शेम, शेम, शेम...............

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आजचा हा अर्थसंकल्प पोकळ, निष्क्रिय सादर केल्याबद्दल आमच्या आरपीआय, राष्ट्रवादी कॉग्रेस आणि मनसे या पक्षांचा त्यास विरोध आहे. या अर्थसंकल्पामध्ये काही रस्त्यांची कामे प्रस्तावित केली आहेत. परंतु ते रस्ते नगरसेवकांचे चेहरे पाहुन पक्षपातीपणे घेतलेले आहेत. गुरुनानक शाळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत सिमेंट कॉक्रिटचा रस्ता तयार करण्यासाठी कॅम्प नं. ४ येथिल हा रस्ता अर्थसंकल्पात घेतलेला नाही. त्याच प्रमाणे हाच रस्ता व्हाया संतोष सिंग वखार मार्गे ब्लॉक ए २९० पर्यंतचा रस्ता अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट करण्यात यावा. कारण की स्थायी समिती सभापती अर्थसंकल्प वाचत असतांना सत्ताधारी सदस्य बाके वाजवत होते. परंतु या अर्थसंकल्पामध्ये काय त्रुटी आहेत, आणि तो कसा पोकळ आणि निष्क्रिय आहे ते मी त्यांना सागु इच्छितो. हा अर्थसंकल्प अतिशय हीन दर्जाचा आहे असेच आम्हांला म्हणायचे आहे. मा. महापौरजी, सन २००८—२००९ चा हा जो अर्थसंकल्प येथे सादर करण्यात आलेला आहे तो नेहमीप्रमाणे कुठलीही कर वाढ न सुचविता थोडस औदार्य दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे कुठलीही कर वाढ करायची नाही, आणि दुसरीकडे मोठ मोठी विकासकामे करण्याचे गाजर शहरवासियांना दाखवायचे. हे नेहमी सतत होत असते. उल्हासनगरची पाणी योजना ही पाण्यात जात असते. पण औदार्य दाखविण्यासाठी कुठलीही दरवाढ पाणी दरात सुचविलेली नाही. तसेच मालमत्ता दरात देखील कुठलीही दरवाढ सुचविलेली नाही. सन २००७—०८ ची पाण्याची वसुली ९ कोटी इतकी आहे. तर मालमत्ता कराची वसुली १६.३१ कोटी इतकी आहे. उत्पन्नाचे एकमेव साधन म्हणजे जकातीचा ठेका आणि त्यामध्ये नागरी सुविधा कसे करणार हा प्रश्न आहे. दरवर्षी प्रमाणे प्रशासनाने टॅकर भाडे हे नाममात्र कराने मोफत असे सुचविलेले आहे. मला येथे असे म्हणायचे आहे की, टॅकरमुक्त शहर झाले पाहिजे. शहरातील जे लोक पाणी पुरवठयाबाबत फसवेगिरी करतात, त्यांना टॅकर देणे अयोग्य आहे. शहर टॅकर मुक्त केले पाहिजे, टॅकर मुक्त केले पाहिजे. आणि जर तुम्ही त्यांच्याकडुन पैसे घेत असाल तर ते फसवेगिरी करुन पाणी विकतील व पैश्याचा अपव्यय होईल.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**आपण पैसे दया, आम्ही टॅकरवर शुल्क लावतो.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—**मी बोलत आहे,मला बोलु दया, आपणांस जे काही बोलायचे आहे ते नंतर बोला

**सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—**हा अर्थसंकल्प बोगस आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**परंतु स्थायी समितीने कर्णाचे औदार्य दाखवुन टॅकर निशुल्क देण्याचे ठरविले आहे. सन ९९ मध्ये टॅकरवरचा खर्च ११ लाख रुपये होता. तो आता एक कोटी पर्यंत जात आहे. ९९ मध्ये ९० एमएलडी पाणी पुरवठा होत होता. आता ११० एमएलडी पाणी पुरवठा होत आहे. तसेच दरवर्षी लाखो रुपयाच्या जलवाहिन्या उल्हासनगरमध्ये टाकल्या जातात. सन २००६ मध्ये विविध ठिकाणी जलकुंभ सुरु करण्यात आले होते. त्यामुळे पाण्याचे समान वितरण होण्यास मदत होत आहे. तरी पण शहरात रोज दिडशे पेक्षा जास्त पाण्याचे टॅकर पुरविले जात आहेत. ठेकेदाराकडे फक्त १६ टॅकर आहेत. एक टॅकर जास्तीत जास्त सहा ते सात फे—या मारु शकतो. म्हणजेच १०० टॅकर पाणी पुरविता येवु शकते. म्हणजेच जवळ जवळ ५० टॅकरचा भ्रष्टाचार दररोज होत असतो. स्थायी समिती सभापती साहेब, हे जरा ऐकुन घ्या. ज्या प्रभागामध्ये नळाला ४—४ तास पाणी येते तेथे सुध्दा रोज १०—१० टॅकर पाणी पाठविले जात आहे. ''फुकटचे

धावले आणि बाप दावले'' अशा प्रकारची परिस्थिती आहे. सन २००५ मध्ये टॅकरचे नाममात्र भाडे आकारले होते. तेव्हा शंभर फे—यांवरुन १० ते १२ फे—यांवर टॅकर मागणींची संख्या आली होती. याचाच अर्थ अधिकारी व ठेकेदार यांचे पोट भरण्यासाठी ही टॅकर लॉबी पोसली जात आहे. झोपडपट्टया व पाणी टंचाईग्रस्त भागात निशुल्क टॅकर पुरवुन इतर ठिकाणी शुल्क आकारावेत व टॅकरच्या वाचणा—या पैश्यातुन नागरीक सुविधांची कामे करण्यासाठी नगरसेवक निधीमध्ये पैसे समायोजित करावेत अशी मी सूचना करत आहे. आयुक्तांनी सुचविल्याप्रमाणे या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये उत्पन्न कुठुन मिळेल याकडे महापालिकेचे लक्ष नाही. आणि तेच मी तुमच्या नजरेस आणुन देत आहे. आयुक्तांनी सुचविल्याप्रमाणे सायकल स्टॅण्डची नियुक्ती करुन ते भाडे तत्वावर दयावे. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. उल्हासनगर स्टेशन, शहाड व विठ्ठलवाडीच्या बाजुस सायकल स्टॅण्ड लावता येईल. तसेच बाजारामध्ये दुकानदार दुचाकी वाहने उभी करतात त्यामुळे वाहतुकीस अडथळा होतो. यासाठी त्यांच्यासाठीही सायकल स्टॅण्ड करावे. त्यातुनही उत्पन्न मिळु शकते. तसेच भाजी मार्केटमधून काहीही उत्पन्न मिळत नाही असे दिसते. भाजी मार्केटस् ठेक्यावर दिल्यास त्यातुनही उत्पन्न मिळु शकेल. शहरात कुत्र्यांची संख्या वाढली आहे. कुत्रे चावण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु त्यावर दयावयाच्या लसीचे इंजेक्शन दवाखान्यात उपलब्ध होत नाही. त्यासाठी जास्तीत जास्त निधीची अर्थसंकल्पात तरतुद करावी असे मला वाटते. मालमत्तांसंबंधी बरेचसे वाद आहेत. ते निकाली काढुन मालमत्ता कर वसुल करावा. ब—याचशा मालमत्तांच्या नोंदी महापालिकेने केल्या नाहीत त्यांच्यावर लवकरात लवकर कर आकारणी करुन महापालिकेचे उत्पन्न वाढवावे. मागील अर्थसंकल्पाच्या काळात काही विशिष्ट नगरसेवकांच्या प्रभागातच नागरी सुविधांची कामे झाली आहेत. तो प्रकार या अर्थसंकल्पात होवु नये. म्हणुन प्रशाासनाने प्रत्येक नगरसेवकासाठी अर्थसंकल्पात १० लाखाच्या निधीची तरतुद केली आहे. परंतु काही प्रभागातील कामांची निकड व यादी बघुन कमीत कमी २० लाख नगरसेवक निधी असावा अशी मी सूचना करतो. उल्हासनगर मध्ये ४८ शासनमान्य झोपडपटटया आहेत व इतर काही झोपडपट्टया अशा एकुण १२३ झोपडपट्टया आहेत. झोपडपट्टयांमध्ये नागरी सुविधांची विकासकामे अदयापपर्यंत झालेली नाहीत. झोपडपट्टी विकासासाठी जास्तीत जास्त निधी ठेवावा. शहरातील मोकळया जागा ताब्यात घेवुन तेथे उदयाने व वाहनतळ निर्माण करावेत. उड्डानपुलाची जागा कश्या प्रकारे भाडयाने देता येईल याचा विचार करावा. महानगरपालिकेचे सन २००७—०८चे सुधारित अंदाजपत्रकात उत्पन्न १४७ कोटी ८० लाख व खर्च १४७ कोटी ८९ लाख कापुन अखेरची शिल्लक ९ लाख रुपये दाखविली आहे. माझ्या मते उत्पन्न व खर्चाचे आकडे लिहितांना टंकलेखन दोष असावा. वास्तविक पहाता उत्पन्न १४७ कोटी ८८ लाख व खर्च १४७ कोटी ७९ लाख असे असेल. तरच शिल्लक ९ लाख उरते. आकडयांची फिरवाफिरव केल्यामुळे हा गोंधळ झालेला दिसतोय. काहीही असले तरी हा अर्थसंकल्प एकदम मिळमिळीत, बोगस आकडे फुगविलेला व खोटया अशा अर्थसंकल्पाला आमच्या आरपीआय, राष्ट्रवादी व मनसेचा कडकडाडुन विरोध आहे. सन्माननिय आयुक्त साहेब या अर्थसंकल्पामध्ये आम्ही ज्या काही त्रुटी निदर्शनास आणुन दिलेल्या आहेत, त्यामध्ये या सत्ताधा—यांनी व सभापतींनी आपल्या मनाप्रमाणे व पक्षपातीपणाने हे सर्व केले आहे. आज या ठिकाणी जर बघितले तर विरोधकांच्या प्रभागात जर पाच लाखाचे काम झाले असेल तर सत्ताधा—यांचे प्रभागात ५०—५० ते ६०—६० लाखाचे काम झालेले आहे. याठिकाणी आम्हांला एवढेच सांगायचे आहे की, सत्ताधारी असो कि विरोधी असो, विकास कामे करायची असतील तर सत्ताधा—यांनी विरोधकांना सुध्दा जवळ घेतले पाहिजे. त्यांची देखील कामे केली पाहिजेत. परंतु येथे असे होत नाही. आणि येथे बाके वाजवुन सांगत आहेत की तुमचा नगरसेवक निधी १५ लाख केला. परंतु १५ लाख आम्हांला नको आहेत, आम्हांला त्याची काही आवश्यकता नाही. येथे आम्ही आयुक्त साहेबांना पहिल्यांदाच बोललो, त्यांच्याकडुन निधी वाढवुन घेतलेला आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुरः—</u> यांचा निधी कमी करा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरेः—</u> सर्वांना सारखा निधी दिला पाहिजे. याचे पत्र देखिल सन्माननिय आयुक्त साहेबांना मी दिलेले आहे. या अर्थसंकल्पाला आमचा कडाडुन विरोध आहे. टॅकर लॉबीची महाराष्ट्र शासनाने चौकशी सुरु केलेली आहे. आणि या उल्हासनगर शहरामध्ये ११० एमएलडी पाणी पुरवठा होवुन सुध्दा टॅकरने पाणी पुरवठा करावा लागतो. अधिकारी कामे करत नाहीत. पाण्याचे वाटप सम प्रमाणात होत नाही. कुणाला चार तास तर कुणाला एक तास पाण्याचे वाटप होत आहे. म्हणुन मा. महापौर व आयुक्त साहेबांना आमची विनंती आहे की, याबाबतीत एक चौकशी समिती नेमावी. आणि त्या समितीच्या वतीने येथिल टॅकर लॉबी नष्ट करावी. टॅकरमुक्त शहर करावे. एवढीच मी सूचना देतो, जयहिंद।

<u>सदस्य श्री. राजेश वधारियाः—</u>मा. महापौरजी, स्थायी समिती सभापती यांच्याकडुन या अर्थसंकल्पामध्ये सर्वात मोठी जी चुक झाली आहे, व त्याबाबतीत त्यांनी काहीही लक्ष दिलेले नाही. ती बाब अशी आहे की, मागील

११ वर्षामध्ये पाणी पुरवठयापोटी महानगरपालिकेस जवळ जवळ २०० कोटीचे नुकसान झाले आहे. आयुक्त साहेबांचा जो अहवाल आहे त्यातील पृष्ठ क्र. १७ वर जी नोंद आली आहे ती कृपया पहा. एमआयडीसीकडुन ७ रुपयाने आपण पाणी घेतो. पाणी पुरवठयाच्या त्याच स्त्रोतामधुन शहाड पाणी पुरवठा केंद्रातुन भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये चार तासामध्ये पाणी पोहचते. जो विभाग येथुन ८० किलोमिटर अंतरावर आहे. आपण ना कोणतेही प्राधिकरण तयार करण्याची सूचना दिली आहे ना स्वत:चे एखादे स्त्रोत तयार करण्याचा आपण एखादा प्रकल्प दिला आहे. ज्यामुळे यावर्षी सुध्दा २७ कोटी आपणांस नुकसान होणार आहे. याबाबीकडे कुणाचे लक्ष गेले नाही. त्यानुसार मी आपणांस प्रश्न विचारु इच्छितो की काय आपण ही पाणी पुरवठा योजना दरवर्षी २७ कोटी रुपये नुकसानीसह यापुढे चालु ठेवणार आहात? ज्यामुळे पुढील चार वर्षामध्ये आपणांस १२५ कोटीपेक्षा जास्त रक्कमेचे नुकसान होणार आहे. त्याबद्दल आपणाकडे काय तरतुद आहे? त्याबाबतीत आपली काय सूचना आहे? आपण काय करु इच्छित आहात? हे कृपया स्पष्ट करावे. जवाहरलाल नेहरु अर्बन रिनिव्हल मिशनमधुन १७८ कोटी रुपये मिळणार आहेत असे जे आपण लिहिले आहे व १७९ कोटीचा खर्च दाखविला आहे, या १७८ कोटी मागे ५० टक्के रक्कम महानगरपालिकेने दयायची आहे. त्या रक्कमेची यामध्ये कुठेही तरतुद करण्यात आलेली नाही. तर त्या १७८ कोटीमागे १७८ कोटी आपण कोठुन आणणार आहात? ते जरा स्पष्ट करा. गलिच्छ वस्तीत घरबांधणी (बीएसयुपी) साठी आपण तरतुद केलेली आहे. तर आपण गलिच्छ वस्तीत घरबांधणी योजना कुठे राबविणार आहात? त्यासाठी कोणता भुखंड आपण निवडला आहे? त्याची सद्यस्थिती काय आहे? त्यावर अतिक्रमण आहे किंवा नाही? किंवा ही योजना आपण कशी कार्यान्वीत करणार आहात? याबाबतचा कोणताही खुलासा नाही. मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करु इच्छितो की, त्यांनी आपल्या भाषणामध्ये ही गोष्ट मान्य केली आहे की, मागील दहा वर्षामध्ये करोडो रुपये सीसी पॅसेज आणि नाली बांधण्याच्या कामामध्ये व्यर्थपणे खर्च केले आहेत. व त्यावर मी एक सांगु इच्छितो की, त्या खर्चास आपण मंजुरी देतात, अशा कामांना मंजुरी देतांना आपण याची खात्री करुन घ्या की याअगोदर तेथे कोणते विकास काम झाले आहे? काय सीसी पॅसेजवर सीसी पॅसेज तर तयार केला जात नाही ना? सीसी पॅसेजवर लादया बसविल्या जात नाहीत ना? किंवा सीसी पॅसेजवर पेव्हर ब्लॉक बसविले जात नाहीत ना? दुसरे असे की, स्थायी समितीच्या प्रस्तावामध्ये नामनिर्देशित सदस्यांसाठी नगरसेवक निधी ५ लाख रुपये दर्शविला आहे. व निर्वाचीत सदस्यासाठी १० लाख रुपये निधी ठेवला आहे. ही जी विसंगती आहे, याबाबत आपणाकडे कोणताही अधिकार नाही, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २ मध्ये जी व्याख्या देण्यात आली आहे त्यामध्ये निर्वाचीत सदस्य आणि नामनिर्देशीत सदस्य हे एकसारखेच आहेत. नामनिर्देशित सदस्य आणि निर्वाचीत सदस्य यांच्यामध्ये फरक करण्याचा आपणाकडे कोणताही अधिकार नाही. जर असेल तर कोणता अधिनियम आहे आणि कोणते कलम आहे ते सांगावे. यासाठी नामनिर्देशित सदस्य आणि निर्वाचीत सदस्य यांचा नगरसेवक निधी एकसारखाच ठेवावा मग भलेही तो १० लाख करा किंवा ५ लाख करा. दोघांनाही एकसारखाच नगरसेवक निधी ठेवा. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. सभापतीजी, आपण श्री. राजेश वधारीया यांना काही उत्तर दयाल की शांत बसुन रहाल? ..........कुणाकडुन काय इशारा होत आहे हे पाहत राहु नका. होय किंवा नाही या एका शब्दात उत्तर दया.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u>हा काही प्रश्नोत्तराचा कालावधी नाही.

<u>स्थायी समिती सभापती, श्री. राम पारवानी:—</u>आपण आपले विचार पुर्णपणे मांडा त्यानंतर आपणांस उत्तर दिले जाईल.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>असे आपण सांगा ना, आपण दुस—यांकडे का पाहता आहात? वाट पाहत आहात?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>ही महापालिका या अगोदर मोबाईल फोनवर चालत होती.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u>आपण तर मोबाईल वरील आदेशानुसार चालत आहात. एकएक गोष्ट मोबाईलवर विचारुन घेत आहात. या अगोदर ही महापालिका मोबाईल फोनवर चालत होती.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सन्माननिय सभापती श्री. राम पारवानीजी, तेच सभागृह, तेच सभापती, तीच आश्वासने, त्याच गोष्टी, अशा या अर्थसंकल्पास काय म्हणु? हा अर्थसंकल्प म्हणजे ''मुंगेरीलालचे सोनेरी स्वप्न'' मग ही स्वप्न भलेही कृष्णधवल असतील किंवा

रंगीत असतील. अशी ही स्वप्न दाखविल्याबद्दल आपणांस धन्यवाद. स्वप्न दाखविण्यास पैसे लागत नाहीत. श्री. रामचंद्र पारवानीजी हसु नका. कृपया लक्षपुर्वक ऐकुन घ्या. तसेच अर्थसंकल्प वाचुन दाखविला जात नाही. तो समजावुन सांगितला जातो. या अर्थसंकल्पात आपण काय काय केले आहे त्याबाबत आमचे बंधु श्री. राजेश वधारिया त्यांनी बरेच काही सांगितले आहे. आपल्या मागील कार्यकाळात ४०५ कोटीचा अर्थसंकल्प याच व्यासपीठावर आपण सादर केला होता. त्यातुन आपण काय कार्य केले आहे. ते आपण आपल्या स्वत:च्या मनालाच विचारा. फक्त खुर्चीवर बसुन मोठ मोठया गोष्टी करणे, त्यांची घोषणा करणे पुरेसे नाही. या महापालिका मुख्यालयाच्या इमारतीवर दोन माळे चढविले जातील. अगोदर एक माळा बांधण्याचे ठरविले, त्यानंतर त्यात दुरुस्ती करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात काहीही काम झाले नाही. १०० खाटांचे रुग्णालय बांधले जाईल. ते रुग्णालय कोठे गेले? कुठे गेले एक माळा बांधण्याचे काम? श्री. पारवानीजी, माझ्या बोलण्याकडे लक्ष दया. इकडे तिकडे पाहु नका. या सर्व गोष्टींबाबत आपणांस उत्तर दयायचे आहे. प्रत्येक वेळा खोटी आश्वासने देणे. मागील वेळेस आपला जो निवडणूक जाहिरनामा होता त्याबाबत मागील अर्थसंकल्पाच्या वेळी मी चर्चा केली होती. मागील वेळेस जो अर्थसंकल्प सादर केला होता त्याबाबत आज मी येथे बोलणार आहे. मी बोलत असतांना मध्ये–मध्ये कोणी बोलु नये. श्री. बच्चाराम रुपचंदानीजी आपणांस बोलण्यास संधी दिली जाईल कृपया शांत रहा. आपल्या कार्यकाळातील काही उदाहरणे मी आपणांस दिली आहेत. केवळ मोठ मोठया गोष्टी करणे त्याबाबतची उदाहरणे आपणांस दिली आहेत. आपल्या कार्यकालावधीत काय झाले? शहरात दोन मोठया दुर्घटना घडल्या. आपण त्याचा साधा उल्लेख सुध्दा केला नाही. उघडया नाल्यात पडुन खेमाणी येथे एका लहान मुलाचा मृत्यु झाला व आपण येथे बसुन टाळया वाजवत आहात. श्री. धनंजय बोडारे यांच्या प्रभागात दुर्घटनेने एका मुलाचा मृत्यु झाला व आपण येथे बसुन टाळया वाजवत आहात. मी धन्यवाद देईल श्री. धनंजय बोडारे यांना. श्री. बोडारे हे तत्काळ तेथे पोहचले होते. आपल्या कार्यकालावधीत अशा घटना घडतात आणि आपण फार मोठे कामकाज केले आहे असे दर्शवुन येथे टाळया वाजवता? काय आपणांस तेथे जाण्यास वेळ मिळाला नाही? नाही, कारण की आपणांस इतर कामांमधुन वेळ कुठे मिळतो? दोन दोन महिने ड्रेनेजच्या गाडया बंद राहतात परंतु त्यांच्याकडे लक्ष देण्यास कुणास वेळ नाही. आपणांस येथे बसुन फक्त मोठ मोठया गोष्टी करायच्या आहेत. पाणी पुरवठा विभागाच्या अधिका–यांना बोलवा आणि त्यांच्याकडुन अहवाल मागवा की किती कालावधीपासुन गाडया बंद होत्या? या बाबींकडे लक्ष देण्यास कुणीही नाही. आरोग्य विभाग– जेसीसबीच्या ड्राव्हरला सहा महिन्यापासुन पगार दिला नाही आणि ४०० ते ५०० कोटीच्या आपण गोष्टी करत आहात. बोलवा संबंधीत अधिका–यास. हे जे मी सांगत आहे त्यामध्ये तत्थांश आहे आपण संबंधीत अधिका–यास बोलवुन विचारणा करा. काय हा कारभार चालला आहे? सार्व.बांधकाम विभाग–फक्त रिॲप्राप्रिएशन, या लेखाशिर्षातुन त्या लेखा शिर्षात रक्कम समायोजित करायच्या? आयुक्त साहेबांना मी निवेदन केले होते की, साहेब, कशाप्रकारे सर्वसाधारण निधीचा अपव्यय होत आहे. सर्वसाधारण निधीचा अर्थ काय आहे? रस्ते, उदयाने, मोठ मोठया शाळा, इमारती त्यांच्यासाठी अर्थसंकल्पात केवळ तरतुद करायची? नंतर त्यामध्ये कशाप्रकारे भ्रष्टाचार करायचा आहे? व त्यास अन्य एखादया लेखा शिर्षात समायोजित करुन आपले प्राकलन मंजुर करुन घ्यायचे आहे? केवळ हाच धंदा, हाच कारभार. व यावेळेस सुध्दा अर्थसंकल्पात याच बाबी दिसुन येत आहेत. मा. आयुक्त साहेब, मी आपणांस असे निवेदन करेन. त्याचबरोबर आपणाकडुन ही अपेक्षाही ठेवतो की, या वर्षापासुन अर्थसंकल्पामध्ये ज्या लेखाशिर्षात जी तरतुद करण्यात आली आहे, तो निधी त्याच कामासाठी खर्च झाला पाहिजे. त्यानंतर हे आपणाकडे येतील व म्हणतील की साहेब, आम्हांला एक प्राकलन तयार करायचे आहे, सीसी पॅसेज तयार करायचा आहे. याबाबत मी आयुक्त साहेबांना धन्यवाद देवु इच्छितो की, त्यांनी आपल्या भाषणात असे म्हटले आहे की, या महापालिकेत सीसी पॅसेज आणि ड्रेनेज या बाबींवरच पैसा व्यर्थ गेला आहे. यासाठी या गोष्टीचा मी पुर्नउच्चार करु इच्छितो की, कोणत्याही लेखाशिर्षातील निधी त्याच लेखा शिर्षातील कामासाठी खर्च केला पाहिजे.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:–</u>मा. आयुक्त साहेब, एका लेखा शिर्षातील रक्कम दुस–या लेखाशिर्षात समायोजित केली जावु शकत नाही असे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात कुठेही लिहिले नाही. तसेच महासभेस लेखाशिर्षातील रक्कम एका लेखाशिर्षातून तरतुद दुस–या लेखाशिर्षात समायोजित करण्याचा अधिकार आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>२००७–२००८ च्या मागील अर्थसंकल्पात महापालिका इमारतीसाठी आपण एक कोटी रुपयांची तरतुद केली होती. याबाबत आपणांस आठवण असेल किंवा नसेल परंतु मी आपणांस आठवण करुन देवु इच्छितो. त्यामधुन खर्च फक्त एक लाख ८२ हजार एवढाच झालेला आहे. उर्वरित पैसा कुठे गेला? आहे कुणाकडे याचे उत्तर? लेखा विभागाचा कुणी अधिकारी आहे काय? सार्वजनिक बांधकाम विभागाचा कुणी अधिकारी आहे काय? लेखा शिर्षाचा दुरुपयोग होत आहे. लेखाशिर्ष बदली केला, सीसी

पॅसेजवर सीसी पॅसेज तयार केला, ग्रीट वापरुन बांधकाम केले, बिल तयार केले आणि निघुन गेले, केवळ हाच धंदा. या वेळेस महापालिका इमारतीसाठी २ कोटी ३२ लाख रुपये ठेवले आहेत. व असे दर्शविले आहे की ८२ लाख रुपये मागील देणे बाकी आहे. काय मला हे दाखवु शकाल ८२ लाखाची कोणती इमारत बांधण्यात आली आहे? आयुक्त साहेब, महापौर महोदया, ८२ लाखामध्ये कोणती इमारत बांधण्यात आली आहे ती मला दाखवा याबाबत कुणाकडे उत्तर आहे काय? आपण काय उत्तर दयाल? याबाबत कुणाकडेही काहीही उत्तर नाही. फक्त टाळया वाजविल्याने काम होत नाही. सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये कशा प्रकारचे काम चालले आहे त्याचे मी एक उदाहरण देतो. सार्वजनिक आरोग्य विभागासाठी १२ कोटी ९४ लाख रुपये (आस्थापनेवर) खर्च झाला आहे, ५६ लाख रुपये वैद्यकीय विभागाचा खर्च, ५० लाख रुपये जंतुनाशके खरेदीसाठी, ५ लाख रुपये पर्यावरणावरील खर्च, १.१४७ लाख दवाखानासाठी खर्च, ७ लाख रुपये मलेरिया आणि डेंग्युसाठी एकुण २१ कोटी ७० लाख रुपये वर्षाला खर्च केला जातो सार्वजनिक आरोग्य विभागावर. या हिशोबाने प्रत्येक दिवसाला ६ लाख रुपये खर्च येतो आणि तेवढे करुन या शहराची स्थिती काय आहे? आपणांस मी सांगु इच्छितो काही दिवसापुर्वी २८ सेक्शनमध्ये सलग २० दिवसापर्यंत कचरा उचलला नव्हता. तेथे महानगरपालिकेच्या तीन—तीन फायर व्हॅन मागवाव्या लागल्या, कारण की तेथे आग लागली होती. या सर्व बाबींकडे कोण लक्ष देत आहे? कोणीही लक्ष देत नाही. सन्माननिय सभापतीजी, आपण माझे वडिल बंधु आहात. अॅन्थोनी ठेकेदाराच्या कामकाजाविषयी चौकशी करण्यासाठी स्थायी समितीमध्ये एक समिती तयार करण्यात आली होती. त्या समितीचा अहवाल सुध्दा आपण सभेपुढे ठेवत नाहीत? त्याचे कारण काय? याबाबत मी आयुक्त साहेबांना जेव्हा निवेदन केले त्यावेळी त्यांनी सांगितले की, सदरचा अहवाल सभेपुढे ठेवण्याबाबत मी तीन वेळा स्थायी समितीस पत्र लिहिले आहे. तो अहवाल आपण सभेपुढे ठेवत नाहीत. व येथे मोठ मोठया गोष्टी करत आहात.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>श्री. राजु जग्यासीजी, आपण राग व्यक्त करत आहात की अर्थसंकल्पावर बोलत आहात? आपण अर्थसंकल्पावर बोला. आपले विचार ऐकण्यास आम्ही तयार आहोत. अर्थसंकल्पावर आपणांस जे काही बोलायचे आहे ते आपण बोला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>श्री. बोडारेजी, आपण बसुन घ्या. आपण नंतर बोला. आपणांस बोलण्याची संधी मिळेल. कचरा वाहतुक ठेकेदाराच्या कामकाजाबाबत चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीने आपला अहवाल सादर केलेला आहे. तो अहवाल आपण स्थायी समितीसमोर ठेवत नाहीत. याबाबत आम्ही आयुक्त साहेबांकडे जातो तर ते सांगतात की, मी स्थायी समिती सभापतींना निवेदन दिले आहे. समितीचा जो अहवाल आहे तो त्यांनी सभेपुढे ठेवला पाहिजे. मा. आयुक्त साहेब, मा. महापौरजी, मी जास्त बोललो तर आमचे बंधु श्री. धनंजय बोडारे यांना खुप त्रास होतो कारण की, सत्य गोष्टी कडु लागतात.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u>आपणांस जे काही बोलायचे असेल ते अर्थसंकल्पावर बोला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>ज्या ज्या बाबींबाबत मी आपणाकडुन खुलाश्याची अपेक्षा केली आपण तो देवु शकत असाल तर ठिक आहे. देवु इच्छित नसाल तर त्याबाबतीत आम्ही आपणांस काही करु शकत नाही. परंतु आम्ही या अर्थसंकल्पास राष्ट्रवादी कॉंग्रेस आरपीआय आणि मनसे च्या वतीने विरोध करतो.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>स्थायी समितीमध्ये जे सदस्य आहेत ते सुध्दा विरोध करत आहेत की नाही?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>मा. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती आणि आयुक्त साहेब, अर्थसंकल्पीय सभेत सन्माननिय सदस्य श्री. बी.बी. मोरेजी, श्री. राजु जग्यासीजी, आणि श्री. राजेश वदारियाजी यांनी आपापले विचार व्यक्त केले. स्थायी समिती सभापतींनी अर्थसंकल्प मा. महापौरांना सादर केला आहे. याबाबत स्थायी समिती सभागृहात विस्तृतपणे चर्चा झाली आहे. तेथे सर्व पक्षाच्या सदस्यांनी त्यास स्विकृती दिलेली आहे. स्थायी समितीचे सदस्य असोत किंवा महापालिका सदस्य असोत त्यांनी आपल्या पक्षाची अर्थसंकल्पाबाबतीत भुमिका स्पष्ट केली आहे. मग भलेही ते स्थायी समिती सभागृह असो किंवा महासभा सभागृह असो तेथे ते आपली भुमिका ते व्यक्त करतात. तर या विषयावर स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती, होती ना? आता हा अर्थसंकल्प स्थायी समिती सभापतींकडुन मा. महापौरांना सादर करण्यात आलेला आहे. त्या अगोदर त्यास स्थायी समितीत मंजुरी मिळालेली असल्याने त्याबाबतीत सर्व पक्षाच्या गटनेत्यांचा त्यामध्ये सहभाग आहे. असे मला वाटते. सर्व पक्ष त्यास सहमत आहेत.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:—</u>आम्हांला कुठे बोलावले होते? मला त्या सभेस बोलावलेच नव्हते.

सदस्य श्री. मोहन साधवानी:—स्थायी समितीमध्ये आपल्या पक्षाचे सदस्य आहेत ना?

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:—मला बोलावले नव्हते.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—श्री. बी.बी. मोरे यांनी म्हटले की, नेहमीप्रमाणे, नेहमीप्रमाणे म्हणजे? श्री. राजेश वदारिया म्हणाले मागील ११ वर्षापासुन, म्हणजे त्यावेळेस अर्थसंकल्प कोण सादर करत होता? तेव्हा टाळया वाजविणारे कोण होते? मागील ११ वर्षापासुन आकडे पुरविणारे कोण होते? आम्ही तर मागील एक वर्षापासुनच आहोत. तर मग मागील दहा वर्षापासुन कोण अर्थसंकल्प सादर करत होता? श्री. बी.बी.मोरे म्हणत आहेत की, नेहमीप्रमाणे आकडे फुगवुन अर्थसंकल्प तयार केला आहे. नेहमीप्रमाणे म्हणजे कधी? श्री. वधारीया तर म्हणत आहेत की मागील ११ वर्षापासुन.

सदस्य श्री. राजू जग्यासी:— तर मग आपण परिवर्तन काय केले?

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—११ वर्ष तुम्ही जे परिवर्तन करु शकला नाहीत ते आम्ही एका वर्षात काय करणार?

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:— तुम्ही टॅकरमुक्त शहर करणार होते? टॅकरमुक्त शहर तरी करायचे होते? तुम्ही परिवर्तन काय केले? कामाचे काही नियोजन केले आहे का तुम्ही?

उप—महापौर:—कृपया इकडे लक्ष दया. सभागृहाची शिस्त पाळा. ऐकुन घ्या. तुम्ही बोलण्यास परवानगी मागा, तुम्हांला बोलायला परवानगी दिली जाईल. सगळयांनी सभागृहाची शिस्त पाळा. मी सर्व नगरसेवकांना सांगत आहे. बसुन बोलु नये. तुम्ही दुस—यांदा निवडून आला आहात. तुम्हांला कळले पाहिजे, बसुन बोलले जात नाही किंवा परवानगी घेतल्याशिवाय बोलले जात नाही. मी सर्व सदस्यांना सूचना करतो........

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:— ते पण सदस्य निवडून आलेले आहेत, त्यांना शिस्त शिकवली का तुम्ही?

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—मला अर्थसंकल्पावर बोलायचे आहे.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:—श्री. राजेश वदारिया हे बोलत असतांना तुमचे काही सदस्य बसुन बोलत होते. तेव्हा ते शिस्त पाळत होते का? ते सुध्दा सदस्य आहेत. ते सुध्दा निवडून आलेलेच आहेत ना? त्यांना शिस्त शिकवली का तुम्ही? कव्वाली गात होते तेव्हा तुम्ही त्यांना शिस्त शिकवलीत का? तुम्हांलाच शिस्त नाही तर आम्ही काय शिस्त पाळणार? तुम्ही सत्तेत बसला आहात. तुम्हांलाच शिस्त नाही. तुम्हांला शिस्त असेल तर आम्हांला शिस्त लागेल ना?

उप—महापौर :—सर्व नगरसेवकांना सांगतो की, हे भाजी मार्केट बनवु नका. ही काही बोलण्याची शिस्त नाही.

महापौर:—एका वेळेला एकाच जणाने बोलावे. ज्या कुणाला बोलायचे असेल त्याने एकेकानेच बोलावे.

सदस्य श्री. बी.बी. मोरे:—श्री. राजेश वदारिया जेव्हा बोलत होते, त्यावेळेस सत्ताधारी पक्षातील काही सदस्य सिनेमा गृहात बसल्यासारखे हां हु करत होते ते तुम्हांला दिसले नाही?

उप—महापौर :—सर्व काही बघितल्यानंतर, सर्व सदस्यांना मी बोलत आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—सन्माननिय सदस्यांना उल्हासनगर शहरातील तमाम जनतेने निवडून पाठविले आहे. एक दुस—याची नक्कल करण्यासाठी पाठविले नाही तर तुम्ही येथे लक्षात घेतले पाहिजे की, जेव्हा एखादा सदस्य महापौरांची परवानगी घेवुन बोलत असेल तर दुस—याने मध्येच बोलु नये. असे धोरण ठेवले पाहिजे.

उप—महापौर :—श्री. मोरे साहेब, आता तुम्ही परवानगी घेवुन बोलला नाहीत. तुम्ही सरळ उभे राहून बोललात. तुम्ही परवानगी घेवुन बोला. आताही तुम्ही परवानगी घेतलेली नाही.

**<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>**आधी तुम्ही तुमच्या सदस्यांना शिस्त पक्षाला शिकवा श्रीमती वेलकर यांना बोला की या पध्दतीने तुम्ही वागा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**श्री. मोरे साहेब, तुम्ही सुचविल्याप्रमाणे दर वाढ सुचविलेली नाही. म्हणजे दरवाढ सुचविली पाहिजे होती.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>**तेच मी म्हणत आहे.......

**<u>उप–महापौर :–</u>**श्री. मोरे साहेब, परवानगी घेवुन बोला, शिस्त पाळा. शिस्त पाळा परत सांगत आहे. शिस्त पाळा परवानगी घेवुनच बोला.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>**टॅकरवाल्यांकडुन कमी भाडे घेतले पाहिजे. मोफत टॅकर घेवु नये. हा आमचा समज आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>** मी दरवाढ बोलत आहे, तुम्ही सांगितलेले मालमत्ता करातील आकडे कसे काय आहेत? दरवाढ केली पाहिजे होती, विकास कसा होणार? आम्ही विकास करणार. आमचे वाक्य होते की भ्रष्टाचार कमी, पारदर्शकता जास्त. पारदर्शकता प्रशासनामध्ये आलेली आहे. भ्रष्टाचार कमी झालेला आहे. जो पैसा भ्रष्टाचाराकडे जात होता तो वळवुन विकासाकडे वळविणार आहोत. परंतु दरवाढ करणार नाहीत. टॅकर मोफत करु नये, टॅकर मुक्त करावे या तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत. परंतु गेल्या ११, १२ वर्षापासुन ज्या पध्दतीने कारभार चालला होता. ब–याच विभागामध्ये पाईप लाईनच नाहीत. त्या विभागात टॅकरची तर आवश्यकताच आहे. जो पर्यंत तेथिल परिस्थिती सुधारत नाही, त्यांना नळाद्वारे पाणी देता येत नाही तोपर्यंत तेथे टॅकर चालु ठेवणे ही एक अपरिहार्य गोष्ट आहे. तुम्ही आम्ही सुध्दा बोलु शकत नाही परंतु राजकारणासाठी तुम्ही येथे बोलाल. आतापर्यंतच्या शासनाच्या किंवा प्रशाासनाच्या चुकीमुळे वैयक्तीकरित्या ज्या प्रभागात, झोपडपट्टयांमध्ये पाण्याच्या लाईन पोहचल्या नाहीत, तेथे टॅकर हा एकच पर्याय आहे. जोपर्यंत तेथे पाण्याची सोय होत नाही तोपर्यंत टॅकर चालु ठेवणे ही एक नाईलाजास्तव गोष्ट आहे. JNNRUM योजना आल्यानंतर त्यामध्ये किर्लोस्करची योजना आहे, किर्लोस्कर कंन्स्ल्टंसीने ८४ साली दिलेली योजना ९७ साली ती आम्ही आमलात आणली. तो पहिला टप्पा झाला त्यानंतर दुसरा टप्पा अजुनही अमंलात आलेला नाही. तो पुढच्या वर्षापर्यंत नक्कीच अमलात येईल. तेव्हा हे शहर टॅकर मुक्त होईल. तिसरे म्हणजे सीसी पॅसेजवर बदल झाला पाहिजे. याबाबत श्री. राजेश वदारिया यांनी आयुक्त साहेबांचे अभिनंदन केले आहे, त्याबाबतीत तुमच्या ज्या सूचना असतील त्या आम्ही नक्कीच पाळू. सीसी पॅसेज न करता इतर विकास कामे करु. जे ११ वर्ष १२ वर्षे झाले ते यापुढे होणार नाही. आम्ही त्याच्याशी सहमत आहोत. यापुर्वी ज्या चुका केल्या आहेत त्या चुका आम्ही करु इच्छित नाहीत. सुधारणा या झाल्याच पाहिजेत. आणि त्या लोकोपयोगी असल्या पाहिजेत. या मताशी मी सहमत आहे की या अगोदर ज्या चुका झालेल्या आहेत त्या होवु नयेत. अर्थसंकल्प आम्ही आमच्या कुवतीप्रमाणे, क्षमतेप्रमाणे तयार केला आहे. १७१ कोटी कुठुन आले? JNNRUM चा निधी हा येणार आहे. श्री. वदारिया साहेब, १७१ कोटी कोठुन येणार असे आपण विचारले? खर्चामध्ये ही रक्कम दर्शविली आहे. ही जी जवाहरलाल नेहरु नागरी पुर्नउत्थान विकास योजना त्यांच्याकडुन हा निधी येणार आहे. जो निधी येणार आहे तो खर्चामध्ये दर्शविला आहे. याव्यतिरिक्त आपणाकडे जर काही प्रस्ताव असेल पुर्णच्या पुर्ण अर्थसंकल्प असेल, हा अर्थसंकल्प ४३६ कोटी चा आहे. जवळ जवळ ३ लाख रुपये वाचविले आहेत. तुमच्याकडे जर काही प्रस्ताव असेल तर तो तुम्ही दया. एवढे उत्पन्न आणि एवढा खर्च असला पाहिजे. असे जर काही असेल तर ते दया. यावर विस्तृत चर्चा झाली पाहिजे. श्री. राजु जग्यासी आपण अर्थसंकल्पावर काही बोलला नाहीत. आपण त्या दुर्घटनेचा उल्लेख केलात. अहो, ती तर दुर्घटना आहे, अपघात आहे. अपघात कधीही होवु शकतो त्यासाठी कुणीही जबाबदार नसतो. दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाने काय केले हे महत्वाचे असते. त्या आपत्तग्रस्तांना अनुदान म्हणुन काही रक्कम दिली आहे. श्रीमती सुरेखा वेलकर यांच्या प्रभागामध्ये शौचालय पडले, त्याखाली एक मुलगी दबली होती. हे बरोबर आहे ना? तिच्या कुटुंबियांना सुध्दा अनुदानाची रक्कम दिली आहे. माझ्या प्रभागात जेव्हा दुर्घटना घडली त्यावेळेस सुध्दा त्यांच्या कुटुंबियांना अनुदानाची रक्कम दिली आहे. दुर्घटना कुठे घडू शकत नाही असे नाही. दुर्घटना घडल्यानंतर तेथे शासन, प्रशासन पोहोचले आहे. शासन, प्रशासन तेथे पोहोचले नाही हा आपला चुकीचा आरोप होता. येथे फक्त अर्थसंकल्पावरच चर्चा झाली पाहिजे. जर आपणाकडे पुरक प्रस्ताव असेल तर आपण सादर करा. त्यावर चर्चा करु. परंतु आपण काही केले नाही. आपली इच्छा प्रामाणिक नाही. ४३६ च्या ठिकाणी ३३६ आहे जे काही आहे ते आपण सादर करावयास पाहिजे होते परंतु ते आपण सादर केले नाही. फक्त आकडे फुगवुन ठेवले आहेत. हिन अर्थसंकल्प आहे, असे म्हणणे चुकीचे आहे. मी स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र

पारवानी यांना धन्यवाद देतो व त्यांना सांगतो की आपणाबरोबर संपुर्ण उल्हासनगर आहे. स्थायी समितीचे सर्व सोळाच्या सोळा सदस्य आहेत ते संपुर्ण शहराचे प्रतिनिधी आहेत. ते आपल्या बरोबर आहेत. राजकीय पक्ष म्हणुन येथे कुणी काही भुमिका घेत असेल तर ते चुकीचे आहे. जे झाले आहे ते स्थायी समितीत झाले आहे, आम्ही त्यास सहमत आहे. JNNRUM व एमएमआरडीएच्या माध्यमातुन उल्हासनगरचा विकास करावयाचा आहे. व खर्चामध्ये कपात करावयाची आहे, जो अनावश्यक खर्च आहे तो कमी करुन, जो आवश्यक आहे तो आपण केला आहे. त्यासाठी आपणांस शुभेच्छा देतो. धन्यवाद। जय हिंद। जय महाराष्ट्र।

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः–</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब व स्थायी समिती सभापतीजी, स्थायी समितीमध्ये जकातीचा जो मुद्दा आला होता, त्यावेळेस आमच्या सभापतींनी एक निवेदन वाचुन दाखविले होते. ते निवेदन कधी दिले नव्हते. हे सर्व स्थायी समितीस चुकीची माहिती देवुन केले आहे. चार बाबींवर आम्ही जो जकातीचा दर कमी केला आहे, बाकी आठ बाबींवर जकातीचा दर वाढविला आहे. त्याबाबत कुठल्या व्यापा–याचे किंवा व्यापारी मंडळाचे लेखी पत्र घेंतले आहे, असे जर सभापती म्हणत असतील व ते महासभेस दाखवत असतील तर त्याबद्दल माझी अशी सूचना आहे की, ज्या ८ बाबींवर जकातीचा दर वाढविण्यात आला आहे ती व्यापा–यांवर अन्याय आहे. व कपडयांवरील जकात दरांमध्ये २० पैसे जकात दर कमी करण्याबाबतीत जे व्यापा–यांना सांगण्यात आले होते त्यानुसार त्या कपंडयांवरील जकात दर २० पैश्यांनी कमी करावा व या ८ बाबींवरील जकात दराची वाढ हटविली जावी. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेश वदारियाः–</u>मा. महापौरजी, मी पाणी पुरवठयाच्या नुकसानीची गोष्ट आपल्या लक्षात आणुन दिली होती, तो काही राजनैतिक मुद्दा नव्हता. हा संपुर्ण शहराच्या हिताचा मुद्दा आहे. आपण त्याबाबत जर योजना तयार करणार, ती योजना बनविण्यास २ वर्ष, ४ वर्ष लागत असतील, तेव्हाच आपणांस त्यावर काही चांगला परिणाम मिळेल. आज २७ कोटी रुपये प्रत्येक वर्षाला नुकसान होत आहे व दिवसेंदिवस हे नुकसान वाढत जाईल. जसे श्री. धनंजय बोडारे म्हणाले, ११ वर्षात, त्यावेळेस ९७ मध्ये शिवसेना, भाजपाची सत्ता होती व आता एकावर्षापासुन आपण या सत्तेवर आहात. आपण परिवर्तनाच्या माध्यमातुन निवडून आला आहात तर आपणांसच परिवर्तन केले पाहिजे. आम्ही आपणाकडुन परिवर्तनाची अपेक्षा व्यक्त करतो. आपण या गोष्टींवर परिवर्तन कराल व आपण खरोखरच दाखवुन दयाल की, आपण खरोखरच परिवर्तन करु इच्छित आहात. दुसरे म्हणजे आपण जवाहरलाल नेहरु नागरी पुर्नउत्थान योजनेबाबत सांगितले, त्या योजनेमध्ये १०० टक्के अनुदान नाही. ३५ टक्के, १५ टक्के आणि ५० टक्के यातील ५० टक्के महानगरपालिकेला भरावयाचे आहेत. माझे जर काही चुकीचे असेल तर त्याबाबतीत आयुक्त साहेबांनी खुलासा करावा की ५० टक्के रक्कम महानगरपालिकेने दयायची आहे किंवा नाही? जर ५० टक्के रक्कम महानगरपालिकेनेच दयावयाची असेल तर त्याची आपण कुठे तरतुद केली आहे ते मला सांगा. आपण फक्त दर्शविले आहे की, १७१ कोटी येतील आणि ते आम्ही खर्च करु. आपला जो ५० टक्के सहभाग आहे तो कुठे आहे? जोपर्यंत आपण ५० टक्के रक्कम देत नाहीत तोपर्यंत तो पैसा आपण खर्च करु शकणार नाहीत. बीएसयुपी साठी आपण कोणताही भुखंड निश्चित केलेला नाही. जसे आपण म्हटले की आम्ही काही प्रस्ताव दयावा त्यानुसार माझे आपणांस असे सांगणे आहे की, ही अर्थसंकल्पीय सभा काही दिवसांसाठी तहकुब करा. त्या दरम्यान आम्ही आपणांस प्रस्ताव तयार करुन जरुर देवु. दुसरे असे की नगरसेवक निधीबाबत मी जे म्हटले की, निवडुन आलेल्या नगरसेवकांसाठी १५ लाखाचा निधी, नामनिर्देशित सदस्यांसाठी ५ लाखांचा निधी ठेवला आहे. त्याबाबतीत विचारलेल्या प्रश्नाचे आपण अदयाप उत्तर दिलेले नाही. मी असे समजतो की, माझा तो मुद्दा आपल्या लक्षात आला असेलच. नामनिर्देशित सदस्य आपले चार आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा एकच आहे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः–</u>मी जास्त काही बोलणार नाही. कारण अर्थसंकल्पाबाबतीत बोलण्यासारखे काहीच नाही. कुठल्याही प्रकारची करवाढ नाही तसेच नगरसेवक निधी वाढविला. श्री. राजेश वदारिया यांनी येथे जे काही सांगितले त्याबाबत मी बोलु इच्छितो, एक म्हणजे त्यांनी सांगितले की नगरसेवक निधी जो आहे तो सर्वांना समान असला पाहिजे. मी त्यांच्या मताशी सहमत आहे. सर्वांना समान हक्क मिळाला पाहिजे. दुसरी गोष्ट मी त्यांना सांगु इच्छितो की, तुम्ही खुप हुशार नगरसेवक आहात परंतु तुम्ही अर्थसंकल्प वाचायला विसरला आहात. तसेच त्यांनी सांगितले की, जो JNNRUM ही योजना दर्शविली आहे त्यामध्ये आमचा सुध्दा वाटा असेल. मी त्यांना सांगेल की ही योजना एक वर्षासाठी नाही. ही जी योजना आहे ती पाच वर्षाची योजना आहे. या पाच वर्षाच्या योजनेत यावर्षीचा आमचा जो वाटा आहे तो एक कोटी रुपये आहे. त्याची अर्थसंकल्पामध्ये तरतुद केलेली आहे. तसेच दुस–या वर्षाची तरतुद आम्ही पुढच्या वर्षीच्या अर्थसंकल्पात करु. यावेळेस आम्ही ६ कोटीची तरतुद केली आहे. व जसे टप्प्या टप्प्याने काम होईल तसे पुढील अर्थसंकल्पात त्याची तरतुद ठेवु. मी स्थायी समितीच्या सभापतींना धन्यवाद देतो की मी मागील ११ वर्षापासुन पाहत आलो

आहे की, जेव्हा स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्प सादर केला जातो, आयुक्त साहेब हा अर्थसंकल्प प्रस्तृत करतात तेव्हा स्थायी समिती आपला अर्थसंकल्प सादर करते. त्यावेळेस शहरातील करवृध्दी विरोधाबाबत वर्तमानपत्रात बातमी येते. परंतु यावेळेस कुठल्याही वर्तमानपत्रामध्ये, कूठल्याही नगरसेवकाने, कुठल्याही व्यापा—याने, किंवा कुठल्याही अंदोलनका—याने याबाबत उल्लेख केला नाही की हा अर्थसंकल्प बरोबर नाही आहे. यावेळेस पहिल्यांदाच असे झाले आहे की स्थायी समितीमध्ये फक्त १० मिनिटामध्ये अर्थसंकल्प सर्व संमतीने मंजुर झाला. प्रत्येक पक्षाचा नगरसेवक स्थायी समितीमध्ये एक सदस्य निवडतात. व प्रत्येक पक्षाचा सदस्य स्थायी समितीमध्ये आहे. व त्यांनी खुप आनंदाने हा अर्थसंकल्प वाचला आहे. या अर्थसंकल्पात करवाढीबाबत कुठलीच वाढ केली नाही. फक्त जकातीमध्ये थोडीफार वृध्दी केली आहे. मी आमच्या सभापती महोदयांना धन्यवाद देतो त्यांनी १० दिवस कठोर परिश्रम करुन सर्व पक्षांच्या पदाधिका—यांशी चर्चा करुन व्यापारी असोसिएशनच्या पदाधिका—यांना बोलावुन त्यांच्याशी चर्चा करुन सर्व संमतीने हा अर्थसंकल्प तयार केला आहे. त्यामुळे ते धन्यवादास पात्र आहेत. या अगोदरचे अर्थसंकल्प सुध्दा आम्ही पाहिले आहेत. आपण पाहिले असेल, आपले पत्रकार बंधु सुध्दा बसले आहेत. कश्याप्रकारे आमचे नगरसेवक बसले होते, व विरोधी पक्षास बोलण्याची संधी दिली जात होती. मी श्री. बोडारे साहेबांना धन्यवाद देतो. यांनी सांगितले की आपण आपला पुरक प्रस्ताव दया. जेव्हा आम्ही विरोधी पक्षात होता तेव्हा आम्ही आमचा पुरक प्रस्ताव घेवुन येत होतो. आपणांस फक्त ओरडता येते. जर पुरक प्रस्ताव तयार करता येत असेल तर तो तयार करुन दया. परंतु आपणाकडे कोणतीही योजना नाही. विरोधी पक्ष या नात्याने आपणांस फक्त काहीना काही बोलायचे आहे. आपणांस जर काही बोलायचे असेल तर आपण बोला. आम्ही ऐकण्यासाठीच बसलो आहोत. श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले की नगरसेवक निधी हा समान असला पाहिजे. त्याबाबत मी सुध्दा असे सांगतो की प्रत्येक नगरसेवकाचा निधी समान असला पाहिजे. व पुन्हा एकदा विरोधी पक्षांच्या सदस्यांना निवेदन करतो की, त्यांच्यावतीने स्थायी समितीमध्ये सदस्य पाठविण्यात आलेले आहेत. त्यांनीच स्थायी समितीमध्ये याबाबतचा ठराव सर्वसंमतीने पारीत केला आहे. आपण सुध्दा हा अर्थसंकल्प सर्व संमतीने पारीत करावा. जेणेकरुन शहराचा चौमुखी विकास होवू शकेल. धन्यवाद । जयहिंद । जय महाराष्ट्र ।

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—</u>आदरणीय महापौरजी, ही माझी पहिलीच महासभा आहे. एक वर्षाच्या प्रदिर्घ काळानंतर स्विकृत सदस्यांना या सभागृहात येण्याची संधी मिळाली आहे. व आताच माहित पडले की स्विकृत सदस्यांसाठी पाच लाख रुपये नगरसेवक निधी व निर्वाचीत सदस्यांसाठी १० लाखाचा नगरसेवक निधी शहर विकास कामासाठी राखुन ठेवला आहे. यासाठी श्री. राजेश वदारिया यांचे मी अभिनंदन करु इच्छितो. कारण की हा चांगला मुद्दा येथे मांडला आहे. जेथे आता श्री. राजु जग्यासी बसतात तेथे मी बसत असे. आता बैठकीच्या रांगा बदलल्या आहेत, श्री. प्रकाश यांना माहित असेलच त्यावेळेस मी सभागृहातील भिंतीबाबत बोललो होतो परंतु आता येथे सभागृहातील भिंतींवर चांगल्या चांगल्या नेत्यांचे प्रतिमा कोरण्यात आल्या आहेत.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u>महापौरजी......

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—</u>एक मिनिट, श्री. बी.बी. मोरेजी मला बोलु दया. परिवर्तन फक्त असे झाले आहे की अधिका—यांना काचेच्या घरात ठेवण्यात आले आहे. अर्थसंकल्पाचा विषय फारच गंभीर असा विषय आहे. ज्यावर मोकळेपणाने चर्चा झाली पाहिजे. अर्थसंकल्प हा केवळ मानसिकतेचा व आकडयांचा खेळ नाही आहे. जेथे विभागाचे लोक विचार करत बसतील की माझ्या विभागाचा किती अर्थसंकल्प आहे? लेखा विभागाचे लोक आकडयांच्या आधारावर अर्थसंकल्प खाली वर करतील. स्थायी समितीमध्ये आयुक्तांना तसे अधिकार आहेत, अर्थसंकल्पात किती घट आहे ? करात किती घट आहे? किती काय आहे हे बघितल्याशिवाय ते टाकु शकतील? महासभा किंवा स्थायी समिती असो विरोधी पक्ष असो किंवा सत्ताधारी पक्ष, सत्ताधारी पक्ष तर हा विचारच करेल की अर्थसंकल्प आम्हांला टाळया वाजवुन, टेबल वाजवुन पास करायचाच आहे. विरोधी पक्षाची ही मानसिकता असतेच की केवळ विरोध करण्यासाठीच अर्थसंकल्प आहे. जेव्हा स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्प येतो तेव्हा स्थायी समितीमध्ये आपापल्या पक्षातील प्रतिनिधी तेथे असतात. सर्वांचे प्रतिनिधी एकजुटीने तेथे जर अर्थसंकल्प पारीत करतात तर अर्थसंकल्प पारीत मानला जातो. कुठलाही पक्ष हा स्थायी समितीमध्ये एक वेगळी भुमिका व महासभेत वेगळी भुमिका ठेवणे हे उचित नाही. तसेच स्थायी समितीमध्ये बंद दरवाज्यामध्ये जे काही होते तेथे पत्रकार उपस्थित नसतात, साधारण जनता तेथे नसते त्यामुळे जे पाहिजे ते केले जाते. महासभेत आल्यावर जनता बघते, पत्रकार बघतात, त्यावेळेस तेथे विरोध केला जातो. तर मग स्थायी समितीमध्ये असलेला आपल्या पक्षातील प्रतिनिधी विरोध का नाही करत? तेथे विरोध करुन दाखवा, ती मानसिकता घेवुन येथे विरोध करा. अर्थसंकल्पासाठी जर एखादा नगरसेवक म्हणतो की माझ्या प्रभागात गुलशन नगर मध्ये गुलशन झाले पाहिजे तर आम्ही मानणार. श्री. बागुलजी, परंतु गुलशन नगरमध्ये गुलशन

होण्यासाठी आपण अर्थसंकल्पास साथ देणार काय? हात वर करा, आम्ही मानणार. आता मी श्री. पारवानीजी यांना सांगतो की, गुलशन नगर त्यात टाका तर आपण काय हात वर करणार? बोला, सांगाना?

<u>**सदस्य श्री. रविंद्र बागुल:–**</u>हात वर केला पाहिजे. जर अर्थसंकल्पात तशी तरतुद ठेवली नसेल तर त्यात तरतुद ठेवली पाहिजे.

<u>**सदस्य श्री. नरेंद्र राजानी:–**</u>गुलशन नगरचा एक मुद्दा त्यामध्ये ठेवा व त्याच्या विकास कामाची तरतुद अर्थसंकल्पात ठेवा. अश्याप्रकारच्या गोष्टी करा की अर्थसंकल्पात काय काय तरतुद ठेवली पाहिजे? जेथपर्यंत श्री. राजेशजी आपण जसे म्हणालात की JNNURM योजनेसाठी १७८ कोटी देत आहेत, त्यातील अर्ध्ये महानगरपालिकेने खर्च केले पाहिजेत. जर माझ्या शहराच्या विकासासाठी अर्धे पैसे कोठुन येत असतील तर मी काय त्यास मान्य करु नये? मी असे का म्हणावे की अर्ध्ये पैसे कोठुन आणणार? का थांबुन जाणार? या पैश्यांचे बंदोबस्तासाठी मी आपल्या शहरासाठी झटुन जाणार व हे आम्ही सर्व मिळुन करणार. हा काही विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्षाचा विषय नाही आहे. आपण सर्व मित्र आहोत. तुम्ही पर्यवेक्षक आहात आम्ही सर्व काम करणारे आहोत. आम्हांला साथ दया, सहयोग दया. आपण सर्व मिळुन काम करु, शहराचा विकास करु. केवळ आम्ही टेबल वाजवु व आपण सर्व विरोध कराल? बाहेर सर्व जनता आपणांस पाहत आहे. विरोध करणारे केवळ विरोध करत आहेत, स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्प पारीत करत आहेत व महासभेत विरोध करत आहेत. हे जनता पाहत आहे. आम्ही केवळ टेबल वाजविणार, अर्थसंकल्प पास करणार नाहीत, जनता आपणांस पाहत आहे. मी आपले अभिनंदन करतो की आपण जसी परिवर्तनाची गोष्ट करत होता, म्हणजे आपण सुध्दा बघता की परिवर्तन झाले पाहिजे. आपल्या मनाची सुध्दा इच्छा आहे की परिवर्तन झाले पाहिजे. ते परिवर्तन करण्यासाठी आपण येथे आलो आहोत त्यासाठी त्यास वेळ दिला पाहिजे. त्या परिवर्तनास आपण सहभाग देणार तर त्या परिवर्तनासाठी मी बाकावर उभा राहिल. आम्ही या शहरासाठी परिवर्तन करणारच. आम्ही आयुक्त साहेबांना सांगतो की अधिका–यांना काचेच्या घरात बसवुन ठेवला आहात, काचेच्या घरात दगड फेकणे मला सुध्दा येते. या आधारावर या अर्थसंकल्पास विरोध करण्यास आपणांस काय उचित वाटत आहे? अर्थसंकल्पात काय कमी आहे, कुठे अडचण आहे? ती दुर करु या व अर्थसंकल्पास एकमताने पारीत करु या. मला फक्त एवढेच म्हणायचे होते. या टर्म मधील माझी ही पहिलीच सभा आहे त्यामुळे जास्त काही बोलणे उचित वाटणार नाही. धन्यवाद।

<u>**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**</u>मा. महापौरजी, मी श्री. जमनादास पुरस्वानी व नरेंद्र राजानी यांना धन्यवाद देतो त्यांनी जरी अर्थसंकल्पाचे समर्थन केले आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्उत्थान योजनेचा जो गाभा आहे तो १५ + ३५ + ५० मी असे म्हणतो की तो पैसा आमच्या शहराच्या विकासासाठी जरुर यावा. जसे आपणांस वाटते. मी असे म्हणतो की त्याची तरतुद न केल्यामुळे जे काम होणार आहे ते सुध्दा कदाचित होणार नाही. २७ कोटी रुपये प्रत्येक वर्षी जवळ जवळ ७५ हजार रुपये दररोज आपण पाण्यावर नुकसान सोसत आहोत. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्उत्थान योजनेमध्ये आपणांस जे पैसे लावायचे आहेत ते आपण कोठुन आणणार? पैश्याचा बंदोबस्त कसा करायचा ते आपणांस सांगायचे आहे. जर मी चुकीचे सांगत असेल, ५० टक्के नाही १०० टक्के अनुदान आहे? तर कृपया महापौर महोदयांना मी विनंती करेन की त्यांना आयुक्त साहेबांना निर्देश दयावा, त्यांनी स्पष्टीकरण करावे. स्पष्ट करावे की अनुदान किती येणार आहे व आम्हांस किती दयायचे आहे?

<u>**सदस्य श्री. राजु जग्यासी:–**</u>मा. महापौरजी, आमचे मोठे बंधु श्री. नरेंद्र राजानी यांनी जसे म्हटले, त्यानुसार मी त्यांना निवेदन करतो की, केवळ श्री. रविंद्र बागुलच काय तर पुर्ण शहराच्या हिताचा अर्थसंकल्प असेल तर आम्ही सर्व सदस्य अर्थसंकल्पाच्या बाजुने हात वर करण्यास तयार आहोत. श्री. राजानीजी यांनी विचारले की आपण केवळ हे सांगा की अर्थसंकल्पामध्ये काय आहे? का विरोध करु इच्छिता? श्री. राजानीजी म्हणाले की ही त्यांची पहिली महासभा आहे. मागील वेळेस कसा कारभार चालला? मी केवळ आपल्या एक दोन मुद्दयांवर लक्ष वेधु इच्छितो, शहरामध्ये जो पुतळा उभारतात त्यासाठी मागील वर्षी पाच लाख निधी ठेवला होता. मात्र यावर एक पैसा सुध्दा खर्च करण्यात आला नव्हता. यावर्षी या लेखा शिर्षात ४५ लाखाची तरतुद करण्यात आली आहे. हे काय दर्शवत आहे? कुठे जाणार तो पैसा? श्री. जमनुजी, आपण लक्षपुर्वक ऐकुन घ्या, आम्ही केवळ विरोधासाठी विरोध करत नाहीत. आपण मुद्दयांवर बोला. मुददयांवर बोलण्यास आम्ही तयार आहोत. मागील वेळेस आपण ५ लाख रुपयाचा निधी ठेवला होता त्यातील एक रुपया सुध्दा खर्च केला नाही व या वर्षी ४५ लाख रुपयाची तरतुद करत आहात? महापालिका इमारतीचे मी एक उदाहरण दिले. २ कोटी ३२ लाख रुपये आपण त्या लेखाशिर्षात ठेवले आहेत. व त्याबरोबर असे लिहिले आहे की

८२ लाख रुपयाचे मागील देणे बाकी आहे. मागील वर्षी ८२ लाख रुपये आपण महापालिका इमारतीवर खर्च केले आहेत. या पैश्यातुन महापालिकेची कोणती इमारत बांधण्यात आली आहे? ती आम्हांला सांगा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—मा. नगरसेवक श्री. राजु जग्यासी यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्याबद्दल मी त्यांना येथे सांगु इच्छितो. पुतळयांसाठी जो निधी ५ लाख रुपये ठेवण्यात आला आहे, जेव्हा कधी अर्थसंकल्प तयार केला जातो. तेव्हा कोणत्या ना कोणत्या लेखा शिर्षामध्ये काहीना काही रक्कमेची तरतुद करुन ठेवली जाते. कधीकधी आपण असा अंदाज करतो की या वर्षी मी माझ्या घरावर आणखी एक स्लॅब टाकेन. परंतु तो जर टाकण्यात आला नाही तर त्यासाठी तरतुद केलेल्या अदांजाची ५ लाख रुपयाची बचत होईल. आपण जर म्हणत असाल तर पुतळयांसाठी तरतुद केलेल्या ४५ लाख रुपयामध्ये कपात केली जाईल.

सदस्य श्री. नरेंद्र राजानीः—श्री. जमनुजी, त्या पैश्याची बचत होत नाही.

सदस्य श्री. राजु जग्यासीः—मी तेच सांगु इच्छितो की त्या पैश्याची बचत होत नाही. त्या लेखाशिर्षातुन तो निधी दुस—या लेखाशिर्षात समायोजित करुन त्यामधुन सीसी पॅसेज सारखी कामे केली जातात.

सदस्य श्री. नरेंद्र राजानीः—अनौपचारीक विरोधी पक्ष नेताजी .....

सदस्य श्री. राजु जग्यासीः—जर ही महापालिका अनौपचारीक काम करत असेल.........

सदस्य श्री. नरेंद्र राजानीः—कृपया ऐकुन घ्या. माझे ऐकुन घ्या. आपण विरोध करत आहात म्हणुन मी बोलत आहे. नाहीतर मी बोललो नसतो. तसे तर आमच्या पक्षाचे नेते आहेत. काय आपणांस असे वाटते की पुतळयांसाठी तरतुद केलेल्या ४५ लाख रुपयातील काही रक्कम कपात केली जावी? काय आपली अशी सूचना आहे?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— या अर्थसंकल्पात पुतळयांसाठी आम्ही ४५ लाख रुपयांची तरतुद ठेवलेली आहे. शहरामध्ये २२ पुतळे आहेत. त्या २२ पुतळयांची यावर्षी आम्हांला देखभाल करुन निगा ठेवायची आहे. आपणांस असे वाटते की हे कामे होवू नये म्हणुन?

सदस्य श्री. राजेश वदारियाः—पुतळयांना नविन रंग रुप दिले पाहिजे हे बरोबर आहे. परंतु त्याचबरोबर असे होता कामा नये की,.........

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानीः—नेताजी सुभाषचंद्र बोष, शहिद हेमु कालानी, चौईथराम गिधवानी यांचे पुतळे आम्ही तयार केले आहेत. आणि ते यावर्षी बसविणार आहोत. हे कदाचित आपणांस माहित नसेल.

सदस्य श्री. राजु जग्यासीः—श्री. बच्चारामजी आपण हे सिध्द करुन दाखवा की, आपण ५ लाख रुपये पुतळयांवर खर्च केले आहेत तर मी आताच्या आता सभागृहात राजीनामा देतो. आपण सभागृहाची दिशाभुल करत आहात.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानीः—शहिद हेमु कालानी यांच्या पुतळयाचे काम चालु आहे.

सदस्य श्री. बी.बी. मोरेः—अहो, दिशाभुल करणे हे श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचे कामच आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानीः— नाही, नाही आमचे काम नाही. आपणांस फक्त विरोध करायचा आहे म्हणुन आपण असे बोलत आहात.

सदस्य श्री. किशोर जग्यासीः—मा. महापौरजी, या लेखा शिर्षातुन खर्च झाला आहे किंवा नाही याबाबतची माहिती देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. शिर्के यांना बोलाविले जावे. तेच सांगतील पुतळयांवर खर्च झाला आहे किंवा नाही?

सदस्य श्री. नरेंद्र राजानीः—आदरणीय राजु जग्यासी, ....... आणि जर श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी तसे सिध्द करुन दाखविले तर? मग आपण कृपया राजीनामा देवु नका.

**सदस्य श्री. राजु जग्यासी:—**श्री. नरेंद्रजी, आपणांस सुध्दा धोका होईल. पुढील वर्षी आपण सुध्दा उभे राहुन याबाबतीत बोलु लागाल. आता आताच आपण असे म्हणलात की येथे काचेच्या केबीनमध्ये अधिकारी बसले आहेत, फक्त एवढेच परिवर्तन झाले आहे.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :—**सर्वात महत्वाची गोष्ट ही आहे की, मागील वर्षी पुतळयांसाठी फक्त ५ लाख रुपयांचाच निधी ठेवण्यात आलेला नव्हता. मला वाटते की त्यापेक्षा अधिक निधी ठेवण्यात आलेला होता.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**मा. महापौरजी, आमचे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, ही ५ वर्षासाठीची तरतुद आहे तर मी त्यांना सांगु इच्छितो की, आपण जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे तो फक्त एक वर्षाचाच आहे. दुसरे असे की, जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्व्हल मिशन बाबत जो शहर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे तो १६०० कोटीचा आहे. व मागील वर्षी आपण १७६.७९ कोटीची तरतुद केली होती. ती योजना अदयाप मंजुर होवुन आलेली नाही. तर मागील वर्षाची तरतुद आपण यावर्षी सुध्दा करु इच्छित आहात. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पाचे स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांचे भाषण आपण स्वत: वाचुन पहा.

आम्ही संपुर्ण शहरातील कामांची माहिती घेवुन १६०० कोटीची एक योजना तयार केली आहे. या योजनेअनुसार ज्या सेवा अपेक्षित आहेत त्या या प्रकारच्या आहेत.

१. रस्ते विकास कार्यक्रम
२. पाणी पुरवठा योजना
३. भुयारी गटार योजना
४. घणकचरा व्यवस्थापन
५. ट्रक टर्मिनल
६. पार्किंग सुविधा
७. रेल्वे उड्डान पुल
८. पदयात्रीपुल

सन २००७—०८ पासुन २०११—२०१२ पर्यंत म्हणजे येणा—या या पाच वर्षातील वित्तीय कार्यक्रमाची माहिती याप्रकारची आहे.

रस्ते, पाणी पुरवठा व जलनिस्सारण सुविधा २००७—०८ ते २०११—२०१२ पर्यंत ८३१ कोटी सन २००७—०८ साठी खर्च १७.२२ कोटी, गलिच्छ वस्तीमध्ये घर बांधण्यासाठी ६३१ कोटी आणि १३२ कोटी सन २००७ आणि २००८ मधील, गलिच्छ वस्तीमधील मुलभुत सुविधा २०११—२०१२ पर्यंत १३६ कोटी आणि सन २००७—०८ पर्यंत २८ कोटी एकुण २००७—०८ ते २०११—२०१२ पर्यंत १५९९.२४ कोटी. सन २००७—०८ साठी खर्च १७६ कोटी.

तर मी आपणांस सांगु इच्छितो की, आज जे आपण १७१ कोटीची तरतुद सांगत आहात ती चार वर्षाची नसुन फक्त एक वर्षाचीच तरतुद सांगत आहात. पाच वर्षासाठी १६०० कोटी रुपये आहे.

**सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—**जेएनएनयुआरएमचा इंग्रजीमधील स्थायी समितीचा जो अंदाज दर्शविला आहे त्यातील पहिले पान जर आपण पाहिले, तर असे दिसुन येईल की, जेएनएनयुआरएमचा अनुदानाचा जो आकडा दर्शविला आहे, तो १७ कोटी २२ लाख ३३ हजार आहे, काय हे बरोबर आहे? ते अनुदान आहे. दुसरा बीएसयुपीचे जे अनुदान आहे १३२ कोटी ८१ लाख ८२ हजार आहे, काय हे जे आकडे आहेत ते बरोबर आहेत? याव्यतिरिक्त जे कर्ज आहे ते २८ कोटी ७५ लाख ९ हजाराचे. हे कर्ज आहे अगोदरचे जे आहे ते अनुदान आहे. या खाली जो आकडा दर्शविला आहे तो ६ कोटी ८१ लाख १५ हजार रुपये ही जी तरतुद आहे ती महापालिकेच्या वतीने केलेली. कुणीही समजदार विरोधी पक्ष यास नाही म्हणु शकणार नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**श्री. राजेशजी मी आपणांस सांगु इच्छितो की जेएनएनयुआरएमचा आम्ही जो प्रस्ताव तयार केला आहे त्याबाबत श्री. नरेंद्र राजानी यांनी सांगितले की त्यासाठी (मनपा हिस्सा म्हणून )आम्ही ६ कोटी ८१ लाख १५ हजाराची तरतुद केलेली आहे. पाणी पुरवठा आणि भुयारी गटार योजनेचे काम सर्वात प्रथम हाती घ्यावे, असे आम्ही अधिका—याना सांगितले आहे. याकामांसाठी ज्याप्रकारे तरतुद केली आहे त्याप्रमाणे काम करु. शक्य असेल तर आम्ही दुसरीही तरतुद करु. ही महासभा कधीही कोणत्याही वेळी दोन, चार महिन्यानंतर यासाठी तरतुद करु शकते. आपण हुशार नगरसेवक आहात आपण असे समजु नये की आज एकदा तरतुद केल्यानंतर पुन्हा तरतुद केली जावु शकणार नाही, असे काही नाही. आमचे सद्याचे आयुक्त आल्यापासुन एमएमआरडीए जेएनएनयुआरएम हे निधी यायचे सुरु झाले आहेत. आमचे कित्येक

अधिकारी या प्रस्तावांचा पाठपुरावा करण्यासाठी गेले आहेत. ज्याप्रकारे काम सुरु होत राहिल त्याप्रमाणे तरतुदही होत राहील. ६ कोटी ८१ लाखाची तरतुद आहे. जर जास्त वसुली होत असेल तर त्यानंतर कधीही आम्ही महासभेमध्ये २, किंवा ३ महिन्यानंतर तरतुद करु शकु. व येणा–या दुसरा, तिस–या, चौथ्या वर्षी आम्ही निधी घेत राहु व त्यासाठी तरतुद करत राहु.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुरः–</u>मा. महापौरजी,मा. आयुक्त साहेब, मा. उप–महापौरजी, स्थायी समिती सभापती, सर्वात प्रथम तर स्थायी समिती सभापतीचे मी हार्दिक अभिनंदन करतो. कारण त्यांनी अतिशय चांगला असा अर्थसंकल्प सादर केला आहे. त्याचबरोबर आमच्या सर्व मित्रांना मी विनंती करु इच्छितो की, अर्थसंकल्पावर आधी लक्ष दया व त्यानंतरच बोला. फक्त विरोध करायचा म्हणुन विरोध करु नका. चर्चा करायची असेल तर रात्रभर चर्चा करा. आज करा, उदयाही करा. त्यास कुणाची काही हरकत नाही. श्री. बी.बी.मोरे साहेब यांनी टॅकरवर शंभर रुपये शुल्क आकारण्याबाबतीत आयुक्तांना विनंती केली आहे. त्यांना मी हे सांगु इच्छितो की स्थायी समितीमध्ये जेव्हा हा विषय चर्चेस आला होता त्यावेळेस त्यांचे सदस्यही तेथे होते मग त्यांनी त्यावेळेस याबाबत का म्हटले नाही? त्याचबरोबर श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांना प्रश्न विचारु इच्छितो की, व्यापारी लोकांसाठी जकातीचे दर वाढविले ते कमी केले जावे. ज्यावेळेस स्थायी समितीमध्ये हा विषय चर्चेस आला होता त्यावेळेस काही जकात पात्र वस्तुंच्या जकात दरामध्ये वाढ केली होती तर काही जकातपात्र वस्तुंच्या जकात दरामध्ये घट करण्यात आली होती त्यावेळेस त्यांच्या पक्षांचे सदस्यांनी स्थायी समितीमध्ये विरोध का केला नाही? त्याचबरोबर श्री.राजेश वदारिया यांनाही मी एक प्रश्न विचारु इच्छितो. ते वारंवार म्हणत आहेत की पाणी पुरवठयामुळे उल्हासनगर महानगरपालिकेचे २०० कोटीचे नुकसान होत आहे, त्याबद्दल मी त्यांना विचारु इच्छितो की, हे २०० कोटीचे नुकसान कोणी केले? त्याबाबत कुणी आजपर्यंत तरतुद का केली नाही? व जी तरतुद केली होती ती डब्यात का टाकण्यात आली? पाणी पुरवठयासाठी मा. आमदार पप्पु कालानी यांनी १०२ कोटीचा प्रस्ताव आणला होता आणि त्यास मंजुरी देण्यात आलेली होती. तो कुठे गेला? त्याबाबत कुणी काही प्रश्न विचारत नाही. आज आपण म्हणत आहात पाणी पुरवठयामुळे २०० कोटीचे नुकसान होत आहे ते नुकसान कुणामुळे होत आहे? आज सत्तेमध्ये बसलेले लोक आहेत त्यांना सत्तेत बसुन एक वर्ष होत आहे तर आपला हा जो प्रश्न आहे तो ज्यांनी पंधरा ते वीस वर्ष सत्ता भोगली त्यांना विचारा. पुढे काही वर्षांनी आपल्या शहरतील लोकसंख्या वाढेल आता ज्या कुटुंबास एक ड्रम पाण्याची आवश्यकता आहे त्यास काही दिवसांनी ४ ड्रम पाणी लागेल. तर एवढया मोठया प्रमाणावर पाणी कोठुन आणणार? त्यासाठी त्या लोकांनी तरतुद का केली नाही? स्थायी समितीच्या माजी सभापती श्रीमती ज्योती कालानी यांचे नाव गिनिझ बुकामध्ये लिहिले जाणार होते त्या सलग ७ वर्षे अर्थसंकल्प सादर करत होत्या. त्यावेळेस याबाबतची तरतुद का करण्यात आली नाही? निवडणूकांच्या अगोदर मा. आमदार पप्पु कालानी यांनी जाहिर केले होते की जकात वसुलीचे खाजगीकरण मी करणार नाही. मग त्यानंतर जकात वसुलीचे खाजगीकरण का करण्यात आले? त्यावेळेस हा प्रश्न का विचारण्यात आला नाही? जकातीचे दर वाढविले असे आज बोलले जात आहे. एका वृत्तवाहिनीवर असे वृत्त दर्शविले जात आहे की पाण्याचे दर वाढविले आहेत, जकातीचे दर वाढविले आहेत, मालमत्ता करांचे दर वाढविले आहेत. अर्थसंकल्पाचे पुस्तक यांच्या हातात आहे, त्या अर्थसंकल्पात कोणत्याही करांच्या दरात वाढ करण्यात आलेली नाही परंतु त्यांना त्यातील काही कळतच नाही. हे लोक शहरामध्ये असा चुकीचा प्रचार का करत आहेत? कुणीतरी आज वर्तमानपत्रामध्ये एक वृत्त दिले आहे की, मालमत्ता कर वाढला आहे, पाणी पट्टीचा दर वाढला आहे. हे दर कुठे वाढविले आहेत? एक रुपयाचा सुध्दा दर वाढविलेला नाही असे असतांना हे लोक चुकीचा प्रचार का करत आहे? खोटी लोकप्रियता मिळविण्यासाठी असा खोटा प्रचार करु नका. प्रथम आपल्या मनामध्ये डोकवा, त्यानंतर विचार करा आणि बोला. प्रत्येक घर काचेचे असते. म्हणुन प्रथम आपले घर पहा. आपले झोपडे जाळुन दुस–याची हवेली दाखविण्याचा प्रयत्न करु नका. मला तर असे वाटते की, चित्रपटात जी शुटींग होते जसे इनडोर शुटिंग आणि आउटडोर शुटिंग परंतु चित्रपट तर एकच तयार होतो. वेगवेगळा चित्रपट तयार होत नाही. त्यानुसार आपण इनडोर शुटींग वेगळी करता व आउटडोर शुटिंग वेगळी करता त्यातुन वेगळा चित्रपट तयार होणार नाही. एकच चित्रपट तयार होईल स्थायी समिती मध्ये एक म्हणता व महासभेमध्ये वेगळेच म्हणता. लोकांना दाखविण्यासाठी महासभेत ओरडायचे की हा अर्थसंकल्प बोगस आहे व स्थायी समितीमध्ये गुपचुप पारीत करायचा. मग आपण तेथे अर्थसंकल्प का मंजुर केला. तर मग तेथेच विरोध करायचा होता. यासाठी मी आपणांस विनंती करतो की हा अर्थसंकल्प आपण सर्वसंमतीने पारीत करा. या अर्थसंकल्पात बोगस असे काहीच नाही आहे. एक महिन्या अगोदर या व्यासपीठावर बसुन मा. आमदारांनी सांगितले होते की, शहराच्या विकासासाठी मी आपणाबरोबर आहे व आपल्या खांदयास खांदा लावुन मी काम करेन. शहराच्या लाडक्या आमदारांच्या शब्दाचा आपण मान ठेवा व हा अर्थसंकल्प आपण सर्व संमतीने पारीत करा. जयहिंद जय महाराष्ट्र।

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—सन्माननिय महापौरजी आणि आयुक्त साहेब, श्री. विनोद ठाकुर हे मिलिजूली भगत आहेत यांचा एक साथीदार आहेत. आज तो साथीदार सर्वांचे ऐकुन घेतल्यानंतर, अर्थसंकल्पाबाबतीत काही बोलले. श्री. बी.बी. मोरे यांचे काही सदस्य स्थायी समितीमध्ये आहेत. ते तेथे अर्थसंकल्पास सहकार्य करतात. आणि येथे विरोध करायचा म्हणुन विरोध करतात. श्री. विनोद ठाकुर हे चुकीचे आहे, चुकीचे आहे. आपण लक्षपुर्वक ऐकुन घ्या. स्थायी समितीमध्ये आमचा जो सदस्य आहे, तो जेव्हा विरोध करतो तेव्हा तुमचे सदस्य आणि सभापती ऐकत नाहीत. आणि आपल्या बहुमताच्या जोरावर ठराव मंजुर करुन घेता. तसेच हा अर्थसंकल्प अर्थहिन आहे, पोकळ आहे, जे जेष्ठ सदस्य आहेत त्यांनी आज तोंड सुध्दा उघडले नाही त्यांनी तोड का उघडले नाही? कारण त्यांना माहित आहे की या अर्थसंकल्पात काही त्रुटी आहेत. परंतु जे बोलत आहेत ते मिलिजुली भगतवाले आहेत. वारंवार सभापतींना धन्यवाद देत आहेत, परंतु आम्ही धन्यवाद न देता अर्थसंकल्पाचा विरोध का करत आहोत? आम्हांला वाटते ही सभा पुढे ढकलावी. आम्ही तुमच्या बरोबर चर्चेस बसण्यास तयार आहोत. हा अर्थसंकल्प शहराच्या हितासाठी जर असेल तर आम्ही आपल्या मताशी सहमत आहोत परंतु श्री. विनोद ठाकुरजी जरा लक्षपुर्वक ऐकुन घ्या.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—सन्माननिय मोरे साहेब, आपणांस माहित असेल जेव्हा अर्थसंकल्पाची सभा असते त्या अगोदर आपणांस अर्थसंकल्पाची प्रत पुरविली जाते. इतिवृत्त येते. आपल्या कोणत्या सदस्यांनी अर्थसंकल्पास विरोध केला आहे ते इतिवृत्तात आम्हांला दाखवा. तसा काही पुरावा दाखवत असाल तर आम्ही आताच्या आता याबाबतीत विचार करु.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आता सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष यांच्याकडुन बरीचशी चर्चा झाली आहे. विरोधी पक्षाला सुध्दा कळले आहे की अर्थसंकल्प फारच चांगला आहे. परंतु विरोध करण्यासाठी विरोध करायचाच आहे. यासाठी मा. महापौरांना विनंती आहे की त्यांनी अर्थसंकल्प मतदानास टाकावा.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—अहो जरा आपण ऐकुन घ्या श्री. विनोद ठाकुर बोलतात श्री. पप्पु कालानी यांनी काय केले?

सदस्य श्री. मोहन साधवानी :— मा महापौर महोदया, अर्थसंकल्पावर आतापर्यंत बरीचशी चर्चा झाली आहे. आमच्या काही सदस्यांना चर्चा करायची आहे. यासाठी श्री.बी.बी. मोरे यांना खाली बसण्यास सांगा.

सदस्य श्री. बी.बी मोरे:—सभागृहनेताजी, दोन मिनिटं ऐकुन घ्या.

.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:—मा. महापौरजी, आमच्या सदस्यांनी स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्पास विरोध केला होता परंतु ते इतिवृत्तात आलेले नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, कृपया प्रस्ताव मतदानास टाका.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—मी बोलत आहे, श्री. मोरे साहेब तुम्ही बसुन घ्या. मला बोलु तर दया.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—श्री. मोरे साहेब, तुमचाच विरोधी पक्ष नेता बोलत आहे.

सदस्य श्री. सतिश चहाळ:—अहो, गायकवाड साहेब तुम्ही विरोधी पक्ष नेता आहात हे आम्हांला सुध्दा माहित आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—श्री. मोरे साहेब, विरोधी पक्ष नेते आपलेच आहेत त्यांना बोलायचे आहे त्यांना बोलु दया, तुम्ही बसुन घ्या.

महापौर :—खाली बसा. खाली बसुन घ्या. एकेकाने बोला.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—मा. महापौरजी, उप—महापौरजी, स्थायी समिती सभापती व आयुक्त साहेब, खरतर मला या ठिकाणी बोलायचे नव्हते. सर्व सदस्य आणि गटनेते बोलले आहेत. परंतु श्री.बी.बी. मोरे साहेब हा अर्थसंकल्प बोगस असल्याचा आरोप वारंवार लावत आहेत. त्यामुळे थोडेफार मी त्यांच्या लक्षात

आणुन देवु इच्छितो. आणि मला कोणताही आरोप तुमच्यावर करायचा नाही. कारण मी तुमचाच विरोधी पक्ष नेता आहे. तुमच्या सर्व मताशी मी सहमत आहे.

सदस्या श्रीमती जया माखिजा, श्रीमती जयश्री पाटील या सभागृहातुन बाहेर गेल्या. 

सदस्य श्री. रविंद्र बागुल:—आमच्या नावापुरता साहेब...

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—ऐकुन घ्या, श्री. बागुल साहेब. स्थायी समितीमध्ये आतापर्यंत जेवढया सभा झाल्या आहेत, सन्माननिय सदस्य, सन्माननिय पत्रकार, सन्माननिय गटनेते, सभापती यांना सांगु इच्छितो. स्थायी समितीमध्ये मी स्वत: सुध्दा सदस्य आहे. प्रत्येक प्रस्तावावर, मुद्दयावर व विषयावर सर्वात जास्त मी बोललो आहे. पाहिजे तर आपण आजपर्यंतच्या सभा सूचना काढुन पहा. आपणांस दिसुन येईल प्रत्येक विषयाच्या चर्चेत मी भाग घेतलेला आहे. आपला एकही सदस्य स्थायी समितीमध्ये बोलत नाही. याबाबत वारंवार मी तुमच्या गटनेत्यांकडे तक्रारी केलेल्या आहेत. विरोध करता येत नसेल तर निदान चर्चेत तरी भाग घ्या. स्थायी समितीची सभा तुम्ही १० मिनिटात उरकता. या मागचे रहस्य काय? श्री. कुमारी साहेबांना सुध्दा मागच्या वेळेस बोललो. काय साहेब, स्थायी समितीमध्ये जेव्हा पाहिले तेव्हा मान हलवत असतात. विषय वाचल्यानंतर सचिव साहेब म्हणतात पास का? त्यावेळेस आपण त्वरीत मान हलवुन इशारा करतात की पास. ही काय भानगड आहे? ते म्हणतात की नाही नाही बरोबर चालु आहे, खुपच चांगले आहे, पहिल्या पेक्षा फारच चांगले आहे. याठिकाणी मी काही कॉमेंटस् किंवा कॉमेंटरी करत नाही. स्थायी समिती सभागृहामधील घडामोडी प्रामाणिकपणे मी येथे सांगत आहे. गटनेते स्वत: आरोप करतात आणि स्थायी समिती सदस्यांना सांगतात की तुम्ही स्थायी समितीमध्ये विरोध का करत नाहीत. पाण्याच्या टॅकरचा विषय आला, कच—याच्या अमर,अकबर,ॲन्थोनीचा विषय आला. तेथे सुध्दा तुमचा विरोध होत नाही त्याठिकाणी आम्ही चर्चा करतो. शहर टॅकरमुक्त झाले पाहिजे, पाहिजे तर तुम्ही इतिवृत्त वाचा. मी काय बोललेलो आहे आणि तुमचे सदस्य काय बोलले आहेत? तुम्ही याठिकाणी खोटे आरोप करु नका. याठिकाणी सन्माननिय स्थायी समिती सभापती यांनी खरोखरच रात्रं दिवस एक करुन मा. सर्व गटनेत्यांना याची कल्पना देवुन सर्व पक्षीय, नि:पक्षपाती अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्यास आपण सर्वसंमतीने पारीत केले पाहिजे. ही प्रामाणिक पणे तुम्हा सर्वांना माझी विनंती असेल आणि एक आठवण करुन देतो की काही दिवसांपुर्वी मा. आमदार श्री. पप्पु कालानी यांनी टीव्हीवर स्वत:ची मुलाखत देत असतांना सांगितले की, ज्यांना टक्केवारी घ्यायची असेल त्यांना ती घेवु दया. पण सत्ताधारी पक्षाचे लोक जर विकास कामे चांगली करत असतील तर त्यांना त्याठिकाणी खरोखरच साथ दया. असा प्रकारचे त्यांचे वक्तव्य मी स्वत: पाहिले आहे आणि ऐकलेही आहे. म्हणुन तुम्ही सन्माननिय आमदारांचा तरी याठिकाणी आदर ठेवा. त्यांनी तुम्हांला सांगितले आहे की ज्याठिकाणी विकास कामे करतात, त्याठिकाणी त्यांना सहकार्य करा. आणि गेल्या पाच वर्षापासुन मी बघत आहे, २००२ पासुन ते २००६ पर्यंत ३ लाख, ४ लाख, ५ लाखाच्या खिरापतीशिवाय आम्हां नगरसेवकांना जास्त नगरसेवक निधी सत्ताधारी पक्षाने कधी दिला नाही. आज याठिकाण ४,५,७ लाख नव्हे तर १५ लाख रुपये आम्ही स्वत: मा. गटनेते, विरोधी पक्षनेता म्हणुन आम्ही स्थायी समिती सभापती व आयुक्त साहेबांना विनंती केली. तर ज्या नगरसेवकांना याचा अभ्यास नसतो, ज्या नगरसेवकांना कुठला निधी कुठल्या लेखाशिर्षातुन कसा घ्यायचा याची माहिती नसते, त्यामुळे ते नविन नगरसेवक आपल्या प्रभागामध्ये विकास कामे करुन घेण्याच्या कामात मागे राहतात. यावेळेस आमची तुम्हांला विनंती असेल की कसेही करुन नगरसेवक निधी हा पंधरा लाख रुपये मिळालाच पाहिजे. पंधरा लाख नगरसेवक निधीचा आकडा जर फुगवलेला असेल तर तो तुम्ही घेवु नका. इतर नगरसेवक घेतील. नाहीतर घेवुच नका तुम्ही करा हात वर. मी सांगतो की, बाकीच्या नगरसेवकांना दया. ज्या झोपडपट्टयांमध्ये विकास कामे जवळ जवळ शुन्य टक्क्यावर आहे, भ्रष्टाचाराच्या आकडयाचा तर तुम्ही डोंगर तयार केला. वारंवार श्री. जग्यासी साहेब बोलत आहेत. अहो ॲन्थोनीच्या ठेक्याबाबत तुम्हांला बोलायचा अधिकार नाही व साठ हजाराचा कच—याचा ठेका तुम्ही दिवसाला एक लाख देवुन तोही १० वर्षासाठी दिला. प्रतिदिन साठ हजाराचा ठेका प्रतिदिन एक लाख रुपयास म्हणजे प्रतिदिन ४० हजार रुपये वाढवुन दिले आणि ते पण दहा वर्षासाठी. तेथुनच तुमच्या सत्तेला घरघर लागण्याची सुरुवात झाली. हे सुध्दा या ठिकाणी तुम्हांस सांगु इच्छितो कारण स्थायी समितीमध्ये त्यावेळेस आम्ही सदस्य होतो. त्यावेळचे सत्ताधारीतील तुमचेच सदस्य मला बोलले आता काही आमच्या सत्तेचे खरे नाही. आता आमची फाटाफुट होण्यास सुरुवात झालेली आहे. कारण की अशा प्रकारचा प्रस्ताव आणि करार जो मंजुर केला आहे. या अगोदर दहा वर्षासाठीकरार कधीही झालेला नाही. इतिहासाची साक्ष देणारा असा हा विषय या ठिकाणी घेतलेला आहे. त्याने सर्वांनाच नाराज केले आहे. प्रतिदिन साठ हजाराचा ठेका एक लाखात दिला त्यामुळे संपुर्ण शहरात त्याची चर्चा होती. त्या प्रस्तावामध्ये भ्रष्टाचार होता. आम्हांला तुमच्यावर आरोप प्रत्यारोप

करायचे नाहीत. परंतु या ठिकाणी प्रामाणिकपणे मी सांगु इच्छितो की, प्रभागातील विकास कामे करण्यासाठी सर्व सदस्यांना १५ लाखाचा जो निधी दिलेला आहे यासाठी पुन्हा एकदा स्थायी समिती सभापतींचे मनपुर्वक अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र।

सदस्य श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), श्री. भारत राजवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.



सदस्य श्री. बी.बी. मोरे:—सतरा वेळा तुम्ही चर्चा करत आहात आणि दुस—याला म्हणता, हे बरोबर नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी:—तुम्ही किती वेळा बोलणार?

सदस्य श्री. बी.बी. मोरे:—मी हेच म्हणतो की, या अगोदर जी महासभा होती त्या महासभेचे कामकाजाबाबतचा विषय तुम्ही आता येथे काढु नका. आपण काय करत आहात ते आता आम्ही काढत आहोत. मागील लोकांनी काय केले ते काढु नका. मागील लोकांनी ११ वर्षामध्ये जे केले नाही ते तुम्ही एक वर्षातच काय सहा महिन्यात करुन दाखविले. यासाठी तुम्ही सगळे काही केले आहे

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—एक मिनिट, मोरे साहेब ११ वर्षाची गोष्ट कोणी काढली?

सदस्य श्री. राजु जग्यासी:—११ वर्षाची गोष्ट आम्ही नाही काढली, ११ वर्षाची गोष्ट तुम्हीच काढली आहे. नाही, नाही, आपण जे बोलत आहात, आधी कोणी काढली ११ वर्षाची गोष्ट?

सदस्य श्री. बी.बी. मोरे:—फक्त आपल्या मनाचे चालवत आहात. मनाचे चालवुन अर्थसंकल्प मंजुर केला जावु शकत नाही.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—श्री. मोरेजी हा जो अर्थसंकल्प आहे तो येणा—या वर्षासाठी आहे. मागील वर्षाचा नाही.

सदस्य श्री. बी.बी. मोरे:—१९९७ मध्ये आपण सुध्दा माझ्याबरोबर या सभागृहात सदस्य होतात.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:— या अर्थसंकल्पास आम्ही विरोध करतो, असे जे तुम्ही म्हणता, तुम्ही विरोध करा मग येणारे वर्ष कसे जाईल? अर्थसंकल्प मंजुर करणे अनिर्वाय आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—अर्थसंकल्पात ज्या त्रुटी आहेत त्या काढल्या पाहिजेत.

सदस्य श्री. मोहन साधवानी:—मा. महापौरजी, उप—महापौरजी, स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांना मी धन्यवाद देतो त्यांनी अतिशय चांगला अर्थसंकल्प तयार केला आहे. त्यामध्ये मिळकत करामध्ये कोणतीही वाढ केलेली नाही, किंवा पाणी पट्टीमध्ये वाढ केलेली नाही. नगरसेवक निधीमध्ये भरीव वाढ केली आहे. महापौर आणि आयुक्तांना राहण्यासाठी महापालिकेच्या वतीने बंगले बांधण्याचा प्रस्ताव या अर्थसंकल्पात समाविष्ट केला आहे. व जकात दरामध्ये जी वाढ केली आहे ती अतिशय कमी वाढ केली आहे आणि त्याबाबत सर्व व्यापारी मंडळ सहमत आहेत. माझ्याकडे दोन तीन प्रस्ताव आहेत त्यांकडे आयुक्त साहेबांनी कृपया लक्ष दयावे. रुग्णवाहिका आणि शववाहिका खरेदी करण्यास आम्ही मंजुरी दिली आहे या दोन्ही गाडया लवकरात लवकर आल्या पाहिजेत. दुसरी गोष्ट म्हणजे सांयकाळच्या वेळेस जे विजेचे भारनियमन केल्याने विद्युत पुरवठा बंद असतो त्यामुळे महत्वाची जी उदयाने आहेत विशेष करुन सपना गार्डन, स्वामी शांती प्रकाश उदयान, गोल मैदान येथे इन्व्हंटरची व्यवस्था केली जावी. कारण की विद्युत पुरवठा खंडित झाल्यानंतर असामाजिक तत्वाचे लोक त्याचा गैरफायदा घेतात. यासाठी उदयाने विकासांसाठी जो निधी आहे त्यातुन या तीन चार ठिकाणी इन्व्हंटरची सोय केली जावी. त्याचबरोबर आपण आम्हां सर्व नगरसेवकांना जे लॅपटॉप देणार आहात त्यासाठी सर्व सदस्यांना संगणक हाताळणीचे प्रशिक्षण लवकरात लवकर देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर मुख्यालयाच्या या इमारतीवर दोन अतिरिक्त माळे बांधण्यास जी मंजुरी दिली आहे त्यानुसार लवकरात लवकर दोन माळे बांधण्यात यावेत नाहीतर येणा—या पावसाळयात पुन्हा त्रासाचे होईल. तसेच जेएनएनयुआरएमचा जो प्रस्ताव तयार करत आहोत त्यासाठी एक स्वतंत्र विभाग तयार करण्यात यावा. आणि

त्यासाठी एक स्वतंत्र उपआयुक्त नेमावा. जेणेकरुन लवकरात लवकर सविस्तर अहवाल तयार करुन तो राज्य सरकारला पाठविता येईल. तेथुन तो केंद्र शासनाकडे जाणार असल्याने यासाठी स्वतंत्र विभाग असल्यास लवकरात लवकर अहवाल तयार केला जावु शकेल. आणखी माझी एक सूचना अशी आहे की नगरसेवकांना दरमहा जो मानधन बैठक भत्ता व पदाधिका–यांना जो वाहनभत्ता दिला जातो तो संबंधित नगरसेवकांचे बॅकेतील खात्यावर जमा करण्यात यावा त्यामुळे प्रत्येक महिन्यास धनादेश काढण्याचे लेखा विभागाचे काम कमी होईल. त्याचबरोबर डबल फिडर साठी आपण जे पैसे भरलेले आहेत विदयुत भारनियमनाच्या वेळी पाणी पुरवठयास अडचणीचे होते ही समस्या दुर करण्यासाठी डबल फिडरसाठी ७७ लाख रुपये आपण भरलेले आहेत त्यासाठी विदयुत मंडळाच्या कार्यालयाकडे पाठ पुरवा करुन डबल फिडरची योजना लवकरात लवकर चालु करावी. उल्हासनगर कॅम्प ५ मध्ये कामगार कॉलनीची जी इमारत आहे ती कधीही कोसळु शकते. येणा–या पावसाळयाच्या अगोदर तीची डागडुजी केली नाही तर कदाचित ती कोसळु सुध्दा शकते. तसेच अंतिम प्रस्तावामध्ये जकातीमध्ये जे काही बदल सुचविले आहेत. त्यात बाब क्र. ४०(अ) साठी जकातीचा दर १.७५ केला जावा. स्थायी समितीने ४ टक्के दर्शविला आहे तो १.७५ केला जावा. तसेच बाब क्र. ५३ (ब) करीता जकातीचा दर २.२५ ऐवजी २.७५ टक्के केला जावा. पाणी पुरवठयाच्या जलवाहिनी टाकण्याकामीची बरीचशी प्राकलने प्रलंबित आहेत यासाठी त्या प्राकलनांसाठी आणखी एक कोटीची तरतुद केली जावी. कारण की दोन कोटी खर्चाची प्राकलने प्रलंबित आहेत. आणखी एक कोटीची यासाठी तरतुद केल्यास सर्वांच्या प्रभागातील जलवाहिन्यांची कामे होवू शकतील. याचबरोबर नामनिर्देशित सदस्यांसाठी नगरसेवक निधी आणखी पाच पाच लाख रुपये वाढविला जावा. पाच नामनिर्देशित नगरसेवकांच्या नगरसेवक निधीत आणखी पंचवीस लाखाची वाढ केली जावी. एक कोटी रुपयाचे जे (डिस्पोजेबल अॅसेट) निरुपयोगी साहित्य आहे त्यामध्ये १ कोटीची अतिरिक्त तरतुद केली जावी. २५ लाख रुपये पाणी पुरवठा विभागाच्या पाणी बिलामधे समाविष्ट केले जावेत. २००७–०८ च्या काही लेखा शिर्षामध्ये अंतर्गत बदल आहेत त्याबाबतीत मी श्री. हरेश इदनानी यांना सांगेन की त्यांनी ते आपणांस वाचुन दाखवावे. त्याचबरोबर मला असे वाटते की स्थायी समितीमध्ये हा अर्थसंकल्प जसा सर्वसंमतीने पारीत झाला तसा येथे सुध्दा सर्व संमतीने पारीत झाला तर बरे हाईल.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u>अर्थसंकल्प सर्व संमतीने पारीत होणार नाही, होणार नाही.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:–</u> श्री. बी.बी. मोरे साहेबांना मी गाणे ऐकवितो. जुन्या गोष्टी विसरुन जा, त्यांना मी एक गाणे ऐकवितो, ‘‘छोडो कलकी बाते, कल की बात पुरानी, नये युग में मिलकर हम बनायेंगे नई कहानी.’’ आम्ही आपणा सोबत आहोत. आता अर्थसंकल्प आपल्या समोर आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>श्री. विनोद ठाकुरजी, या गोष्टी ऐकविण्यासाठीच आम्ही आलो आहोत. काही गोष्टींमुळे आपले स्वागत आहे. परंतु आपण लोक आम्हांला असे सुध्दा आमिष देत आहात की आम्ही लोक सत्तेत आलो आहोत म्हणुन लॅपटॉप देत आहोत. हे सुध्दा तुम्ही आमिष देत आहात. लॅपटॉप कशासाठी येथुन सचिव साहेब बोलतील सभेची ही नोटिस वेबसाईटद्वारे आपल्या लॅपटॉपवर पाहुन सभेस येतांना लॅपटॉप बरोबर घेवुन या.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:–</u>मा. महापौरजी, या प्रस्तावावर मतदान घेवुन सात वाजण्याच्या अगोदर या सभेचे कामकाज संपवावे.

<u>उप–महापौर:–</u>हा अर्थसंकल्प पारीत केला जावा.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>मतदान घ्या, मतदान.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u>महापौर, उप–महापौर आणि आयुक्तांना माझी विनंती आहे की आजची ही अर्थसंकल्पीय सभा स्थगित करुन सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे सदस्य यांनी एकत्रित बसुन विचारविनिमय करुन त्यानंतर याबाबतीत निर्णय घेतला तर बरे राहिल.

<u>महापालिका सचिव:–</u>अर्थसंकल्प पारीत? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—**नाही होवु देणार नाही होवु देणार. सर्व संमतीने पारीत होवु देणार नाही. आमचा विरोध आहे, आमचा विरोध आहे.

**महापौर:—**सचिव सो., मतदान घ्या.

**महापालिका सचिव:—**कृपया लक्ष दया. जे सन्माननिय सदस्य अर्थसंकल्प मंजुर करण्याच्या बाजुने आहेत, त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**अर्थसंकल्प मंजुर करण्याच्या बाजुने ४६ मते**

| | |
|---|---|
| १ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| २ | श्री. रमेश चव्हाण |
| ३ | श्री. राम (चार्ली) फुंदुमल पारवानी |
| ४ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी |
| ५ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| ६ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| ७ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| ८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी |
| ९ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| १० | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ११ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १२ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा |
| १३ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी |
| १४ | श्री. दत्तात्रय नारायण पवार |
| १५ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| १६ | श्री. प्रशांत किशनराव धांडे |
| १७ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १८ | श्री. हरेश परमानंद जग्यासी |
| १९ | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २० | श्री. लाल देवनदास पंजाबी |
| २१ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद |
| २२ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २३ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय |
| २४ | श्री. लालबिहारी यादव |
| २५ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास |
| २६ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| २७ | श्रीमती शकुंतला पाटील |
| २८ | श्री. किशोर जग्यासी |
| २९ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ३० | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) |
| ३१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| ३२ | श्री. रामसागर जनार्दन यादव |
| ३३ | श्री. गायकवाड दिलीप |
| ३४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ३५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३६ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ३७ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र |
| ३८ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३९ | श्री. विजय खंडु सुपाळे |
| ४० | श्री. शेखर केशव यादव |
| ४१ | श्री. मोहन साधवानी |
| ४२ | श्रीमती ज्योती शाम माने |
| ४३ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

| | |
|---|---|
| ४४ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर |
| ४५ | श्री. सुंदर आसनदास मंगतानी |
| ४६ | श्रीमती निलम रावत |

<u>महापालिका सचिव:–</u> जे सन्माननिय सदस्य अर्थसंकल्पाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>अर्थसंकल्पाच्या विरोधात १८ मते</u>

| | |
|---|---|
| १ | श्री. मोरे भानजी भिकाजी |
| २ | श्री. ढोके जनार्दन किशनराव |
| ३ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ४ | श्रीमती लता शांताराम निकम |
| ५ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| ६ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे |
| ७ | श्री. राजू जग्यासी |
| ८ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती |
| १० | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम |
| ११ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी |
| १२ | श्री. एडके गणपत गोविंद |
| १३ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| १४ | श्री. रविंद्र दशरथ बागूल |
| १५ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी |
| १६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे |
| १७ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| १८ | श्रीमती निलु चांदवानी |

<u>सदस्या श्रीम. मिनाताई सोनेजी:–</u>सचिव साहेब, सर्व सदस्यांना विनंती आहे की ज्या सदस्यांनी शिलाई मशिन वाटपासंदर्भात फॉर्म्स दिलेले नाहीत ते त्यांनी शनिवार पर्यंत दयावे. जेणेकरुन लवकरात लवकर निविदा मागविता येईल व ८ मार्चचे निमंत्रण आपणांस मिळालेच आहे, आपण त्या कार्यक्रमास यावे. आभारी आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>शिलाई मशिन वाटप करण्याचा कार्यक्रम लवकरात लवकर करा.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>श्री. मोरे साहेब, शिलाई मशिनचेच नाही तर आणखी दोन तीन प्रस्ताव मी आयुक्त साहेबांकडे पाठविले आहेत त्या प्रस्तावावर लवकरात लवकर कार्यवाही केली जावी अशी आपण सुध्दा त्यांना विनंती करा.

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १** :– स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००८–०९ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००७–०८ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

<u>प्रस्तावना</u>

सन २००७–२००८ या वर्षा करिता अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न **रू. ३९३.३६ कोटी** अपेक्षीत होते आणि खर्च **रू. ३९३.२० कोटी** अपेक्षित होता. अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न झाले नाही त्यामूळे

खर्चात कपात करणे आवश्यक असून सदर वर्षात उत्पन्नाचा खर्चाशी मेळ बसविण्यासाठी आयुक्तांनी सन २००७–२००८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात येणे प्रमाणे स्थायी समितीसमोर सुधारणा प्रस्तुत केलेली होती.

उत्पन्न : १४६.८८ कोटी

खर्च : १४६.७९ कोटी

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदी प्रमाणे आयुक्तांनी सन २००८–२००९ करिता उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले असून ते स्थायी समितीसमोर खालील प्रमाणे सादर केले हाते.

उत्पन्न : ३२६.७६ कोटी

खर्च : ४१६.६४ कोटी

वित्तीय वर्ष २००८–२००९ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट **रू. ८९.८८ कोटी** जकात, मालमत्ता कर, पाणी पट्टी, टॅंकर भाडे व इतर फी च्या दरामध्ये वाढ करणेचा स्वतंत्र प्रस्ताव आयुक्तांनी पुस्तीकेच्या स्वरुपात स्थायी समितीपुढे सादर केला होते.

शिक्षण मंडळाचे सन २००७ – ०८ चे सुधारित व २००८ – ०९ चे मुळ अंदाजपत्रक. :

सन २००७ – ०८ चे सुधारित अंदाज

वर्ष २००७ – ०८ करिता शिक्षण मंडळाचे खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रु :– १२,६९,१५,५८०/–**
**अंदाजपत्रकीय खर्च रु :– ११,६७,७१,३८४/–**

उपरोक्त दर्शविलेल्या एकुण अंदाजात एकुण रु. ६३०२७०००/– महापालिका हिस्सा म्हणून अदा करण्याची तरतुद करण्यात आली होती.

सन २००८ – ०९ चे मुळ अंदाज

मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडाव्याची कार्य व कर्तव्य लक्षात घेता उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे ठराव क्र. ३ दिनांक ३.९.२००७ अन्वये खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १४,३४,००,०००/–
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १४,३४,००,०००/–

उपरोक्त दर्शविलेल्या एकुण अंदाजात रुपये ६,४३,९०,०००/– शासकीय अनुदान अपेक्षित असुन उर्वरित रक्कम रुपये ७,९०,१०,००० /– महानगरपालिकेकडून महापालिका अनुदान म्हणून अदा करावयाची असल्याने ती ही तरतुद करण्यात आली होती.

शिक्षण मंडळाचे सन २००७ – २००८ चे सुधारित अंदाजपत्रक व २००८ – २००९ चे मुळ अंदाजपत्रक, आयुक्तांचे महानगरपालिकेसाठी सन २००७–२००८ चे सुधारीत अंदाजपत्रक, सन २००८–२००९ चे जमा–खर्चाचे अंदाज, कर वाढीचे प्रस्ताव व प्रशासनाकडून तपशिलवार माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी समितीने पुढीलप्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले आहे.

महानगरपालिकेचे सन २००७ – ०८ चे सुधारित अंदाजपत्रक :

उत्पन्न : १४७.८८ कोटी

खर्च : १४७.७९ कोटी

अखेरची शिल्लक : ९ लाख

<u>महानगरपालिकेचे सन २००८ – ०९ चे मुळ अंदाजपत्रक :</u>

प्रशासनातर्फे सन २००८ – २००९ करिता **उत्पन्न रु. ३२६.७६ कोटी व खर्च रु. ४१६.६४ कोटी** चे सादर करण्यात आलेल्या अंदाजात स्थायी समितीने पुढील प्रमाणे फेरफार करुन अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले आहे.

(आकडे हजारात)

| पान क्र | उत्पन्न ( आयुक्तांचे अंदाज) | | ३२६७६४२ | खर्च ( आयुक्तांचे अंदाज) | | ४१६६४२६ | पान क्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सर्व साधारण कर | + | १२८८०० | शिखण कर परतावा | + | ४२००० | ३१ |
| २ | महापालिका शिक्षण कर | + | २५२०० | रोजगार हमी कर परतावा | + | ५६०० | ३१ |
| २ | वृक्ष कर | + | २८०० | वेतन राखीव निधी | + | २००० | १३ |
| २ | पथ कर | + | ३०८०० | भविष्य निर्वाह निधी अंशदान | + | १३२८ | १३ |
| ३ | विकास अधिभार शुल्क | + | २२५०० | नगरसेवक निधीतून विकास कार्य | + | ३८००० | २८ |
| ६ | शिक्षण करावरील सुट | + | ८४० | नवीन रस्ते बनविणे | + | ३५००० | २७ |
| ६ | रोजगार हमी करावरील सुट | + | ११२ | प्र.क्र. ७६ मधिल रस्ते व इ. सुविधा | + | २५०० | २७ |
| ९ | शिक्षण कर | + | ४२००० | उद्याने सौर्दयीकरण | - | २५०० | १९ |
| ९ | रोजगार हमी कर | + | ५६०० | गोल मै. ,सपना,दशहरा,रोटरी,उमपा मु. उद्याने सो. | + | २५०० | १९ |
| ७ | महापालिका मालमत्ता विनियोग | + | ४०००० | पुतळे बनविणे | + | १००० | २७ |
| | | | | एमआयडीसी पाणी पुरवठा देयके | - | २०२५०९ | ४१ |
| | | | | एमआयडीसी थकबाकी देयके | - | ८५००० | ४१ |
| | | | | निर्मल एमएमआर योजनेतर्गत नवीन शौचालये बनविणे . | + | ३५०००० | ४८ |
| ४ | रस्ते खोदाई फी | + | ७५०० | निर्मल एमएमआर मनपा अंशदान | + | १००० | ४८ |
| ३४ | पाणी पुरवठा वसुली (कर) | + | १९५००० | न्गरसेवकांना मानधन सभा व इतर भत्ते | + | ५००० | २४ |
| ३४ | पाणी पुरवठा वसुली (पा.पु.) | + | २००००० | श्रीगणेश विसर्जन घाट बनविणे | + | १००० | २७ |
| ३४ | पाणी पुरवठा लाभ कर | + | १४००० | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | मल प्रवाह सुविधा लाभकर | + | ५६०० | | | | |
| ३४ | मलप्रवाह कर | + | २५२०० | | | | |
| ३६ | निर्मल एमएमआर योजनेअंतर्गत अनुदान | + | ३५०००० | | | | |
| | | | | | | | |
| | एकूण | | ४३६३५९४ | | + | ४३६३३४५ | |
| | **अखेरची शिल्लक** | | | | + | २४९ | |

शिक्षण मंडळाचे सन २००८ – ०९ चे मुळ अंदाजपत्रक. :

मागील ३ वर्षात शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेला उत्पन्न व खर्चाचा आढावा घेवून वर्ष २००८ –०९ चे अंदाज पुढीलप्रमाणे सुधारित करण्याचे स्थायी समितीने शिफारीश केली आहे.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १४,१८,२९,१३५/–
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १३,५८,९०,०००/–
**अखेरची शिल्लक** : ५९,३९,१३५/–

उपरोक्त अंदाजात रक्कम रुपये ७३४४५०००/– महानगरपालिकेकडून अनुदान व शासकिय अनुदान म्हणून रक्कम रु. ६२४४५०००/– मंजूर करण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

सन २००७ – ०८ चे सुधारित अंदाज

शिक्षण मंडळाचे वर्ष २००७ – ०८ करिता मुळ अंदाजपत्रकिय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेला प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता शिक्षण मंडळाचे वर्ष २००७ – ०८ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे स्थायी समितीने शिफारीश केली आहे.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** : १२,८६,९६,१६५/–
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये** : १२,४२,५७,००० /–
**अखेरची शिल्लक** : ४४,३९,१३५/–

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ५,९०,२७,०००/– महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्याची शिफारीश करण्यात आली आहे.

विविध कर व दराचा प्रस्ताव :–

१) पाणी टॅंकर भाडे :–

पाणी टॅंकर भाडयाची प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यात आली आहे.

२) मालमत्ता कर :–

मालमत्ता कराच्या दरात पुढील प्रमाणे वाढ अमान्य करण्यात आली आहे .

३) पाणी पट्‌टी दर :–

पाणी पट्‌टीच्या दरात वाढ अमान्य करण्यात आली आहे.

४) अग्निशमन सेवा शुल्क :–

**अग्निशमन सेवा शुल्क** दरात प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यात आली .

५) जकात दर :–

शहरात आयत होणा–या जकात पात्र मालाच्या खालील गटात दर वाढ मंजूर करण्यास शिफारीश करण्यात आली आहे.

( रुपये ०००)

| वस्तु गट क्र. | वस्तुचे नांव | किमान दर (%) | कमाल दर (%) | प्रचलित दर (%) | प्रशासना मार्फत प्रस्तावित दर (%) | स्थायी समितीने शिफारस केलेले दर | वार्षिक वाढ / घट | अभिकर्त्याच्या कालावधीत वाढ किंवा घट (१/४/०८ ते १८/१/०९) २९३ दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५३ क | लेसस, टेप्स, लकडी व धातूच्या रिंगण ...इ. | ०.५० | ४.०० | ३.५० | ४.०० | ३.०३ | –८८७४.०० | –७१२३.५१ |
| ७१ | लोखंड व पोलाद | ०.५० | ४.०० | ४.०० | ४.०० | ३.६२ | –३८६१.७५ | –३०९९.९८ |
| ४० ब | र्स्व प्रकारचे रसायने, सोडियम सल्फेट ... इ. | ०.५० | ४.०० | ४.०० | ४.०० | ३.७२ | –१९३३.१२ | –१५५१.७९ |
| ७७ | अलोद धातू म्हणजेच पितळ, तांबे टिन इ.... | ०.५० | ४.०० | २.५० | ४.०० | २.०२ | –५४६०.६७ | –४३८३.५० |
| ३० ब | कोल कोक | ०.५० | ४.०० | २.१० | २.१० | ४.०० | +५७४७.०५ | +४६१३.३८ |
| ३८ ब | क्रुड ऑयल | ०.५० | ४.०० | २.०० | २.०० | ४.०० | +७९६७.०० | +६३९५.४२ |
| ४० अ | इन अॅडेबल फॅट | ०.५० | ४.०० | १.७५ | १.७५ | ४.०० | +१५७८.८६ | +१२६७.४१ |
| ४८ | पेन्टस व डिसटंबर | ०.५० | ४.०० | ३.५० | ३.५० | ४ ०० | +७१३.७१ | +५७२.९३ |
| ४९ | ग्लास चायनावेअर | ०.५० | ४.०० | ३.०० | ३.०० | ४.०० | +१४३९.०० | +११५५.१४ |
| ५१ | टिंबर | ०.५० | ४.०० | ३.५० | ३.५० | ४.०० | +२८९.१४ | +२३२.११ |
| ७० ब | रबर | ०.५० | ४.०० | २.५० | २.५० | ४.०० | +२०४०.६० | +१६३८.०७ |
| ७८ | डाईस व प्रिटिंग | ०.५० | ४.०० | १.७५ | १.७५ | २.५० | +३८०.१४ | +३०५.१६ |
| | एकूण | | | | | | +२५.९६ | +२०.८४ |

<u>महासभा ठराव क्र:</u> ६१ <u>दिनांक:– २०/२/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्री. रामचंद्र (चार्ली) पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधिन राहुन, स्थायी समितीने ठराव क्रमांक १३९ दिनांक १२/२/२००८ अन्वये महापालिकेस सादर केलेल्या सन २००८–०९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजास व सन २००७–०८ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास काही फेरफारांसह अंतिम स्विकृती देत आहे.

<u>विविध कर व दराचा प्रस्ताव :–</u>

१) मालमत्ता कर , पाणी पुरवठा , टॅंकर भाडे व अग्निशमन इत्यांदी दरामध्ये वाढ मंजूर करण्यात येत नाही .

२) <u>जकात दर :–</u>

शहरात आयत होणा–या जकात पात्र मालाच्या काही गटात शासन मंजूरीच्या अधिन राहून पुढील प्रमाणे दरात फेरफार मंजूर करण्यात येत आहे.

( रुपये ०००)

| वस्तु गट क्र. | वस्तुचे नांव | किमान दर (%) | कमाल दर %) | प्रचलित दर (%) | प्रशासना मार्फत प्रस्तावित दर (%) | स्थायी समिती ने शिफारस केलेले दर | महासभेने मंजूर केलेले दर | वार्षिक वाढ / घट | अभिकर्त्याच्या कालावधीत वाढ किंवा घट (१/४/०८ ते १८/१/०९) २९३ दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५३ क | लेसस, टेप्स, लकडी व धातूच्या रिंगण ...इ. | ०.५० | ४.०० | ३.५० | ४.०० | ३.०३ | ३.०३ | —८८७४.०० | —७१२३.५१ |
| ७१ | लोखंड व पोलाद | ०.५० | ४.०० | ४.०० | ४.०० | ३.६२ | ३.६२ | —३८६१.७५ | —३०९९.९८ |
| ४० ब | र्स्व प्रकारचे रसायने, सोडियम सल्फेट ... इ. | ०.५० | ४.०० | ४.०० | ४.०० | ३.७२ | ३.७२ | —१९३३.१२ | —१५५१.७९ |
| ७७ | अलोद धातू म्हणजेच पितळ, तांबे टिन इ.... | ०.५० | ४.०० | २.५० | ४.०० | २.०२ | २.०२ | —५४६०.६७ | —४३८३.५० |
| ३० ब | कोल कोक | ०.५० | ४.०० | २.१० | २.१० | ४.०० | ४.०० | +५७४७.०५ | +४६१३.३८ |
| ३८ ब | क्रुड ऑयल | ०.५० | ४.०० | २.०० | २.०० | ४.०० | ४.०० | +७९६७.०० | +६३९५.४२ |
| ४० अ | इन ॲडेबल फॅट | ०.५० | ४.०० | १.७५ | १.७५ | ४.०० | १.७५ | -- | -- |
| ४८ | पेन्टस व डिसटंबर | ०.५० | ४.०० | ३.५० | ३.५० | ४.०० | ४.०० | +७१३.७१ | +५७२.९३ |
| ४९ | ग्लास चायनावेअर | ०.५० | ४.०० | ३.०० | ३.०० | ४.०० | ४.०० | +१४३९.०० | +११५५.१४ |
| ५१ | टिंबर | ०.५० | ४.०० | ३.५० | ३.५० | ४.०० | ४.०० | +२८९.१४ | +२३२.११ |
| ७० ब | रबर | ०.५० | ४.०० | २.५० | २.५० | ४.०० | ४.०० | +२०४०.६० | +१६३८.०७ |
| ७८ | डाईस व प्रिटिंग | ०.५० | ४.०० | १.७५ | १.७५ | २.५० | २.५० | +३८०.१४ | +३०५.१६ |
| ५३ ब | सीझरस आणि रेझर्रस | ०.५० | ४.०० | २.२५ | २.२५ | २.७५ | २.७५ | +१५९२.४४ | +१२७८.३२ |
|  | एकूण |  |  |  |  |  |  | +३९.५५ | +३१.७५ |

दिनांक १८ जानेवारी २००८ पासून १ वर्षाच्या कालावधीसाठी जकात वसुलीकरिता खाजगी अभिकर्त्याची नेमणूक करण्यात आली आहे. फेरबदलामूळे होणारे वाढीव उत्पन्न जकात अभिकर्त्याककडून कराराच्या उर्वरीत कालावधीसाठी वसुल करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक एमएमए—१०९४/सीआर३/९४/नवि—३२ दिनांक २३ मार्च, १९९४ नुसार जकात अभिकर्त्याची नेमणूकीची शेवटची तारीख ३१ मार्च असणे आवश्यक आहे . त्यानुषंगाने दिनांक १८/१/२००९ रोजी संपुष्ठात येणारा जकात अभिकर्त्याचा कराराचा कालावधी ३१ मार्च २००९ पर्यंत वाढविणेस शिफारस करण्यात येत आहे . सदर कालावधी वाढीमूळे फरकाची रक्कम जकात अभिकर्त्याकडून वसूल करण्यात यावी व आवश्यक तो पुरक करार जकात अभिकर्त्याबरोबर करण्यात यावा .

महानगरपालिकेचे सन २००७—०८ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज

सन २००७—०८ करीता उत्पन्न रु १४७.८८ कोटी व खर्च रु १४७.८६ कोटी च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज पुढील प्रमाणे फेरफारांसह अंतिम असेल. (आकडे हजारात)

| ज्या लेखा शीर्षात रक्कम वर्ग करावाची आहे | ज्या लेखा शीर्षातून रक्कत वर्ग केली आहे . | रक्कम |
|---|---|---|
| सामान्य प्रशासन (विधी विभाग) | सामान्य प्रशासन (नगररचना) | ५० |
|  | कार्यालयीन विदयूत साहित्य | १००० |
|  | अग्निशमन इमारत निगा व दुरुस्ती | १००० |
| सामान्य प्रशासन (आरोग्य विभाग) | रस्ते निगा व दुरुस्ती | १५०० |

| | | |
|---|---|---|
| | माहिती व तंत्रज्ञान साहित्य<br>माहिती व तंत्रज्ञान सेवा खर्च | १३८८<br>५०० |
| सामान्य प्रशासन (प्रभाग समिती) | प्रतिनियुक्ती वरील कर्मचा—यांना पगार भत्ते व निवृत्ती वेतन व अंशदान | ६३० |
| निवृत्ती वेतन (अ—अंदाजपत्रक) | महापालिका भुखंडावर तट बांधणे<br>मार्केट दुरुस्ती व निगा<br>महापालिका इमारत दुरुस्ती | २०००<br>४९०<br>१००० |
| निवृत्ती वेतन (क—अंदाजपत्रक) | सानुग्रह अनुदान | ७०० |
| प्रवास भत्ता (अ—अंदाजपत्रक) | रोजंदारी व मानधन इ. खर्च | ३८ |
| कर्मचारी प्रशिक्षण | सामान्य प्रशासन ( भांडार विभाग) | ५० |
| पेट्रोल डिढेल (अ—अंदाजपत्रक) | स्टेशनरी | १०० |
| संकीर्ण (विदयूत विभागं) | शोध , विकास व अपारंपारिक वीज | ५० |
| प्रभाग समिती क्र.४ क्षेत्रात मुलभूत सेवांची निगा व दुरुस्ती | मार्केट दुरुस्ती व निगा | ५०० |
| सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | पूर किंवा अन्य आपत्तीच्या वेळी खर्च | १०० |
| टेंडर व इतर नोटीस जाहिरात खर्च | क्रिडा खर्च | २०० |
| नगरसेवकांना मानधन , सभा व इतर भत्ते | भाडे तत्वावरील गाडया | ५०० |
| प्रवास भत्ता ( क—अंदाजापत्रक | सानुग्रह अनुदान | १५ |
| भविष्य निर्वाह निधी अंशदान | सामान्य प्रशासन (कर विभाग) | ४०० |

<u>महानगरपालिकेचे सन २००८ — ०९ चे मुळ अंदाजपत्रक</u>

स्थायी समितीने सन २००८—०९ साठी शिफारीश केलेल्या रु. ४३६.३५ **कोटीचे उत्पन्न व रु.४३६.३३.** कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाज पुढील प्रमाणे फेरफारांसह अंतिम असेल.

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न<br>स्थायी समिती अंदाज | ४३६३५९४ | खर्च<br>स्थायी समिती अंदाज | ४३६३३४५ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | पाणी पुरवठा (पा.पु.) | ५००० | नगरसेवक निधीतून विकास कार्य | २५०० | २८ |
| ०७ | महापालिका मालमत्ता विनियोग | १०००० | पाणी पुरवठा साहित्य व पॉवर पंप खरेदी व बसविणे | १०००० | ४६ |
| | | | कर्मचारी प्रशिक्षण | १५०० | १३ |
| एकूण | | ४३७८५९४ | | ४३७७३४५ | |
| अखेरची शिल्लक | | | | १२४९ | |

**<u>शिक्षण मंडळाचे सन २००७–०८ चे सुधारित व २००८ – ०९ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज</u>**

महापालिका शिक्षण मंडळाचे सन २००७–०८ चे सुधारित व २००८ – ०९ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीच्या शिफारशीप्रमाणे मंजूर करीत आहे.

वरील सर्व बाबींच्या तरतुदीच्या प्रयोजनासाठी उक्त अंदाजपत्रक छापुन प्रत्येक पालिका सदस्यास त्याची प्रत पाठवण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानले जाईल.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.५० वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१९/३/२००८

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/३/२००८ रोजीच्या**
**सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

(१३)

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक १९/३/२००८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उप—महापौर, श्री. चव्हाण रमेश महादेव हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

४. उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३८ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३९ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ४० | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४१ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४२ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४३ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४४ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४५ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४६ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४७ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४९ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५० | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १५ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५१ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५२ | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५३ | श्रीमती चैनानी ज्योती रमेश |
| १८ | श्री. राजू जग्यासी | ५४ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवानी |
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५५ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २० | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५६ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५८ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २३ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५९ | श्री. मोहन साधवानी |
| २४ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६० | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६१ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६२ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ६३ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६४ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६५ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३० | श्रीमती शकुंतला पाटील | ६६ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३१ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६७ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३२ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६८ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३३ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६९ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३४ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७० | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३५ | श्री.एडके गणपत गोविंद | ७१ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३६ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ७२ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३७ | श्रीमती विद्या विजय निर्मले | | |

तर,

१. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण, व खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
२. श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद, ३. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ४. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ५. श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा, ६. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ७. श्री. गोविंदराम डोलुमल लुंड, ८. श्रीमती वनवारी मोना अशोक, ९. श्री. इदनानी राजु

**मा. उप—महापौर श्री. रमेश चव्हाण हे पीठासीन अधिकारी म्हणुन महापौरांच्या स्थानी आसनस्थ होते.**

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२२.श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
२३.श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
२४.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२५.श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
२६.श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त
२७.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
२८.श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
२९.डॉ. जी.टी. जिंदे , वैद्यकीय आरोग्य अधिकारी
३०.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
३१.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
३२.श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
३३.श्री. अली हसन, उप अभियंता, पाणी पुरवठा

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, ठाणे जिल्हयाचे लोकप्रिय खासदार मा. श्री. प्रकाश परांजपे साहेब यांचे निधन झालेले आहे. आणि त्याबद्दल संपुर्ण जिल्हयात शोककळा पसरली आहे. म्हणुन आजच्या या महासभेमध्ये शोक प्रस्ताव टाकत आहे तो मंजुर करावा.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>श्री. प्रकाश परांजपे, ठाणे जिल्हयाचे लोकप्रिय खासदार होते. त्यांनी सलग चार वेळा या मतदार संघाचे संसदेमध्ये प्रतिनिधीत्व केले आहे. ठाणे जिल्हयामधील सर्व शहरामध्ये ते जात असत व वेळोवेळी ते उल्हासनगरमध्ये येत असत. शहरातील प्रश्न ते नेहमी संसदेमध्ये उपस्थित करत असत. मला असा एक दिवस आठवतो जेव्हा रेल्वेचा अर्थसंकल्प सादर केला जात होता व त्या अर्थसंकल्प रात्रीचे अडीच तीन वाजेपर्यंत चर्चा चालु होती. त्या चर्चेत त्यांनी सहभाग घेतला होता. हे सांगायचा अर्थ एवढाच की ते अभ्यासू खासदार होते. व लोकांसाठी ते नेहमी जागृत खासदार म्हणुन कार्यरत होते. ते लोकांच्या प्रश्नांसाठी नेहमी झटत असत. यासाठी भारतीय जनता पार्टीच्यावतीने आम्ही सर्व सदस्य त्यांना श्रध्दांजली देवु इच्छितो. हा शोक प्रस्ताव पारीत करुन त्यांच्या परीवारास पाठवु या व दोन मिनिटे त्यांना श्रध्दांजली देण्यासाठी उभे राहु या.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—</u>आमचे ठाणे जिल्हयाचे दिवंगत खासदार श्री. प्रकाशजी परांजपे एक अशी व्यक्ती ज्या व्यक्तीने आपले पुर्ण आयुष्य नगरसेवक पदापासुन ते खासदार पदापर्यंतच्या प्रवासात जनतेस समर्पित केले. एक अशी व्यक्ती ज्या व्यक्तीने आपल्या ठाणे जिल्हयाची कोणतीही समस्या असो, मग भलेही ती रेल्वेशी संबंधीत असो किंवा कुणी टेलिफोन विभागाशी संबंधीत असो किंवा अन्य एखादया कुठल्या विवादा संबंधीची असो. मग भलेही तो संसदेचा विषय असो, विधानसभेचा विषय असो, महानगरपालिकेचा विषय असो किंवा नगरपालिकेचा विषय असो. प्रत्येक विषयामध्ये, समस्येमध्ये लक्ष देणारी व्यक्ती आज ती व्यक्ती आपल्यामध्ये

नाही. परंतु त्यांनी केलेले कार्य, त्यांची प्रेरणा आपल्या सर्व समाजांतील समाजसेवकांना मार्गदर्शक ठरेल. म्हणुन मी त्यांना ही श्रध्दांजली अर्पित करतो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:</u>—मागच्या २० तारखेला, २० फेब्रुवारीला ठाणे जिल्हयाचे लाडके खासदार, आमचे गुरु आणि आमच्याशी वेगळे नाते असलेले, मैत्रीचे संबंध ठेवणारे, वय विसरुन मार्ग दाखविणारे, आमचे गुरु, आमचे मित्र २० तारखेला निधन पावल्याची बातमी आम्हांला कळली. आणि एक वेगळाच धक्का बसला. गेल्या दोन वर्षापासुन ते कर्करोगाने पिडीत होते, कर्करोगाशी ते झुंझ देत होते. एप्रिल २००६ मध्ये उल्हासनसगर महापालिकेमध्ये आपण एक बाळमेळावा आयोजित केला होता. त्या कार्यालयास त्यांना आमंत्रित केले होते आणि अचानक फोन आला की मला कर्करोग झालेला आहे, उदया ऑपरेशन असल्याने मी तुमच्या कार्यक्रमास येवु शकणार नाही. एक जबरदस्त इच्छाशक्ती असलेला माणुस, जबरदस्त ताकद, मनाशी ध्येय असलेला माणुस. नगरसेवक असतांना ठाणे महानगरपालिकेमध्ये त्यांनी आपल्या कर्तत्वाचा ठसा उमटविला. नगरसेवक कसा असतो त्याचे जिवंत उदाहरण त्यांनी महानगरपालिकेला दिले. नगरसेवक असतांना केवळ आपल्या प्रभागाचा विचार न करता संपुर्ण शहराचा विचार करावा. आमदार असेल तर त्याने फक्त आपल्या मतदार संघाचा विचार न करता संपुर्ण महाराष्ट्राचा विचार करावा. आणि खासदाराने त्याच्या लोकसभा मतदार संघाचा विचार न करता देशासाठी मला काय करता येईल अशा प्रकारची विचारप्रणाली ठेवणारा, आमचा, ठाणे जिल्हयाचा लाडका खासदार, अभ्यासू आणि एक हसरे खेळते व्यक्तीमत्व, कुणालाही आकर्षित करणारे व्यक्तीमत्व. मागच्या लोकसभा निवडणूकीच्यावेळी सुशिक्षित लोकांनी मतदानात मोठया प्रमाणावर सहभाग घ्यावा म्हणुन त्यांनी फार मेहनत घेतली. सुशिक्षितांनी मतदानामध्ये मोठया प्रमाणावर सहभाग घेतला तर ठाणे जिल्हयाचेच नव्हे तर देशाचे भवितव्य घडेल आणि त्यासाठी प्रयत्न, प्रयत्न नव्हे तर त्यांनी साकार करुन दाखविले. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये बोलतांना मुक्त अर्थव्यवस्थेचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर चांगले आणि वाईट परिणाम काय होतील, चीनने कोणती प्रक्रिया स्विकारली आहे, अमेरिकेत काय होत आहे त्यांची जिवंत उदाहरणे दिली शाब्बासकी त्यांच्या या अभ्यासू व्यक्तीमुळे त्यांना शाब्बासकी मिळाली. पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग व आमचे शिवसेना प्रमुख आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना शाब्बासकी दिली. एक अभ्यासू खासदार माझ्या शिवसेनेने मला दिला त्याबद्दल मला तुझा अभिमान आहे. अशाप्रकारे शाब्बासकीची थाप त्यांच्या पाठीवर मारली. कॉंग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, देशाचे माजी पंतप्रधान व भाजपाचे जेष्ठ नेते श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी सुध्दा त्यांची वाहव्वा केली. अशाप्रकारचे खासदार श्री. प्रकाश परांजपे आमच्यातुन निघुन गेले आहेत. या ठाणे जिल्हयाचे फार मोठे नुकसान झाले आहे. उल्हासनगरसाठी सुध्दा त्यांनी खुप काम केले आहे. उल्हासनगरच्या बाबतीत येथिल स्थानिक लोकांनी निधी किती दिला त्यापेक्षा खासदारकीचा निधी, यापुर्वी आम्हांला माहित नव्हते की खासदार निधी आपल्या महापालिकेस येतो म्हणुन तो निधी आपल्या महापालिकेस त्यांच्यामुळे मिळु लागला. पण कुठलाही पक्ष जात, धर्मपात, भाषा न बघता त्यांच्याकडे कुठल्याही पक्षाचा माणुस गेला आणि त्यांनी सांगितले की, अमुक या ठिकाणी अमुक या कामाची निकड आहे. तर त्यांनी ताबडतोब त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. अशाप्रकारचे खासदार आमच्यातुन निघुन गेले आहेत. फार मोठे नुकसान झाले आहे. माझे वैयक्तीक पातळीतुन फार मोठे नुकसान झाले आहे. त्या धक्क्यातुन सावरण्याची त्यांच्याच इच्छेनुसार शक्ती मिळाली तर बरे होईल. कारण की त्यांनीच दाखविलेला मार्ग त्यांनीच दिलेली शक्ती आहे. तसेच ख—या अर्थाने त्यांना श्रध्दांजली असेल ती म्हणजे या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये हे जे सभागृह आहे त्यास खासदार श्री. प्रकाश परांजपे यांचे नाव देण्यात यावे, मी सभागृहाला विनंती करतो की अशा प्रकारचा खासदार मिळालेला नव्हता. व मिळणारही नाही. अशा प्रकारचा खासदार त्यांच्या आर्शिवादाने मिळाला तर चांगलीच गोष्ट आहे. जसे ठाणे महानगरपालिकेमध्ये सभागृहाला नाव दिले आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये सभागृहाला नाव दिले आहे, माझा आग्रह नाही परंतु विनंती आहे आहे या सभागृहाला खासदार श्री. प्रकाश परांजपे यांचे नाव देण्यासाठी आपण सर्वांनी पाठींबा दयावा मी शिवसेनेच्या वतीने व वैयक्तीक परीवाराच्यावतीने मी त्यांना आदरांजली अर्पित करतो.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :</u>—ठाणे जिल्हयाचे लोकप्रिय खासदार श्री. प्रकाश परांजपेजी, त्यांच्याबाबत ज्याप्रकारे माझे बंधु श्री. धनंजय बोडारे यांनी सांगितले. एक सरळ स्वभावाची व्यक्ती, सरळ राजकिय नेता अशी ती शक्ती होती. खासदार असून सुध्दा ते लोकांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये ज्याप्रकारे मिसळत असत, त्याचबरोबर सर्वात प्रमुख अशी गोष्ट जी आहे ती अशी की कोणत्याही पक्षाची व्यक्ती त्यांच्याकडे जेव्हा जात असे तेव्हा त्या व्यक्तीस मान देवुन त्यांची समस्या लक्षपुर्वक ऐकुन घेणे ही त्यांच्यामध्ये खास खुबी होती. मध्यंतरी एल. आय.सी. वाल्यांची फार मोठी एक समस्या उद्भवली होती. त्यामध्येयुनियनच्या बरेचश्या अडचणी होत्या व बरेचसे लोक त्यामुळे प्रभावीत झाले होते. म्हणजेच काही कर्मचा—यांचा नोकरीचा प्रश्न निर्माण झाला होता. तो मुद्दा श्री. प्रकाश परांजपे यांनी ज्याप्रकारे संसदेमध्ये उपस्थित केला व त्याची सोडवणूक केली. अशी

व्यक्ती आपल्यातुन निघुन गेली आहे ठाणे जिल्हयामध्ये तीची कमतरता नेहमीच जाणवत राहील. खासदार असून सुध्दा त्यांना कोणत्याही प्रकारच्या सुरक्षाव्यवस्थेची गरज भासत नव्हती ते थेट लोकांमध्ये मिसळत असत. त्यांच्यामध्ये कोणताही बडेजाव नव्हता. अशा या खासदाराच्या निधनामुळे आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्यावतीने मनापासुन श्रध्दांजली अर्पित करतो.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>स्वर्गीय खासदार यांच्याबाबतीत श्री. राजु जग्यासी यांनी जसे सांगितले की त्यांची राहणी अगदी साधी होती. त्यांना कोणत्याही पदाची घमेंड नव्हती. कोणत्याही पक्षाचे लोक त्यांच्याकडे जात असत. मी सुध्दा दिल्लीमध्ये एक—दोन वेळा त्यांच्याकडे गेलो होतो. त्यावेळेस त्यांनी मला एक दोन कामे करुन दिली. ठाणे येथे सुध्दा एकदा त्यांच्याकडे मी गेलो होतो. त्यावेळेस सुध्दा त्यांनी माझी एक दोन कामे करुन दिली. त्यांची राहणी अतिशय साधी होती ते ठाणे जिल्हयाचे लोकप्रिय खासदार होते. मी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने श्रध्दांजली अर्पित करतो व संपुर्ण सभागृहाला विनंती करतो की दोन मिनिट उभे राहुन त्यांना श्रध्दांजली दिली जावी.

श्री. बोडारे साहेबांनी सुचविल्याप्रमाणे सर्व पक्षांचे असे मत आहे की, या सभागृहास त्यांचे नाव दिले पाहिजे. मी त्या मताशी सहमत आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>श्री.बी.बी. मोरे साहेब या सभागृहाला खासदार प्रकाश परांजपे सभागृह असे नाव देण्यास मी प्रस्तावित करतो तसा प्रस्ताव मी देतो.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, फक्त एक मिनिटात मी बोलतो जर या सभागृहाला खासदार प्रकाश परांजपे यांचे नाव दयायचे असेल तर आमची हरकत नाही. परंतु या सभागृहामध्ये मराठी भाषा वापरली गेली पाहिजे. मराठीत बोलले पाहिजे. सर्वांना मी अशी विनंती करतो की जर असे केले तर त्यांचे नाव दिल्याचे सार्थक होईल. नाहीतर कुणी हिंदीत बोलतो, कुणी अन्य कुठल्या भाषेत बोलतो म्हणुन मराठी खासदाराचे या सभागृहाला नाव दयाचे तर मराठीतच कारभार झाला पाहिजे.

<u>महापालिका सचिव :—</u> श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी कृपया मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी.मोरे

<u>शोक प्रस्ताव</u>

जवळ जवळ साडेतीन दशके आपल्या वैशिष्टयपुर्ण शैलीने ठाणे जिल्हयाच्या राजकारणावर स्वत:चा असा आगळावेगळा ठसा उमटविणारे खासदार श्री. प्रकाश परांजपे यांचे दिनांक २०/२/२००८ रोजी निधन झाल्यामुळे केवळ शिवसेनेचेच नाही तर एक अभ्यासू आणि व्यासंगी लोकप्रतिनिधी म्हणुन सातत्याने त्यांना निवडून देणा—या आम जनतेचे नुकसान झाले आहे.

नगरसेवक ते खासदार असा कोणाही राजकारण्याला हवाहवासा वाटणारा प्रवास खासदार परांजपे यांनी केला आणि लोकप्रतिनिधी या संज्ञेला ख—या अर्थाने न्याय दिला खासदार परांजपे यांची शिस्त, वक्तृत्व, विचारांची बैठक, वक्तशीरपणा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे नेत्यांभोवती निर्माण होणा—या भपकेबाज वलयाला छंद देणारी वृत्ती ही भावी राजकारण्यांना प्रेरणादायी आणि मागदर्शक ठरत राहील, यात वाद नाही.

खासदार श्री. प्रकाश परांजपे यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

त्यांचे कार्य नेहमीच स्मरणात रहावे व त्यांच्या पासुन प्रेरणा मिळावी म्हणुन उल्हासनगर महापालिका प्रशासकिय इमारतीतील महापालिका सभागृहास कै. खासदार श्री. प्रकाश विश्वनाथ परांजपे सभागृह असे नामकरण करण्यास महासभेपूढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ६१ अ दिनांक:–१९/३/२००८

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. प्रकाश विश्वनाथ परांजपे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीतील महापालिका सभागृहास कै. खासदार श्री. प्रकाश विश्वनाथ परांजपे सभागृह असे नाव देण्यास मंजुरी देत आहे.

सर्वानुमते

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मा. महापौरजी, जसे की आता आताच सूचना मिळाली आहे की, महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्प सादर करतांना संपुर्ण महाराष्ट्र जकात मुक्त करुन व्यापा–यांना फार मोठी भेट दिली आहे. मला असे वाटते की, आमच्या राष्ट्रवादी कॉंगेस पार्टीच्यावतीने तसेच आरपीआय, मनसेच्या वतीने तसेच कॉंग्रेस पक्षाने सुध्दा या प्रस्तावाचे समर्थन केल्यास महाराष्ट्र शासनाचे मी अभिनंदन करु इच्छितो. महाराष्ट्र शासनाने फार मोठी भेट दिली आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :–मी सुध्दा मा. मुख्यमंत्री नामदार श्री. विलासराव देशमुख यांचे अभिनंदन करु इच्छितो. त्यांनी राज्यातील पंधरा ड वर्ग महानगरपालिकांमधील जकात कर रद्द केला आहे. त्यामुळे व्यापा–यांना फार मोठी सवलत मिळणार आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:–आम्ही सुध्दा आमच्या वतीने प्रशासनाच्या या निर्णयाबाबतीत त्यांचे अभिनंदन करतो की, भारतीय जनतापार्टी व शिवसेनेच्या प्रदिर्घ काळापासुनच्या मागणीचा त्यांनी मान ठेवला त्याबद्दल त्यांचे आम्ही अभिनंदन करतो.

सदस्य श्री. विनोद ठाकुर:–वाईट वाटुन घेवु नका होळी आहे.

अभिनंदन प्रस्ताव :–

सुचकाचे नाव :– श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

राज्यातील १५ ''ड'' वर्गीय महानगरपालिकांमधील जकात कर रद्द करुन नवी मुंबई महापालिकेप्रमाणे लेखाधारित प्रवेश उपकर पध्दती लागु करण्याचा महाराष्ट्र शासनाने दिनांक १९/३/२००८ रोजी महत्वपुर्ण निर्णय घेतल्याने उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील व्यापारी वर्गाची प्रदिर्घ काळापासुनची जकात कर रद्द करण्याची मागणी पुर्ण झाल्याने महाराष्ट्र शासनाचे तसेच राज्याचे मा. मुख्यमंत्री नामदार श्री. विलासराव देशमुख व मा. अर्थमंत्री नामदार श्री. जयंत पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ६१ ब                                                   दिनांक:–१९/३/२००८

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे ''ड'' वर्गीय महापालिकांमधील जकात कर रद्द केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे तसेच मा. मुख्यमंत्री नामदार श्री. विलासरावजी देशमुख व मा. अर्थमंत्री नामदार श्री. जयंत पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सर्वानुमते

उप–महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे......... यावेळी सांयकाळचे ५.०० वाजले आहेत.

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. ८० हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

**?** प्रश्न क्र. ८० :– केंद्र शासनाने महापालिका हद्दीत मूलभुत नागरी सुखसुविधा व विकास कामे करणेसाठी जवाहरलाल नेहरु अर्बन डेव्हलोपमेंट मिशनचे माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदर विषयावर महापालिकेच्या सभागृहात यापुर्वी चर्चा करुन कारवाई करणेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) जवाहरलाल नेहरु अर्बन डेव्हलॉपमेंटच निधी उपलब्ध करणेसाठी महापालिका प्रशासनाने आजतागायत कोणकोणती कारवाई केली?

उत्तर :– जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नुतनीकरणी योजने अंतर्गत निधी उपलब्ध करणेसाठी प्रशासनाने आजतागायत केलेल्या कार्यवाहीची संक्षिप्त माहिती सोबत जोडत आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:— आयुक्त साहेब, यापुढे मी प्रश्न विचारला आहे की, सध्याची स्थिती काय? जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी अर्बन डेव्हलोपमेट या योजने अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेला जो निधी मिळणार आहे. त्यासाठी यावर्षी आपण कोणकोणत्या प्रकल्पांची माहिती पाठविली आहे? आणि त्याची सद्यस्थिती काय? कुठपर्यंत आली आहे? असे ऐकवित आले आहे की कल्याण —डोंबिवली महानगरपालिकेस मागच्यावर्षीचा निधी मंजुर झाला आहे, ठाणे महानगरपालिकेस मंजुर झाला आहे, पुणे महानगरपालिकेसही मंजुर झाला आहे. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त श्री. सदाशिव कांबळे यांच्या उदासिनतेमुळे किंवा नाकर्तेपणामुळे उल्हासनगर महानगरपालिका या योजने अंतर्गत आपले प्रस्ताव तिकडे पाठवु शकली नाही. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेला एकही रुपयाचा निधी मिळु शकला नाही. आम्ही आमच्या अर्थसंकल्पेमध्ये मागच्या वर्षी दर्शविले होते की आम्हांला १२०० कोटी रुपये मिळतील यावर्षीही दर्शविले आहे. जर प्रस्ताव गेले असतील आणि त्यांचा पाठपुरावा होईल तर. आपली महापालिका नक्की कोठे आहे हे आपले लोकप्रतिनिधींना कळले पाहिजे. त्या प्रस्तावांचे काय झाले कोणकोणते प्रस्ताव आहेत? पाणी पुरवठयाकामीची किर्लोस्कर कंन्सल्टंसीची योजना तुम्ही दाखविली आहे, पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवर २४ कोटी ३० लाख खर्च आहे. आता काही नाही म्हणुन आपण ही योजना पाठविली असे मला वाटते. १९८७ मध्ये किर्लोस्कर कंन्सल्टंसीने जो अहवाल दिला होता आणि दुस—या टप्प्याचे काम जे बाकी होते तेच पुढे केले नंतर सुधारीत योजना केली नाही, कारण पाणी पुरवठयाची समस्या दिवसेंदिवस भेडसावत आहे. जेएनएनयुआरएममुळे चांगली हाती आलेली संधी तीचा व्यवस्थीत वापर जर केला नाही तर ती संधी हातुन जाण्याची शक्यता आहे. संधीचे सोने करण्याचा आमचा उद्देश आहे आणि त्यासाठी ही चर्चा करु इच्छितो. तर कृपया ही योजना नक्की कोणत्या टप्प्यात आहे? इतर महानगरपालिकांची स्थिती काय आहे? आणि आपली स्थिती काय आहे? त्यांच्या जवळपास तरी आपण आहोत काय? त्यांना समजा १२०० कोटी मिळाले असतील आपणांस यावर्षी सदरचा निधी मिळविण्यासाठी काय काय केले पाहिजे? प्रशासन काय करत आहे आणि आम्ही काय करत आहोत याची माहिती दया.

सदस्य श्री. संजय बठिजा हे सभागृहातुन बाहेर गेले. 

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—मा. महापौर महोदय व सर्व सन्माननिय सदस्य, गेल्या ९ महिन्याच्या कालावधीत पहिल्यांदाच हा प्रश्न विचारला गेला त्याबद्दल मी आभारी आहे. लोकप्रतिनिधीचा दबाव प्रशासनावर असेल तर कामे जास्त चांगल्यापध्दतीने होतात असा आजपर्यंतचा अनुभव आहे. जवाहरलाल नेहरु योजनेमध्ये आपण जुलै, २००७च्या महासभेमध्ये शहर विकास आराखडा (सीटी डेव्हलोपमेंट प्लान) मंजुर केला होता. हा सीडीपी महाराष्ट्र शासनाने २८ डिसेंबर २००७ ला राज्यस्तरावर जी समन्वयक समिती असते त्या समितीने त्यास मान्यता दिली आहे. आज त्याच्या अधीन राहुन आपण दोन डीपीआर केंद्र सरकारकडे पाठविले आहेत. त्यातील पहिला डीपीआर हा पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचा होता २४ कोटीचा, दुसरा जो प्रस्ताव होता तो रस्त्यांच्या संदर्भातील १५४ कोटीचा होता. अशाप्रकारे जवळ जवळ १८१ कोटीचे प्रस्ताव महापालिकेमार्फत शासनाकडे गेले आहेत. पाणी पुरवठा योजनेची जी छाननी झाली त्यामध्ये २४ कोटीच्या प्रस्तावामध्ये सुधारणा करण्यासाठी तो प्रस्ताव परत महापालिकेकडें पाठविण्यात आला आहे आणि १५४ कोटीचा रस्त्यांचा जो प्रस्ताव आहे तो अजुनही केंद्रसरकारच्या विचाराधीन आहे. सल्लागार नेमण्याची प्रक्रिया होती ती स्थायी समितीच्या मान्यतेने पाणी पुरवठा योजना, जलनिस्सारण योजना आणि आपले जे दोन डीपीआर होते ते आणि बीएसयुपीची योजना या योजनांचे कंन्सल्टंट नेमण्याचा प्रक्रियेस फेब्रुवारीमध्ये मान्यता मिळाली या तिन्ही योजनेच्या सल्लागारांना कार्यादेश दिले आहेत. आजच्या घडीला डीपीआर बनविण्याची प्रक्रिया चालु आहे. जे प्रस्ताव केंद्र शासनाकडे गेलेले आहेत त्यास अदयाप मंजुरी मिळालेली नाही. मोठी कामे होणे आवश्यक असते. महानगरपालिकेमध्ये बीएसयुपी आणि जेएनएनयुआरएमसाठी एक वेगळा कक्ष तयार करण्याचा प्रस्ताव आम्ही शासनाकडे पाठविला आहे. त्यामध्ये एक उपआयुक्त, एक कार्यकारी अभियंता, दोन उप अभियंते, चार कनिष्ठ अभियंते, लिपिक आणि प्रकल्प व्यवस्थापक अशा पदांची मागणी आम्ही शासनाकडे केलेली आहे. आजच्या घडीला प्रशासनामार्फत संबंधीत अधिका—याकडुन पाठ पुरावा होत आहे. व्यक्तीश: मी माझ्या पातळीवर याचा आढावा घेतो. पण म्हणावा त्या गतीने काम होत नाही. ही वस्तुस्थिती मी मान्य करतो. याच्यामध्ये आमचे अधिकारी म्हणा किंवा प्रशासन म्हणा कमी पडले आहे. महासभेच्यावतीने, सन्माननिय लोकप्रतिनिधींच्यावतीने त्यामध्ये सातत्य असल्यास या कामामध्ये निश्चित गती मिळेल. आणि लोकप्रतिनिधी आणि प्रशासनामध्ये समन्वय राहण्यासाठी जे सन्माननिय गटनेते आहेत आणि हा जो एक विशेष कार्यकक्ष स्थापन करत आहोत त्यांमध्ये एक आढावा बैठक आपण घेवु. आणि जी राहिलेली कामे आहेत ती तातडीने पुर्ण केली जातील यासाठी आपल्या सहकार्याने प्रयत्न करु. बीएसयुपीची जी योजना आहे ती जेएनएनयुआरएममध्ये एक फार मोठी संधी आहे. जवळ जवळ ४५ टक्के निधी आपणांस या योजनेमध्ये

मिळालेला आहे. याबाबत सर्वाच्या सहकार्याने बैठक सुध्दा घेतली होती. बीएसयुपीची ६ कोटीची जी योजना आहे ती संपुर्ण झोपडपट्टींचे स्थर उंचावण्यासाठीची आहे. आजच्या घडीला ३५ ज्या झोपडपट्टया आहेत ज्या केंद्र सरकारच्या निकर्षानुसार जेथे आरक्षण नाही किंवा जेथे जागेचा वाद नाही अशा ३५ जागा आता आपणाकडे उपलब्ध आहेत. आणि ज्या ठिकाणी आपली मागणी होत आहे त्यामध्ये जर काही बदल असतील व केंद्र सरकारची मंजुरी घ्यावी लागत असेल, अशा जागा आपण निवड पण सर्व सदस्यांना माझी विनंती राहील की, ज्या ३५ जागांमध्ये आता झोपडपट्टया उपलब्ध आहेत तेथे स्थानिक पातळीवर आपण संबंधीतांना सहकार्य दयावे. योजना समजुन सागंण्यामध्ये कार्यशाळा घ्यायच्या असतील तर त्या देखील आपण प्रशासनामार्फत घेवु. एंकदरीत ज्या वेगाने या योजनेची अंमलबजावणी व्हावयास पाहिजे होती ती झालेली नाही. ही वस्तुस्थिती मी मान्य करतो आणि यामध्ये जास्तीत जास्त तातडीने सबंधीत अधिकारी काम करतील किंवा नविन अधिकारी काम करतील असा एक प्रयत्न प्रशासनामार्फत केला जाईल.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>महापालिकेसमोर प्रस्ताव आल्यानंतर महानगरपालिकेने मला वाटते या विकास योजनेला किंवा जेएनएनयुआरएमला मान्यता दिलेली आहे. त्यांनतर पुढील प्रक्रिया किंवा कारवाई करणे हे प्रशासनाचे काम आहे. याबाबतीत माझे स्पष्टपणे असे मत आहे की मागच्यावर्षीचे जे प्रशासन आहे त्यापेक्षा आताच्या प्रशासनाची थोडीशी गती वाढलेली आहे. परंतु पाहिजे तेवढी गती आता प्राप्त झालेली नाही. आम्ही काहीही म्हटले तरी अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. नक्की तुमची अडचण काय आहे ती तुम्ही आम्हांला सांगितली पाहिजे. त्यासाठी प्रशासनाने महासभेसमोर हा विषय आणला आहे. आता ८,९ महिन्यांनतर प्रश्न विचारला म्हणुन हा विषय आपला. याबाबत प्रशासनाला नक्की अडचण काय आहे. डीपीआर नक्की कुठे आहे हे प्रशासनाने महासभेसमोर आणले पाहिजे होते की त्याच्यामध्ये अमुक अडचणी आहेत. २४ कोटीची १९८७ साली किर्लोस्कराने दिलेली योजना आज जशीच्या तशी घेतली आहे. परंतु आज परिस्थिती बदलली आहे. तेव्हाची लोकसंख्या वेगळी होती, आताची वेगळी आहे. त्यावेळेस लोकसंख्या होती साडेतीन लाख आता लोकसंख्या आहे साडेसात लाख, आठ लाख . १९८७ साली लोकसंख्या दिड लाखाच्या आसपास होती. त्यासाठी त्यावेळेस प्रोजेक्टेड लोकसंख्या म्हणजेच साधारणतः १० ते ११ वर्षाच्या प्रोजेक्टसाठी ती योजना तयार केली होती. ८७ सालापासुन ९७ सालापर्यंत ती अशीच पडुन होती. ९७ साली पहिला टप्पा कार्यान्वीत झाला आणि दुस—या टप्प्यामध्ये वितरण व्यवस्था आहे. टाक्यांपासुन पाणी देणे किंवा जलकुंभापासुन पाणी येणे ही व्यवस्था. त्यानंतर प्रशासनाने साडेसात लाख लोकसंख.येला पाणी वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी काय केले पाहिजे? ती अजुनही योजना नाही ती जर असती तर तुमचा एफडीआर करायला वेळ लागला नसता. त्यासाठी आयुक्त कोण आहेत? आता तुम्ही आहा,त अगोदर दुसरे होते. परंतु मी एकंदरीत प्रशासनाविषयी बोलत आहे. आयुक्त व अभियंते येतील जातील, परंतु उप—अभियंता असु दया, कार्यकारी अभियंता असु दया, प्रत्येकाने या शहरास काहीतरी दिले पाहिजे. मागच्या वेळी आपण काय दिलेले आहे याचे मुल्यमापन करा. आणि त्या आधारेच त्यांना येथे ठेवा. केंद्र शासनाच्या योजना, महाराष्ट्र शासनाच्या भरपुर योजना आहेत परंतु प्रशासनाच्या उदासिनतेमुळे त्या याठिकाणी येत नाहीत. आंध्रा सारखे राज्य ज्यांची स्वतःची उत्पन्नाची साधने कमी आहेत. परंतु केंद्र शासनाकडुन येणा—या निधीवर त्यांनी त्यांच्या राज्याचा विकास केला आहे. प्रत्येक महानगरपालिका विकसीत केली आहे. तसे या उल्हासनगरमध्ये का होत नाही? मिरा—भाईंदरसारखी महानगरपालिका, केंद्र, राज्य सरकारकडुन निधी घेते. ठाणे महानगरपालिकेला त्यांची स्वतःची उत्पन्नाची साधने असतांना सुध्दा केंद्र शासनाकडुन जास्तीत जास्त निधी मिळविण्याचा प्रयत्न करते. कल्याण महापालिका केंद्र, राज्य शासनाकडुन निधी घेते. प्रतिनिधी जिथे आहेत तिथेच आहेत. परंतु प्रशासनाची जी गतिमानता पाहिजे ती गतिमानता हे प्रशासन दाखवत नाही किंवा त्यांच्यामध्ये नाही. तुम्ही सांगा आम्ही काय करायचे? तुम्ही प्रस्ताव दया आम्ही तो एक मितनटांत मंजुर करतो. अडचण काय आहे ती समजल्याशिवाय आम्ही काही करु शकत नाही. मी प्रश्न दिला म्हणुन त्यावर चर्चा होत आहे. वास्तविक याबाबतचा विषय अगोदरच यावयास पाहिजे होता. एफडीआर होण्यासाठी काय काय अडचणी आहेत? त्या बाबतचा विषय यावयास पाहिजे होता. बीएसयुपीची जी योजना आहे ती मान्य आहे त्यावर आपली चर्चा झाली. बीएसयुपीच्या काही अडचणी आहेत त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला त्या सोडविण्यासाठी आम्ही जरुर सहकार्य करु. बीएसयुपी व्यतिरिक्त ज्या पायाभुत सुविधा आहेत त्याबाबतचे प्रस्ताव जास्तीत जास्त लवकर येथे कसे येतील त्यासाठी प्रशासनाने प्रयत्न केले पाहिजेत. त्याचबरोबर पाणी पुरवठा योजनेसाठी एक चांगली संधी चालुन आलेली आहे. पाणी वितरण व्यवस्थेचे संपुर्ण जाळे आम्ही नविन करु शकतो. त्यामुळे पाण्याची आता जी समस्या आहे तीचे कारण म्हणजे वितरण व्यवस्था बरोबर नाही. आयुक्त म्हणुन वैयक्तीकपणे आपला काहीही दोष नसला तरी प्रशासन म्हणुन प्रशासनच दोषी आहे.कारण ही संपुर्ण जबाबदारी शेवटी प्रशासनाची आहे. आम्ही कितीही ठरविले तरी आम्ही करु शकत नाहीत. एक लोकप्रतिनिधी व नगरसेवक म्हणुन आम्हाला मर्यादा आहेत . पण प्रशासन बाकीचे आधार घेवुन हे करु शकते. यास्तव माझी आपणांस एक विनंती आहे की झाले गेले गंगेस मिळाले यापुढे तरी पाणी पुरवठयाबाबतीत

सुधारीत डीपीआर असतील, नविन योजना असतील, सीडीपी असेल, सीडीपी आपला तयार झालेला आहे. डीपीआर बाबत अदयाप कार्यवाही चालु आहे. पुढच्या २५ वर्षामध्ये या उल्हासनगरला भेडसावणा—या समस्या काय आहेत त्या सोडविण्यासाठी या योजनांच्या माध्यमातुन आपण त्यांचा पाठपुरावा करु या. २४ कोटी ऐवजी २४०० कोटीचा निधी कसा आणता येईल यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत. आमच्याकडुन ज्या अपेक्षा असतील त्या आम्ही नक्की पु—या करु परंतु आलेल्या संधी गमवु नयेत. जेएनएनयुआरएमसाठी केलेल्या पाठपुरव्याची माहिती दर महिन्याला महासभेपुढे ठेवण्यात यावी अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>आयुक्त साहेब, जीआयएस योजनेचे जे काम चालु आहे ते कुठपर्यंत पोहचले आहे? कारण की ते काम जोपर्यंत पुर्ण होणार नाही तोपर्यंत डीपीआर स्विकृत होणार नाही असे काही आहे काय? ते काम कुठपर्यंत पोहोचले ते सांगितले तर बरे होईल.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>जीआयएस मॅपिंगचे जे काम आहे ते सॉप्टवेअर टॅक्नॉलॉजी पार्क या पुण्याच्या संस्थेला केंद्र सरकारच्या संस्थेला या पुर्वीच दिलेले आहे. त्यांना आपण ६ महिन्याची मुदत दिलेली आहे. या कामासाठी पॉईंट जे फिक्स करावे लागतात ते काम प्रगती पथावर आहे. जो मॅप आहे तो आता आपणांस प्राप्त झालेला आहे. सिटी सर्व्हे सिटस् आणि सॅटेलाईट मॅप हे एकमेकांना जोडण्याचे काम आता चाललेले आहे. सॅटेलाईट मॅपमध्ये इमारती किलटेड दिसतात. सॅटेलाईल मॅपचे क्षेत्रफळ आणिी सीटी सर्व्हे सिटचे क्षेत्रफळ जुळत नाही. आपली अशी अपेक्षा आहे की तीन महिन्याच्या कालावधीत हे काम पुर्ण करुन मिळेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>मा. महापौरजी, जवाहरलाल नेहरु अर्बन डेव्हलोपमेंट मिशनसाठी माझी अशी एक सूचना आहे की याबाबतचा अहवाल लवकरात लवकर तयार करण्यासाठी, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी, डीपीआर तयार करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाकडे व केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी तसेच तेथुन मंजुरी घेवुन येथे अंमलबजावणी करण्यासाठी या सर्व बाबींचा पाठपुरावा करण्यासाठी अधिका—यांची आणि सदस्यांची एक समिती गठीत केली जावी, एक समिती नेमली पाहिजे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>मा. महापौर व आयुक्त साहेब या योजनेबाबत श्री. बोडारे साहेब व श्री. वदारिया साहेब जे काही बोलले, त्याबाबत मी सांगु इच्छितो की उल्हासनगर मधील काही प्लॉट असुरक्षीत ठेवलेले आहे. त्यांच्या बाबतीतील समस्या लवकरात लवकर सोडवावी. कारण आम्हांला या योजनेमध्ये रस आहे. परंतु आमच्या काही अडचणी आहेत, श्री. निकम साहेब व आणखी तीन—चार नगरसेवक यांच्या प्रभागात ही योजना राबविण्यासाठी इच्छुक आहेत. तेथिल लोक सुध्दा तयार आहेत. शासनाकडुन आलेली ही जी योजना आहे तीची संधी आम्हांला दया. त्याबाबत चर्चा करण्यासाठी आम्ही तुमच्याकडे आलो होतो, त्यावेळी आपण सांगितले होते की ही जागा असुरक्षित ठेवलेली आहे. त्यामुळे आमचा हा प्रश्न काही सुटत नाही. म्हणुन लवकरात लवकर हा प्रश्न सोडवावा अशी मी महासभेस विनंती करतो.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. ८१ हा श्री. विनोद ठाकुर यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ८१ :—</u> येणा—या महासभेमध्ये खाली नमुद केलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे मिळणेसाठी सविनय सादर.

प्र.क्र. १) सेवानिवृत्तीचे वय किती असून, वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर काही कर्मचारी/अधिकारी काम करित आहे का? असल्यास कोण कोणत्या विभागात व किती आहेत याची माहिती.

प्रश्न क्र. २) इतर अशा पदावर भरती का केली जात नाही किंवा पदोन्नतीने पदे का भरली जात नाही.

वर दिलेल्या प्रश्नांची सखोल उत्तरे येत्या महासभेत देण्यात यावीत ही विनंती.

<u>उत्तर :—</u> १) शासनाच्या प्रचलित नियमानुसार वर्ग १,२ व ३ मधील अधिकारी व कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे आणि वर्ग—४ साठी सेवानिवृतीचे वय ६० वर्षे आहे.

नाही. परंतु प्रशासकिय कामाचा निपटारा त्वरित करण्यासाठी मानधन तत्वावर सहा महिने कालावधीसाठी खालील विभागांमध्ये नियुक्त्या दिलेल्या आहेत.

अ) नगररचना/अतिक्रमण विभाग

ब) चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी, साप्रवि

क) विशेष कार्य अधिकारी, साप्रवि

२) एकुण ०९ संवर्गातील १० पदांसाठी अर्ज मागवून भरती प्रक्रिया सुरु आहे. तसेच पदोन्नतीने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, माझा प्रश्न होता सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष असते, किंवा ६० वर्षाचे असते. आपल्या महानगरपालिकेत वयाची साठ वर्ष पुर्ण केल्यानंतरचे किती लोक कामावर ठेवले आहेत? येथे उत्तर देण्यात आलेले आहे अ) नगररचना/अतिक्रमण विभाग, किती लोक आहेत त्यांची संख्या दिलेली नाही ब) चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी, साप्रवि, किती आहेत? कोण आहेत? माहित नाही. क) विशेष कार्य अधिकारी, साप्रवि, किती आहेत? कोण आहेत? नाव काय आहे? काही माहित नाही. काय महाराष्ट्रात, उल्हासनगरमध्ये ६० वर्षाखालील कुणी काम करण्यास उपलब्ध नाहीत?

**मा. सदस्या श्रीमती जया माखिजा, श्रीमती निलम रावत, श्रीमती चंद्रा टेकचंदानी, श्रीमती बेबी भोईर हे सभागृहातुन बाहेर गेल्या.** 

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—अधिका—यांची जी नावे विचारली आहेत त्यात चौकशी अधिकारी श्री. मोरे आणि सादरकर्ता अधिकारी श्री. कुलकर्णी हे विभागीय चौकशी करण्यासाठी शासन निर्णयानुसार नेमले आहेत. विशेष कार्य अधिकारी म्हणुन सामान्य प्रशासन विभागामध्ये सेवा निवृत्त सहा. संचालक नगरपालिका प्रशासन संचालनालयाचे श्री. खवणेकर हे कार्यरत आहेत. आणि नगररचना आणि अतिक्रमण विभाग जो आहे त्यामध्ये तज्ञ समिती जी होती, त्या तज्ञ समितीमध्ये पदसिध्द प्राधिकरणाचे अधिकारी आहेत.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—साहेब, तज्ञ समितीतील नाहीत. आपल्या महानगरपालिकेने नेमलेले ६० वर्षाच्या पुढील वयोमानाचे लोक आहेत. त्यांचा पगार महानगरपालिका भरते. ६० वर्षाखालील माणसे आपणाकडे उपलब्ध नाहीत काय?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—एक तातडीची किंवा तात्पुरती उपाययोजना केली आहे. सामान्य प्रशासन विभागामार्फत नविन अधिकारी भरण्याची प्रक्रीया आपण चालु करत आहोत. छाननी समिती आहे त्यामध्ये प्रशासनाचा प्रयत्न राहिल की लवकरात लवकर ही प्रक्रिया पुर्ण होवो.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—माझ्या माहितीनुसार साठ वर्षाच्या वयानंतर सेवानिवृत्ती दिली जाते. कारण की त्याची मानसिक स्थिती काम करण्याच्या लायकीची नसते. आणि आपल्या या अधिका—याने कित्येक लोकांवर एफआयआर दाखल केलेत, कित्येक लोकांवर केलेले एफआयआर मागे घेतलेत. नजरचुकीने झाले, आमच्याकडुन चुक झाली आहे. कागदपत्रांची पुर्तता केल्याचे आम्ही बघितले नाही. असे सांगणा—या लोकांना कामावर ठेवण्याची व त्यांच्यावर एवढा पैसा खर्च करण्याची महापालिकेला काय गरज आहे?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—नगररचना विभागामध्ये सेवानिवृत्त पोलिस निरिक्षक पाटील श्री. म्हणुन कार्यरत होते. सहा महिन्याचा कालावधी झाल्यावर त्यांना कामावरुन कमी केले नव्हते. तसा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये सादर केला होता. आणि तो प्रस्ताव मान्य झाल्याचे मला समजते. तर त्यांना सलग कामावर ठेवले आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—साहेब, परंतु ६० वर्षाच्या वर वय असलेल्या लोकांना कामावर का ठेवण्यात येते? आम्हांला त्याचे उत्तर दया. काय आपणाकडे काम करण्यासाठी तरुण लोक नाहीत काय? आपल्या शहरात, महाराष्ट्रात शिकलेले लोक नाहीत काय? मग त्यांना का ठेवले?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—विधी अधिकारी नेमण्याची प्रक्रिया आम्ही हाती घेत आहोत. तोपर्यंत तांत्रिक ज्ञान व फौजदारी संहिता याची माहिती असणारा अधिकारी असावा. म्हणुन यापुर्वी सेवानिवृत्त पोलिस अधिका—यांची नेमणुक केली आहे. त्यांची नेमणुक सलगपणे चालु ठेवण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवण्यात आलेला होता.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:—**साहेब, मी काय म्हणतो, या शहरात सुशिक्षित बेरोजगार भरपुर आहेत त्यांना संधी कधी मिळणार? कितीतरी सुशिक्षीत बेरोजगार तरुण आहेत. त्यांना संधी मिळाली पाहिजे. आपण या वयोवृध्द लोकांनाच सलगपणे सेवेत ठेवले तर कसे व्हायचे?

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**भरतीची प्रक्रिया जेव्हा आपण सुरु करु तेव्हा त्यांना संधी दिली जाईल. एक तात्पुरती व्यवस्था म्हणुन आपण या लोकांना कामावर घेतले आहे. हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीस ठेवण्यात आला होता. स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर आम्ही त्यावर अंमलबजावणी करायचा प्रस्ताव होता.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर:—**साहेब, सेवानिवृत्त झालेल्या कोणत्याही व्यक्तीला कामावर न ठेवता त्याच्या जागी नविन भरती करण्यात यावी अशी माझी आपणांस विनंती आहे.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**या प्रस्तावाची फेरछाननी करुन निर्णय घेवु.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**आपल्या महापालिकेतील जे अधिकारी/ कर्मचारी सेवानिवृत्त होवुन गेले आहेत त्यातील कुणी ६ महिने मुदतवाढ देण्याकामी अर्ज केले आहेत काय? कुणाचा अर्ज आला आहे काय? आता एक दोन महिन्यापुर्वी जे सेवानिवृत्त झाले त्यातील कुण्या व्यक्तीने मला ६ महिने मुदवाढ दिली जावी असा अर्ज केला आहे काय? किंवा मला ६ महिन्यासाठी कामावर घ्या म्हणुन अर्ज केला आहे का?

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—** जवाहरलाल नेहरु योजना जी आहे तिच्या अंमलबजावणीमध्ये वेग जरा कमी होता. आम्ही विशेष कक्षाची स्थापना केली होती या कक्षाच्या कामकाजासाठी सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता श्री. सुखरामानी यांचा अर्ज आला होता. त्यांना विशेष कार्य अधिकारी म्हणुन नेमणुक केली होती. परंतु त्यांची विनंती होती की, विशेष कार्य अधिकारी म्हणुन मला काम करता येणार नाही. सल्लागार म्हणुन तात्पुरती व्यवस्था म्हणुन आम्ही त्यांची नेमणुक करत आहोत. कार्यकारी पदाचा त्यांना अनुभव असल्यामुळे त्यांना नेमणुक दिली आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**साहेब, त्यांना काय अनुभव आहे? मी महासभेत प्रश्न क्र. ६५ मध्ये विचारणा केली होती की प्रारुप विकास आराखडयामध्ये शिट क्र. ५०,५१, प्लॉट नं. ५८३,५९३,५९२,५९४ व ६०७ हे प्लॉट प्रारुप विकास आराखडयाप्रमाणे १८० क्रमांकाचे आरक्षण आहे. आता आपले जे नविन नगररचनाकार आले आहेत त्यांना साईटवर पाठवा. वयाबाबत पाहणी करावयास सांगा.श्री. सुखरामानी यांनी याबाबत महासभेत खोटी माहिती दिलेली आहे. व सांगितले आहे की या प्लॉटवर कोणतेही आरक्षण नाही. आपल्या नगररचनाकारांकडे याबाबतची कागदपत्र नसतील तर ती माझ्या कार्यालयात आहेत, ती मी १० मिनिटाच्या आत, किंवा सभा संपण्या पुर्वी आपणांस आणुन दाखवु शकतो. आपल्या महापालिकेचीच ती कागदपत्रे आहेत त्यामध्ये लिहिले आहे की या भुखंडावर आरक्षण असल्याने बांधकाम परवानगीचा नकाशा मंजुर केला जावु शकत नाही व त्याबाबत श्री. सुखरामानी हे व्यासपीठावर उभे राहुन खोटी माहिती देतात. अशा व्यक्तीची जर आपण सल्लागार म्हणुन नेमणूक केली तर ते या शहराचे काय करतील?

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**तात्पुरती व्यवस्था म्हणुन आम्ही त्यांची नेमणुक केली आहे. आपण एखादया चांगल्या व्यक्तीचे नाव सूचवा, त्यांना आपण ते काम देवु. आपणांस काम लवकर करुन घ्यायचे आहे. जवाहरलाल नेहरु योजने बाबत आपण आता चर्चा केली तेथे तात्पुरती व्यवस्था केली आहे. आपण एखादया चांगल्या व्यक्तीचे नाव सूचवा आपण त्यांना घेवु.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**जो व्यक्ती कार्यकारी अभियंता म्हणुन मागील दोन वर्षापासुन होता. काम करायचेच असते तर मागील वर्षी त्यांनी चांगले परिणाम दिले असते. ते कार्यकारी अभियंता या पदावरुन निवृत्त झाले. त्यांच्या कार्यकाळात मागील वर्षी एकाही प्रकल्पाचा प्रस्ताव गेला नाही. सीडीपी तयार नाही. डीपीआर तयार नाही. बजेटची काय वाट लावली ती तुम्हांला माहित आहे. आणि अशा व्यक्तींला सेवा निवृत्त झाल्यावर सेवेत घेत असाल ते बरोबर नाही. ते सेवानिवृत्त झालेत त्यांना जावु दया. कार्यकारी अभियंता आहेत. काय काम करतात माहित नाही. शेतात बुजगावणे असते त्याप्रकारचे आहेत. मी त्यांना

बूजगावणे बोलत नाही. कार्यकारी अभियंता आहेत. काय चालले आहे? कार्यकारी अभियंता, शहर अभियंता असतांना आम्हांला दुस—या व्यक्तीची सल्लागार म्हणुन नेमणुक करावी लागते. मागे कार्यकारी अभियंता आहेत त्यांनी त्याच्या कार्यकालावधीत काही केले नाही. त्यांना करायचे असते तर त्यांनी त्यांच्या कार्यकालावधीत डीपीआरचे काम केले असते. कार्यकारी अभियंता काही लहानसे पद नाही. प्रत्येक गोष्टीमध्ये आयुक्तांनीच पाहिले पाहिजे असे काही नाही. त्यांच्यामध्ये इच्छाशक्ती असती तर त्यांनी ते काम केले असते. आणि ज्या व्यक्तींनी वर्षभर किंवा दोन वर्षात केले नाही ते सहा महिन्यामध्ये करणार आहेत? तसा पर्याय आहे काय? पर्याय असेल तर तुम्ही जाहिरात दया. चांगले होतकरु तरुण येतील, त्यांना दया संधी. त्यांच्याकडे अनुभव असतांनाही त्यांनी काही केले नाही. आणि त्यांनाच परत सहा महिने नेमणुक दयायची?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—याच्यामध्ये प्रशासनाची प्रामाणिक इच्छा अशी होती की अडलेली जी कामे आहेत त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी कुणीतरी तेथे असावे. आजच्या स्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाची सर्व कामे श्री. शिर्के पाहतात आणि विशेष असे जे प्रकल्प आहेत ते हाताळण्यासाठी कुणी अधिकारी नाही. यासाठी आपण दुस—या एखादयाचे नाव सुचवा , आपण त्यांना घेवु.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार तुम्ही बघितला ना तर तेथे कुणाला नीट लिहिता येत नाही. दलित वस्ती या शब्दाचे स्पेलिंग त्यांना लिहिता येत नाही. तेथे दिप्ती नावाची एक कर्मचारी आहे आणि दुसरे श्री. नागदेव एक आहेत. ते आहेत म्हणुन तो विभाग चालतो आहे. प्रभाग समितीमध्ये श्री. जयसिंघानी काय काम करतो ते सांगा ना?

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. मोहन रामरख्यानी हे सभागृहातुन बाहेर गेले**

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—पुर्ण वेळ दारु पिऊन असतो.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—सही करतांना त्याचा हात हालतो. प्राकलन तयार करतांना त्याचे हात थरथर करतात. आणि अशी माणसे त्या माणसांच्या हाताखाली देता? आमची सर्व कामे तेथे प्रलंबित पडले आहेत. ही फार मोठी शोकांतिका आहे. त्याठिकाणी एकएक जागेवर एकएक कर्मचारी किती वर्षापासुन बसलेला आहे ते सांगा? शासनाच्या कोणत्याही कार्यालयात अधिकारी व कर्मचा—यांच्या बदल्या होतात. त्या ठिकाणी काम करण्यास दुस—या अधिका—यास, कर्मचा—यास संधी दिली जाते. परंतु येथे असे आहे की एकएक माणुस त्या ठिकाणी फेविकॉल सारखा कायमस्वरुपी चिकटलेला आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—साठ वर्षापुढील वयाची जी माणसे आपण कामावर ठेवली आहेत त्यांच्या पगारावर किती खर्च आहे ते सांगु शकाल काय? त्यांचा पगार किती आहे आणि त्यांच्यावर आपल्या महापालिकेचा खर्च किती होतो?

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—मा. महापौर, ज्या सेवानिवृत्त अधिका—यांना विशेष अधिकारी म्हणुन नेमणुक दिली होती त्यांना पंधरा हजार रुपये मानधन देण्यात आले होते. आणि जे चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी आहेत त्यांना प्रत्येक प्रकरणामागे शासनाने जे दर ठरविले होते त्याप्रमाणे देतो.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—त्यांना पगार पंधरा हजार रुपये कार्यालयाचा खर्च, शिपाई, गाडी हा खर्च आहे की नाही?

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—त्यांना जे कर्मचारी देण्यात येतात ते आपलेच कर्मचारी आहेत.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—गाडी?

श्री. अशोक बागेश्वर (उप—आयुक्त, मुख्यालय):—गाडी दिलेली नाही.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**गाडी दिलेली नाही? त्यांना फक्त पंधरा हजार रुपये पगार आहे?

**सदस्य श्री. रविंद्र बागुल:–**परत नंतर गाडी देता येईल ना?

**श्री. अशोक बागेश्वर (उप–आयुक्त, मुख्यालय):–**पंधरा हजार रुपये मानधन देतो, पगार नाही.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**सेवानिवृत्त झालेल्या एकाही व्यक्तीला महानगरपालिकेत कामावर ठेवु नये. त्यांच्याजागी भरती करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवुन अर्ज मागवा परंतु सेवानिवृत्त व्यक्तीस कामावर ठेवु नये.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:–**आपण सर्वांनी मिळुन ठराव देवु या.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**शहर अभियंता जे आहेत ना, त्यांना त्यांच्या मुळ विभागात परत पाठवुन त्यांच्या जागी चांगला अधिकारी मागवा. त्यांना येथे व्यासपीठावर उभे राहून हिंदीत सुध्दा बोलता येत नाही. एका उदयानाला हरेकृष्णा म्हणुन नाव दयायचे आहे. ते विचारतात हरेकृष्णा काय असते? ते काय अफगाणिस्तानातुन आले आहेत काय? त्यांना हरेकृष्णा माहित नाही काय आहे ते? आम्हांला पत्र देवुन विचारतात हरेकृष्णा काय आहे? अशा व्यक्तीस परत पाठवुन चांगला अधिकारी मागविला जावा. त्याबरोबर हा सुध्दा ठराव करा.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**सेवानिवृत्त जे अधिकारी घेतलेले आहेत त्यानां परंत पाठवा.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–**आपण जी चर्चा केली त्यावर आम्ही विचार करु. आमचा प्रामाणिकपणे असा प्रयत्न होता की अडलेली कामे लवकर व्हावीत. त्या व्यतिरिक्त दुसरे काही नाही. हात स्वच्छच आहेत, आपण चांगले नाव सुचवा ,त्यांना घेवु. आज आठ महिने झाले जेएनएनयुआरएमची कामे पुढे सरकत नाहीत. माणसे कमी पडतात. गाडी पुढे ढकलण्यासाठी जशी माणसे लागतात त्याप्रमाणे......

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**याचा अर्थ असा की, म्हातारी माणसे कामे करतात? तरुण माणसे कामे करत नाहीत असा होता. असे असेल तर तसेही सांगा आमच्या शहरातील तरुण काम करत नाहीत म्हणुन? प्रत्येक वेळेस सेवानिवृत्त झालेली माणसे कामे करतील?

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :–**साहेब, पाच सहा महिने झाले, कनिष्ठ अभियंता आणि लिपिक यांच्या भरतीसाठी आपण वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती, प्रत्येकाने फार्म भरलेला आहे परंतु अदयापपर्यंत त्यांची मुलाखत झालेली नाही.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–**त्या अर्जाच्या छाननीची प्रक्रिया चालु आहे ती लवकरात लवकर आम्ही संपवु. फक्त हा जो विषय आहे, मला वाटते सहा महिन्याच्या कालावधीसाठी त्यांची नेमणूक केली आहे, ती आपले प्रकल्प लवकर मार्गी लागावेत म्हणुन केली आहे. मला असे वाटते की सहा महिन्याऐवजी तीन महिन्याची मुदत करु, पटल तर ठेवु नाही तर काढुन टाकु.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:–**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. विनोद ठाकुर यांनी असा प्रश्न विचारला आहे की, सेवानिवृत्त होवुन काही लोक आपल्या महापालिकेत कामे करतात, ज्यांचे वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे. त्याबाबतीत मला असे म्हणायचे आहे की, याठिकाणी भरती झाली पाहिजे. याबाबत आमच्या श्री. धांडे यांनी सांगितले की, भरती झाली पाहिजे. नविन तरुणांना संधी दिली पाहिजे. त्यांच्या मतास मी सहमत आहे.परंतु असे म्हणुन चालणार नाही की माझा हा माणुस आहे, त्याला कामावर घ्या, शासन नियमानुसार जर काही रिक्त पदांसाठी जाहिरात काढली असेल तर नियमाप्रमाणे भरती झाली पाहिजे. एका पदाची जरी भरती असली तरी बरेचसे सदस्य आपापल्या लोकांची शिफारस करतात त्यांचे मी येथे नाव घेणार नाही. परंतु मला सर्व

परिस्थिती माहित आहे. आमचे शासकिय अधिकारी अशा त्या सदस्यांबाबत येथे काही बोलत नाहीत. ते मुग गिळुन बसतात. मागे श्री. उत्तम लोणारे येथे मुख्यालयाचे उप आयुक्त होते आणि त्यांनी येथुन सोडुन जाण्याचे कारण एवढेच होते की सन्माननिय सदस्यांनी माझा माणुस घ्या, माझा माणुस घ्या असे रोज रात्रंदिवस सांगुन त्यांना अतिशय हैराण करुन सोडलेले होते. त्याबाबतीत मला एक असे सांगायचे आहे की शासन नियमानुसार भरती झाली पाहिजे. नियत वयोमानानुसार तो सेवानिवृत्त झाला पाहिजे. या सर्व बाबतीत आम्ही सहमत आहोत. आता कायदयानुसार भरती तुम्ही करणार आहात ती करत असतांना कुठल्याही सदस्याचे तुम्ही ऐकुन घेवु नका. शासकीय नियमाप्रमाणे जे काही बसत असेल ते करा. एवढेच मी सभागृहाला आवर्जुन सांगतो.

**महापालिका सचिव :—** प्रश्नोत्तराचा कालावधी संपला, महासभा सूचनेबरोबर आपणांस तीन सूचनापत्र देण्यात आली होती.

१. मुंबई महाराष्ट्र विकास प्राधिकरण अंतीम मतदार यादी प्रसिध्दीची सूचना
२. प्रशासनाच्या कामात नगरसेवकांचे नातेवाईक हस्तक्षेप करत असल्याबाबतचे आयुक्तांचे पत्र
३. २४ मार्च २००८ जागतिक क्षयरोग दिना निमित्त आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहण्याबाबतचे मा. महापौरांचे पत्र.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाच्यावतीने एक सूचना आलेली आहे, त्यास मा. महापौरांनी मान्यता दिलेली आहे. मनसे पक्षाकडुन श्रीमती जयश्री पाटील यांना गटनेता नियुक्त करण्यासाठी सूचना दिलेली आहे आणि या सूचनेस मा. महापौरांनी मान्यता दिलेली आहे.

श्री. पाटील आपले अभिनंदन.........

याचबरोबर काही लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

<u>लक्षवेधी सूचना क्र. १</u>

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम (चार्ली) पारवानी

विषय :— उल्हासनगर शहरातील गोरगरीब नागरीकांना तातडीने आरोग्य विषय सेवा उपलब्ध व्हावी, औषधेपचार प्राप्त व्हावेत याबाबतचे आरोग्यविषयक ज्वलंत प्रश्नाबाबत व आरोग्य केंद्राबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वानखेडे

विषय :— उमपा हद्दीतील काही विभागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याबाबत व उन्हाळयाचा मौसम सुरु होत असल्याने पाणी समस्या अधिकच गंभीर होणार असल्याने पाणी समस्येबाबत लक्षवेधी सूचना.

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक ३</u>

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

विषय :— आरक्षित मोकळे भुखंड व महापालिकेच्या मालमत्ता ताब्यात घेणेबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक ४</u>

सुचकाचे नाव :— श्री. दत्तात्रय पवार
अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

विषय :— दि. ८ मार्च २००८ पासुन कचरा वाहतुक ठेकेदार यांचेमार्फत शहरातील कचरा उचलला जात नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्रमांक ५

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

विषय :—पाणी टंचाईची समस्या निवारणार्थ उचित उपाययोजना करणेस्तव / जलवाहिनी व टॅंकरद्वारे पाणी वितरणाचा योग्य असा कार्यक्रम/वेळापत्रक तयार करणे बाबतची लक्षवेधी सूचना.

लक्षवेधी सूचना क्रमांक ६

सुचकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सुरेखा वेलकर

विषय :— मे. ॲन्थोनी वेस्ट हंडलींग हा ठेकेदाराचे निविदेतील अटी शर्तीनुसार काम करत नसल्याने याचा परिणाम शहराचे साफसफाईवर पर्यायाने नागरीकांच्या आरोग्यावर होणार असल्याने नागरीकांच्या जिवनाशी संबंधीत लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्रमांक ७

सुचकाचे नाव :— श्रीमती सुरेखा वेलकर
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती पंचशिला पवार

विषय :— उल्हासनगर शहरात तिव्र पाणी टंचाई जाणवत असून, अपुरा, अनियमित, कमी दाबाने व काही ठिकाणी पुर्णपणे बंद असा पाणी पुरवठा होत असल्याने नागरीक त्रस्त आहेत. पाणी पुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्याने पाणी समस्येबाबतची लक्षवेधी सूचना.

लक्षवेधी सूचना क्रमांक ८

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी
अनुमोदकाचे नाव :—श्री लाल पंजाबी

विषय :— कर्मचा—यांचा रोजंदारीवरील प्रथम नियुक्तीचे दिनांकापासुन सेवेची गणना करणे सदरचा प्रश्न कर्मचा—यांच्या भविष्याशी निगडीत असल्याबाबतची लक्षवेधी सूचना

या आठ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यातील कित्येक लक्षवेधी सूचना या पाणी पुरवठयाच्या समस्येबाबतीत आहे व काही साफसफाई व कचरा वाहतुकीबाबतच्या आहेत. त्या एकत्रित करुन त्यांच्यावर चर्चा करण्यास मा. पीठासीन अधिका—यांनी स्विकृती दिली आहे. बाकीच्या ज्या लक्षवेधी सूचना आहेत त्या रद्द केल्या आहेत. आता पहिली लक्षवेधी सूचना जी आहे ती पाणी पुरवठयाबाबतची असून ती

श्री. धनंजय बोडारे आणि राजेश वानखेडे यांची आहे. या लक्षवेधीस मा. पीठासीन अधिका—यांनी स्विकृती दिली आहे. व कच—याबाबतची श्री. दत्तात्रय पवार आणि श्री. विजय सूपाळे यांची जी लक्षवेधी सूचना आहे तिला तसेच पाण्याबाबत दुसरी एक लक्षवेधी सूचना श्री. मोहन साधवानी व विनोद ठाकुर यांची आहे. या लक्षवेधी सूचना विषयानुसार एकत्रित केल्या जात आहे. तसेच श्री.बी.बी. मोरे आणि श्रीमती सुरेखा वेलकर यांची कचरा वाहतुक ठेकेदार ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग यांच्याबाबतची जी लक्षवेधी आहे ती सुध्दा संबंधीत विषयाशी जोडली जात आहे. आणखी एक लक्षवेधी सूचना आहे ती सुरेखा वेलकर आणि पंचशिला नाना पवार यांची आहे ती पाण्याच्या संदर्भातील असल्याने संबंधीत लक्षवेधी सूचनेस जोडली जात आहे. व श्री. बच्चाराम रुपचंदानी यांची शेवटची जी लक्षवेधी सूचना आहे ती रद्द केली आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौरजी, मला माहित आहे की कायदयानुसार दोनच लक्षवेधी सूचना स्विकृत करायच्या आहेत. परंतु मी दिलेल्या दोन्ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाच्या आहेत. मला असे वाटते की, त्याबाबत आपण आयुक्त साहेबांना आदेश दयावेत. माझी लक्षवेधी सूचना जरी स्विकृत झाली नसेल तरी ती लक्षवेधी देण्यामागे माझी जी भावना आहे ती लक्षात घ्यावी आमचे जे कर्मचारी आहेत ज्यांना आपण सेवेत कायम केले आहेत परंतु त्याबाबतची कार्यवाही पुर्ण झालेली नाही ती पुर्ण केली जावी. व दुसरी हेल्थ सेंटरबाबत मी जी लक्षवेधी सूचना दिली त्या लक्षवेधीवर सुध्दा आयुक्त साहेबांनी लक्ष दयावे जेणेकरुन जनतेला ज्या असुविधा होत आहेत त्या होवु नयेत. मला माहित आहे की कादयानुसार फक्त दोनच लक्षवेधी स्विकृत करायच्या आहेत. यासाठी मी निवेदन करतो की, याबाबत मा. महापौरांनी आयुक्त साहेबांना आदेश दयावेत.

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक १</u>

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वानखेडे

**विषय :— उमपा हद्दीतील काही विभागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याबाबत व उन्हाळयाचा मौसम सुरु होत असल्याने पाणी समस्या अधिकच गंभीर होणार असल्याने पाणी समस्येबाबत लक्षवेधी सूचना.**

अगोदरच नियोजनाचा अभाव व प्रशासनाचा हलगर्जीपणा यामुळे उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील काही विभागातून कमी दाबाने, कमी प्रमाणात, अनियमित पाणी पुरवठा होत आहे. आणि आता तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कमी दाबाने पाणी पुरवठा सुरु केला असून पाणी कपातही केली आहे. त्यातच महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कडुन दिर्घकाळ होणारे भारनियमनाने भरच टाकली आहे. त्यामुळे आधीच अल्प प्रमाणात पाणी पुरवठा होणा—या विभागातून तिव्र पाणी टंचाई व समस्या जाणवत असून दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. आठ ते दहा दिवस पिण्याचे पाणी मिळत नसल्याने गैरसोय व हाल होत आहेत. त्यातच नजिकचे काळात उन्हाळयाचा मौसम सुरु होत असून माहे मार्च, एप्रिल व मे या उन्हाळयाचे तिन महिन्यामध्ये पाणी समस्या अधिकच गंभीर होणार असल्याने पाणी समस्या सोडविणेसाठी उपाययोजना न केल्यास अराजकता, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. याकरीता महासभेचे लक्षवेधून, पाणी समस्येवर उपाययोजना करणेसाठी करीता लक्षवेधी सूचना मांडत आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

**विषय :—पाणी टंचाईची समस्या निवारणार्थ उचित उपाययोजना करणेस्तव जलवाहिनी व टॅंकरद्वारे पाणी वितरणाचा योग्य असा कार्यक्रम/वेळापत्रक तयार करणे बाबतची लक्षवेधी सूचना.**

सद्या उन्हाळा सुरु झालेला असल्याने शहरास अधिक पाण्याची आवश्यकता भासणार आहे. आतपासुनच पाण्याची समस्या अधिक तीव्र बनत चालली आहे. पाण्याची समस्या अधिक गंभीर बनू नये म्हणून आतापासूनच सदर समस्येवर गंभीरतापुर्वक विचार करुन पाणी समस्या निवारणार्थ उचित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सद्या जे टॅंकरद्वारे पाणी वितरण केले जात आहे. त्यामध्ये सुसुत्रता नाही. वितरण्याची व्यवस्था योग्य नसल्याने व त्यावर कोणत्याही अधिका—याचे नियंत्रण नसल्याने पाण्याच्या टॅंकरचा गैरवापर होत आहे. त्यामुळे जलवाहिनी व टॅंकरद्वारे पाणी वितरण करण्याचा उचित कार्यक्रम/वेळापत्रक तयार करण्यात यावे. जेणेकरुन शहरातील सर्व नागरीकांना पुरेसे पाणी उपलब्ध करुन देता येईल व उन्हाळयात उद्‌भवणारी पाणी समस्येची तिव्रता काही प्रमाणात तरी कमी होवू शकेल.

सदर बाब ही नागरीकांच्या जीवनाशी/मुलभूत गरजेशी निगडीत असल्याने येणा—या महासभेत सदर विषयावर चर्चा होवून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

---

सुचकाचे नाव :— श्रीमती सुरेखा वेलकर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती पंचशिला पवार

**विषय :— उल्हासनगर शहरात तिव्र पाणी टंचाई जाणवत असून, अपुरा, अनियमित, कमी दाबाने व काही ठिकाणी पुर्णपणे बंद असा पाणी पुरवठा होत असल्याने नागरीक त्रस्त आहेत. पाणी पुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्याने पाणी समस्येबाबतची लक्षवेधी सूचना.**

सद्यस्थितीत उल्हासनगर शहरात तिव्र पाणी टंचाई जाणवत असून अपुरा, अनियमित, कमी दाबाने, कमी प्रमाणात, काही ठिकाणी पुर्णपणे बंद असा पाणी पुरवठा होत असल्याने नागरीकांना, अबालवृध्दांना, महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. नागरीक पाण्याअभावी त्रस्त झाले आहेत. अनेक महापालिका सदस्यांनी प्रशासनास पाणी समस्येबाबत वारंवार लेखी तक्रारी करुनही प्रशासनाने समस्या सोडविण्यासाठी कारवाई केलेली नसल्याने पाणी समस्येने गंभीर स्वरुप धारण केले आहे. पाणी पुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्याने सदर लक्षवेधी सुचनेवर महासभेत चर्चा होवून माहिती मिळणेस विनंती आहे.

---

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मा. महापौर व आयुक्त साहेब, गेल्या दोन महिन्यापासुन महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडुन पाणी पुरवठा कमी होत आहे, म्हणुन उल्हासनगरमधील ब—याचशा विभागांमध्ये पाणी पुरवठा बरोबर होत नाही. पाणी पोहचत नाही. उंचावर असलेल्या भागांमध्ये पाणी पोहचत नाही. आणि त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आम्ही उपाययोजना करतो, विचार करतो, बैठका होतात. आयुक्तांकडे होते, कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांच्याकडे बैठका होतात आणि त्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातुन फिरवा फिरव करत होते, पण कुठेच सुधारणा नाही. त्याची कारणे? एमआयडीसी एक आहे हे झाले. वास्तविक पाहता, महाराष्ट्र शासनाकडे आमच्या प्रतिनिधींनी जावुन मग ते प्रतिनिधी आमदार असतील, खासदार असतील त्यांनी वारंवार तेथे मुद्दे उपस्थित करुन महाराष्ट्राच्या औद्यागिक विकास मंडळाकडुन मिळणारे पाणी हे वाढवुन घेतले पाहिजे होते परंतु ते वाढविले जात नाही. तसे जर केले असते तर एमआयडीसीकडुन आम्हांला मिळणारे पाणी कमी झाले नसते. मुख्य कारण हे जरी असले तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन आपणांस पाणी कमी मिळत नाही. असे जरी असले तरी आपण लोकांना असे सांगु शकत नाही की एमआयडीसी कडुन होणारा पाणी पुरवठा कमी आहे. त्यासाठी एमआयडीसीवर आम्ही शिवसेनेच्यावतीने मोर्चा काढला, भाजपानेही मोर्चा काढला होता. मोर्चा ठाणे जिल्हा किंवा महाराष्ट्र स्तरावर झाला तरी उल्हासनगरचे काय? एमआयडीसीने पाणीपुरवठयात सुधारणा केलीच नाही. तर उंच भागात राहणा—या लोकांना आपण पाणी देणारच नाही काय? त्यासाठी काय उपाययोजना केली? सर्व स्तरावर बैठका झाल्या. अगदी वॉलमन पासुन आयुक्तांपर्यंत बैठका झाल्या. या समस्येसाठी नेमके काय केले पाहिजे? त्यावर चर्चा झाली पाहिजे. चर्चा झाल्यानंतर पुन्हा तेच. अंमलबजावणी करण्याचे काम तुमच्याकडे आहे. पण ती अंमलबजावणी होत नाही. चर्चा करण्यासाठी वैयक्तिकपणे मी बारवी धरणावर गेलो. त्याची अडचण पाहीली, मागच्या दिड

महिन्यापुर्वी उल्हासनदीचा पाण्याची जी पातळी आहे ती वजा ७६ झाली होती. म्हणजेच ० पातळीच्या खाली त्याचे कारण काय तर बारवी धरणापासुन व्यवस्थीत पाणी पुरवठा होत नाही. पाण्याचा प्रवाह वाढविण्यास त्यांना सांगितले तर ते म्हणतात की तसे केले तर मार्च पर्यंत पाणी संपेल. मागच्यावर्षी २००७ मध्ये १६ जानेवारीला बारवी धरणाची पातळी ही ६५ मिटरचे होती. ती यावर्षी ५८ मिटरची आहे. मागच्यावर्षी २२०० क्युसेस मि.लिटर क्षमता होती. या वर्षी फक्त १४४८ मि.लिटर क्युसेस आहे. म्हणजेच जवळपास ६०० ते ७०० म्हणजेच ५८ ते ६५ मिटरच्या पातळीवर आहे. मागच्या वर्षीच्या १६ जानेवारी मध्ये व यावर्षीच्या १६ जानेवारीमध्ये हा एवढा फरक आहे. आणि याचप्रमाणे जर प्रवाह ठेवला तर ते पाणी मार्च मध्ये संपेल असे एमआयडीसीवाल्याने सांगितले तेव्हा कुठे खात्री पटली, मग आम्ही इरीगेशनवाल्यांच्या मागे लागलो. कारण की ते आंध्रा डॅममधुन पाणी सोडत नव्हते. त्यांच्याशी समन्वय साधुन पाण्याची पातळी कमीत कमी कशी वाढेल म्हणजेच जी वजा ७६ आहे ती कशी वाढेल त्यासाठी प्रयत्न केला. हा प्रयत्न महाराष्ट्र शासनाच्या पातळीवर व्हावयास पाहिजे होता परंतु तो दुर्देवाने झाला नाही. आजही केबल वर जसे दाखविले जात आहे, म्हणुन मी सांगतो श्री. राजु जग्यासी साहेब, विरोधससाठी विरोध नसावा. विरोधी पक्ष म्हणुन या महासभेमध्ये मुद्दे उपस्थित करणे हे आवश्यक होते परंतु ते गेल्या आठ–नऊ महिन्यापासुन ते आपण केले नाहीत. जनसंदेश, जनादेश मी सर्व पाहत आहे. आमच्या आमदारांनी पाण्यापासुन इतर ज्या सुविधा आहेत त्या उल्हासनगर शहरवाशियांना महाराष्ट्र शासनाकडुन कसे मिळेल हे पाहिजे पाहिजे त्याचा विचार केला पाहिजे. एमआयडीसी कडुन मिळणारे पाणी, एमआयडीसीकडुन आम्हांला एक अभियंता मिळु शकत नाही? हा पाठ पुरावा कोण करणार? कार्यकारी अभियंता येण्यासाठी किती दिवस लागले? श्री. सावकारे म्हणत होते मला जायचे आहे, जायचे आहे परंतु कार्यकारी अभियंता म्हणुन येथे येण्यास कुणी तयार नव्हते. आजच्या बिकट परिस्थितीतुन मार्ग काढण्यासाठी जवांदे सारखे कार्यकारी अभियंत्याची येथे आवश्यकता होती. त्यांच्यासाठी ठाण्याचे आमदार गेले, त्यांनी त्यांच्याकडे त्यांची नेमणुक करुन घेतली. महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करुन कार्यकारी अभियंता, नगररचनाकार मिळवुन घेण्याची आवश्यकता आहे. अडीच महिने झाले येथे एक नगररचनाकार नाही. आम्ही आमच्या परीने प्रयत्न करतो परंतु महाराष्ट्र शासनाकडे येथिल लोकप्रतिनिधी या नात्याने आमदाराने प्रयत्न करणे आवश्यक आहे, ते होत नाही. त्यामुळे जशी एमआयडीसीकडुन पाणी कपात होते तर मी म्हणतो की महापालिका करते काय? एमआयडीसी पाणी तर देणारच नाही. महाराष्ट्र शासनाकडे आमची बाजु मांडली जात नाही व ती जाणारही नाही. महापालिका प्रशासनाकडुन पाणी पुरवठा होत नाही. परंतु प्रशासन काय करते? आलेले पाणी व्यवस्थीत वितरीत कसे करता येईल त्यासाठी तुमच्याकडे ठोस उपाययोजना आहे काय? ती केली काय? का नाही केली? याची काय उत्तर आहेत? आम्ही पर्याय दिले आहेत तुम्हांला समान वितरण करण्यासाठी पर्याय दिले आहेत मग तो प्रभाग कुणाचाही असो, श्री.बी.बी. मोरेंचा असो कि राजु जग्यासी यांचा असो. प्रत्येकाला कमीत कमी दोन तास, दोन तास नाही तर दिडतास पाणी मिळायला हवे. त्यासाठी तुमचा काही सर्व्हे आहे काय? कर्मचारी आहेत, पंधरा दिवसापुर्वी आम्ही चर्चा केली त्यावेळी सांगितले की, युध्द पातळीवर पाणी हा एकच विषय घ्या आणि तो निर्णयीत काढा. बाकी सुधारणा होत राहतील. परंतु तसे दुर्देवाने झाले नाही. एमआयडीसीच्या मागे लागुन आम्हांला चालणार नाही. त्यांच्याकडे काही अडचणी आहेत. ते जेवढे पाणी देतील तेवढेच पैसे घेतील. जर उदया त्यांच्याकडे पाणी नसेल तर आपणाकडे आलेल्या पाण्यामध्ये आपण वितरण कसे करणार आहोत? त्यांच्या नावाने खडे फोडुन चालणार नाही. १२० एमएलडी पाणी मिळत होते तेथे १०९, ते ११० एमएलडीवर आले आहे. उदया एमआयडीसी ला पाणी नसणार आहे, बारवीला नसणार आहे, आंध्राला नसणार आहे. उदया जर ९० एमएलडीवर आले तर आम्ही लोकांना पाणी कसे देणार? त्यासाठी लोकांना, लोकप्रतिनिधींना समजावुन सांगितले पाहिजे. दोन तीन महिने प्रशासनाला सहकार्य करा. कमीत कमी पाणी वापरा अशा प्रकारची लोकजागृती आणि समान पाणी वितरण हे दोनच पर्याय असून त्यावर लक्ष दया. आणि विरोधी पक्षांनाही मी आवाहन करतो की त्यांनी आपल्या प्रभागामध्ये लोकांना समजावुन सांगावे. या बिकट परिस्थितीमध्ये सुध्दा समजावुन सांगितले पाहिजे की सध्या पाणी नाही पाणी असते तर दिले असते. नसेल तर कोठुन देणार? पण आलेल्या पाण्याचे वितरण तयासाठी आपण जास्तीत जास्त लोकांनी चर्चा करु या , बोंबाबोंब करु या, परंतु करण्यासाठी मार्ग निघणार नाही. आजच परिस्थिती हाताबाहेरची आहे. लोक पाण्यासाठी एकमेकांना मारतील. तेव्हा एमआयडीसीकडुन पाणी मिळत आहे असे आपले सांगणे लोक ऐैकणार नाहीत. कुठे पंप बंद पडतात, अभियंते इकडुन तिकडे पडतात. नुसते पळुन आणि धावपळ करुन काही चालणार नाही. त्यासाठी ठोस आणि कठोर उपाय करावे लागतील. मग धनंजय बोडारे असोत कि दिलीप गायकवाड असोत किंवा आमचे भुल्लर महाराज व विनोद ठाकुर असोत कुणीही हस्तक्षेप करु नका. प्रत्येक सदस्यांच्या प्रभागात दोन तास पाणी कसे देता येईल त्याचे प्रशासनाने नियोजनबध्द आराखडा तयार ठेवावा आहे का ? गेल्या दोन महिन्यापासुन चर्चा होत आहे, यासाठी माझी आपणांस एक विनंती आहे , एक आवाहन आहे, प्रत्येक उंच भागामध्ये पाणी जाण्यासाठी आपण आजपासुन युध्द पातळीवर प्रयत्न केले पाहिजे. युध्द पातळीवर एक आवाहन घ्या. ती आलेली एक संधी आहे. ज्याप्रकारचे संकट २००५ साली उल्हासनगर महानगरपालिका

क्षेत्रामध्ये ते संकट न समजता लोकांपर्यंत जाण्याची ती आम्हांला संधी होती. लोकांची सेवा करण्याची संधी होती. आता ही एक संधी आहे, एमआयडीसीने आम्हांला संधी दिली आहे. अशा कठिण परिस्थितीत सुध्दा आम्ही लोकांना पाणी देवु अशा प्रकारची भुमिका तुमची आणि आमची असली पहिजे त्यासाठी आम्ही तुम्हांला लागेल ती संधी देवु. शिवसेनेच्यावतीने मी तुम्हांला एक निवेनदन करतो की, अशा प्रकारची योजनेचा तुम्ही लाभ घ्या. मी सदस्यांना सुध्दा एक निवेनदन करतो की, पाण्यासाठी राजकारण करु नका. एका प्रभागातील लोक दुस–या प्रभागातील नागरीकांना मार मार मारतील आणि आम्ही टाळया वाजवत बसु किंवा आनंद व्यक्त करु हे बरोबर होणार नाही. राजकारण चालेल, याच्या पुढचीही चार वर्ष आहेत परंतु ही दोन वर्ष परिक्षेचा कालावधी आहे. परिक्षेच्या कालावधीमध्ये विद्यार्थी चांगले गुण मिळविण्यासाठी दिवसरात्र अभ्यास करतो तशी या उल्हासनगरची पाणी पुरवठा व्यवस्था सुधारण्यासाठी प्रत्येकाने कसोसीने प्रयत्न करा, प्रामाणिक प्रयत्न करा अशी मी विनंती करतो, अंमलबजावणी करणे प्रशासनाचे काम आहे आतापर्यंत दुर्लक्ष झालेले आहे. जी काही उपाययोजना करायची आहे ती लवकरात लवकर करा. परंतु लवकर करा.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे:–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, पाण्याच्या लक्षवेधीवर चर्चा करतांना आपणांस विनंती आहे की, पाण्याची समस्या सोडविण्यासाठी एकच उपाययोजना करायची कि समान वितरण, समान वाटप शहरातील प्रत्येक नागरीकांसाठी पिण्याचे पाणी सम प्रमाणात वितरण होण्यासाठी उपाययोजना करावी त्यासाठी आम्ही आपल्या पाठीशी आहोत, ही विनंती.

<u>सदस्या श्रीमती सुमन शेळके :–</u>सन्माननिय महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब व सभागृहातील सर्व सदस्य, श्री. धनंजय बोडारे यांनी जी लक्षवेधी सूचना मांडली आहे तिचे मी समर्थन करते कारण की पाण्यासाठी माझ्या प्रभागातुन सुध्दा मोर्चा आलेला होता. पाण्याची समस्या इतकी बिकट आहे की हंडा कळशी घेवुन दिड दोनशे महिला येथे आलेल्या होत्या त्यासाठी पाण्याबाबतीत तुम्ही लवकर कार्यवाही करावी.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>मा. महापौरजी....

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u> श्री. मोरे साहेब, मी दोन मिनिट बोलतो. माझी लक्षवेधी आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>अहो, तुम्ही सत्ताधारी पक्षाचे आहात. मा. महापौरजी, आणि आयुक्त साहेब, आज दोन–दोन तीन–तीन लक्षवेधी एकत्रित करुन घेतलेल्या आहेत मग त्या पाण्याच्या संदर्भातील असोत की कच–याच्या संदर्भातील असोत मला तरी असे वाटते की सत्ताधा–यांना आणि सभागृह नेत्यांना जाग आली आहे. कुठे वादविवाद होवु नये म्हणुन लक्षवेधी सूचना एकत्रित केल्यात. जेणेकरुन पाण्याचा प्रश्न सर्व सदस्यांनी संहमताने सोडवावा. आणि म्हणुन हा तोडगा काढलेला आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आज सन्माननिय महापौर येथे नाहीत, त्यांनी देखील पाण्याच्या संदर्भात मोर्चा काढला होता. आज वडोल गावचा मोर्चा आला होता. म्हणुन सन्माननिय आयुक्त साहेबांना मी असे सांगु इच्छितो की असे किती दिवस चालणार आहे. आपण पाण्याचे पैसे घेतो, पैसे दिले नाही तर आपण त्यांना नोटिसा देतो, व्याज लावतो. आणि मोठी गाडी शहरात फिरते. लोक म्हणतात की तुम्हांला पैसे जर हवे असतील तर पाहिजे तर आम्ही कपडे गहाण ठेवु पण तुम्हांला पैसे देवु. अहो, एकतर तुम्ही जनतेला पाणी देत नाहीत आणि त्यांना वाटेल तसे म्हणतात की पैसे भरा. नाहीतर हे केले जाईल ते केले जाईल या संदर्भात आपल्या महापालिकेतील गाडी फिरते. लोकांना नोटिसा काढता. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, एमआयडीसीकडुन किती पाणी मिळते? त्याचे समान वाटप झाले पाहिजे. याबाबत मी आणि बोडारे साहेब पहिल्यापासुन या सभागृहात ओरडत आहे. कुणाला चार तास, कुणाला दोन तास पाणी मिळते तर कुणाला अजिबात मिळत नाही. आणि जे अधिकारी येथे मागविले जातात त्यांना पुरेसे ज्ञान आहे किंवा नाही? पुर्वीचे जे अधिकारी येथे होते श्री. सावकारे साहेब, ते म्हणत मला येथे राहायचे नाही. मला जायचे आहे. असा अधिकारी शहराला काय पाणी देवु शकेल? आणि शहराची काय बिकट व्यवस्था हा करु शकेल? याबद्दल मी आयुक्त साहेबांना सांगितले होते की, जो माणुस या शहरामध्ये , या महापालिकेत रहायला तयार नाही त्याला तुम्ही सोडत का नाही? त्यांना मी सांगितले त्यांना सोडा, दुसरा अधिकारी येईल. याबददल मी दुसरे वाक्य वापरणार होतो, पण ते मी येथे वापरत नाही. एक माणुस गेला आणि दुसरा आला, याबद्दल दुसरे वाक्य वापरणार होतो परंतु ते गैरवर्तनाचे वाक्य या सभागृहामध्ये माझ्या सारख्या सन्माननिय सदस्याने तरी ते वापरु नये. आता आलेले श्री. खडताळे साहेब हे नविन आहेत त्यांना तर पाणी पुरवठयाचे काही माहित नाही. कारण हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक खात्याकडुन येतात आणि त्यांना येथिल माहिती नसते. उल्हासनगरमध्ये कॅम्प निहाय कशाप्रकारे पाण्याची वितरण व्यवस्था केली पाहिजे. १९९७ मध्ये मी सन्माननिय सदस्य म्हणुन या सभागृहात आलो त्यावेळेस देखिल कॅम्प नं. १,२,३ आणि ४ मध्ये काही भाग उंच संखल

असल्यामुळे पाण्याचा थोडा फार तुटवडा पडत होता. परंतु पाणी पुरवठा अतिशय व्यवस्थित होता. सन्माननिय सदस्यांनी सांगावे की त्यावेळेस पाण्याचा असा तुटवडा भाषत होता का? परंतु जेव्हा श्री. सावकारे साहेब येथे आलेत आणि श्री. सावकारे काही पैसे घेवुन आम्हांला पाण्यापायी कंगाल केले. त्याठीकाणी आता श्री. सेल्वन आले, श्री. खडताळे आले. यासाठी सन्माननिय सदस्यांना एक अशी विनंती आहे की, श्री. सेल्वन यांना पुरेसे तांत्रिक ज्ञान नाही. ज्यांना पुरेसे तांत्रिक ज्ञान आहे अशा अधिका–यांची आमच्या आयुक्त साहेबांनी, दुस–या विभागांमध्ये बदली केली आहे. श्री. खयानी, श्री. सभागनी व श्री. चाफेकर या अधिका–यांना कोठुन कोणती पाईप लाईन गेली आहे हे माहित आहे. या महापालिकेच्या कार्यालयाशेजारी कोणती जलवाहीनी आहे हे सुध्दा ते सांगु शकतील. अशा अधिका–यांच्या तुम्ही इतरत्र बदल्या केल्या. ते अधिकारी खुष झाले ते म्हणतात की बरे झाले आयुक्त साहेबांच्या त्रासापासुन मुक्त झालो येथे आरामात येवुन बसायला बरे झाले. आयुक्त साहेब, तुम्ही त्या अधिका–यांच्या बदल्या करावयास नको होत्या. त्यांना तुम्ही सांगावयास पाहिजे होते की कॅम्प नं. १,२,३ मध्ये व्यवस्थित पणे पाणी येत होते. आज पाण्याचा तुटवडा झाला कसा? सन्माननिय सदस्य श्री.बोडारे साहेब व मी चौकशी केली शांतीनगर येथे वॉल्व तुटला होता. त्यामुळे पाणी फुकट जात होते. आपल्याला किती पाणी मिळते ते अधिकारी सांगत नाहीत. पाण्याचे किती पैसे दयावे लागतात? इथे तर असे आहे आंधळे दळत आणि कुत्र पीठ खातयं. कुत्रे दोन आहेत या शहराचे व या शहराच्या बाहेरचे, या उल्हासनगर महापालिकेत शिरतात आणि आम्हाला वेडे बनवतात. आज कल्याणमध्ये व्यवस्थितशिर पाणी आहे परंतु उल्हासनगरात पाणी नाही. याचे कारण काय आहे हे तुम्ही शोधले पाहिजे? हे कुणी शोधत नाही, तांत्रिक मुद्दा पाहत नाहीत. १० लाखाचे, १५ लाख केले परंतु तुम्ही काम बरोबर करत नाहीत. तुम्ही काम करा. आज सन्माननिय सदस्यांनी येथे महाराष्ट्र शासनाचा गौरव केलेला आहे. परंतु एक लक्षात घ्या गौरव करतांना देखील एक मागची बाजु पडताळली पाहिजे की शहराचा विकास होईल कसा? शहराचा विकास कसा होईल किंवा होणार नाही याबाबत मला आज बोलायचे नाही आहे. विस्ताराने मी ते बोलेलेे. मला फक्त एवढचे सांगायचे आहे की, या महापालिकेत कुठलाही अधिकारी गव्हातुन किडे रगडत नाही आहे. किंवा त्या अधिका–याने कॅबिनमधुन माझ्याकडे पहायचे हे बरोबर नाही. ज्या अधिका–यांनी काम बरोबर केले नसेल त्यांना सांगायचे तुम्ही आठ–आठ वाजेपर्यंत बसा. परंतु हे काम मला करुन पाहिजे. परंतु तसे काही एक होत नाही. त्यांची बदली करण्याने काही होणार नाही. आज तुम्ही श्री. चाफेकरांना बोलवा आणि या उल्हासनगर मध्ये किती पाईप लाईन टाकलेल्या आहेत, कुठली लाईन लिकेज आहे, कुठली लाईन कोठुन गेली आहे ही माहिती मिळु शकेल याबाबत श्री. चाफेकर, श्री. सभागनी व श्री. खयानी यांना चांगले माहित आहे. तसेच श्री. जयसिंघानी आहेत त्यांना सुध्दा चांगले माहित आहे. परंतु अशा अधिका–यांची येथे कदर केली जात नाही त्यांना बाजुला फेकले जाते. आणि असे अधिकारी हे फक्त गाडीत बसतात आणि ते म्हणतात की आम्ही चाललो. आम्ही प्रभागात चाललो आम्ही व्हीजीटला चाललो परंतु व्हिजीट कुठे दिली जाते याचा काही पत्ता नाही. श्री. सेलवन आणि श्री. खडताळे यांनी काहीच चांगले नाही की दिवसाआड आम्ही तुम्हांला पाणी देवु. दिवसाआड पाणी देवु, तर दिवसाआड काय एक हप्त्याने दया ना? आणि पैसे वसुल करा? तुम्ही चुकीचे करत आहात. ही चुकीची भावना बरोबर नाही. यावेळेस मी एमआयडीसीच्या अधिका–यांना विचारले की आज पाणी आले नाही किंवा दोन दिवस पाणी आले नाही यास उत्तर काय आहे? तर ते म्हणाले की, श्री. खडताळे यांना तुम्ही विचारा. मी एमआयडीसीतर्फे पत्र पाठविले आहे असे ते म्हणाले परंतु श्री. खडताळे म्हणाले की माझ्या कडे पत्र आले नाही. त्या अधिका–यांनी त्यांना जाब विचारला की, सन्माननिय सदस्यांना तुम्ही पत्र दिले नाही किंवा गाडी फिरविली नाही की २ दिवस किंवा २४ घंटे पाणी येणार नाही? अशा पध्दतीने काहीच केले जात नाही. आम्हांला लोक विचारतात, तुम्ही नगरसेवक आहात, तुम्ही पाण्याची मोटार लावतात? मग आम्हांला सांगातात की पाणी का आले नाही? तर माझी अशी विनंती आहे की, असे अधिकारी आपण खपवुन घेत आहोत. कश्यासाठी तर श्री.बी.बी. मोरे यांचे सार्वजनिक बाधंकाम विभागाचे एक प्राकलन पास केले. तर ते राहु दया. तसेच श्री.बी.बी. मोरे यांचे पाण्याचे एक प्राकलन पास केले तर ते राहु दया मी त्याची शिफारस करेल. हे बरोबर नाही. हा प्रश्न फक्त श्री.बी.बी. मोरे व त्यांच्या प्रभागाचाच नाही तर संपुर्ण शहराचा प्रश्न आहे. आणि जर शहरामध्ये पुरेसे पाणी दिले तर हे शहर राहु शकेल. नाही तर जसे या शहरात बिल्डर होते ते इकडे तिकडे` गेले व शहर उजाड झाले आहे, शहरांचा विकास होणार नाही, शहराचा विकास ठप्प झालेला आहे. जर पाणी मिळाले नाही तर आम्ही देखील हे शहर सोडण्याचा तयारीत आहोत असे होईल. आमचे उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. रमेश चव्हाण यांना देखील ही समस्या माहिती आहे. तसेच आयुक्त साहेब आहेत त्यांना एकच सांगतो की हा पाण्याचा प्रश्न जर तुम्ही सोडविला नाहीत तर आम्ही सर्व मिळुन येथे ढिय्या मांडु. आजही आमचा तोच विचार होता, सर्व सन्माननिय सदस्यांचा विचार होता जर तुम्ही कुठल्याही पध्दतीने हे काम केले नसते तर आज आम्ही या सभागृहात ढिय्या मांडुन सर्व बाटल्या फेकुन निषेध, निषेध केला असता. काय चालले आहे या उल्हासनगरमध्ये एक पाण्याचा हंडा नाही मिळत? का नाही मिळत आम्ही असे काय पाप केलेले आहे?उल्हासनगर शहराच्या हद्दीमध्ये येवुन काय त्यांनी पाप केलेले आहे की त्यांना एक पाण्याचा थेंब सुध्दा मिळत नाही? पाण्याच्या

पैश्यासाठी तुम्ही नगरसेवकांना सांगतात की तुमच्या प्रभागात रिकव्हरी झालेली नाही. जर या पध्दतीने असा कारभार चालत असेल तर हे बरोबर नाही. आम्ही लोकप्रतिनिधी म्हणुन निवडून यायचे आणि जनतेच्या शिव्या खायच्या आणि तुमच्याकडे तास, तास, अर्धा अर्धा तास या महासभेमध्ये बोलुन आमचा गळा खराब करायचा? हे बरोबर नाही आहे. आमचे उप–महापौर तर लोकप्रतिनिधीच आहेत परंतु आयुक्त साहेबांनी प्रशासनास वठणीवर आणले पाहिजे. एकदाच त्यांना सांगितले पाहिजे की श्री.बी.बी. मोरे यांच्या प्रभागात पाणी येत नाही, शेजारच्या प्रभागात जाते त्याचे कारण काय? हे कारण शोधले पाहिजे, ते विचारले पाहिजे त्याचे विसर्जन केले पाहिजे. कुणाला चार तास, कुणाला एक तास तर कुणाला अजिबात पाणी येत नाही. तर ते पाणी कुठे गेले जर ११० एमएलडी पाणी मिळते? ते पाणी गेले कुठे? याचा कुणी तपास केला? एमआयडीसी वाले म्हणतात आमचे ४० करोड रु. देणे बाकी आहेत, ४४ करोड आहेत दिले तर बरे नाही तर पाणी कपात. उल्हासनगर शहराचा आमचा एक इमेज आहे. इमेज होती आणि आज आहे. परंतु ही इमेज या सर्व अधिका–यांनी घालवलेली आहे. पाण्यासाठी मोठया पेपरामध्ये छापुन येते की उल्हासनगर महापालिकेमध्ये ४४ करोड रुपये पाण्याचे देणे आहे. आणि म्हणुन उदयापासुन त्यांचे पाणी कट होईल. म्हणुन आमची विनंती आहे की पुढच्या महासभेच्या अगोदर एक समिती नेमा व त्या समितीला आपण जाब विचारला पाहिजे की पाणी का मिळत नाही? पाणी गेले कुठे? जेव्हा ११० व ९० एमएलडी पाणी होतें तेव्हा पाणी मिळत होते. आज एवढी माणसे वाढली की पाणी अजिबात नाही आहे. श्री.बी.बी. मोरे, श्री. धनंजय बोडारे, श्री. विनोद ठाकुर यांना कशा पध्दतीने पाणी मिळते याचा कुणी विचार करत नाही. आणि डोके लावुन काम करत नाहीत. सकाळी १०.३० वाजता कामावर यायचे, १.३० वाजता दुपारी जेवण करायचे आणि सायंकाळी ५.३० वाजता घरी जायचे, गेली ती उल्हासनगर महापालिका XXX तो शब्द येथे आता वापरायला नको आहे. गेली ती उडत अशा पध्दतीने जर कुणी अधिकारी वागत असेल तर आमची त्यास सहमती नाही. पुढच्या महासभेत किंवा २६ तारखेच्या विशेष महासभेत पाण्याचा प्रश्न जर सुटला नाही तर आम्ही मटके आणु आणि या महासभेत फोडु. एवढेच मी बोलता आणि येथेच थांबतो. जय हिंद।

**मा. सदस्या श्रीमती शीला मनसुलकर, श्रीमती ज्योती चैनानी या सभागृहातुन बाहेर गेल्या.** 

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, पाण्याच्याबाबत असा मुद्दा आहे की 'पाणी रे पाणी तुझा रंग कसा? ज्यात मिळविले त्या सारखा.' न सत्तापक्षाचे आहे ना विरोधीपक्षाचे आहे. पाणी प्रत्येक व्यक्तीस पाहिजे. आज आपल्या शहराची ही स्थिती आहे की पाण्याचे टॅंकर मागे हजारो लोक उभे आहेत. ड्रम घेवुन, बादली घेवुन, हंडा घेवुन. वर्तमानपत्रात अशी बातमी आहे की, ११० एमएलडी पाणी येते, लोकसंख्या जेवढीच्या तेवढीच आहे वाढलेली नाही. पाणी कुठे गेले? एक तास माझ्या प्रभागात पाणी येत होते. एका तासाचे ४० मिनिटे केले, ४० चे ३५, ३५ चे २० मिनिट केले, २० येणारे पाणी ते सुध्दा आता बंद झाले आहे. टॅंकरने पाणी घ्या, परंतु टॅंकर मिळत नाही. लोकांना पाणी कोठुन दिले जावे? उदया होळीचा सण आहे, होळीच्या दिवसात पाणी मिळाले नाही तर लोक आमच्या घरात घुसून मारतील. मला तर असे वाटते की, महापालिकेत नगरसेवक म्हणुन निवडुन आल्यानंतर फक्त पाण्याची नोकरी करायची आणि चार हजार रुपये मानधन पगार घ्यायचा, फक्त पाण्याचेच काम करायचे. टॅंकरवाल्याकडे जायचे आणि टॅंकर घ्यायचे, अधिका–यांकडे जायचे पाण्याविषयी बोलायचे, पाण्याच्या टाकीची पातळी किती आहे ते विचारा, टाकी भरली की नाही ते विचारा, वॉल्व खोलला कि नाही ते विचारा म्हणजेच नगरसेवकाचे हे काम आहे का? पुर्ण दिवस तो हेच काम करणार? आपले बालगोपाल, आपले कुंटुंब, नोकरी धंदा सोडुन, नगरसेवकांनी फक्त नोकर बनुन महानगरपालिकेचे काम केले पाहिजे का? या महानगरपालिकेचे जे अधिकारी आहेत, ज्यांना पंधरा, वीस हजार पगार आहे ते काय कामाचे आहेत? ते कश्यासाठी येथे बसले आहेत? तुम्ही तुमच्या घरी जावुन बसा ना? प्रमोशनने येतात, कामे करतात व आम्हांला धक्का खाण्यासाठी, लोकांच्या शिव्या ऐकण्यासाठी सोडुन देतात? पाणी जर ११० एमएलडी येते तर पाणी जाते कोठे? प्रभागात जावुन अधिका–यांना विचारले तर अधिकारी, अभियंत्यांना विचारले तर टाकी भरत नाही असे उत्तर देतात. टाकीच्या ठिकाणी जावुन विचारले तर ते म्हणतात पाणी आले नाही तर जायचे कोठे? कुणाला विचारायचे? करायचे काय आम्ही? एका भागात पाहिले तर चौदा तास पाणी, दुस–या भागात पाहिले तर चार तास पाणी, तिस–या भागात पाहिले तर दोन तास पाणी तर एका ठिकाणी पाहिले तर दोन मिनटं सुध्दा पाणी नाही. म्हणजेच जेथे चौदा तास पाणी मिळते तेथिल लोक टॅक्स भरतात, पाण्याचे बिल भरतात. जेथे दोन मिनिट पाणी मिळते तेथिल लोक आपल्या उल्हासनगर महानगरपालिका हद्दीच्या बाहेर राहतात.? त्या लोकांना पाणी पिण्याचा अधिकार नाही? ते टॅक्स भरत नाहीत? पाण्याचे बिल भरत नाहीत? शेवटी हे कुठपर्यंत चालत राहील? पाण्याच्या मद्दया विषयी आम्ही आपसात कधी पर्यंत भांडत राहायचे? आपले अधिकारी लोक फार मोठे राजकारण करतात असा माझा आरोप आहे एखादया विभागाचे पाणी दुस–याच विभागात फिरवुन नगरसेवकास जावुन सांगतात की, अमुक

एका विभागात चार तास पाणी येत आहे आणि आपल्या विभागात दोन मिनिट सुध्दा पाणी नाही. म्हणजेच त्या नगरसेवकांनी आपसात भांडत राहायचे किंवा तेथिल रहिवाश्यांनी आपसात मारामारी करावी. लोकांनी जावुन वॉल्व उघडायचे. असे का होते? लोकांना एक तास पाणी देण्यामागे आपणांस अडचण काय आहे? आपली समस्या काय आहे? आपण एक तास पाणी का देत नाहीत? माझ्या विभागात पाणी येत नाही त्याबाबतीत पत्र दिले तर या लोकांनी जलवाहिनी टाकण्यासाठी ५ लाख रुपये खर्चाचे एक प्राकलन तयार केले. जलवाहिनी टाकण्यासाठी तेथे पाणी तर पाहिजे? कोरडया जलवाहिनीवर लोक छिद्रे पाडतील. आणि पाणी आले नाही तर नगरसेवकाने आम्हांला मुर्ख बनविले असे म्हणुन शिव्या देतील. आमच्या विभागात जलवाहिनी टाकुन सोडुन दिली. आम्ही लोकांना कधी पर्यंत समजावत राहायचे? येणारा कालावधी हा उन्हाळयाचा आहे. मुलांच्या परिक्षा चालु आहे. सण येतात. अशा परिस्थितीत आम्ही लोकांना काय उत्तर दयायचे? म्हणुन संबंधीत अधिका–यास व्यासपीठावर बोलाविले जावे २००५ मध्ये तत्कालीन आयुक्त श्री. रामनाथ सोनावणे यांनी पाणी पुरवठयाविषयी श्वेतपत्रिका काढली होती तेव्हा सांगण्यात आले होते की, उल्हासनगरमधील प्रत्येक प्रभागात दोन–दोन तास पाणी देण्यात येईल. त्या श्वेतपत्रिकेचे काय केले? ती कच–याच्या डब्यात टाकली कि तिला आग लावली? तिचा अर्थ काय?एक आयुक्त श्वेतपत्रिका काढतो आणि सभागृहास समजावतो. ती श्वेतपत्रिका तेवढयाच कालापुरती होती काय? आणि ती काढुन फुकट वेळेचा अपव्यय केला. कागदाचां अपव्यय केला? सर्व काही त्याच ठिकाणी आहे. त्या श्वेतपत्रिकेवर पुढे काय झाले? ती तेवढयाच कालापुरती होती काय? वेळेचा अपव्यय करण्यासाठी श्वेतपत्रिका काढली काय? याबाबत काय करायचे त्याबाबत आम्हांला आज उत्तर पाहिजे? उत्तर दिले नाही तर मी येथुन उठणार नाही. माझ्या प्रभागात आज दोन मिनिट सुध्दा पाणी येत नाही. काल मी आणि श्री. राजेश वानखेडे पंप रुममध्ये बसलो होतो. म्हणजे आम्ही काय उपोषण करायचे? धरणे दयायचे तेव्हा कुठे काम होईल काय? म्हणुन जोपर्यंत उत्तर मिळत नाही तोपर्यंत मी येथुन उठणार नाही.

मा. सदस्य श्री. हिरानंद जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, संपुर्ण शहरात पाण्याची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. याअगोदर थेडे फार पाणी येत असे. परंतु एक–दोन महिन्यापासुन पाणी येतच नाही. पाणी कुठे गेले तेच कळत नाही. व जेव्हा पाण्याचा टॅंकर घेण्यासाठी लोक जातात तोही मिळत नाही. टॅंकर मिळविण्यासाठी सकाळ संध्याकाळ चार चार तास फिरावे लागते. या फोटोमध्ये हे दृश्य दाखविण्यात आले आहे ते माझ्या प्रभागातील आहे. तेथे पाण्याची एवढी समस्या आहे, एवढी समस्या आहे की एक एक तास पाण्यासाठी लोक तडफडत आहेत. याबाबतची उल्हास विकासमध्ये बातमी छापुन आली आहे. तरी सुध्दा या समस्येकडे आपले लक्ष वेधले जात नाही. असे कधीपर्यंत होत राहील? लोकांना पाणी पाहिजे. लोकांना पाणी मिळत नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>ही पाण्याची समस्या संपुर्ण शहरात आहे. त्यासाठी मी आपणांस हे सांगु इच्छितो की, आपण सुध्दा आमच्यामध्ये सहभागी व्हा.

**यावेळी श्री. विनोद ठाकुर, श्री. प्रशांत धांडे, श्री. सुरेश जाधव, श्री. राजेश वानखेडे, श्री. तुलसीदास वसिटा, श्री. सुंदर मंगतानी, श्रीमती जयश्री सुर्वे, श्रीमती ज्योती माने, श्री. शेखर यादव, श्री. मुकेश तेजी, श्रीमती सुजाता रिजवानी, श्री. विजय सुपाळे, श्री. प्रधान पाटील, श्रीमती मालती करोतिया, श्री.बी.बी. मोरे, श्रीमती लता निकम, श्रीमती सुमन शेळके, श्रीमती पंचशिला पवार व श्री. जनार्दन ढोके यांनी व्यासपीठासमोरील मोकळया जागेत बैठक मांडली.**

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>आम्हांला साथ दया.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>आम्ही तुमच्या सोबत आहोत.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>मा. महापौरजी, मला असे वाटते की, याबाबत आयुक्त साहेबांनी उत्तर दयावे. सर्व सदस्य खाली बसले आहेत. हे शोभा देत नाही.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—मा. महापौर, मी आपणांस विनंती करतो की, आपण मा. आयुक्त साहेबांना आदेश दयावा, ते पाण्याची समस्या सोडविण्यासाठी काय करणार आहेत? ते सभागृहास सांगितले जावे. तरच सन्माननिय सदस्य आपापल्या आसनावर आसनस्थ होतील.

सदस्य श्री. राजु जग्यासी:—मा. महापौरजी, मी केव्हापासुन उभा राहुन बोलण्यासाठी आपली परवानगी मागत आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—मा. महापौरजी, पाण्याची समस्या सोडविण्यासाठी आपण महापौरांना आदेश दयावा. सत्तेत असूनसुध्दा सदस्यांना खाली बसावे लागते हे बरोबर नाही. पाण्यासाठी ब—याच दिवसापासुन जी चर्चा होत आहे त्याबाबत आज काही तरी निर्णय लागला पाहिजे. त्यासाठी मी आपणांस विनंती करतो की, आपण आयुक्त साहेबांना आदेश दयावेत व याबाबतीत काय उपाययोजना करता येईल ते त्यांनी सभागृहास सांगावे.

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.**

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सर्व सदस्यांना मी विनंती करतो की, कृपया गोंधळ घालु नका. या समस्येतुन आपण काहीतरी मार्ग काढु या. अशा प्रकारे गोंधळ करुन त्यातुन काही मार्ग निघणार नाही. व अशी वेळ येता कामा नये की सदस्यांनी खाली बसावे.

सदस्य श्री. लालबिहारी यादव:—मा. महापौरजी यातुन काहीतरी मार्ग निघायला पाहिजे. लोकांना पाणी मिळाले पाहिजे.

सदस्या श्रीमती मालती करोतिया :—माझ्या प्रभागात पाण्याची फार मोठी समस्या आहे. माझ्या प्रभागात आपले सचिव साहेब राहतात, श्री. सुंदर मंगतानी हे पण येत असतात.

सदस्य श्री. लालबिहारी यादव:—तरीही कुणीही लक्ष देत नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—सार्वत्रिक निवडणूकीपासुन कोणी पाणी समस्येकडे लक्ष दिलेले नाही.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—कृपया सर्व सदस्यांनी आपापल्या आसनावर बसुन घ्यावे.

सदस्य श्री. लालबिहारी यादव :—आम्ही लोकांना पाणी पुरवु शकत नसु तर सत्तेत बसुन फायदा काय?

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. महापौरजी, सभागृहातील हे वातावरण पाहुन मला आज खरोखरच असे वाटत आहे की आपण लोकांनी काहीतरी परिवर्तन जरुर केले आहे. अहो, आम्ही तर निवडुन आलेले लोकप्रतिनिधी आहोत. श्री. बोडारे साहेब आपण माझे बंधु आहात. आपणांस जनादेश व जनसंदेश बघुन खुप त्रास होतो. मी आपणांस सांगु इच्छितो की जनादेश व जनसंदेश म्हणजे जनतेचा आवाज असतो. आज आपल्या प्रभागात पाणी नाही तर माझ्याही प्रभागात पाणी नाही. आपण आपल्या भाषणात म्हणतात की पाण्याबाबतीत राजकारण करु नका, राजकारण करु नका असे दहा वेळा बोललात. मी राजकरण करु इच्छित नाही मी उत्तर देवु इच्छितो. राजकारण ते आहे की स्वत: महापौर हंडा घेवुन फिरतात व म्हणतात की माझ्या प्रभागात पाणी येत नाही. परंतु महापौर कधी एमआयडीसी ची बैठक घेत नाहीत. मंत्रालयात याबाबत जेव्हा एखादी बैठक होते त्यावेळेस श्री. एकनाथ शिंदे बोलतात, ठाण्याच्या महापौर बोलतात, मुंबईच्या महापौर बोलतात, परंतु उल्हासनगरचे कोणी प्रतिनीधी काही बोलत नाहीत?

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.**

सदस्य श्री. राजु जग्यासी:—मला बोलु दया, मला बोलु दया. राजकारण हे आहे. व जर एमएमआरडीए जेएनएनयुआरएम यांच्याकडुन कधी पैसे आले तर म्हणता की हे आम्ही केले आहे. आणि काम झाले नाही

तर म्हणता महाराष्ट्र शासन काम करत नाही. चांगले काम झाले तर म्हणता मुख्यमंत्री आमचे आहेत. व पाणी मिळाले नाही तर ........

उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–श्री. राजु जग्यासीजी, ....

सदस्य श्री. राजु जग्यासी:–हे कॉंग्रेस पक्षाचे सदस्य आपल्या सोबत बसले आहेत. त्यांच्याबाबतीत आपण काय काय अपशब्द वापरले होते? काय काय पत्रके काढली होती? त्याबाबत मला सभागृहात बोलण्याची आवश्यकता नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:–जो मोर्चा काढण्यात आला होता तो महाराष्ट्र शासनाच्या विरोधात काढला होता.

सदस्य श्री. राजु जग्यासी:–आज मी आमचे बंधु श्री. विनोद ठाकुर यांच्या बाजुने आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–ही चांगली गोष्ट आहे की आपण आमच्याबरोबर आहात. याबद्दल आपले धन्यवाद मानतो.

सदस्य श्री. राजु जग्यासी:–पाण्याबाबतीत मी आपणांस काही सूचना करु इच्छितो. आज पाण्याची जी समस्या उद्भवली आहे त्याची कारणे श्री.बी.बी. मोरे साहेबांनी सांगितली की येथिल काही अधिका–यांच्या एका झटक्यात बदल्या केल्या. पाणी वितरण व्यवस्थेबाबत आम्ही अपयशी आहोत. प्रभाग समिती क्र. १ मध्ये कनिष्ठ अभियंता कोण आहे? हे आपण जरा सांगु शकता काय? पाणी पुरवठा विभागाचा कनिष्ठ अभियंता कोण आहे ते उभे राहुन आपण सांगा. आपण सांगितले तर मला माहित पडेल ना? आपण महाराष्ट्र शासना बाबतीत मोठ मोठया गोष्टी करता परंतु आपण येथे काय करता?

उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:– पाणी प्रश्नाबाबतीत आपणांस मार्ग काढायचा आहे या समस्येचे राजकारण करु नका.

सदस्य श्री. राजु जग्यासी:–पाणी समस्ये बाबत मी आपणांस काही सूचना करु इच्छितो.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:–साहेब, भाषण बाजी नको आता. आम्हांला तुम्ही निर्णय दया. पाण्यासाठी बोला. पाणी दया, पाणी दया....

**यावेळी खाली बसलेले काही सदस्य पाणी दया, पाणी दया असे आवाज देत होते .**

सदस्य श्री. राजु जग्यासी:–शरम करा, शरम करा.

**यावेळी श्री. राजु जग्यासी, श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती कविता सिरवानी, श्रीमती सुजाता रिजवानी, श्री. रविंद्र बागुल, श्री. गणपत एडके, श्री. भारत राजवानी, श्री. नरेंद्र दवणे, श्री. लालबिहारी यादव हे व्यासपीठासमोरील मोकळया जागेत बैठक मांडुन बसलेल्या सदस्यांमध्ये सहभागी झाले.**

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–पाणी दया पाणी दया नाही तर खुर्ची खाली करा.

सदस्य श्री. लालबिहारी यादव :–श्री. मोरे साहेब खुर्ची कोणी खाली करायची? अधिका–यांनी खुर्ची खाली केली पाहिजे? लोकांना पाणी मिळाले पाहिजे.

उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–मोरे साहेब, पाण्यामध्ये राजकारण करु नका. शांत रहा.

सदस्य श्री. मोहन साधवानी :– श्री. मोरेजी आपल्या जागेवर बसुन घ्या. आयुक्त साहेब निवेदन करत आहेत. आयुक्त साहेब, कृपया आपण निवेदन करावे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):– उल्हासनगर शहरासाठी ११५ एमएलडी पाणी .......

सदस्य श्री. लालबिहारी यादव :—आयुक्त साहेब, एक मिनिटं....

सदस्य श्री. राजु जग्यासी:—आपण बसुन घ्या,.....

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):— उल्हासनगर शहरासाठी ११५ एम एल डी पाणी नोव्हेंबर महिन्यामध्ये येत होते. आजही येत आहे. शुक्रवारी फक्त पाणी येत नाही. पाण्याच्या संदर्भात महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या सोबत रात्रीचे तीन तीन वाजेपर्यंत फिरतात. आपणांस पाणी दयायचे नाही अशाप्रकारची कोणती इच्छा किंवा प्रयत्न होणे कदापीही शक्य नाही. महानगरपालिका कारभारातील चुका या मात्र प्रशासनामार्फतच घडतात. त्याची आम्हांलाही कल्पना आहे. जे यश असते ते आपणा सर्वांचे मिळुन असते. अपयश हे प्रशासनाचे असते. याची जाणीवही आम्हांला आहे. परंतु यामध्ये एकच सन्माननिय सदस्यांना मी सांगु इच्छितो, पाण्याच्या संदर्भात महापालिकेचे अभियंते, अधिकारी मग ते उपायुक्त असतील, ते व मी स्वत: आपल्या समवेत आपण सांगाल त्या वेळेला व आपण सांगाल तेथे येण्यास सदैव तयार आहोत, येत आहोत, कामेही करत आहोत. पाणी पुरवठयामध्ये दोन अडचणी येतात, त्यातील पहिली असमान वितरण व्यवस्था या व्यवस्थेस महापालिकेचे अधिकारी कर्मचारी निश्‍चितच जबाबदार आहेत. पण त्या समवेत जर लोकप्रतिनिधींनी आपली जबाबदारी पार पाडली किंवा एक सहकार्य त्यात दिले तर हा प्रश्न फारसा उत्पन्न होणार नाही. पाणी जाते कुठे? कोण घेवुन जाते? जर पाणी कोठे जात असेल तर वॉल्वमनला ते फिरवायला कोण लावते ? त्याचाही कुठेतरी खाजगीमध्ये विचार झाला पहिजे. मी सभागृहामध्ये सर्वच बोलणार नाही. पण खाजगीमध्ये बसुन अंतर्गत विचार व्हायला पाहिजे. वॉल्वमनने एका प्रभागातील पाणी काढुन दुस—या प्रभागात दिले, काही ठिकाणी असे होत असेल, जर सर्व ठिकाणी असे होत असेल तर सर्वांनी मिळुन यावर विचार करणे गरजेचे आहे. प्रामुख्याने जो प्रश्न आहे तो असमान वितरणतेचा आहे. ज्या बेकायदेशीर नळ जोडण्या आहेत, त्या हटविण्याची मोहिम हाती घेतली जाईल. अधिका—यांवर दबाव येतो तो येवु देवु नका, अनाधिकृत नळ जोडण्या तोडण्याचे सोडुन दया. अशी दुटप्पी भुमिका घेवु नका. आम्ही समजा कमी पडत आहोत, दहशतीला बळी पडत आहोत ती आमची चुक आहे ती आम्हांला मान्य आहे. पण जर असमान पाणी पुरवठा आहे तर त्यास फक्त वॉल्वमन आणि अभियंते जबाबदार आहेत असे मला देखील म्हणुन चालणार नाही. आपण सर्वांनी एकत्रितपणे या शहरातील जबाबदारी चालवायची आहे. चुका होत असतील, त्यामध्ये सुधारणा करण्याची आमची जबाबदारी आहे. परंतु आपले सहकार्य देखील यामध्ये अपेक्षित असणार आहे. असमान पाणी पुरवठा होतो, का होतो? याबाबतीत बैठका अनेकवेळेला झालेल्या आहेत. वॉल्वमनवर तलवारीने हल्ला करण्यापर्यंत वेळ येते. मग हे बघण्याची लोकप्रतिनीधींची जबाबदारी नाही? प्रश्न सोडवायचे आहेत, मिळुन सोडवायचे आहेत, मिळुन सोडवायचे आहेत? ज्या उपाययोजना होत्या, त्या केल्या आहेत, या समस्येची तिव्रता गेल्या दहा पंधरा दिवसापासुन आहे. त्यामध्ये जेथे ही समस्या तिव्रतेने वाढली तेथे तात्काळ अधिकारी, कर्मचारी पोहचले. जिथे बेकायदेशीर नळजोडण्या तोडायच्या होत्या तेथेही पोहोचले आहेत. सर्व अधिकारी व कर्मचा—यांना मी सांगु इच्छितो. पाणी पुरवठया संदर्भात शहरामध्ये असमान पाणी पुरवठा व्हावा अशी कुणाचीही इच्छा असु शकत नाही. समान पाणी पुरवठा करण्यासाठी महापालिकेचे अधिकारी समान प्रयत्न करतील त्याला आपलेही सहकार्य असले पाहिजे. त्यासाठी आपले सहकार्य मला लागणार आहे. सर्व महापालिकेचे अधिकारी व कर्मचा—यांना आपले सहकार्य लागणार आहे. वितरण व्यवस्थेच्या शेवटच्या टोकाचा प्रश्न आहे, वितरण व्यवस्थेच्या शेवटच्या टोकाला पाणी पोहोचत नाही. त्यासाठी जे काही भाग असतील, वॉल्व असतील त्यांनी थोडया कमी कालावधीत पाणी स्विकारणेचे औदार्य दाखविणे देखील गरजेचे आहे. पाणी वितरण व्यवस्थेमध्ये एकतर आपण अवलंबुन आहोत एमआयडीची च्या पाण्यासाठी. जर तेथुन काही पाणी पुरवठयामध्ये अडचण आली, पाणी पुरवठयामध्ये काही खोळंबा झाला तर त्याचा परिणाम वितरण व्यवस्थेवर होतो. काही असे भाग आहेत तेथे बेकायदेशीर नळजोडण्या असतील, बेकायदेशीर नळजोडण्या हा काही आजचा प्रश्न नाही. पाणी समस्येचा प्रश्न आहे त्या सर्वांनी मिळुन सोडविल्या पाहिजे. या समस्या सोडविण्यासाठी प्रशासन नेहमीच सक्रिय कारवाई करत आहे. यापुढेही करत राहील. आणि हाही प्रश्न पडतो की, आपण वर्षाला ४० कोटी खर्च करतो, ११० एमएलडी पाणी येते तरी असा प्रसंग रहावा हा देखील दुर्देवी भाग आहे शहराचा अनुषंगाने, यामध्ये मोठया प्रमाणावर भांडवली गुंतवणुक आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यासाठी पाण्याच्या लाईन बसवायच्या असतील, समान जलवाहिन्या टाकायच्या असतील त्या आतापर्यंत झालेल्या नाही. करावयाच्या अल्प मुदतीची उपाययोजनामध्ये टॅकरच्याबाबतीमध्ये चर्चा करण्यासाठी सभागृह नेते, काही पक्षाचे नेते होते त्यांनी एकत्रित बसुन कॅम्प नं. ४,५ येथिल टॅकर्सवाटपाबाबत निश्‍चित अशी दिशा गेल्या आठवडयात दिलेली आहे. पाणी वितरण व्यवस्थेमध्ये टेलेन्सचे जे भाग आहे त्यामध्ये लक्ष दयावे लागेल, त्यासाठी जे वॉल्वची उघडझाप करायची आहे, समजा एखादया विभागाचे पाणी एखादया टेलेन्टला जाते आणि त्यासाठी मधला एखादा वॉल्व नियंत्रीत करावा लागत

असेल त्यासाठी संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकाने सहकार्य करावे लागेल काही भागात ८ तास पाणी येते, काही ठिकाणी येत नाही, ती जास्त प्रक्षोपत आहे, कोणत्या भागात पाणी नाही त्याची मी माहिती घेतो, १००–१५० घरात पाणी पोहचत नसेल, बेकायदेशीर नळजोडण्यावर, कडक कारवाई करण्याची गरज आहे त्यासाठी, आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे. महानगरपालिकेमार्फत जे उपाययोजना करण्याची ठरविले त्यामध्ये जी काही कारवाई करण्याचे ठरविले. ती गायकवाडा पाडा येथे १८ इंच व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवरील पाणी पुरवठयामध्ये दोन तासाच्या पाण्याची कपात केली, हे पाणी नेताजी चौक तक्षशिला विभागामध्ये देण्याची, नेताजी चौक येथिल पंप गळती काढुन रबरपॅकींग लावुन त्या बंद केल्या. नेताजी चौक येथिल जलकुंभात योग्य रितीने पाणी भरण्यासाठी वॉल्वचे नियंत्रण केले आहे. प्रभाग ५९ मधील पाणी प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. सेंट्रल हॉस्पीटल मधील बुस्टर पंपची गळती काढण्यात आली. नेताजी चौक पासून तीस सेक्शनपर्यंत वॉल्ववरच नियंत्रण पंपींग द्वारे होणारा पाणीपुरवठा शेवटच्या टोकापर्यंत पोहोचण्यासाठी नियंत्रण करत आहोत. २५० व्यासाची जी वॉल्व नादुरुस्त झाली होती ती दुरुस्त करुन घेतली. ओटी सेक्शन कॅम्प नं. ४ मधील ३५० एमएमचा बटरफ्लाय वॉल्व होता तो दुरुस्त करण्याची कारवाई करण्यात आली. नेताजी चौक ते समाधान मेडिकल स्टोअर्स पर्येंतच्या पाईपलाईनचे खोदकाम करुन संजीवनी हॉस्पीटल येथिल खोदकाम आम्ही चालु केले असता स्थानिक रहिवाशांकडुन काम अडविण्यात आले, त्यासाठी पोलिस बंदोबस्त घेवुन आम्ही तेथिल काम पुर्ण करत आहोत. एमआयडीसीकडुन जुन्या मुख्य संतुलन टाकीतुन कमी प्रमाणात येणारे पाणी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर कार्यकारी अभियंता यांनी पाहणी करुन पाण्यात वाढ करुन देण्यात येईल अशी विनंती त्यांना करण्यात आली आहे त्यांनी ती मान्य केली आहे. फ्रेबुवारी २००८ पासुन बंद असलेले ७० हॅण्डपंप आणि १४ जेटपंप दुरुस्त करुन शहरात पाण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला आहे. कॅम्प नं. १ ते ५ मधील टॅकरचे नियोजन देखील आम्ही केलेले आहे. शहरामध्ये पाणी मिळत असतांना त्या भागापर्यंत अधिकारी व कर्मचारी पोहाचत नाही अशा प्रकारची भावना आहे. त्यासाठी हे पाणी सोडल्यानंतर त्या संबंधीत भागामध्ये महापालिकेचे कर्मचारी जावुन पाणी पोहोचले किंवा नाही याची खातरजमा करुन घेवुन ग्राहकांच्या स्वाक्ष–यादेखील घेण्याची प्रक्रिया आपण चालु केली आहे. पाणी समस्या जी आहे ती प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या दोघांनी मिळुन सोडवायची राहणार आहे. जर त्यामध्ये असे दाखविण्यात आले की प्रशासनाला यामध्ये एकटे पाडले जात आहे तर त्यामध्ये प्रशासनाचे मनोधैर्य आणखी कमी होईल. त्यामुळे प्रश्न सुटायच्या ऐवजी आणखी वाढतील. लोकप्रतिनिधी खाली बसले आहेत आणि मी व्यासपीठावर उभा आहे हे मला देखिल योग्य वाटत नाही. पाणी प्रश्नासाठी अत्यंत गांभीर्यपुर्वक अत्यंत तळमळीने आणि काळ वेळेची कुठल्याही प्रकारची वाट न पाहता महानगरपालिकेचे अभियंते, कर्मचारी आपल्या समवेत हे काम करत आहेत. आणि यापुढेही करत राहतील. ११५ एमएलडी पाण्याच्या वितरण व्यवस्थेचा प्रश्न होता त्याच्यामध्ये वितरण व्यवस्थेच्या शेंवटच्या टोकाला पाणी पुरवठा होत नव्हता तर त्याचे कारण काय तर मधले वॉल्व उघडे राहत होते. त्या संदर्भात महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी हे स्वत: जातीने हजर राहतील. आपले देखील सहकार्य गरजेचे आहे. आज १९ मार्च आहे. पुढचे तीन महिने आपल्याला काढायचे आहे. एक्स्ट्रा फिडरचा जो प्रश्न होता त्यासाठी देखिल महानगरपालिकेर्माफत जवळ जवळ दोन महिन्यापुर्वी ५० लाख रुपयाचा निधी आपण एमएसईबीला दिला. जेणेकरुन विद्युत भारनियमाच्या कालावधीमध्ये पंपींगचा कालावधी कमी होवून ज्या टाक्या भराव्या लागतात त्यासाठी प्रयत्न कमी पडु नये, म्हणुन जी वितरण व्यवस्था आहे, साधारणत: जे पाणी शहराला लागते त्याचे एकतृतीयांश पाण्याचा साठा हा शहराला लागतो जर ११५ एमएलडी पाण्याची शहराला गरज आहे तर कमीत कमी ३० एमएलडी पाणी साठवणुकीची क्षमता शहरात असायला पाहिजे. आज फक्त ८ एमएलडी पाणी साठवणुकीची क्षमता आहे. महानगरपालिकेमार्फत एमएमआरडीएला आम्ही साधारणत: साडे आठ कोटीचे प्रस्ताव हे केवळ पाण्याच्या निधीसाठी आम्ही सादर केलेले आहे त्यामध्ये प्रामुख्याने पाण्याचे जलकुंभ (इएसआर)बांधणे, समांतर जलवाहिनी जोडण्यासाठी आम्ही निधिची मागणी केली आहे. शहरात ही समस्या हाताळत असतांना लोकप्रतिनिधीच्या समवेत प्रशासनाचे सर्व अधिकारी कर्मचारी हे अत्यंत तळमळीने काम करत आहेत याचा प्रत्यंतर आपणांस काही ना काही तरी आला असेलच. आपले जे काही पाण्याचे प्रश्न आहेत ते देखिल तातडीने सोडविण्यासाठी सर्व प्रयत्न हे महानगरपालिकेकडुन केले जातील याची मी ग्वाही देतो. आणि यासाठी आपण प्रशासनास सहकार्य करावे अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>मी सर्वांच्या वतीने बोलत आहे कारण की जे अधिकारी पहिले ज्याठिकाणी होते, जसे आमच्या कॅम्प नं. ४ मध्ये श्री. सेलवन साहेब आणि श्री. बी.एस.पाटील होते आणि कॅम्प नं. २, ३ साठी वेगळे अधिकारी होते त्यांना त्याच ठिकाणी ठेवा कारण त्यांना त्या विभागाची माहिती आहे. कोणती लाईन कोठुन जोते ती कुठे आहे हे सर्व त्यांना माहित आहे. आपण त्यांची बदली करु नका. सध्या आपण त्यांच्या ज्या बदल्या केल्या आहेत तेथुन काढुन त्यांना त्यांच्या पुर्वीच्या ठिकाणी नेमणुक करा. जेणेकरुन पाण्याची समस्या सुटु शकेल. सर्वांची हीच एक इच्छा आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—अशी जर आपली आग्रही मागणी असेल तर अशा संबंधीत अधिका—यांना पुढील तीन महिन्याच्या कालावधीसाठी, पावसाळा चालु होईपर्यंत पुर्वव्रत त्याठिकाणी ठेवण्याचा निर्णय आम्ही घेतो.

सदस्य श्री. मोहन साधवानी:—मा. आयुक्त साहेब, कॅम्प नं. ५ येथे जीन्स पॅन्टचे कारखाने आहेत, एमआयडीसीची पाले येथुन जी मुख्य जलवाहिनी येते त्या जलवाहिनीवर दोन दोन इंच व्यासाच्या नळ जोडण्या या कारखानदारांनी घेतलेल्या आहेत. सध्याच्या उन्हाळाच्या काळात कमीत कमी दोन—तीन महिन्यासाठी त्याच्या नळजोडण्या बंद केल्या जाव्यात भलेही त्यांच्याकडे कायदेशीर अधिकृत नळजोडणी असो, पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी जीन्स कारखानदारांच्या नळजोडण्या दोन महिन्यासाठी काढुन टाकल्या जाव्यात जेणेकरुन शहरवाशियांना कमीत कमी पिण्याचे पाणी तरी मिळु शकेल.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आयुक्त साहेबांनी लोकप्रतिनिधींवर आरोप लावलेला आहे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—नाही, नाही मी सहकार्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—अधिका—यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे लोकप्रतिनिधी काम करु देत नाहीत. हा आरोप एकदम निराधार आहे. आयुक्तांच्या या आरोपाचा आम्ही निषेध करतो. तो शब्द त्यांनी मागे घेतला पाहिजे. कारण की कोणत्याही अधिका—याने व्यासपीठावर येवुन सांगावे की कोणत्या लोकप्रतिनिधींनी त्यांना काम करु दिले नाही. अशा लोकप्रतिनीधीचे नाव त्यांनी सांगावे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—उलट आम्ही अशी मागणी करत आहोत की पुर्वी जे अधिकारी ज्या विभागात कार्यरत होते आणि आता सध्या त्यांची बदली केली आहे अशा अधिका—यांना त्यांच्या मुळ विभागात आणले जावे.

सदस्य श्री. राजु जग्यासी:—जर असे काही लोकप्रतिनिधी असतील तर त्यांच्या नावांचा खुलासा केला जावा की जे अधिका—यांना काम करु देत नाहीत.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—आयुक्त साहेबांना आम्ही असे वारंवार सांगितले आहे की जर कुणी लोकप्रतिनीधी कामामध्ये अडथळा आणत असेल तर त्याच्यावर तुम्ही एफआयआर दाखल करा. तुमच्या कामामध्ये कुणीही हस्तक्षेप करणार नाही परंतु तुम्ही आमच्यावर आरोप करु नका. एकतर तुम्ही व्यवस्थित पाणी पुरवठा करत नाहीत आणि उलट आमच्यावर आरोप करता?

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—एक मिनिट मी आयुक्तांना सांगु इच्छितो, .....

सदस्या श्रीमती मालती करोतिया :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आमच्या प्रभागामध्ये नळांना पाणी येत नाही याबाबत सर्व्हे करण्यासाठी आम्ही जेव्हा संबंधीत अधिका—यांना बोलवतो तेव्हा अधिकारी येत नाहीत, आपली खुर्ची सोडत नाही आणि सर्व्हेही करत नाहीत. मग जनतेस आम्ही कसे समजावयाचे? मी स्वत: डोक्यावर हंडा घेवुन पाणी आणते. ही शरमेची गोष्ट आहे.

सदस्या श्रीमती पंचशिला पवार:—मा. महापौरजी, पाणी पुरवठा विभागाच्या संबंधीत अधिका—यांना व्यासपीठावर बोलवा. त्यांनी उत्तर देवू दया.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—मा. आयुक्त साहेब, विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते, मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो, सर्व नगरसेवकांच्या म्हणण्यानुसार काही विभागांमध्ये भरपुर पाणी येते आणि काही विभागांमध्ये अजिबात पाणी येत नाही असा मलाही अनुभव आहे. अगदी पाच दहा मिनिटे सुध्दा पाणी येत नाही. यासाठी सर्व ठिकाणी समान पाणी पुरवठा झाला पाहिजे. जेथे आठ आठ तास पाणी येते त्या विभागातील पाणी पुरवठा थोडाफार कमी करुन सर्व ठिकाणी सर्वांना व्यवस्थीत पाणी कसे पोहोचेल? वितरण व्यवस्थेच्या शेवटचा टोकापर्यंत पाणी कसे पोहोचेल? हे पाहण्यासाठी साहेब, तुम्ही तुमच्या संबंधीत अधिकारी व कर्मचा—यांना सांगितले पाहिजे. आणि त्यामध्ये जर कुणी लोकप्रतिनिधी किंवा अन्य कुणीही व्यक्ती हस्तक्षेप करत असेल आणि तुमच्या व्यवस्थेत सहकार्य करत नसेल तर तुम्ही त्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करा.

अशा बिकट परिस्थितीमध्ये तुमच्या व्यवस्थेमध्ये अडथळा आणत असेल तर त्याच्यावर तुम्ही कडक कारवाई करा. आम्ही तुमच्या बरोबर आहोत आणि एवढे तुम्हांला अधिकार दिल्यानंतरही तुम्ही बरोबर पाणी पुरवु शकला नाहीत आणि कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर ती सर्व जबाबदारी तुमची राहिल. तुम्हांला ज्या कोणत्याही प्रकारचे सहकार्य पाहिजे असेल ते सर्व सहकार्य तुम्हांला मिळेल. परंतु त्यानंतरही, तुम्ही व्यवस्थित पाणी पुरवठा करु शकला नाही तर पुर्ण जबाबदारी तुमची राहिल. आणि तुमच्या या व्यवस्थेमध्ये जर कुणी हस्तक्षेप करत असेल तर त्याच्यावर तुम्ही कारवाई करा. कोणताही दुजाभाव न ठेवता तुम्ही काम करा. सर्वाना एका नजरेने बघा. पाणी पुरवठा व्यवस्थेमधुन एकही विभाग सुटणार नाही याची काळजी घ्या. सर्वांना व्यवस्थीत पाणी पुरवठा करा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>त्यांनी अदयाप कोणताही निर्णय दिला नाही ना?
<u>सदस्य श्री शेखर यादव</u> :– सर्वांच्या प्रभागात समान प्रमाणात पाण्याचे वाटप झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u>लोकप्रतिनिधी......... लोकप्रतिनिधी.......

<u>काही सदस्य :–</u> जिंदाबाद....जिंदाबाद....


<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u>लोकप्रतिनिधी.........लोकप्रतिनिधी......

<u>काही सदस्य :–</u> जिंदाबाद....जिंदाबाद.....

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>आयुक्त साहेब, यापुर्वी आपण निवेदन केले आणि उपाययोजना काय केली ? अधिकारी फिरतात, रात्रीचे तीन तीन वाजेपर्यंत फिरतात ही वस्तुस्थिती आहे, नगरसेवक सुध्दा फिरतात. परंतु त्यानंतर त्याठिकाणी पाणी पुरवठा झाला का? अधिकारी गेले म्हणजे पाणी गेले नाही. आणि तुम्ही आता जे सांगितले की, हे होते, होत नाही,. आज सुध्दा तीच परिस्थिती आहे, सुधारणासाठी काय उपाययोजना करणार? ही अपेक्षा होती. मी काय केले त्यापेक्षा काय करणार आहात? आता हे जे सदस्य खाली बसलेले आहेत ते हौस म्हणुन बसले नाहीत. खाली बसायची मजा वाटते म्हणुन बसलेले नाहीत. पाणी पुरवठया संदर्भात तुम्ही ठोस उपायोजना काय करणार? आम्ही प्रत्येक वेळा तुम्हांस सांगीतले आहे. एकतर कार्यवाही करा किंवा कारवाई करा. तुम्ही आता म्हटले की, १५ दिवसांपासुन आम्ही चर्चा करत आहोत. तुम्ही म्हणता की लोकप्रतिनिधी हस्तक्षेप करतात. ठिक आहे तुम्ही त्यांच्यावर कारवाई करा ना, आम्ही किती वेळा सांगायचे अगदी घसा कोरडा झाला तरी आम्ही सांगत आहोत. तुम्ही कारवाई करत नाहीत आणि पाणीही मिळत नाही. आम्ही सांगितल्याप्रमाणे या २० दिवसामध्ये पाण्याची समस्या जास्त भेडसावत आहे. म्हणजे एकतर अधिका–यांना नक्की काय करायचे ते कळत नाही. पाणी समस्या कोठे आहे ती सोडविण्याची त्यांच्यात क्षमता नाही आणि असेल तर ते वापरत नाहीत. किंवा राजकारण करतात या दोन्हीपैकी काहीतरी एक आहे. म्हणजे लोकप्रतिनिधींनी एकमेकाविरुध्द उभे राहावे किंवा लोकांनी भाडांवे किंवा श्री. धांडे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे, काही अभियंतांच्या बदल्या झाल्या त्यासाठी असे होत आहे असे काही राजकारण आहे का? अधिकारी त्यासाठी करतात का? मुद्दामहुन दुरावस्था आणि त्यांची पाठराखण तुम्ही करायची का? रात्री तीन वाजेपर्यंत फिरले म्हणजे समाधान झाले काय? ते फक्त जातात, बघतात, एक दिवस गेले, नगरसेवक रोज जातात, रोज लोक त्यांना समोरासमोर विचारतात. अधिकारी तीन दिवस रात्री गेले, तीन दिवस रात्री गेल्यानंतर एक दिवस वॉल्व ऑपरेटरने वॉल्व उघडल्यानंतर लोकांना कुठे एक दिवस पंधरा वीस मिनिटे पाणी मिळाले, त्यापेक्षा जास्त काही पाणी मिळाले नाही. पाणी पुरवठयाच्या परिस्थितीमध्ये कसलीही सुधारणा झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. शुक्रवारी पाणी बंद आहे. गुरुवारपासुन ब–याचशा विभागांमध्ये पाणी आले नाही. त्यामुळे गुरुवारी नाही, शुक्रवारी नाही, शनिवारी नाही, रविवारी रात्री कुठे दहा–पंधरा मिनिट पाणी मिळाले. तेही तुमचे अधिकारी तेथे पोहोचल्यानंतर दहा–पंधरा मिनिट पाणी मिळते. कुठलीही ठोस उपाययोजना नाही. कार्यपध्दत नाही. वॉल्व नियंत्रण वॉल्वमन करत असतांना तुम्ही म्हणता की लोक वॉल्व खोलतात असा तुम्ही आरोप करतात. मग तुमच्या हातात काय आहे? प्रशासन म्हणुन तुमच्या यंत्रणेचे जर अपहरण झाली असेल तर तुम्ही काय करु शकता? त्यासाठी उपाययोजना करणे हे प्रशासनाचे काम आहे. एका माणसाने सुध्दा वॉल्वला हात लावता कामा नये त्यासाठी काय केले पाहिजे? सर्व लोकप्रतिनीधी तुम्हांला ओरडुन सांगत आहे की तुम्ही कारवाई करा. एकतर पाणी दया नाहीतर कारवाई करा. दोन्हीपैकी एक करा. एकतरी कारवाई झाली का? किती लोकांवर तुम्ही केसेस केल्या? नगरसेवकांवर कि लोकांवर केल्या? किती? पाणी पुरवठयामध्ये सुधारणा नाही. चर्चा, चर्चा आणि चर्चा. निष्फन्न काही नाही. आज सुध्दा तसे व्हायला नको म्हणुन एक ठोस असा निर्णय, आम्ही एकतर पाणी देवु नाहीतर कारवाई करु. मुख्य जलवाहिनीवरील नळजोडण्या किंवा अनाधिकृत नळजोडण्या यांची नेमकी व्याख्या काय? ब–याचशा झोपडपट्टी विभागांमध्ये

सामुहिक नळजोडण्या आहेत. तेथे आपली पाणी पट्टी आकारणी चालु आहे. झोपडपट्टीमध्ये प्रत्येक झोपडयामध्ये ५० रु, ६० रु. , बॅरेक मध्ये ८० रु, १०० रु. , फ्लॅट वाल्यांकडुन १५० रुपये अशा प्रकारची आकारणी चालु आहे मग अनाधिकृत नळजोडणी कसे म्हणता? ते लोक पाणी पट्टी भरत आहेत. नळ जोडण्या अधिकृत करुन घेण्यासाठी किती लोकांनी फॉर्म भरले त्याची तुमच्याकडे नोंद नसेल परंतु ते लोक पाणी पट्टी भरतात त्यामुळे अनाधीकृत नळ जोडण्या असे तुम्हांला म्हणता येणार नाही. वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी अनाधिकृतपणे मुख्य जलवाहिनीवरुन घेतलेली नळ जोडणी तोडण्यासाठी तुम्ही उपाययोजना अजुनही केलेली नाही त्याबाबत आश्वासन दिले नाही किंवा त्याबाबतची भुमिका स्पष्ट केली नाही. गायकवाड पाडयामध्ये काय केले, नेताजी चौक येथे काय केले? सेंट्रल हॉस्पीटल येथे काय केले? त्यामुळे तेथिल पाणी पुरवठा सुरळीत झाला का? अशा प्रकारचे तुमचे उत्तर असेल आणि त्यामुळे आम्ही उठायचे का? यामुळे आम्हांला पाणी मिळणार नाही. केलेली उपाययोजना त्यामुळे समाधान झालेले नाही हे अधिकारीही सांगतील. अधिका—यांना तुम्ही बोलवा. ज्या ज्या विभागाची जी तक्रार होती त्याबाबतीत तेथिल लोकांचे समाधान झाले का? त्याठिकाणी पाणी पोहोचले का? उलट पाण्याचे दुर्मिक्ष वाढत आहे. कारणे काय? हे कुणी अधिकारी सांगत नाहीत. म्हणजे नक्की याचा अर्थ काय? अधिका—यांना समजत नाही काय? ज्या उद्देशाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांची नेमणुक केलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन आपण त्यांना इकडे घेतलेले आहे. ते वॉल्वमन, मुकादम किंवा मिस्त्री नसून अभियंते आहेत. समस्या कोठे आहे? त्यासाठी काय केले पाहिजे? हे लगेच समजले पाहिजे? समस्या कोठे आहे त्यासाठी काय केले पाहिजे? हे लगेच समजले पाहिजे. २०—२० दिवस फक्त विभागामध्ये फिरायचे आणि आम्ही प्रयत्न करत आहोत असे दाखवायचे? फिरल्याने पाणी मिळत नाही. पाणी मिळाल्यानंतर फिरले तर लोकांना समाधान मिळेल. नुसत फिरल्याने आमचे समाधान होणार नाही लोकांचे समाधानही होणार नाही. पाणी देण्यासाठी तुम्ही काय केले? काय करणार आहात? आणि तुम्हाला काय आमचे सहकार्य पाहिजे? आणि सभागृहातील आम्ही सर्व सभासद सांगत आहोत यामध्ये आमचा हस्तक्षेप असणार नाही. जो कोणी हस्तक्षेप करेल त्यावर कारवाई करा. यानंतरही तुमची भुमिका स्पष्ट नाही ती स्पष्ट करा. आम्ही संपुर्ण सभागृहाने कारवाईचे अधिकार तुमचे हाती दिले आहेत. आम्ही केलेल्या कोणत्याही योजनेवर अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. अडचण काय असेल ती सांगा. अडचण होती लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपाची. आता लोकप्रतिनिधी हस्तक्षेप करणार नाहीत. आणि आलेच तर त्यांच्यावर कारवाई करा. कुणीही काही बोलणार नाही.

<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सर्वांना विनंती करण्यात येते की, कृपया सर्वांनी आपापल्या आसनावर बसा.

**मा. सदस्य श्री. भारत राजवानी, श्री. रामचंद्र पारवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.** 

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मला केवळ हे सांगायचे आहे की, पाण्याच्या या विषयावर बोलणे हेही बरोबर वाटत नाही, आणि गप्प बसणे हेही बरोबर वाटत नाही. परंतु आपले बोलणे ऐकल्यानंतर असे वाटले की आता यावर बोलणे अति आवश्यक आहे. आपली भुमिका अशी वाटत होती की आपण केवळ आपल्या अधिका—यांचे संरक्षण करत आहात. जेवढी तडप, जेवडी पिडा, जेवढे दु:ख नगरसेवकांना पाणी प्रश्नाबाबतीत लोकांचे आहे, शहरातील प्रत्येक गृहिणी सकाळपासुन रात्री उशिरापर्यंत पाणी पाणी करत फिरत राहते त्या महिलांच्या विकासासाठी या शहरात काय होईल. हा एक विषय. दुसरा विषय असा की, आपल्या कामामध्ये कुणी नगरसेवक हस्तक्षेप करत असेल, नगरसेवक वॉल्वमनवर दबाव आणत आहेत. तर आपण हे सांगा की, या दबाव तंत्राशिवाय त्यांचे काम होईल काय? जर एखादया नगरसेवकाने असे ठरविले की, काहीही दबाव टाकायचा नाही तर त्याच्या प्रभागात काम होईल काय? आपल्या अधिका—यामध्ये तेवढी गुणवत्ता आहे का की नगरसेवकाच्या दबावाशिवाय तो काम करु शकेल? अडचणी, लोकांचे मोर्चे यांना सामोरे जावुन नगरसेवक आपल्या प्रभागात कामे करतात, आपले अधिकारी काचेच्या महलात राहतात असे मी यापुर्वी सुध्दा म्हटले होते. आजसुध्दा सभागृहास असा अधिकार आहे की नगरसेवकांनी आपल्या आसनांवर बसुन ते या अधिका—यांना खाली बसवु शकतात. आपले उत्तर असे आहे की, आपल्या अधिका—यांनी आपणांस असे सांगितले आहे की, नेताजी चौक येथे अमुक अमुक केले, कुण्या एका ठिकाणी जलवाहिनी जोडली. कुठे टाकी बांधली, कुठे काही योजना तयार केली. आपल्या अधिका—यांनी आपणांस असे सांगितले की या या नगरसेवकांच्या प्रभागामध्ये अमुक ही समस्या आहे ती सोडविण्यासाठी काय काय करण्याची आवश्यकता आहे. या शहरामध्ये जे ७६ प्रभाग आहेत त्यांमध्ये असे कोणते विभाग आहेत की ज्यामध्ये पाणी पोहचत नाही. तेथे पाणी पोहाचविण्यासाठी आमच्याकडे ही ही योजना आहे. त्यासाठी आपले हे हे सहकार्य पाहिजे किंवा हा हा निधी पाहिजे. अशी कोणती योजना

आपल्या अधिका—यांनी आपल्याकडे दिले आहे. येथे आपण सांगितले की आपले अधिकारी रात्री तीन वाजेपर्यंत पाणी समस्या सोडविण्यासाठी फिरतात. परंतु तीन वाजेपर्यंत फिरण्याची आवश्यकता काय आहे? म्हणजेच असे काही विभाग आहेत की जेथे रात्री तीन वाजता पाणी येते. रात्री तीन वाजता उठुन महिलांना पाणी भरावे. दोन अडीच वाजता त्यांची झोपमोड होवून त्यांनी नळ चालु करुन बसावे. त्यावेळेस नळातुन केवळ सू, सु असा आवाज करत हवा बाहेर पडते. महिलांची झोप बिघडावी, त्यांचे कुटुंब बिघडावे, समाज बिघडावा? आपले अधिकारी रात्री तीन वाजेपर्यंत पाणी समस्येसाठी फिरतात, म्हणजे ते आमच्या शहरावर किंवा आमच्यावर मेहरबानी करत नाहीत. त्यांना सांगावे की रात्री तीन वाजेपर्यंत फिरणे बंद करा. रात्री बारा वाजेपर्यंत सर्वांना पाणी मिळाले पाहिजे. १२ नंतर लोकांनी आपल्या घरामध्ये झोपले पाहिजे. पाण्यासाठी जागता कामा नये. परंतु आपणाकडे असे काही विभाग आहेत की तेथे वर्षानुवर्षापासुन लोक रात्री तीन वाजेपर्यंत जागुन पाणी भरतात. त्याबाबत त्यांच्या मनामध्ये काही दु:ख किंवा पिडा झालेली नाही? व आपण म्हणता की नगरसेवक वॉल्वमनवर दबाव टाकतात, हे कसे चालेल? म्हणुन हा असा एक गंभीर विषय आहे. ज्यावर आपण सर्वांनी खरोखरच विचार केला नाही तर आपणांस येथे अधिकारी म्हणुन राहण्यात औचित्यच काय आहे? आपण येथे आयुक्त म्हणुन पगार का घेत आहात? आपले अधिकारी उपआयुक्त म्हणुन पगार का घेत आहेत? केवळ यासाठी की नगरसेवकांनी त्यांच्या नगरसेवक निधी व्यतिरिक्त ज्यादा निधी मिळविण्यासाठी आपल्या मागे फिरत रहावे? सार्वजनिक बांधकाम विभागातील एखादया कामाचे प्राकलन तयार करुन घेण्यासाठी संबंधित अधिका—यांच्या मागे फिरत रहावे लागते. आपल्या प्रभागात पिण्याच्या पाण्याचा टॅंकर मागविण्यासाठी जेथे पिण्याच्या पाण्याचे टॅंकर भरले जातात तेथे उभे रहावे लागते. नगरसेवकास नगरसेकाचे पद आपण देत आहात की त्याऐवजी दुस—या कुठल्या शब्दाचा मी वापर करु इच्छित नाही? नगरसेवकाने प्रत्येक ठिकाणी भिक मागुन टॅंकर घ्यावा की तेथुन टॅंकर खेचुन आणावा? तसेच भिक मागुन खेचुन एखादया कामाचे प्राकलन घेवुन यावे, अशाप्रकारची व्यवस्था या महापालिकेत आहे. या विषयीचे दु:ख, पीडा नसेल तर येथे आयुक्त म्हणुन राहण्यास काहीही औचित्य नाही. आपण म्हणता की आमच्या शहरामध्ये नगररचनाकार येवु इच्छित नाहीत? आपण म्हणता की, आमच्या शहरामध्ये पाणी पुरवठयासाठी नगरसेवक वॉल्वमनवर दबाव आणतात? तर काय आपण कधी एखादया प्रभागामध्ये गेला आहात का ज्याठिकाणी रात्री तीन वाजेपर्यंत पाणी येत नाही. आयुक्त या नात्याने या शहराची आपण कधी पाहणी केली आहे? आपण प्रशासनाचे प्रमुख आहात. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये आयुक्तांना जे अधिकार आहेत ते सर्वात जास्त आहेत. त्या अधिकारांचा वापर आपण करणार नाहीत तर मग कोण करेल? आपण सक्रिय झाले नाहीत तर कोण सक्रिय होईल? तर कृपया आपण आपल्या अधिका—यांचे संरक्षण करण्याचे थांबवा. शहरास पाणी दया. अन्यथा आपण नगरसेवकांची भुमिका वठवा.आपण अधिकारी म्हणुन अनुभवी आहात जेवढे तुमचे वय आहे तेवढेच आमचेही आहे. जेवढी वर्ष आम्ही महापालिकेमध्ये घालविली आहेत तेवढीच वर्ष आपण महापालिका सेवेत घालविली आहेत. आपणांस माहित आहे नगरसेवक एकमेकांशी भांडतात, विरोधी पक्षाचे व सत्ताधारी पक्षाचे आपसात मतभेद असतात. माईक समोर आल्यानंतर बोलण्याची तिव्र इच्छा होते ती इच्छा पुर्ण करतात, थकतात आणि त्यांची इच्छा पुर्ण झाल्यावर सभा पुर्ण झाल्यावर आपल्या दालनामध्ये बसतात. चहापाणी पिल्यानंतर विषय समाप्त होतो आणि मुद्दा तसाच्या तसा राहतो. आणि दुस—या महासभेपर्यंत तसेच्या तसे राहते. तर ही जी मानसिकता आहे ही आपण बदला. यानंतर आमच्यातील एकही नगरसेवक येथे ओरडणार नाही. माईकवर बोलणार नाही तसेही हे माईक आहे ते गैरसोयीचे आहेत. आम्हांला झुकावे लागते, झुकुन बोलावे लागते, पाठ झुकवावी लागते. अशा या माईकवर आम्ही बोलणार नाहीत. येथे कोणी खाली बसणार नाही, येथे कुणी येणार नाही. येण्याची आवश्यकताच तरी काय आहे? शहरास आपण कोणत्याही सुविधा देत नाहीत.

<u>सदस्य श्री. तुलसीदास वसिटा:—</u>नगरसेवकांची भांडणे होतात.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>अगोदर नळाला पाणी येत होते पण श्री.उन्हाळे साहेब आल्यापासुन मोटार लावल्याशिवाय नळाला पाणी येत नाही. आणि म्हणुन ................

<u>काही सदस्य :—</u>शेम, शेम शेम.......

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>मा. आयुक्त साहेब, कधी कधी आपणावर अशी वेळ येते की आपणांस निधीची आवश्यकता पडते अशा वेळेस आपण लोकांकडे कर वसुली साठी कर्मचारी पाठविता. परंतु आज अशी वेळ आलेली आहे की, कर विभागातील त्या कर्मचा—यांना कर वसुलीचे काम बंद करुन पाणी पुरवठा विभागात पाठवावे व शहरातील लोकांच्या घरातील नळाला पाणी येते किंवा नाही ते पाहण्याचे काम दया. नाहीतर मी सर्व नगरसेवकांना असे निवेदन करेन की, त्यांनी आपल्या प्रभागातील लोकांना सांगावे की जर आपल्या

नळाला पाणी येत नसेल तर शहरातील कचरा उचलला जात नसेल तर आपण महानगरपालिकेला कोणताही कर भरु नये.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**आयुक्त साहेब, मी आपणांस विनंती करतो की आपण एक दिवस माझ्या प्रभागात चला तेथिल परिस्थिती पाहून अशरक्ष: आपल्या डोळयातुन पाणी येईल, नळाला पाणी येणार नाही पण तुमच्या डोळयातून नक्की पाणी येईल. माझ्या विभागातील आम्रपाली नगर, बौध्द कॉलनी, अचानक नगर याठिकाणी ३ इंच व्यासाची जी जलवाहिनी आहे ती उंचावर आहे. महिलांनी त्या पाईप लाईनला छिद्रे पाडली आहेत. त्यांमध्ये पाईप टाकुन वाटीने पाणी भरतात आणि घरी नेतात. काय ही स्थिती आहे मला तुम्ही सांगा. अशा एका ठिकाणी १०० महिलांचा घोळका तयार होतो. याबाबत मी वारंवार तक्रार केलेली आहे. परंतु तरीदेखील त्याची दखल घेतली गेली नाही. शुक्रवारी पाणी आले नाही तर शनिवार साठी आम्हांला पाणी भेटत नाही. कारण असे सांगितले जाते की, शुक्रवारी पाणी नसते त्यामुळे पाईप लाईन रिकामी असते त्यामुळे पाईपलाईनमध्ये हवा भरली जाते. आपण महिलांचे मोर्चे कधी हाताळले नाही. आमच्यावर अशी परिस्थिती आली आहे, आमचे काही नगरसेवक स्वत:च्या घरी न राहता कुठल्या तरी मंदिरात जावून झोपतात. अशी परिस्थिती आलेली आहे. लोक घरी मोर्चे घेवुन येतात. अशी ही परिस्थिती आपणांस हाताळावी लागत नाही तिला आपणांस सामोरे जावे लागत नाही. अशी परिस्थिती आम्हांला हाताळावी लागते, आम्हाला सामोरे जावे लागते. लोक आपणाकडे येणार नाहीत ते आमच्याकडे येतात. आमचे नगरसेवक श्री. यादव साहेब हे मंदिरात झोपले होते. जी सत्य परिस्थिती आहे ती सांगितली पाहिजे. टँकर पॉईटवर आमच्या महापौर आणि आमचे उप—महापौर जातात यापेक्षा दुसरी शोकांतिका ती काय असेल?

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**महापौर महोदया स्वत: टँकर पॉईटवर जातात. नळाला पाणी येत नाही म्हणुन त्यांनी स्वत: मोर्चा काढला होता.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**अशाप्रकारची शोकांतिका या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये होते. पाणी वितरण व्यवस्था बरोबर नाही.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मा. महापौर साहेब, आयुक्त साहेबांना मी विनंती करतो की, जसे श्री. धनंजय बोडारे साहेबांनी म्हटले की आता उन्हाळयाचा मौसम सुरु होत आहे. यासाठी पाणी पुरवठयाकडे जातीने लक्ष दिले जावे.

**सदस्य श्री. राजेश वधारिया :—**मा. महापौरजी, मी काही सूचना करु इच्छितो. किर्लोस्कर कंन्स्टसीचा जो अहवाल आहे त्यामध्ये लिहिले आहे की २८ ते ३० टक्के जी पाण्याची गळती आहे ती गळती थांबविण्यासाठी आम्ही कित्येक वेळा फोन करतो श्री. सेलवन साहेबांना सांगितले जाते की, फायर ब्रिगेड येथे जलवाहिनीवर गळती आहे. तर १० दिवसानंतर ती गळती बंद केली जाते. दुसरे असे की, ....

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**कृपया जरा बसून घेतले जावे. या समस्येवर आपण काहीतरी तोडगा काढु या ना?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आयुक्त साहेब, जे सदस्य खाली बसलेले आहेत त्यांनी उठावे अशी इच्छा आहे किंवा नाही? असेल तर बोला.

**मा. सदस्या श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती मंजु पोपटानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या**  

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे, माझी एक विनंती आहे, मी या आधीही बोललो होतो, महानगरपालिकेचे कामकाज हे एकटे प्रशासन चालवत नसते, या हेतुने, सगळयांनी मिळुन हा प्रश्न सोडवावा या अनुषंगाने मी बोललो होतो. ज्या अडचणी आहेत आपण म्हणालात मांडा त्या मांडल्या. पहिली जी सूचना होती की जुने अभियंता बदलले, तीन महिन्यासाठी ते तेथे आहेत, त्यानंतर ते पुर्वव्रत केले जातील. दुसरे म्हणजे टँकर पॉईट बाबत. आपण जे वितरण केलेले आहे ते योग्य राहील अशाप्रकारे उपाययोजना केली जाईल. तसेच आमचे जे संबंधीत अभियंते आहेत, वॉल्वमन आहेत हे आपल्या भागात पाणी पोहोचविण्याची खात्री करतील. मी आपणांस मनपुर्वक विनंती करतो की आपण त्यास सहकार्य दया.

पीठासीन अधिका—यांच्या आसनासमोरील मोकळया जागेत बसलेले सन्मानीय सदस्य आपापल्या आसनावर आसनस्थ झाले.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— मा. आयुक्त साहेब, माझी आपणांस एक विनंती आहे की, मी मागे आपणांस एक तक्रार केली होती, कॅम्प नं. ५ मध्ये जे जीन्स कारखाने आहेत, त्यांच्याकडे मोठ मोठया विहिरी आहेत. त्यामध्ये पाईप लाईनचे कनेक्शन करुन अनाधीकृतरित्या तेथे पाईप लाईन टाकल्या गेल्या आहेत. त्यावर सुध्दा आपण कारवाई कराल तर फार बरे होईल. साहेब, उदयापासुन तीन—चार दिवस सुट्‌टी आहे. जेवढे अधिकारी आहेत त्यांना सांगा.

सदस्य श्री. राजु जग्यासी:—मा. महापौरजी, मी आपणांस एक निवेदन करतो की, आपल्याकडे असो कोणते ही रेकॉर्ड उपलब्ध नाही की, कोणती पाईप लाईन कोठुन गेली? ३०० एमएम ची पाईप लाईन कोठुन कोठपर्यंत आहे? ७५ एमएम ची कोठे आहे? कोणती कोठुन जाते? वेगवेगळया वेळी वेगवेगळया वेळेला वेगवेगळे प्राकलन बनविले जाते. प्राकलन बनवितांना आपणांस हे माहित पाहिजे की, तेथे कोणती समांतर लाईन आहे?

सदस्य श्री. लालबिहारी यादव :—मा. महापौरजी, शुक्रवारी आणि शनिवारी होळीचा सण आहे तर कमीत कमी त्यादिवशी तरी पाणी यायला पाहिजे. होळी सारखा सण असल्यामुळे त्या दिवशी भरपुर पाणी लागते त्यामुळे त्यादिवशी पाणी चालु असले पाहिजे. आयुक्त साहेब, शुक्रवारी पाणी येईल का? होळी आहे, होळी निमित्त शुक्रवारी पाणी चालु राहु शकते काय?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—एमआयडीसीवाल्यांना विनंती केली जाईल की, शुक्रवारी पाणी बंद ठेवु नये म्हणुन.

महापालिका सचिव :—कृपया कचरा वाहतुकीबाबतची लक्षवेधी सूचना चर्चेस घेण्यांत येत आहेत. ज्या कुणाच्या कच—याच्या बाबतीत लक्षवेधी सूचना असतील. त्यांनी त्याबाबत आपला प्रस्ताव मांडावा.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव :— श्री. दत्तात्रय पवार

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

**विषय :— दि. ८ मार्च २००८ पासुन कचरा वाहतुक ठेकेदार यांचेमार्फत शहरातील कचरा उचलला जात नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग सेल प्रा.लि. यांना शहरातील जमा होणारा कचरा उचलणेचा ठेका अटी व शर्तीनुसार दिलेला आहे. परंतु संबंधीत कचरा वाहतुक ठेकेदार यांचेकडुन दिनांक ८ मार्च २००८ पासुन कचरा उचलला जात नसल्यामुळे आजुबाजुच्या परिसरात दुर्गंधी पसरली असून तेथिल नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग सेल प्रा. लि. यांनी महापालिकेशी केलेल्या कराराच्या अटी व शर्तीचा भंग केला असल्यानें त्यांचेवर कायदेशीर कारवाई करुन दंड म्हणुन मे. ॲन्थोनी यांना कचरा उचलणेसाठी देण्यात येणा—या देयकातुन योग्य ती रक्कम कपात करण्यात यावी.

सदर बाब ही नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने येणा—या महासभेत सदर विषयावर चर्चा होवून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

---

सुचकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सुरेखा वेलकर

विषय :— मे. ॲन्थोनी वेस्ट हंडलींग ठेकेदार निविदेतील अटी शर्तीनुसार काम करत नसल्याने याचा परिणाम शहराचे साफसफाईवर पर्यायाने नागरीकांच्या आरोग्यावर हा होणार असल्याने नागरीकांच्या जिवनाशी संबंधीत लक्षवेधी सूचना

उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाने स्वच्छ व सुंदर उल्हासनगर शहरासाठी घरोघर जावुन कचरा उचलणेचा ठेका मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग कंपनीला दिला आहे. प्रशासनाचा उद्देश चांगला होता परंतु मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग कंपनीने निविदेतील अटी व शर्तीनुसार काम न केल्याने शहरातील साफ सफाईचा बोजवारा उडाला आहे. ठेकेदार कामगारांच्या मागण्या पुर्ण करु न शकल्याने सफाई कामगारांनी संप केला असून संपुर्ण शहरात कच—याचे, घाणीचे ढिग साचले आहेत, दुर्गंधी व घाणीचे साम्राज्य पसरले असल्याने शहराचे सौदर्यात बाधा येत आहे. शहराचे कधी नव्हे एवढे विद्रुपीकरण झाले आहे. प्रशासन संबंधितांकडून शहर स्वच्द करुन घेणेत अपयशी ठरत असल्याचे निदर्शनास येत आहे. ठेकेदार निविदेतील अटी व शर्तीनुसार काम करण्यास असमर्थ ठरुनही प्रशासन आवश्यक, दंडात्मक कारवाई करण्यास डगमगत आहे. याचा परिणाम शहराचे साफसफाईवर पर्यायाने नागरीकांचे आरोग्यावर होणार असल्याने व नागरीकांचे जिवनाशी संबंधीत प्रश्न असल्याने सदर लक्षवेधी सूचनेवर सभागृहात चर्चा होवून माहिती मिळणेस विनंती

---

मा. सदस्य श्री. भारत राजवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—मा. महापौरजी, व आयुक्त साहेब, आज या ठिकाणी पाण्याच्या संदर्भामध्ये जी शहरामध्ये परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि ती निर्माण होण्यास कारण काय हे तुम्ही शोधा. त्यावर मार्ग काढा. यासाठी सन्माननिय सदस्य तुमच्यासमोर खाली बसले होते. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की.........

महापालिका सचिव :—ही लक्षवेधी कचरा वाहतुकीबाबतची आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—ते मला माहित आहे, तिखट मिरची तर लावली पाहिजे ना? त्याचप्रमाणे मागील बॉडीने, या महानगरपालिकेने १० वर्षाचा ठेका त्या ॲन्थोनी ठेकेदारास दिला आहे. त्या ॲन्थोनीला ठेका दिल्यानंतर त्याच्या ज्या अटी व शर्ती आहेत त्या मी वाचल्या नाहीत ते वाचण्यास मला वेळ मिळाला नाही. मी असे सांगु इच्छितो की, या ठेकेदाराजवळ गाडया कमी आहेत. महत्वाची गोष्ट अशी आहे की त्या ठेकेदाराने सन्माननिय महापौरांना, उप—महापौर व आयुक्तांना तसे पत्र दिले पाहिजे होते की आमचा असा असा संप होत आहे. माझी माणसे संप करणार आहेत. कचरा उचलणार नाहीत त्याला पर्याय आम्ही काहीतरी शोधला असता. परंतु ॲन्थोनी ठेकेदारास फार मोठा गर्व आहे त्याला असे वाटते की अटी शर्तीमुळे मी या महापालिकेस बांधुन घेतलेले आहे. आणि बांधुंन घेतल्यावर या महापालिकेने जर माझा ठेका रद्द केला व पैसे कापले, काही जरी केले तरी माझे काही होणार नाही. या फुशारकीने ॲन्थोनी तेथे आहे. शहरामध्ये कच—याचे एवढे काही ढिग आहेत की एकेका ठिकाणाहुन १०—१० ते १५—१५ ट्रक कचरा निघेल आणि म्हणुन आम्ही एवढे ओरडतो. आणि त्यात वाटेल तेवढी दुर्गंधी संपुर्ण शहरामध्ये पसरली आहे. आम्ही लोकप्रतिनिधी जेव्हा प्रभागात फिरतो तेव्हा प्रभागातील लोक आमच्याकडे नाक दाबुन कच—याबाबतच्या घेवुन येतात आणि म्हणतात काय करते तुमची महापालिका? त्यावेळेस आम्हांला शरमेने त्यांना सांगावे लागते की त्यांचा संप आहे. संपाच्या अगोदर त्यांनी पर्यायी व्यवस्था करावयास पाहिजे होती. आमच्याशी नव्हे तर मा. महापौरांशी, उप—महापौरांशी आणि मा. आयुक्त साहेबांशी त्यांनी चर्चा करावयास पाहिजे होती. आणि या संपाच्या बाबतीत मी पर्यायी व्यवस्था करतो आहे असेही सांगावयास पाहिजे होते. आणि थोडयाच दिवसात तुम्हांला साफ सफाई व्यवस्थीत करुन देईल असे त्यांनी सांगावयास पाहिजे होते पण त्याने साधे पत्र सुध्दा दिले नाही. आजपर्यंत ॲन्थोंनी बिनधास्त आरामात आहे. कारण त्याला माहिती आहे की मागच्या बॉडीने आपणांस दहा वषार्चा ठेका दिलेला आहे तो कायम केलेला आहे. ॲन्थोनीच्या कामातील कमतरतांची कारणे शोधुन ॲन्थोनीचा ठेका रद्द झाला पाहिजे. सर्व पक्षीय सदस्य मिळुन आपण पाणी समस्येबाबत निर्णय घेत आहोत तसे ॲन्थोनीबाबत सुध्दा निर्णय घेतला पाहिजे. ॲन्थोनीचा ठेका रद्द केला पाहिजे. पैश्यांची कपात केल्याने त्याचे काही वाकडे होणार नाही. तो म्हणेल रोजंदारी पध्दतीने जेवढे दिवस आम्ही काम केले तेवढा पैसा आम्हांला मिळाला. नाही काम केले म्हणुन आम्हांला पैसा नाही मिळाला. परंतु यामध्ये नुकसान कुणाचे आहे. शहरवासिय आम्हांला लोकप्रतिनिधी म्हणुन निवडुन देतात, आम्ही प्रभागाचे प्रतिनिधीत्व करतो. परंतु ज्यावेळेस निवडणूका येतात त्यावेळेस आम्ही प्रभागवाशियांना काय सांगायचे? त्यावेळेला काय लोक आम्हांला निवडून देतील? ते म्हणतील साधा कच—याचा प्रश्न तुमच्याने सुटत नाही. तेव्हा महिला म्हणतील आम्ही त्या

ॲन्थोनीला चपलेने मारु. अशा प्रकारे प्रभागातील महिला म्हणतात आम्ही तर त्यांना समजावुन सांगतो. आपले आयुक्त साहेब जेव्हा शहरात येतात तेव्हा ते गाडीच्या काचा बंद करतात. डॉ. आंबेडकर नगर चोपडा कोर्ट येथे श्री.बी.बी. मोरे यांच्या प्रभागात जास्त कचरा साठलेला आहे त्यांची दुर्गंधी मला येईल. म्हणुन ते नाक दाबुन महापालिकेत येतात. हे बरोबर नाही. म्हणुन मला असे सांगायचे आहे की ॲन्थोनीबाबत येथे निर्णय झाला नाही तर ते बरोबर होणार नाही. ॲन्थोनीचा ठेका रद्द झालाच पाहिजे. कारण त्याच्याकडे पुरेशी वाहने नाहीत. त्याने सर्व वाहने मिरा–भाईंदर, मुंबई येथे पाठविली आहेत. आणि उल्हासनगर शहर कसे आहे कच–याचे शहर आहे. या शहरात गाडया नाही पुरविल्या कचरा नाही उचलला तरी चालु शकेल. अशा प्रकारे ॲन्थोनीची समज झाली आहे. ती काढली पाहिजे. आमचे काही वरिष्ठ नगरसेवक आहेत ते का गप्प बसले आहेत ते मला काही समजत नाही. आणि म्हणुन मला सर्वांना विनंती करायची आहे की ॲन्थोनीचा ठेका रद्द झालाच पाहिजे. गेल्या पाच वर्षामध्ये कचरा उचलण्यासाठी किती खर्च येत होता? आणि आज किती खर्च येत आहे. साधारणतः दुप्पट खर्च येत असतांना देखील महापालिका तो करत आहे. तेवढे करुनही कचरा उचलला जात नसेल या दोन दिवसामध्ये ॲन्थोनीने या कामी काही तरतुद केली नाही तर श्री. बी.बी. मोरे टॅंकर लावतील आणि टॅंकर लावुन कचरा उचलतील आणि या महापालिकेच्या प्रवेशद्वारा समोर टाकतील. कारण ॲन्थोनीकडे टाकुन काही फायदा नाही. आणि ॲन्थोंनीची आंबेडकर नगरमधुन प्रेत यात्रा काढुन महापालिके समोर आणुन तिचे दहन करणार. आणि म्हणुन पुन्हा पुन्हा तुम्हांला कळकळीने सांगत आहे की, जर ॲन्थोनीचा ठेका रद्द झाला नाही आणि महापालिकेने त्यांच्यावर कारवाई केली नाही तर महापालिका आयुक्तांना व प्रशासनास जबाबदार ठरविले जाईल. म्हणुन या ठिकाणी पुन्हा एकदा हीच विनंती करतो की, सर्व अधिका–यांनी व आयुक्त साहेबांनी हे लक्षात घ्यावे व लवकरात लवकर याबाबत निर्णय घ्यावा. धन्यवाद।

मा. सदस्या श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती मंजु पोपटानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. सुरेश जाधव :–मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सभागृहाचे लक्षवेधण्यासाठी मी सांगत आहे. ४,५ महिन्यापासुन ॲन्थोनी ठेकेदाराबाबत स्थायी समितीमध्ये चर्चा होत होती, स्थायी समितीचे सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांनी स्थायी समितीमध्ये चार अधिका–यांची एक चौकशी समिती नेमली होती. त्या अधिका–यांचेही मी येथे अभिनंदन करतो कारण ते आमच्या शहराचे आहेत. त्यांना आमच्या शहराबाबत प्रेम आहे. त्यांनी निष्ठापुर्वक शहरातील कच–याच्या समस्येचे निरीक्षण केले. आणि सत्य परिस्थितीचा अहवाल स्थायी समितीपुढे ठेवला. हा अहवाल स्थायी समितीसमोर ठेवण्यासाठी काही कालावधी जरुर लागला. ही खेदाची बाब आहे. तरीही स्थायी समिती सभापती श्री. रामचंद्र पारवानी यांचे मी अभिनंदन करतो. स्थायी समिती पदावरुन पाय उतार होता होता का होईना त्यांनी कच–याच्या समस्येबाबत वाचा फोडली आणि स्थायी समिती सभेमध्ये हा विषय आज आणण्यात आला होता. चार अधिका–यांच्या समितीने जो अहवाल दिला आहे त्यात ॲन्थोनी अटी शर्तीचे पालन करत नसल्याचे दिसुन आले आहे. नियमांचे उल्लंघन केल्याचे अहवालात स्पष्टपणे लिहिले आहे. स्थायी समितीमध्ये ठराव पारीत केलेला आहे. त्यामध्ये एक अटही अंतर्भुत केली आहे की, आजपासुन ॲन्थानी ठेकेदार जर कचरा बरोबर उचलत नसेल तर त्यास बिलाची रक्कम अर्धी दिली पाहिजे असे त्यात नमुद केले आहे. यास्तव मा. महापौरांना आणि आयुक्तांना विनंती करतो की, हा विषय लवकरात लवकर महासभेपुढे आणुन त्यावर निर्णय घेण्यात यावा. शहरात नियमितपणे साफ सफाई झाली पाहिजे आणि नविन ठेकेदाराची लवकरात लवकर नेमणुक केली पाहिजे. यासाठी या ॲन्थोनी ठेकेदारावर कायदयानुसार जी काही कारवाई करायची ती केली पाहिजे. आमच्या अधिका–यांनी जो अहवाल दिला आहे त्याच्यावर चर्चा होवुन ठेकेदारावर कारवाई झाली पाहिजे. एवढे बोलुन मी माझे शब्द संपवितो.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–मा. आयुक्त आणि महापौर साहेब या कच–याच्या संदर्भात बोलायचे झाले तर कच–याच्या संदर्भात ब–याचवेळा मी आयुक्त साहेबांना पत्र दिले होते. तरीही त्यांना जाग आली नव्हती. शहरात आज जर बघायला गेले तर कच–याचे एवढे काही साम्राज्य पसरले आहे. आणि ॲन्थोनी आपली मनमानी करत आहे. न सांगता त्याच्याकडील कामगार संपावर गेले आहेत. आणि शहरात कचरा साठला आहे, तीन दिवसानंतर घंटा गाडी येते आणि कचरा दया म्हणुन सांगतात. ही कोणती पध्दत आहे? त्याला मनमानी करण्यासाठी दररोजचे एक लाख वीस हजार रुपये दिले जात आहेत का? तु काहीही काम करु नको. तुला वाटेल तेवढा पैसा आम्ही देतो असे त्यास सांगितले जातेय काय? यासाठी आयुक्त साहेबांनी त्यास उत्तर दयावे. शहरात जे घाणीचे साम्राज्य पसरले आहे त्यावर तुम्ही काय तोडगा काढला आहे? ॲन्थोनीला मनमानी करण्यासाठी कचरा वाहतुकीचा ठेका त्याला दिला आहे काय? याचे मला आयुक्त साहेबांनी उत्तर दयावे. दर दिवसाचे १ लाख २० हजार रुपये त्याला दिले जातात ते कश्यासाठी दिले जातात? नुसती घंटा वाजवायला? तुम्ही घंटा गाडी घेवुन या दरदिवसाला एक लाख वीस हजार रुपये तुम्हांला देतो? या बाबतीत

मी वारंवार तक्रार केली आहे, डॉ. दिपक सावंत यांच्याकडे सुध्दा मी तक्रार केलेली आहे की कचरा उचलला जात नाही म्हणुन? आणि आज ॲन्थोनीचे कामगार संपावर गेले आहेत. याबाबतीत त्यांनी तुमच्याशी बैठक घेवुन काय करता येईल याची विचारणा केली आहे काय? तीन महिन्यापासुन आम्ही याबाबतीत वारंवार बोलत आहोत. आयुक्त साहेब, तुमच्याकडे सुध्दा मी पत्र दिले आहे, ब—याचवेळा मी तुम्हांलाही सांगितले आहे.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—अजुन कुणाला काही बोलायचे आहे?

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले जावे.

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—आयुक्त साहेबांचे म्हणणे आहे की सर्वांच्या प्रश्नांची एकदम उत्तरे देतो.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. नरेंद्र दवणे:—मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब, आपल्या माहितीसाठी सांगतो. आताच श्री. मोरे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ॲन्थोनीच्या कामगारांनी संप पुकारला आहे. मला वाटते त्यांच्याकडे काही चुकीची माहिती आहे. फक्त एक दिवस त्यांचा संप होता, त्यांच्या काही मागण्या होत्या. सहा—सात कामगारांना कोणतीही नोटिस न बजावता तात्काळ कामावरुन काढुन टाकले. याबाबत त्यांनी आवाज उठविल्यानंतर दोनशे कामगारांना ॲन्थोनीने झटकन कामावरुन काढुन टाकले. कोणत्याही प्रकारचा संप तेथे नाही. सगळीकडे घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. मला वाटते येथे असा एकही नगरसेवक नसेल ज्याच्या प्रभागात कच—याचे ढिगारे, तुडुंब भरलेली गटारे नाहीत, याच्या मागचे कारण असे की कुणीही लक्ष दयायला तयार नाहीत. अधिकारी जे बसलेले आहेत ते सुध्दा तक्रार घ्यावयास तयार नाहीत आणि ते ॲन्थोनीला कुठेतरी सहकार्य करत आहेत, असे दिसुन येते. ज्या दोनशे कामगारांना त्यांनी तातडीने घरी बसविले आहे, मला वाटते त्यांना जर कामावर घेतले तरी समस्या दोन दिवसातच संपु शकते आणि आपल्या माहितीसाठी सांगतो, ज्यांना सफाईच्या कामाची काहीही माहिती नाही, जे बालकामगार आहेत अशा ५० कामगारांना या कामगारांच्या जागी त्यांनी नेमले आहे.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—मा. महापौरजी, आता सायंकाळचे सात वाजत आले आहेत आणि हा विषय या सभागृहामध्ये या अगोदरसुध्दा आलेला आहे. आणि मला आठवते त्यावेळेस आपणच पीठासीन अधिकारी होतात. त्यावेळेस आपण निर्देश दिले होते की, स्थायी समितीमध्ये जो अहवाल आहे त्यावर जेव्हा ठराव पारीत होईल, त्यानंतर याबाबतीत कार्यवाही केली जाईल आणि योगायोगाने आजच या विषयावर आमची लक्षवेधी सूचना आली आहे आणि आजच स्थायी समितीने सर्व संमतीने ठराव पारीत केला आहे. चार अधिका—यांच्या समितीचा जो अहवाल आला आहे तो स्थायी समितीने मान्य केला आहे. ॲन्थोनीला हटविण्यासाठी कायदयानुसार जी काही कारवाई करायची आहे ती केली जावी असे स्थायी समितीने आदेश दिले आहेत. तर याबाबतीत मला असे वाटते की, चर्चा करण्याची काही आवश्यकता नाही. याबाबत या अगोदरच बरीचशी चर्चा झाली आहे. या अगोदर सर्वांनी एकमताने याबाबत संमती दर्शविली आहे. आजच स्थायी समितीने जो ठराव पारीत केला आहे त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. अशा प्रकारचा आदेश आपण आयुक्त साहेबांना दया. त्यासाठी एक महिना वाट पाहण्याची पण काही आवश्यकता नाही.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—मा. महापौरजी, स्थायी समितीने जो अहवाल आज मान्य केला आहे, तो अहवाल स्थायी समितीमध्ये गेल्या दोन—तीन महिन्यापासुन पडुन होता. जे काम आज केले आहे ते मागील तीन महिन्यापुर्वी करावयास पाहिजे होते. दुसरे असे की, बॅरेक नं. १८१ चा मुद्दा कित्येक वेळा आयुक्त आणि इतर अधिका—यांपुढे आम्ही उपस्थित केला आहे. कित्येक वर्षापासुन तिथे कचरा साठलेला आहे व जे काम ॲन्थोनीने केले पाहिजे ते तो करत नाही. याचा अर्थ असा की, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अधिकारी ॲन्थोनीला सहकार्य करत आहेत. आपण त्याच्याशी जो करार केला आहे त्यातील अटी शर्तीनुसार त्यास तो कचरा उचलायचा आहे. परंतु तो उचलत नाही आणि आपले अधिकारी त्यास सहकार्य करतात. आपण त्यांना आदेश दया की आपण हा कचरा उचलायचा आहे व जो अहवाल आज आपण स्विकृत केला आहे तो पुढील महासभेत कोणत्याही परिस्थित आला पाहिजे. त्याचबरोबर पाण्याच्या विषयाबाबत सूचना देतो, आज आमदार साहेबांनी उल्हासनगर येथिल एमआयडीसीची, उल्हासनगरच्या पाणी पुरवठा विभागाची व एमएसईबीची एक

संयुक्त बैठक बोलाविली होती त्यामध्ये याबाबतीत अंतिम निर्णय घेण्यात आला की येणारा जो शुक्रवार आहे त्या दिवशी होळीचा सण असल्यामुळे पाण्याची कपात केली जाणार नाही.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी, शहरात कचरा आहे. तो पाहता आज स्थायी समितीने चार अधिका—यांच्या समितीचा अहवाल स्विकृत केला आहे, त्याबाबत माझी अशी सूचना आहे की लवकरात लवकर एक विशेष महासभा बोलाविली जावी. त्या सभेत सर्व संमतीने ठराव पारीत झाल्यानंतर पुढील जी काही कार्यवाही करायची आहे ती आयुक्त साहेबांनी लवकरात लवकर करावी. तोपर्यंत ॲन्थोनीकडुन कसे काम करुन घ्यायचे ते आपण पहा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u> २६ तारखेला महासभा आहे ना? त्या महासभेत हा विषय घेतला जावा.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u> त्या सभेची सभा सूचना या अगोदरच निघाली आहे त्या सभेच्या कामकाजात हा विषय समाविष्ट करता येवु शकणार नाही. २६ तारखेनंतर एखादया दिवशी महासभा ठेवण्यात यावी आता तर लागोपाठ चार दिवस सुट्टी असल्यामुळे विशेष महासभा आयोजित करता येणार नाही परंतु जेवढया लवकरात लवकर विशेष महासभा बोलावता येईल तेवढया लवकरात लवकर ती बोलाविली जावी.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. आयुक्त साहेब, समितीने नमुद केल्यानुसार कायदयानुसार त्याच्याकडुन जर काही दंड आपणांस वसुल करता येण्यासारखा असेल तर तो वसुल केला जावा.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>स्थायी समितीमध्ये या विषयाबाबत आजच ठराव पारीत करण्यात आला आहे. स्थायी समितीचा जो काही निर्णय झाला आहे आणि महासभेचाही जो काही निर्णय झालेला आहे त्यातील कायदेशीर बाबी तपासून कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सध्याच्या घटकेला मधल्या संपामुळे आठ दहा दिवस जे कचरा उचलण्याचे काम झाले नाही त्यासाठी अतिरिक्त यंत्रणा लावुन त्यांच्याकडुन दिवसनिहाय किती कचरा उचलला आहे त्याचा अहवाल आम्ही दिलेला आहे. मधल्या कालावधीत संबंधित ठेकेदाराकडुन जास्तीत जास्त काम करुन घेण्याची कारवाई केली जावी अशी सूचना संबंधित विभागाला दिलेली आहे. आणि कच—याचे खत्ते हे पुर्णपणे उचलले जातील त्याची दक्षता घेण्यात येईल.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सर्वप्रथम मागील तीन चार महिन्यापुर्वी आम्ही आपणाकडे तक्रारी केल्या होत्या. स्थायी समितपुढे देखिल आम्ही हा कच—याचा विषय घेतला होता. ॲन्थोनी ठेकेदाराच्या कामाबाबत स्थायी समिती सभापती यांनी चार अधिका—यांची चौकशी समिती स्थापन केल्यानंतर समितीने आपला अहवाल सादर केला आहे. चौकशी समितीच्या सर्व सदस्यांचे मी अभिनंदन करु इच्छितो. मा. श्री. प्रकाश कुकरेजा , महापालिका सचिव व श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत त्याचप्रमाणे डॉ. श्री. राजा रिजवानी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त या चार अधिका—यांची चौकशी समिती स्थापन केली होती त्यामध्ये श्री. मिलिंद सावंत यांची अहवालावर स्वाक्षरी नाही. याबाबत आम्हांला शंका वाटते. त्यांनी शिफारस पत्रावर स्वाक्षरी का केंली नाही त्यामागचे कारण काय?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>श्री. दिघे साहेबांचे त्यात नाव नाही.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>श्री. दिघे साहेबांची पण सही नाही आहे.

**यावेळी उत्तर देण्यासाठी श्री. मिलिंद सावंत हे व्यासपीठावर आले.**

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>श्री. सावंत साहेब, याचे उत्तर आयुक्त म्हणुन मी देतो. तुम्ही खाली बसा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u>आज आयुक्त उत्तर देण्यास सक्षम आहेत.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>सक्षम नाही, तुमचे सहकार्य असेल तर उत्तर देवु शकेल. तुमचा काही रोष आहे तर रोष नेत्याने स्विकारला पाहिजे तरच खालचे अधिकारी, कर्मचारी काम करतील. मी जर जबाबदारी टाकत गेलो तर होणारे कामही होणार नाही. हा जो प्रश्न आलेला आहे त्याबाबत पुन्हा एकदा आपणांस विनंती आहे की, अहवाल जो आहे तो स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे. स्थायी समितीने त्याचा निर्णय दिलेला

आहे तो स्थायी समितीचा निर्णय महासभेपुढे येत आहे. स्थायी समिती आणि महासभा जो निर्णय घेईल त्याच्यावर अंमलबजावणी करण्याचे उत्तरदायीत्व प्रशासन पार पाडेल. अहवालामध्ये काय होते आणि काय नव्हते याच्यामध्ये विचार करण्यास काही औचित्य नाही. जो आपण निर्णय दिला ती चर्चा स्थायी समितीमध्ये झालेली आहे. आजच्या बैठकीमध्ये मला उपस्थित राहता आले नव्हते. स्थायी समितीने एकदा निर्णय दिलेला आहे. आपण जो निर्णय दिलेला आहे तोच महासभेपुढे येईल, महासभा जो निर्णय देईल त्याच्यावर अंतिम कारवाई ठरावाप्रमाणे केली जाईल. अशी मी ग्वाही देतो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आयुक्त साहेब, या ठिकाणी तुम्ही सांगितले की स्थायी समिती किंवा महासभा जो आदेश देईल त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. हा अहवाल पहाता, ज्या अटी शर्तीच्या अधिन राहून महासभेने त्या ठेकेदारास ठेका दिला आहे. त्यातील एकही अट त्याने पुर्ण केलेली नाही. किंवा बहुतांश अटी पुर्ण केल्या नाहीत असा सुस्पष्ट अहवाल आहे. आम्ही तुम्हांला निर्देश दिलेले आहेत. या अटी शर्तीच्या अधिन राहुन तुम्ही त्यांच्याकडुन काम करुन घ्या. तुम्ही करु शकत नाही ते? प्रशासनाने केले नाही.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>गेल्या चार महिन्यापासुन हा अहवाल स्थायी समितीच्या विचाराधीन होता, आज दुपारी तीन वाजता स्थायी समितीने त्यावर निर्णय दिलेला आहे हे आता सभागृहात मला समजलेले आहे. जो काही आदेश स्थायी समितीने दिलेला आहे त्याबाबतीत जो काही निर्णय महासभा घेईल त्याच्यावर अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासन करेल. आतापर्यंतच्या कालावधीत त्याच्याकडुन ज्या त्रुटी झाल्या असतील त्याच्यावर कारवाई का झाली नाही हा मुख्य प्रश्न आहे. त्याबाबत पुन्हा एकदा मी तेच सांगतो की, हा अहवाल स्थायी समितीकडे विचाराधीन असल्यामुळे त्याच्यावर कारवाई केली नव्हती. आता स्थायी समितीने आदेश दिला आहे, त्या आदेशाच्या अनुषंगाने त्याच्यावर कारवाई केली जाईल.

**मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया, श्रीमती संगिता कंडारे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>साहेब, स्थायी समितीने चौकशी समिती कधी नेमली? ज्यावेळेस ठेकेदार अटी शर्तीप्रमाणे काम करत नाही. सफाई व्यवस्थीत करत नाही तेव्हा, याबाबतीत प्रशासनाने त्याचवेळी लक्ष दिले असते तर आता ही वेळ आलीच नसती.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>याच्याबाबतीत पुन्हा सन्माननिय सभागृहाला सांगु इच्छितो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>कच—याचे वर्गीकरण करायचे. तेथे दोन वेगवेगळया कचरा कुंडया ठेवायच्या. ओटे बांधायचे, लोकांच्या आरोग्यासाठी धोका होवु नये म्हणुन प्रतिबंधात्मक उपाययोजना करायची हे पाळले नाही. प्रशासनाने त्याच्यावर कारवाई केली का काही?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u> मी सभागृहाला परत सांगु इच्छितो, त्यांनी जे पॅरामीटर दिलेले आहे त्याचा दर महिन्याला आढावा घेतला जातो आणि त्या अनुषंगाने अटी शर्तीच्या मानाने त्यांच्या पैश्यातुन कमात केली जाते. आतापर्यंत त्याच्यावर जी कारवाई केली आहे त्याचा सविस्तर अहवाल याबाबत आपण जी सभा घ्याल त्यामध्ये देण्यात येईल.

**मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. दत्तात्रय पवार हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २ :—</u> मागील महासभेचे दिनांक २०/१२/२००७, १७/१/२००८ व दिनांक २०/२/२००८ सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेबांना विनंती करतो की, जो अर्थसंकल्प आहे, आता तर तो मंजुर झालेला आहे. त्याबाबतीत लेखा विभागास आपण आदेश दया की, लवकरात लवकर अर्थसंकल्पाची पुस्तिका तयार करुन ती सर्व संबंधीत विभागांना व नगरसेवकांना पाठविली जावी. ज्यानुसार प्रत्येक नगरसेवक आपापल्या प्रभागात विकास काम करु शकेल. कारण की, सार्वजनिक बांधकाम विभागास आम्ही सांगतो की, आमच्या विभागातील प्राकलन तयार करा, डीडीआरकडे पाठवा. त्याबद्दल ते सांगतात की

अर्थसंकल्पाची पुस्तीका तयार झालेली नाही. अर्थसंकल्प मंजुर होवुन आता एक महिन्याचा कालावधी झाला तरी त्याची पुस्तिका तयार करण्यात आलेली नाही. मला असे वाटते की एप्रिल महिन्यातच अर्थसंकल्पाची पुस्तिका तयार होवुन सर्व विभागांना वितरीत झाली पाहिजे.

काही सदस्य :—पास—पास......

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— मागील सभेचे दिनांक २०/१२/२००७, १७/१/२००८ व दिनांक २०/२/२००८ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २ :—** मागील महासभेचे दिनांक २०/१२/२००७, १७/१/२००८ व दिनांक २०/२/२००८ सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव : श्री. दिलीप गायकवाड

महासभा ठराव क्र. ६१ क — दिनांक : १९/३/२००८

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २०/१२/२००७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ९२ पर्यंतचे, दिनांक १७/१/२००८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ८ पर्यंतचे व दिनांक २०/२/२००८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ३५ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

एकमताने

उप—महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** अपंग व्यक्तींना तीन चाकी सायकली वाटप करणे कामीचा महिला व बालकल्याण समितीचा दिनांक ८.२.०८ रोजीचा ठराव क्र.२ कायम करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** अपंग व्यक्तींना तीन चाकी सायकली वाटप करणे कामीचा महिला व बालकल्याण समितीचा दिनांक ८.२.०८ रोजीचा ठराव क्र.२ कायम करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सन २००६–०७ च्या राखीव निधीतुन उल्हासनगर शहरातील ५० अपंग व्यक्तींना ३ चाकी सायकल वाटप करण्याचे योजिले असुन सदर प्रस्तावास समितीचे ठराव क्र. ५, दिनांक १८/११/०६ अन्वये मंजुरी दिलेली असुन अपंग व्यक्तीसाठी खरेदी करण्यात आलेले नसल्याने अपंग व्यक्ती सदर लाभापासुन वंचित राहिले असल्याने सन २००६–०७ मध्ये खरेदी केलेल्या ५० तीन चाकी सायकली अपंग व्यक्तींना वाटप करण्यात येणार आहेत.

तसेच ३ चाकी सायकल वाटप करण्यासाठी करण्यात येणा–या कार्यक्रमाकरिता सन २००७–०८ चे राखीव निधीतुन अंदाजे रुपये १५,०००/– खर्च अपेक्षित आहे.

३ चाकी सायकली वाटप करण्यासाठी लाभार्थी नावांच्या प्राप्त यादीस समितीची मान्यता घेवुन यादी सादर करण्यात येईल. वरील खर्चास मान्यता मिळण्यासाठी समितीपुढे सविनय सादर.

महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २ दिनांक :– ८/२/२००८

सुचकाचे नाव :–श्रीमती लता निकम
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती ज्योती माने

ही महिला व बालकल्याण समिती महासभेच्या मंजुरीस अधिन राहून सोबत जोडलेल्या यादीतील ५० अपंग व्यक्तींना सन २००६–०७ मध्ये खरेदी केलेल्या तीन चाकी सायकली वाटप करण्यास व अंतर्भुत खर्च रू. १५०००/–यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही

अनुमोदकाची सही

एकमताने मंजुर

सभापती/ पीठासीन अधिकारी
महिला व बालकल्याण समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र: ६२ दिनांक : १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्रीमती मिनाताई सोनेजी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती ज्योती माने

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरात ५० अंपग व्यक्तींना सन २००६–०७ मध्ये खरेदी केलेल्या ३ चाकी सायकली वाटप करणे कामी महिला व बालकल्याण समितीचा दिनांक ८/२/२००८ रोजीचा ठराव क्र. २ अंतर्भुत निर्णय कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

**विषय क्र. ४** :—शहरातील प्रौढ महिलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे कामीचा महिला व बालकल्याण समितीचा दिनांक ८.२.०८ रोजीचा ठराव क्र.३ कायम करणे.

काही सदस्य :—पास—पास......

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

मा. सदस्य श्री. सुंदर मंगतानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**विषय क्र.** ४:—शहरातील प्रौढ महिलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे कामीचा महिला व बालकल्याण समितीचा दिनांक ८.२.०८ रोजीचा ठराव क्र.३ कायम करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरात घरगुती अडचणीमुळे आर्थिक टंचाईमुळे, शिक्षण अर्धवट राहिलेल्या शिक्षणाची संधी हुकलेल्या अनेक प्रौढ महिला व मुलीं असुन त्यांना पुढील शिक्षण घेण्याची इच्छा आहे. अशा महिलांना यशवंतराव मुक्त विदयापीठाच्या माध्यमातुन पुढील शिक्षण देण्याचा महिला व बालकल्याण समितीचा मनोदय असुन सदरच्या प्रस्तावानुसार १०० महिलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार असुन प्रती लाभार्थी रु. ५१०/— शिक्षणी फी म्हणुन रु. ५१०००/— हे समितीचे सन २००७—०८ चे राखीव निधीतुन खर्च करण्यात येणार आहे.

सदरचा धनादेश विदयापीठास पाठविण्यात येणार आहे. प्रौढ शिक्षण घेणा—या लाभार्थी महिलांच्या नावास समितीच्या बैठकीत मान्यता होवुन यादी सादर करण्यात येईल सदर प्रस्ताव मान्यतेसाठी समितीपुढे सविनय सादर.

महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ३ दिनांक :— ८/२/२००८

**सुचकाचे नाव** :— **श्रीमती निलम रावत**
**अनुमोदकाचे नाव** :— **श्रीमती ज्योती माने**

ही महिला व बालकल्याण समिती महासभेच्या मंजुरीस अधिन राहून उल्हासनगर शहरात घरगुती अडचणींमुळे, आर्थिक टंचाईमुळे शिक्षण अर्धवट राहिलेल्या, शिक्षणाची संधी हुकलेल्यांपैकी १०० प्रौढ महिला व मुलींना पुढील शिक्षणाची संधी देण्याच्या प्रयोजनार्थ प्रती लाभार्थी रू ५१०/— शिक्षण शुल्क म्हणुन रू. ५१०००/— चा धनादेश यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास पाठविण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही

अनुमोदकाची सही

एकमताने मंजुर

सभापती/ पीठासीन अधिकारी
महिला व बालकल्याण समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र: ६३ दिनांक : १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती मिनाताई सोनेजी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जयश्री सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरात घरगुती अडचणीमुळे आर्थिक टंचाईमुळे शिक्षण अर्धवट राहिलेल्या व शिक्षणाची संधी हुकलेल्यांपैकी २०० प्रौढ महिला/मुलींना पुढील शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रयोजनार्थ प्रती लाभार्थी रु. ५१०/— शिक्षण शुल्क याप्रमाणे २०० प्रशिक्षणार्थींचे एकुण रु. १,०२,०००/— चा धनादेश यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडे पाठविणेकामी दिनांक ८/२/२००८ रोजीचा महिला व बालकल्याण समितीचा ठराव क्र. ३ अंतर्भुत निर्णय फेरफारासह मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—** महिला दिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांचे खर्चा बाबत दिनांक २२.२.०८ रोजीचा महिला व बालकल्याण समितीचा ठराव क्र.४ कायम करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

**मा. सदस्या श्रीमती सरोजीनी मुरलीधर टेकचंदानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.** 

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ५:—** महिला दिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांचे खर्चा बाबत दिनांक २२.२.०८ रोजीचा महिला व बालकल्याण समितीचा ठराव क्र.४ कायम करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महापालिकेच्या महिला व बाल कल्याण समिती मार्फत दिनांक ८ मार्च, २००८ रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्याचे ठरविले आहे.

त्यानुसार दिनांक ८ मार्च, २००८ रोजी जागतिक महिला दिनाचे निमित्ताने शहीद अरुणकुमार वैद्य सभागृह, उल्हासनगर–३ येथे विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम, फेरी, स्पर्धा इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून मा. श्रीमती सिंधूताई सपकाळ, सामाजिक कार्यकर्त्या यांना प्रमुख पाहुण्या म्हणुन आंमंत्रित करण्यात आले आहे. त्यांचे शुभ हस्ते उल्हासनगर शहरातील सामाजिक, शैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रात उल्लेखनिय काम, कार्य केलेल्या महिलांचा गौरव चषक देवून सत्कार करण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडणेसाठी ३ नग होर्डिंग, १५० नग निमंत्रण पत्रिका, पाण्याचे पाऊच ग्लाससह ५०० नग, नाष्टा व चहा १५०० नग, रेलिचे फोटो १०० नग, स्टेज बॅनर १ नग, पुष्पहार व बुके २० नग, तसेच गौरव चषक (मानचिन्ह) ४० नग, व्हिडीयो चित्रीकरण, ध्वनीक्षेपक तसेच प्रमुख पाहुण्यांचा प्रवास खर्च, राहण्याचा खर्च व आयत्यावेळी उद्‌भवणारा इतर किरकोळ खर्च अंदाजे रु. ५०,००० + ५०,००० = १,००,०००/– (अक्षरी रु. १ लाख) अपेक्षित आहे.

सदरचा खर्च समितीचे सन २००७–०८ च्या राखीव निधीतून करण्यात येणार आहे. जागतिक महिला दिन साजरा करणे व त्याकामी होणा–या खर्चास मान्यता मिळणेसाठी समितीपुढे सविनय सादर.

<u>महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.</u> ४ <u>दिनांक :– २२/२/२००८</u>

**सुचकाचे नाव :– श्रीमती कविता सिरवानी**
**अनुमोदकाचे नाव :– श्रीमती लता निकम**

ही महिला व बालकल्याण समिती महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहून वरील प्रस्तावनेनुसार दिनांक ८ मार्च, २००८ रोजी महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यास व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही /–

अनुमोदकाची सही /–

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पीठासीन अधिकारी
महिला व बालकल्याण समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र:</u> ६४ <u>दिनांक : १९/३/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती मिनाताई सोनेजी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती ज्योती माने

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरात दिनांक ८ मार्च २००८ रोजी महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमां कामी दिनांक २२/२/२००८ च्या महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ४ अंतर्भुत निर्णय कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :—शहरातील महिला/ मुलींना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामार्फत रूण सहाय्यकाच्या प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणेकामी महिला व बालकल्याण समितीचा दिनांक २२.२.०८ रोजीचा ठराव क्र.५ कायम करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६**:— शहरातील महिला/ मुलींना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामार्फत रूण सहाय्यकाच्या प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणेकामी महिला व बालकल्याण समितीचा दिनांक २२.२.०८ रोजीचा ठराव क्र.५ कायम करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील इयत्ता दहावी पास / नापास महिला/मुलींना रोजगार प्राप्त व्हावा त्यांनी स्वावलंबी व्हावे या करीता उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समिती मार्फत रुग्ण सहाय्यकाचे प्रशिक्षण देण्याचे ठरविले आहे.

महाराष्ट्र शासनाने सोपविलेल्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, मुंबई विभागीय केंद्रातर्फे विविध शिक्षणक्रम, प्रशिक्षण वर्ग राबविण्यात येत असून सदर शिक्षणक्रमापैकी रुग्ण सहाय्यकाचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात येत असून सदर प्रशिक्षणाचे शैक्षणीक शुल्क, प्रती प्रशिक्षणार्थी रुपये ६५००/— एवढा असून प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्षाचा आहे. शैक्षणीक शुल्कापैकी रुपये २०००/— हे महिला व बाल कल्याण समितीच्या राखीव निधीतून भरण्यात येणार असून उर्वरीत शैक्षणीक शुल्क रु. ४५००/— हे संबंधित लाभार्थी / प्रशिक्षणार्थींनी स्वत: भरावयाचे आहेत.

समितीमार्फत १०० महिला /मुलींना रुग्ण सहाय्यकाचे प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली जाणार असून १०० X २००० = २,००,०००/— (अक्षरी रु. दोन लाख) एवढे शिक्षण शुल्क समितीचे सन २००७—०८ चे राखीव निधीतून खर्च करण्यात येणार आहेत. शैक्षणिक शुल्काचे रक्कमेंचा धनादेश यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे नावे पाठविण्यात येणार आहे. तसेच लाभार्थी महिला / मुलींची नावे प्राप्त झाल्यानंतर सादर करण्यात येतील. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेकरीता समितीपुढे सविनय सादर.

महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. ५ दिनांक :—२२/२/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती माने

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती निलम रावत

ही महिला व बालकल्याण समिती महासभेच्या मंजुरीस अधिन राहून उल्हासनगर शहरातील इयत्ता १० वी पास/नापास महिला/ मुलींना रोजगार प्राप्त व्हावा, त्यांनी स्वावलंबी व्हावे या प्रयोजनार्थ महापालिकातर्फे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत रुग्ण सहाय्यकाचे प्रशिक्षणासाठी प्रत्येकी रू २०००/— प्रमाणे १०० प्रशिक्षणार्थींचे रू. २,००,०००/— चा धनादेश यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास पाठविण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही /—

एकमताने मंजुर

सभापती/ पीठासीन अधिकारी
महिला व बालकल्याण समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र:</u> ६५ <u>दिनांक : १९/३/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती मिनाताई सोनेजी
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती ज्योती माने

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील इयत्ता १० वी पास/नापास महिला/मुलींना रोजगार प्रयोजनार्थ महापालिकेतर्फे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत रुग्ण सहाय्यकाचे प्रशिक्षणासाठी प्रत्येकी रु. २०००/– प्रमाणे प्रशिक्षणार्थीचे रु. २,००,०००/– अनुदाना बाबी दिनांक २२/२/२००८ रोजीच्या महिला व बालकल्याण समितीचा ठराव क्र. ५ अंतर्भूत निर्णय कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ७ :– विद्युत विभागातील निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेस मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** ७:– विद्युत विभागातील निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

विद्युत विभागा मार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी जनसंपर्क कार्यालया मार्फत वर्तमान पत्रात निविदा सुचना देउन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यांच्या प्रतिसादात मे. हनान इंटरप्राईझेस, मे. मौर्या स्क्रॅप मार्ट, मे. अे–१ सिंडिकेट, मे. युनिक स्क्रॅप ट्रेडर्स, मे. दिपक ट्रेडर्स, मे. नसिबदार मुजाहिब आणि कं., मे. बिस्मिल्लाह मो. कुरेशी, मे. ठाकुर इंटीरिअर्स, मे. रफिउल्ला खान, मे. गरीब नवाज ऑटोमोबाईल्स, मे. मोहम्मद झुबेर अब्दुल गनी, मे. सुसुम ट्रेडिंग प्रा. लि., मे. ऑलवे स्क्रॅप ट्रेडर्स, यांनी कोरे निविदा चे कोरे प्रपत्र खरेदी केले सदर निविदा इशारा रक्कमे सह सादर करण्याची मुदत ०२/०१/०८ रोजी सायकाळी ५.०० वाजे पर्यंत होती, ६ निविदा धारकांनी इशारा रक्कमे सह सिलबंद निविदा सादर केल्या होत्या. दिनांक ३/०१/०८ रोजी दु. १२.३० वाजता उघडण्यात आल्या त्यांच्या तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**<u>COMPERATIVE STATEMENT</u>**

| अ. क्र. | निरूपयोगी साहित्यांची यादी | परिमाण | अंदाजित परिमाण | सर्व साधारण महासभा ठराव क्र. ७८ दि. ०८.०२. ०६ रोजीची ठरवलेली किंमत (रूपये) | अंदाजित रक्कम (रूपयांत) | मे. दिपक ट्रेडर्स (रू.) | मे. ए–वन सिंडिकेट (रू.) | मे. ठाकुर ईंटीरिअर (रू.) | मे. हनान ईंटरप्राईझेस (रू.) | मे. मुहम्मद झुबेर अब्दुल गनी (रू.) | मे. सुसुम ट्रेडिंग प्रा. लि. (रू.) | प्राप्त दरान्वये एकुण रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४० वॉ. कॉपर चोक | नग | **200** | **20.55** | 4110 | 25.01 | 27.86 | 15.00 | **28.30** | 24.00 | 22.00 | 5660.00 |
| २ | ४० वॉ. टयुब लाईट | नग | **1575** | **3.75** | 5906.25 | 1.10 | 1.50 | 0.00 | **2.80** | 0.00 | 0.89 | 4410.00 |
| ३ | २५० वॉ. सोडियम चोक | नग | **860** | **130.00** | 111800.00 | 200.10 | 201.00 | 132.00 | 161.00 | 141 | **205.33** | 176583.80 |
| ४ | २५० वॉ. सोडियम बल्ब | नग | **1750** | **42.00** | 73500.00 | **31.00** | 27.86 | 0.00 | 26.00 | 0.00 | 4.44 | 54250.00 |
| ५ | १०० अॅ. कटाउट बेस फक्त | नग | **120** | **9.05** | 1086.00 | 10.05 | 2.00 | 0.00 | **10.20** | 0.00 | 1.78 | 1224.00 |
| ६ | २५० वॉ. होल्डर | नग | **580** | **2.02** | 1171.60 | **2.10** | 0.50 | 0.00 | 1.60 | 0.00 | 0.89 | 1218.00 |
| ७ | इगनिटर | नग | **2270** | **2.02** | 4585.40 | 1.00 | **3.00** | 0.00 | 1.60 | 0.00 | 1.87 | 6810.00 |
| ८ | २५० वॉ. सोडियम कॅप फक्त | नग | **245** | **5.11** | 1251.95 | **6.00** | 2.00 | 0.00 | 3.50 | 0.00 | 0.89 | 1470.00 |
| ९ | बंद झालेले खिडकी वातानुकुलित यंत्र | नग | **24** | **915.00** | 21960.00 | 1000.00 | 1786.00 | **2900.00** | 1786.00 | 1501 | 2044.44 | 69600.00 |
| १० | अॅल्युमिनियम स्क्रॅप(षिट व कास्टींग मिक्स) | कि.ग्रॅ. | **80** | **76.14** | 6091.20 | 82.00 | 90.00 | 75.00 | 82.20 | **91.00** | 76.92 | 7280.00 |
| ११ | अॅल्युमिनियम केबल / वायर | कि.ग्रॅ. | **90** | **28.05** | 2524.50 | **55.00** | 40.00 | 32.00 | 33.50 | 41.00 | 28.85 | 4950.00 |
| १२ | जी. आय/लोखंड सॅक्रप (मिक्स) | कि.ग्रॅ. | **100** | **13.21** | 1321.00 | **16.20** | 16.00 | 14.00 | 14.50 | 15.00 | 15.38 | 1620.00 |
| १३ | टयुब स्टारटर्स | नग | **880** | **0.13** | 114.40 | 0.05 | **0.15** | 0.00 | 0.10 | 0.00 | 0.00 | 132.00 |
| १४ | टयुब साईड होल्डर्स | नग | **325** | **0.1** | 32.50 | **0.10** | 0.03 | 0.00 | 0.02 | 0.00 | 0.00 | 32.50 |
| १५ | टयुब लाइट कॅप | नग | **225** | **0.11** | 24.75 | 0.11 | 0.02 | 0.00 | **0.12** | 0.00 | 0.11 | 27.00 |
| १६ | जुने पंखे | नग | **65** | **210.00** | 13650.00 | 105.00 | **220.00** | 140.00 | 162.50 | 211.0 | 188.44 | 14300.00 |
| | | | | एकुण | 249129.55 | | | | एकुण | | | **349567.30** |

सदर तुलनात्मक तक्त्यानुसार ——

वरील तक्त्या प्रमाणे आयटम क्र. ४,६,८,११,१२ व १४ मध्ये मे. दिपक ट्रेडर्स यांचे दर सर्वाधिक आहेत. आयटम क्र. ७,१३ व १६ मध्ये मे. अे–१ सिंडिकेट याचे दर सर्वाधिक आहेत. आयटम क्र. ९ मध्ये मे. ठाकुर इंटीरिअर्स, याचे दर सर्वधिक आहे. आयटम क्र. १,२,५ व १५ मध्ये मे. हनान इंटरप्राईझेस यांचे दर सर्वाधिक आहेत. आयटम क्र. १० मध्ये मे. मोहम्मद झुबेर अब्दुल गनी, व आयटम क्र. ३मध्ये मे. सुसुम ट्रेडिंग प्रा. लि याचे दर सर्वाधिक आहेत.

मे. दिपक ट्रेडर्स यांनी आयटम क्र. ४ करीत दिलेले दर व मे. हनान इंटरप्राईझेस यांनी आयटम क्र.२ करीता दिलेले दर हे आपल्या ठरवीलेल्या दरा पेक्षा कमी आहेत त्या मुळे त्यांना सदर आयटमचे दर वाढवण्या साठी विनंती करण्यात आली.

वाटाघाटी व चर्चेअंती मे. मे. दिपक ट्रेडर्स यांनी आयटम क्र. ४ – रु. ३१.०० चे वाढवून रु. ४२.०० दिले आहेत ते आपल्या दरानुसार आहेत. तसेच मे. हनान इंटरप्राईझेस यांनी आयटम क्र. २ (टयुब नळी) चे दर वाढवून देण्यास नकार दिलेला आहे. तरीही आयटम क्र. २ (टयुब नळी) चे दर आमच्या दरापेक्षा फक्त ९५ पैशे कमी आहे व टयुब नळी ची टुटफूट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून मे. हनान इंटरप्राईझेस यांनी आयटम क्र. २ (टयुब नळी) चे दर रू. ०२. ८० प्रमाणे मान्य करणे रास्त राहील.

वरील सुधारीत दर मिळाल्यानंतर निविदांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निरूपयोगी साहित्यांची माहिती | परिमाण | अंदाजित परिमाण | सर्व साधारण महासभा ठराव क्र. ७८ दि. ०८.०२.०६ रोजीची ठरवलेली किंमत (रूपयांत.) | अंदाजित रक्कम (रूपयांत) | मे. दिपक ट्रेडर्स | मे. ए–वन सिंडिकेट | मे. ठाकुर ईंटीरिअर | मे. हनान ईंटरप्राईझेस | मे. मुहम्मद झुबेर अब्दुल गनी | मे. सुसुम ट्रेडिंग प्रा. लि. | प्राप्त दरान्वये एकुण रक्कम रूप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४०वॉ. कॉपर चोक | नग | **200** | **20.55** | 4110 | 25.01 | 27.86 | 15.00 | **28.30** | 24.00 | 22.00 | 5660.00 |
| २ | ४०वॉ. टयुब लाईट | नग | **1575** | **3.75** | 5906.25 | 1.10 | 1.50 | 0.00 | **2.80** | 0.00 | 0.89 | 4410.00 |
| ३ | २५०वॉ. सोडियम चोक | नग | **860** | **130.00** | 111800.00 | 200.10 | 201.00 | 132.00 | 161.00 | 141.00 | **205.33** | 176583.80 |
| ४ | २५०वॉ. सोडियम बल्ब | नग | **1750** | **42.00** | 73500.00 | **42.00** | 27.86 | 0.00 | 26.00 | 0.00 | 4.44 | 73500.00 |
| ५ | १००अॅ.कटाउट बेस फक्त | नग | **120** | **9.05** | 1086.00 | 10.05 | 2.00 | 0.00 | **10.20** | 0.00 | 1.78 | 1224.00 |
| ६ | २५०वॉ. होल्डर | नग | **580** | **2.02** | 1171.60 | **2.10** | 0.50 | 0.00 | 1.60 | 0.00 | 0.89 | 1218.00 |
| ७ | इगनिटर | नग | **2270** | **2.02** | 4585.40 | 1.00 | **3.00** | 0.00 | 1.60 | 0.00 | 1.87 | 6810.00 |
| ८ | २५०वॉ. सोडियम कॅप फक्त | नग | **245** | **5.11** | 1251.95 | **6.00** | 2.00 | 0.00 | 3.50 | 0.00 | 0.89 | 1470.00 |
| ९ | बंद झालेले खिडकी वातानुकुलित यंत्र | नग | **24** | **915.00** | 21960.00 | 1000.00 | 1786.00 | **2900.00** | 1786.00 | 1501.00 | 2044.44 | 69600.00 |
| १० | अॅल्युमिनियम स्क्रॅप(षिट व कास्टींग मिक्स) | कि.ग्रॅ. | **80** | **76.14** | 6091.20 | 82.00 | 90.00 | 75.00 | 82.20 | **91.00** | 76.92 | 7280.00 |
| ११ | अॅल्युमिनियम केबल/ वायर | कि.ग्रॅ. | **90** | **28.05** | 2524.50 | **55.00** | 40.00 | 32.00 | 33.50 | 41.00 | 28.85 | 4950.00 |
| १२ | जी. आय/लोखंड सॅक्रप (मिक्स) | कि.ग्रॅ. | **100** | **13.21** | 1321.00 | **16.20** | 16.00 | 14.00 | 14.50 | 15.00 | 15.38 | 1620.00 |
| १३ | टयुब स्टारटर्स | नग | **880** | **0.13** | 114.40 | 0.05 | **0.15** | 0.00 | 0.10 | 0.00 | 0.00 | 132.00 |
| १४ | टयुब साईड होल्डर्स | नग | **325** | **0.1** | 32.50 | **0.10** | 0.03 | 0.00 | 0.02 | 0.00 | 0.00 | 32.50 |
| १५ | टयुब लाइट कॅप | नग | **225** | **0.11** | 24.75 | 0.11 | 0.02 | 0.00 | **0.12** | 0.00 | 0.11 | 27.00 |
| १६ | जुने पंखे | नग | **65** | **210.00** | 13650.00 | 105.00 | **220.00** | 140.00 | 162.50 | 211.00 | 188.44 | 14300.00 |
| | | | | एकुण | 249129.55 | | | | एकुण | | | **368817.30** |

सदर सुधारीत दरांच्या तुलनात्मक तक्त्यानुसार आयटम क्र. ४,६,८,११,१२ व १४ मध्ये मे. दिपक ट्रेडर्स यांचे दर सर्वाधिक आहेत. आयटम क्र. ७,१३ व १६ मध्ये मे. अे–१ सिंडिकेट याचे दर सर्वाधिक आहेत. आयटम क्र. ९ मध्ये मे. ठाकुर इंटीरिअर्स, याचे दर सर्वधिक आहे. आयटम क्र. १,२,५ व १५ मध्ये मे. हनान इंटरप्राईझेस यांचे दर सर्वाधिक आहेत. आयटम क्र. १० मध्ये मे. मोहम्मद झुबेर अब्दुल गनी, व आयटम क्र. ३मध्ये मे. सुसुम ट्रेडिंग प्रा. लि याचे दर सर्वाधिक आहेत.

वरील बाबी लक्षात घेता ज्या आयटममध्ये ज्याचे दर जास्त आहेत ते आयटम त्या त्या एजन्सिंना त्या दरानुसार उपलब्ध परिमाण व मार्च २००८ आखेर पर्यत जमा होणाऱ्या परिमाण विल्हेवाट करण्याच्या मान्यता मिळण्या करीता मा. महासभेच्या पटलावर सादर.

महासभा ठराव क्र: ६६ दिनांक : १९/३/२००८

सुचकाचे नाव :– श्री. विनोद ठाकुर
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती सुरेखा वेलकर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या सुधारीत दराच्या तुलनात्मक तक्त्या अनुसार उच्चत्तम निविदाकाराशी बाब क्र.. ४,६,८,११,१२ व १४ मध्ये मे. दिपक ट्रेडर्स, बाब क्र. ७,१३ व १६ मध्ये मे. अे–१ सिंडीकेट, बाब क्र. ९ मध्ये मे. टाकुर इंटिरिअर्स, बाब क्र. १,२,५ व १५ मध्ये मे. हनुमान इंटरप्राईझेस, बाब क्र. १० मध्ये मे. मोहम्मद झुबेर अब्दुल गनी, बाब क्र. ३ मध्ये मे. सुसुम ट्रेडिंग प्रा.लि. यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर महापालिकेतील कनिष्ठ अभियंता व प्रोग्रामर या तांत्रिक पदांकरीता सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८:—** उल्हासनगर महापालिकेतील कनिष्ठ अभियंता व प्रोग्रामर या तांत्रिक पदांकरीता सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर नगरपालिका अस्तित्वात असतांना कनिष्ठ अभियंता या पदासाठी १४००—४०—२३०० ही वेतनश्रेणी अतिस्त्वात होती. सदर वेतनश्रेणी ही ४ थ्या वेतन आयोगानुसार निश्चित केलेली होती. उल्हासनगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर होतांना कनिष्ठ अभियंता व प्रोग्रमर या पदासाठी ४५००—१२५—७००० इतकी वेतनश्रेणी लागु करण्यात आली. याबाबत विदयुत अभियांत्रिकी विभागातील कनिष्ठ अभियंता यांनी मा. आयुक्त व मा. सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे वारंवार पत्रव्यवहार करुन व कनिष्ठ अभियंता या पदासाठी शासन निर्णयानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागु करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकरणाची छाननी केली असता खालील मुद्दे निदर्शनास आलेले आहेत.

१. उल्हासनगर नगरपालिका अस्तित्वात असतांना कनिष्ठ अभियंता या पदासाठी ४ थ्या वेतन आयोगानुसार १४००—४०—२३०० ही वेतनश्रेणी लागु करण्यात आली होती.

२. यानंतर दिनांक १४ डिसेंबर, १९९५ रोजी शासन निर्णय क्र. वेपूर/१०९२ (६२९/९२)/आ(क्षेप्र) नुसार राज्य शासन सेवेतील अभियंत्यांना सुधारीत वेतनश्रेणी पुर्वलक्षी प्रभावाने दि. १ जानेवारी, १९८६ पासुन सुधारण्यात आलेली आहे. यानुसार कनिष्ठ अभियंता या पदासाठी सुधारीत वेतनश्रेणी रु. १६४०—६०—२६००—द.रो. ७५—२९०० इतकी करण्यात आलेली आहे.

३. सदर निर्णयामध्ये असेही नमुद करण्यात आले आहे की, दिनांक १ जानेवारी, १९८६ ते ३१ डिसेंबर, १९९५ या कालावधीसाठी सुधारीत वेतनश्रेणीमुळे देय होणारी कुठल्याही प्रकारची थकबाकी देय असणार नाही.

४. सदर निर्णयानुसार उपरोक्त सुधारीत वेतनश्रेणी नुसार १ जानेवारी १९८६ पासुन वेतन निश्चिती करुन त्याप्रमाणे देय वेतन दिनांक १ जानेवारी १९८६ पासुन प्रत्यक्षात देण्यात येईल.

तत्कालीन नगरपालिकेचे महापालिकेत रुपांतर झाल्यावर महापालिकेने शासनाकडे प्रस्तावित केलेल्या दिनांक २२/६/१९९८ व दिनांक २९/६/१९९८ रोजीच्या आस्थापना सुचिमध्ये कनिष्ठ अभियंता या संवर्गाची असुधारीत वेतनश्रेणी १४००—४०—२३०० अशी दिली होती. तथापि, शासनाने राज्यशासन सेवेतील अभियंत्यांना सुधारीत वेतनश्रेणी मंजुर करणेसंबंधी क्र. वेपुर १०९२/(६२९/९२)/आ(क्षेप) दिनांक १४ डिसेंबर, १९९५ च्या शासन निर्णयाद्वारे कनिष्ठ अभियंता या संवर्गाची विदयमान वेतनश्रेणी रु. १४००—४०—२३०० च्या ऐवजी सुधारीत वेतनश्रेणी रु. १६४०—६०—२६००—द.रो. ७५—२९०० अशी

दिनांक १४ डिसेंबरच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निश्चित केलेली आहे. सदर सुधारीत वेतनश्रेणीप्रमाणे या महापालिकेने कनिष्ठ अभियंता संवर्गातील कर्मचा—यांना लाभ मिळालेला नाही.

५. मात्र तत्कालीन प्रशासन, श्री. बायस यांनी आस्थापना सुची बनवितांना व शासनाकडे मान्यतेस पाठवितांना कनिष्ठ अभियंता व प्रोग्रामर या तांत्रिक पदासाठी ४५००—१२५—७००० इतकी वेतनश्रेणी निश्चित केली असल्यामुळे सदयस्थितीत कनिष्ठ अभियंता व प्रोग्रामर या तांत्रिक पदासाठी ४५००—१२५—७००० इतकी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करण्यात येत आहे.

६. मात्र शासन निर्णय, ४ था वेतन आयोग, ५ वा वेतन आयोग व सोबत जोडलेले शासन निर्णय यांचे अवलोकन करता कनिष्ठ अभियंता व प्रोग्रामर या तांत्रिक पदासाठी खालीलप्रमाणे वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे.

| पदाचे नाव | ४ था वेतन आयोग | सुधारीत आदेश दि.१४ डिसेंबर, १९९५ | ५ वा वेतन आयोग |
|---|---|---|---|
| कनिष्ठ अभियंता/प्रोग्रामर | रु. १४००—४०—२३०० | रु. १६४०—६०—२६००—द. रो. ७५—२९०० लागु दि. १ जानेवारी, १९८६ | रु. ५५००—१७५—९००० |

सोबत जोडलेले शासन निर्णय, ४ था वेतन आयोग, ५ वा वेतन आयोग यांचे वेतननिश्चिती तक्ते यांचे अवलोकन करता कनिष्ठ अभियंता व प्रोग्रामर या तांत्रिक पदांसाठी सुधारीत वेतनश्रेणी रु. १६४०—६०—२६००—द.रो. ७५—२९०० व ५ व्या वेतन अयोगानुसार ५५००—१७५—९००० इतकी वेतननिश्चिती करणे योग्य वाटते व याबाबत कनिष्ठ अभियंता व प्रोग्रामर या तांत्रिक पदासाठी वरील सुधारीत वेतनश्रेणीनुसार देय वेतन हे शासन निर्णय व ५ वे वेतन आयोग यांच्या तरतुदीस अधिन राहुन देणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेचे मान्यतेसाठी सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६७ <u>दिनांक : १९/३/२००८</u>

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या शासन निर्णयाच्या सर्व अटी, शर्ती व निर्बंधानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता व प्रोग्रामर या तांत्रिक पदांसाठी ४ थ्या वेतन आयोगा अनुसार सुधारीत वेतन श्रेणी रु. १६४०—६०—२६००—द.रो. ७५—२९०० व ५ व्या वेतन आयोगानुसार रु. ५५००—१७५—९००० या वेतन निश्चितीस व त्या अनुषंगाने वरील सुधारीत वेतनश्रेणी अनुसार महापालिकेने कनिष्ठ अभियंता व प्रोग्रामर या संवर्गातील कर्मचा—यांना लाभ देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** केंद्र शासनाच्या निर्मल भारत अभियानाच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्या ''महानगर निर्मल अभियाना'' अंतर्गत उल्हासनगर

शहरात जुन्या सार्वजनिक शौचालयांची पुनर्बांधणी व नविन सार्वजनिक शौचालये बांधणे कामी मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, निर्मल महानगर अभियानामार्फत ही जी योजना मंजुर करण्यात आली आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे. त्या कामांतर्गत १० कोटी ३९ लाखाचे ३६ कार्यादेश तीन संस्थाना देण्यात आलेले आहेत. परंतु हया तीन संस्था अशा आहेत त्या फक्त नारळ फोडुन गेल्या आहेत. प्रत्यक्षात कोणतेही काम सुरु झालेले नाही. नगरसेवकांचा याच्याशी काही संबंध नाही. आमचे जे अधिकारी आहेत त्यांच्याकडे रोजच्या कामाचा अहवाल येत नाही. त्यामुळे रोज किती काम झाले, कुठपर्यंत काम पोहोचले हे कळत नाही. मात्र एमएमआरडीएच्या बैठकीत जावुन सांगतात की, आमच्या नगरसेवकांचे सहकार्य मिळत नाही. अदयापही ब–याचशा नगरसेवकांच्या प्रभागातील कामांची प्राकलने तयार करण्यात आलेली नाहीत. माझ्या प्रभागातील तीन कामांची प्राकलने मी तयार करण्यास सांगितले आहे. अदयापपर्यंत ती तयार करण्यात आलेली नाहीत. असे बरेचसे नगरसेवक आहेत ज्यांच्या प्रभागातील कामांची प्राकलने तयार करण्यात आलेली नाहीत. व ज्यांच्या प्रभागातील कामांचे कार्यादेश निर्गमित करण्यात आलेली आहेत त्याठिकाणी कामे सुरु झालेली नाहीत व ज्यांना काम देण्यात आलेले आहे ते काम दुस–यास देत सबलीस करत आहेत. समजा, दोनश रुपयामध्ये काम घेतले आहे तर तो ते काम १०० रुपयामध्ये सबलिस करत (दुस–यास देत आहेत) आहेत त्यामुळे कामाचा दर्जा बरोबर राहणार नाही. यासाठी आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे की, कामाच्या दर्जावर सुध्दा लक्ष ठेवावे. व ज्या नगरसेवकांच्या प्रभागातील कामाची प्राकलने तयार झाली नाहीत ती लवकरात लवकर तयार करणे कामी निर्देश दयावेत व ज्यांना कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत त्यांनी लवकरात लवकर काम चालु करावे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आता ९ व्या क्रमांकाचा हा जो विषय आता चर्चेस आला आहे. त्यामध्ये तफावत आहे. स्थानिक ठेकेदार यांना कमी दर दिल्यामुळे ते ठेकेदार प्रथम नारळ फोडतात आणि विचारतात की हे कशाप्रकारे चालले आहे. त्यांना ते परवडण्यासारखे नाही. त्यामुळे त्यांना असे वाटते की, महापालिकेचे शौचालय आपण कमी दराने बनवत आहोत. उल्हासनगर शहरात, काही प्रभागात उद्घाटन होवुन देखील काम तसेच पडुन आहे. खोदकाम झालेले आहे, खोदकाम होवुन तसेच राहिलेले आहे. त्यामुळे आयुक्त साहेबांनी याकडे लक्ष दयावे आणि त्यांची सभा बोलावुन त्यांच्याशी संपर्क साधुन, त्यांच्याशी चर्चा करुन विल्हेवाट लावावी तरच शहरातील कामे होतील आणि रस्ते तयार केले जातील. नाहीतर यापध्दतीने एकही काम होणार नाही आणि शहरामध्ये महापालिकेतर्फे जी कामे करण्यासाठी आपण सांगितलेले आहे, बोललेलो आहे त्याप्रमाणे जर झाले नाही तर सर्व ठपका प्रशासनावर व आयुक्तावर येणार आहे. आमच्या लोकप्रतिनिधींवर येणार नाही आम्ही वरती हात करणार. आम्हांला हे माहित नाही. हे जे माहित आहे ते आयुक्तांना माहित आहे. आम्हांला माहित नाही असे आम्ही लोकप्रतिनिधी साफ उत्तर देणार. तेव्हा ही गोष्ट आम्ही आयुक्त साहेबांच्या कानी या महासभेत टाकलेली आहे. याची तुम्ही तजविज करावी व तेवढा प्रश्न तडीस न्यावा ही विनंती.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> साहेब, याबाबतीत आपण बारकाईने लक्ष दिले पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे एमएमआरडीएने त्यांना ठेका दिलेला आहे. हे जे निर्मल आहेत, युवक आहेत, प्रतिष्ठान आहेत या लोकांनी तोच ठेका सब कॉन्ट्रेक्टर म्हणुन दुस–या ठेकेदारास दिलेला आहे. म्हणजे त्यांची जबाबदारी त्यांनी दुस–यावर सोपविली आहे तर याच्यावर देखील आपण लक्ष दिले पाहिजे. उदया आपण एवढया मोठा निधी आणत आहोत, तळमजला अधिक एक माळा असे शौचालय बांधत आहोत, उदया जर हे बांधकाम ढासळले तर त्याची जबाबदार कोणाची राहणार आहे? ते तर आपले हात झटकुन निघुन जातील.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>या निर्मल अभियानामार्फत सभागृहाच्या भावना आम्ही एमएमआरडीएला नक्की पोहोचवु आणि कार्यवाहीच्या अनुषंगाने एमएमआरडीएमध्ये देखिल दर पंधरा दिवसाला याचा आढावा घेतला जातो. आपण जे प्रश्न उपस्थित केले आहे किंवा आपल्या मनातील ज्या शंका आहेत त्याची नोंद आणि त्याच्यावरची कारवाई एमएमआरडीए मार्फत करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:–</u>आयुक्त साहेब, या ज्या तीन संस्था आहेत, स्पार्क, युवक आणि जनसेवा यांच्या एकएक व्यक्तीस येथे कार्यालयासाठी जागा दिली जावी. जेणेकरुन आम्हांस त्यांच्याशी विचार विनिमय करता येवु शकेल. या ज्या तीन संस्थांकडुन काम चालु आहे त्यांचा किमान एकएक प्रतिनीधी या महापालिकेत उपस्थित असला पाहिजे.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>**तशी त्यांना सूचना दिली जाईल. आपण आठवडयातील कोणतेही दोन दिवस निश्चित करुन दया, त्या दिवशी त्यांना उपस्थित राहण्यास सूचना दिल्या जातील.

**<u>महापालिका सचिव:–</u>**पास?

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९:–** केंद्र शासनाच्या निर्मल भारत अभियानाच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्या ''महानगर निर्मल अभियाना'' अंतर्गत उल्हासनगर शहरात जुन्या सार्वजनिक शौचालयांची पुनर्बांधणी व नविन सार्वजनिक शौचालये बांधणे कामी मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

केंद्र शासनाच्या निर्मल भारत अभियांनाच्या धर्तीवर मुंबई मेट्रोपोलिटन रिजनल डेव्हलपमेंट अथॉरिटी यांनी एमएमआर क्षेत्रामध्ये ''निर्मल महानगर अभियान'' राबविणेचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. या योजनेचा मुख्य उद्देश एमएमआर क्षेत्रातील शहरे हंगदारी मुक्त करणेचा आहे. त्यामुळे शहर उद्देशपूर्तीकरीता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये उक्त योजनेअंतर्गत सार्वजनिक शौचालये, सार्वजनिक मुता–या व लो कॉस्ट सॅनिटेशन कार्यक्रम राबविणेसाठी १०० टक्के अर्थसहाय्य एमएमआरडीए पुरविणार आहे. या योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरासाठी आवश्यक असणा–या नविन सार्वजनिक शौचालये, नविन सार्वजनिक मुता–या, अस्तित्वातील जीर्ण झालेल्या सार्वजनिक शौचालय/ मुता–या यांची पुर्नबांधणी व लो कॉस्ट सॅनिटेशन अंतर्गत वैयक्तीक शौचालये याबाबतचा सविस्तर तपशिल सादर करणेकरीता महानगर प्राधिकरणाने महानगरपालिकेस कळविले आहे.

मुंबई मेट्रोपोलिटन रिजनल डेव्हलपमेंट अथॉरिटी यांनी उक्त कार्यक्रम हा लोक सहभागातून राबविणेबाबत प्रस्तावित केलेला असून, जागतिक बॅकेच्या झोपडपट्टी स्वच्छता योजनेचे स्वरुप व मार्गदर्शन तत्वे तसेच शासनाने दिनांक ३० ऑगस्ट, २००१ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे विचारात घेणेबाबत सूचित केलेले आहे. त्याप्रमाणे सदर योजना राबविणेकरीता महानगर आयुक्त यांना संपूर्ण अधिकार प्राधिकरणाने दिलेले आहेत. त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आवश्यक असलेल्या सार्वजनिक शौचलयाबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

प्राथमिक सर्व्हेक्षण अहवालानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अस्तित्वातील जीर्ण झालेली ए. पी.युनिट पध्दतीची सुमारे ८००० सीटसची शौचालये आहेत. त्यापैकी २३०० सीटसचे पुर्नबांधकाम या योजनेअंतर्गत करण्याकरीता उल्हासनगर महानगरपालिकेत प्रस्ताव एमएमआरडीएकडे पाठविला होता. (जुने तोडून आहे त्याठिकाणी नविन बांधणे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.) त्याशिवाय जागा उपलब्ध होत असल्यास नव्याने शौचालय बांधणे आहेत. सदरहू योजनेअंतर्गत सार्वजनिक शौचालये बांधणेच्या कामाचा संपूर्ण खर्चाकरीता एमएमआरडीएमार्फत अर्थसहाय्य देण्यात येणार असून, याकरीता उल्हासनगर महानगरपालिकेने जमीन, विज पुरवठा व पाणी पुरवठा द्यावयाचा आहे. (लो कॉस्ट सॅनिटेशन कार्यक्रमांतर्गत काही ठिकाणी वैयक्तीक जागेवर वैयक्तिक शौचालय अनुदाना अंतर्गत बांधण्यात येतील.)

एमएमआरडीए ने या योजनेच्या अंमलबजावणीकरीता कार्यपध्दती विहित केलेली आहे. या कार्यपध्दतीनुसार त्यांचेमार्फत उल्हासनगर शहराकरीता तीन सेवाभावी संस्थांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या सेवाभावी संस्थांनी शौचालयाच्या जागा महानगरपालिकेच्या सहकार्याने व मान्यतेने निश्चित करुन शौचालयाच्या सभोवताली राहण–या रहिवाशांचा कम्युनिटी बेस्ड ऑरगनाइझेशन गट तयार करुन त्यांचे रजिस्ट्रेशन चॅरीटेबल ट्रस्ट कडून करुन घेणे व महानगरपालिकेशी करारनामा करणे इत्यादी अभिप्रेत आहे. निश्चित केलेल्या जागेवर परिसरातील लोकसंख्येनुसार आवश्यक क्षमतेचे म्हणजे ६ सिटस्/१० सिटस्/२० सिट्स/३० सिट्स किंवा त्यापेक्षा जास्त आवश्यक असल्यास बहुमजली शौचालय बांधणे करीता आर्किटेक्ट

तर्फे नकाशे, प्राकलने तयार करुन त्यास महानगरपालिकेने मान्यता दिल्यानंतर महानगरपालिकेने एन जी ओ च्या नावे कार्यारंभ आदेश निर्गमित करणे, काम पूर्ण झाल्यानंतर सदर शौचालय सी बी ओ कडे हस्तांतरीत करणे.

पुनर्बांधणी/नव्याने बांधणी प्रस्तावित केलेल्या सार्वजनिक शौचालयांमध्ये शौचालय सिट्स,बाथरुम, केअरटेकर रुम, लहान मुलांना शौचास बसण्याकरीता ओटे, जमिनीत छतावर पाण्याची टाकी, प्लंबिंग, विदयुतीकरण, डॅडो, बाहय डॅडोकरीता ग्रॅनाईट, कोटा फ्लोअरींग, एम कमोड, रॅम्प इत्यादी सुविधा पुरविणे प्रस्तावित आहे. वरीलप्रमाणे अंदाजित खर्चामध्ये २.५० टक्के एस्टाब्लिशमेंट २.५ टक्के व सल्लागार फी, ५ टक्के कॉटीनजेन्सीज इत्यादी खर्च समाविष्ट आहेत.

एमएमआरडीए यांनी प्रस्तावित केलेल्या निर्मल एमएमआर अभियान या महत्वाकांक्षी योजने अंतर्गत ''निर्मल उल्हासनगर अभियान'' योजना राबविणेकरीता सार्वजनिक शौचालये बांधणे / पुर्नबांधणी / वैयक्तिक शौचालय करणे करीताचा प्रस्ताव एमएमआरडीए यांच्या १०० टक्के अर्थसहाय्याने राबविणेस सदर सार्वजनिक शौचालयाकरीता जमीन, विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा देणेबाबत प्रस्तावास ही महासभा मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे सदर योजलेच्या अनुषंगाने एमएमआरडीए यांचे संयुक्त विद्यमाने सर्व्हेक्षण करणे, योजना राबविणे करीता NGO/CBO ची निवड करणे, एमएमआरडीए यांच्या संयुक्त विद्यमाने योजनेच्या अनुषंगाने पत्रव्यवहार करणे, करार करणे तसेच करारातील अटी/शर्तीनुसार कामे करणे इत्यादीबाबतचे सर्वाधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस महासभेची मान्यता मिळणेस प्रस्तावित आहे.

मात्र प्रत्येक शौचालयाच्या कामांची संविदा स्थायी समितीच्या निदर्शनास आणण्यात यावे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६८ <u>दिनांक : १९/३/२००८</u>

सुचकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती सुरेखा वेलकर

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांनी प्रस्तावित केलेल्या निर्मल एमएमआर अभियान या योजने अंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधणे, पुर्नबांधणी व वैयक्तीक शौचालय बांधणेकामी जमिन विद्युत पुरवठा व पाणी या बाबी महानगरपालिकेने पुरवुन उल्हासनगर मुं.प्रा.वि.प्रा. यांच्या १०० टक्के अर्थसहाय्याने निर्मल योजना राबविणेस मान्यता देत आहे व त्यासंबंधी कोणत्याही कर्तव्याची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी असलेले संपुर्ण कार्यकारी अधिकार आयुक्तांकडे निहित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे, श्रीमती विद्या निर्मले, श्रीमती ज्योती माने, श्रीमती वसुधा बोडारे, श्रीमती राजश्री चौधरी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १०** :— वाटर सप्लाय कम्पाऊन्ड, स्मशान भुमी समोर, उल्हासनगर—४ येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील मोकळया भुखंडावर भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावळ सहीत रचना शिल्प तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उभे शिल्प बसविणेस मान्यता देणे.

-----------------------------------------------------------------------

काही सदस्य :—पास—पास......

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. १०:—** वाटर सप्लाय कम्पाऊन्ड, स्मशान भुमी समोर, उल्हासनगर—४ येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील मोकळया भुखंडावर भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावळ सहीत रचना शिल्प तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उभे शिल्प बसविणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

मा. महापौर सो. यांनी त्यांचे संदर्भित पत्र क्र. १ अन्वये भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावळ सहित रचना शिल्प तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उभे शिल्प बसविण्याबाबत सुचित केले आहे. सदर पत्रात शिल्पकार श्री. उत्तम पाचारणे यांनी महाराष्ट्रामध्ये विविध ठिकाणी थोर पुरुषांच्या शिल्पाकृती बनविलेल्या असून सदर शिल्पांपैकी भगवान गौतम बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ब्रांझ धातूमधील पुतळयास शासकिय व कलासंचालनालयाची मान्यता मिळालेली असल्याने सदरचे पुतळे उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील वॉटर सप्लाय कंपाउंड, कुर्ला कॅम्प, स्मशानभुमी समोर, उल्हासनगर—४ येथिल महानगरपालिकेच्या ताब्यातील मोकळया भूखंडावर बसविणेची मागणी पत्राद्वारे केली आहे.

श्री. उत्तम पाचारणे, सभासद, नॅशनल ललित कला ॲकडमी, न्यु. दिल्ली यांनी त्यांचे दिनांक १७/५/२००७ चे पत्र मा. महापौर यांचे पत्रासोबत दिले असून त्याप्रमाणे भगवान गौतम बुध्द यांची प्रतिमा प्रभावळ मागे व बसविलेली मुद्रा असलेल्या प्रतिमेची उंची ६ फुट एवढी असून त्यांची ब्रांझ धातूमधील सध्याची एकूण किमान किंमत रुपये ७,२५,०००/— एवढी दिलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिल्पाची उंची ८' फुट ३'' उंचीच्या पुतळयाची किंमत ही रुपये ७,००,०००/— एवढी दिलेली आहे. सदरचे दोन्ही पुतळे हे ब्रांझ धातुमधील असून दोन्ही शिल्पांना कला संचानालयामार्फत शासनाची मान्यता प्राप्त झाली असल्याचे त्यांचे पत्रात नमुद आहे तथापी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे सदर दोन्ही पुतळे महानगरपालिकेच्या नियोजित जागेवर बसविणे असल्यास शासन मार्गदर्शक तत्वांप्रमाणे विविध शासकिय विभागाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

वॉटर सप्लाय कंपाउंड, कुर्ला कॅम्प, स्मशान भुमी समोर, उल्हासनगर—४ ही जागा ओपन स्पेस असल्याचे नगररचनाकार यांचे अभिप्राय आहेत. सदर ठिकाणी संरक्षण भिंत बांधलेली आहे. सदर जागा रस्त्याच्या १० ते १२ फुट खाली आहे. त्यामुळे या जागेवर उदयान तयार करणे व सुशोभिकरण करणेकरीता अंदाजे रु. ८.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. तसेच पुतळे बसविण्याचा चबुतरा तयार करणेकरीता २.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. तथापी हा सर्व खर्च योजनेच्या सविस्तर प्राकलनानुसार असणार आहे.

महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक स्मारक ३१०२/८८४/प्र.क्र. १२२/२००२/२९, दिनांक २/२/२००५ अन्वये पुतळे उभारणेकरीता खालील १६ मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे.

१. कोणतीही व्यक्ती /संघटना/संस्था, शासनाच्या/स्थानिक नोंदणीकृत संस्थेच्या/ग्रामपंचायतीच्या/नगरपालिकेच्या/महानगरपालिकेच्या/निमशासकिय संस्थेच्या मालकीच्या जागेवर शासनाच्या परवानगी शिवाय पुतळे उभारु शकणार नाही.

२. पुतळे उभारणेच्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद नसावा. ती जागा अनधिकृत किंवा अधिक्रमित केलेली नसावी. जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधित पुतळा बसविणा—या समितीने कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. पुतळा बसविणा—या समितीने पुतळयाच्या चबुत—यांचे मोजमापे, आराखडा, पुतळयाच्या साईट प्लॅन, पुतळा ज्या धातू/साहित्यापासून तयार करण्यात येणार आहे. त्या धातू/साहित्यांचे प्रमाण पुतळयांचे वजन, उंची व रंग याचा तपशिल पुतळयाच्या रेखाचित्रासोबत मुख्य वास्तू शास्त्रज्ञ महाराष्ट्र राज्य यांना सादर करुन त्यांची मान्यता घेवुन प्रस्तावासोबत सादर केली पाहिजे.

४. पुतळा उभारणा–या संस्थेने पुतळयाच्या क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घ्यावी व ती प्रस्तावासोबत जोडावी.

५. पुतळे उभारतांना जागेचे स्थान महत्व लक्षात घेण्यात यावे व शहराच्या सौंदर्यात बाधा येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

६. पुतळा उभारल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, स्थानिक वाद किंवा जातीय तणाव वाढणार नाही याबाबत सविस्तर चौकशी करुन संबंधित पोलिस कार्यालय प्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच पुतळा उभारण्यासाठी अल्पसंख्याकांची/लोकांची इच्छा लक्षात घेणे आवश्यक असल्याने त्याचा उल्लेख देखील उपरोक्त ना हरकत प्रमाणपत्रात असणे आवश्यक आहे.

७. स्थानिक स्वराज्य संस्था/निमशासकिय संस्था/शासकिय कार्यालय यामध्ये पुतळा उभारावयाचा झाल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकिय विभागाकडून घेतलेले ना हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत असावे.

८. स्थानिक स्वराज्य संस्था यांनी पुतळा उभारण्याबाबत आवश्यक तो ठराव करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

९. पुतळा उभारल्यामुळे वाहतूकीस व रहदारीस अडथळा होणार नाही याबाबतचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडावे.

१०.भविष्यात रस्ते रुंदीकरण वा अन्य विकास कामामुळे पुतळे हलविण्याचा प्रसंग आल्यास त्यास पुतळा उभारणा–या संस्थेचा विरोध राहणार नाही व संबंधित संस्था पुतळा हलविण्याबाबत सर्व खर्च व कार्यवाही करेल असे शपथपत्र घेण्यात यावे.

११.पुतळयाची देखभाल मांगल्य व पवित्र राखण्याची जबाबदारी पुतळा उभारणा–या संस्थेवर राहिल. संस्थेकडून तसे करारपत्र लिहून घेण्यात यावे.

१२.पुतळा उभारण्याबाबत संबंधित पुतळा उभारणारी संस्था सर्व दृष्टीकोनातून सक्षम आहे काय याची छाननी करण्यात यावी.

१३.पुतळयासंबंधीचा सर्व खर्च पुतळा उभारणारी संस्था करील व शासनाकडे कोणत्याही निधीची मागणी करणार नाही असे वचनपत्र संस्थेकडुन घ्यावे.

१४.शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय एखादया व्यक्तीने/संस्थेने/समितीने पुतळा उभारलयास अशा व्यक्ती/संस्था/समितीवर कार्यवाही करण्यात यावी व अशा प्रकरणात जिल्हाधिकारी विहित करतील त्यानुसार दंड आकारण्यात यावा.

१५.पुतळयाला मान्यता देतांना जिल्हाधिका–यांच्या अध्यक्षतेखाली समितीने महसूल व वनविभाग, गृहविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रमविकास जलसंधारण विभाग यांनी निर्गमित केलेल्या शासन आदेश/परिपत्रक यातील सुचना लक्षात घ्याव्यात व त्या संदर्भातील आपले अभिप्राय स्पष्टपणे व्यक्त करावेत.

१६.पुतळा उभारण्यास अनुमती दयावी किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची शिफारस स्पष्टपणे शासनास कळविण्यात यावी व त्या मागील कारणमिमांसा देण्यात यावी.

तरी उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील वॉटर सप्लाय कंपाउंड, कुर्ला कॅम्प, स्मशानभुमी समोर, उल्हासनगर–४ येथिल पाणी पुरवठा विभागाचा मोकळा भूखंड उदयानाकरीता विकसित करुन त्याठिकाणी भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावळ सहित रचना शिल्प तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उभे शिल्प उपरोक्त बाबींची पूर्तता व संबंधित शासकिय विभागांकडून ना हरकत घेवून बसविणेस मान्यता मिळणेस मा. महासभेच्या पटलावर ठेवणेस प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६९ <u>दिनांक : १९/३/२००८</u>

सुचकाचे नाव :– श्री. विनोद ठाकुर

अनुमोदकाचे नाव :–श्रीमती सुरेखा वेलकर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या सर्व निर्बध्द मर्यादा व शर्तीस अधिन राहुन उल्हासनगर महानगरपालिका हद्दतील वॉटर सप्लाय कंपाउंड, कुर्ला कॅम्प, स्मशान भुती, उल्हासनगर–४ येथिल पाणी पुरवठा विभागाच्या मोकळा भुखंड उदयानाकरीता विकसित करणे व त्या ठिकाणी भगवान गौतम बुध्द यांची प्रवचन, बैठक मुद्रा व पाठीमागे प्रभावलीसहीत रचना शिल्प तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उभे शिल्प बसविणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११** :– पुरग्रस्त महापालिका अधिकारी व कर्मचा–यांना दोंन महिन्याचे अग्रिम वेतनापोटी अदा करण्यांत आलेली रक्कम त्यांच्या पगारातून १२ हप्त्यांमध्ये वसुल करणेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>सन्माननिय महापौरजी आणि आयुक्त साहेब, पुरग्रस्त महापालिका अधिकारी व कर्मचा–यांना दोंन महिन्याचे अग्रिम वेतनापोटी अदा करण्यांत आलेली रक्कम त्यांच्या पगारातून १२ हप्त्यांमध्ये वसुल करणेस मान्यता देणे हा जो विषय आलेला आहे त्याबाबत मला असे म्हणायचे आहे, २००५ मध्ये या उल्हासनगर शहरामध्ये फार मोठा पुर आला होता आणि त्यामध्ये ब–याचशा झोपडपट्टयांमध्ये मोठया प्रमाणावर नुकसान झाले आणि नुकसान झाल्यावर आपल्या महापालिकेने फार उशिरा सबंधित अधिकारी, कर्मचा–यांना अनुदान दिले. आणि ते ३६ हफ्त्यांमध्ये वसुल करणार होते ते आता तुम्ही १२ महिन्यामध्ये वसुल करण्याचे प्रस्तावित केले आहे. बिचारे कर्मचारी व्याजाने पैसे काढुन आपले घर चालवितात आणि पुन्हा तुम्ही जर त्यांच्यावर ही वेळ आणली तर ते ठार होतील त्यांच्याकडे घर चालविण्यासाठी अजिबात पैसा राहणार नाही. आणि म्हणुन ज्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने, केंद्र शासनाने शेतक–यांचा प्रश्न घसास लावण्यासाठी त्यांना कर्ज माफी दिली आहे. त्यानुसार मी असे म्हणतो की या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ज्या कर्मचा–यांना तुम्ही अग्रिम वेतन दिले आहे, ते त्यांना माफ करावे. अशी मी आपणांस आणि संपुर्ण सभागृहास विनंती करतो या कर्मचा–यांकडुन ही रक्कम वुसल करुन जास्तीत जास्त किती एवढी रक्कम वसुल होणार आहे? त्यापेक्षा ही रक्कम माफ करावी कारण २००५ मध्ये या शहरात महापूर आला होता आणि त्याच्यामध्ये फार नुकसान झाले आहे. आणि त्या नुकसानी पोटी जर महानगरपालिकेने काही दिले असेल तर ते पुन्हा मागु नये. ते माफ करावे. जसे महाराष्ट्र शासनाच्या, केंद्र शासनाच्या निर्णयामुळे शेतकरी खुष झाले आहेत, सर्व राजकिय पक्ष खुष झाले आहेत. त्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्मचा–यांना सुध्दा खुष केले जावे एवढीच विनंती करतो जय हिंद।

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>मा. महापौरजी, श्री. मोरे साहेब सांगतात तशा प्रकारची स्थिती आपल्या महापालिकेतील कर्मचा–यांची नाही. सर्व कर्मचारी खुष आहेत. महापौर साहेब आपणांस विनंती आहे की, ही अग्रिम रक्कम १२ महिन्यात वसुल करण्याचे आयुक्त साहेबांनी लिहिले आहे त्याऐवजी २४ महिन्यात ती वसुल करावी.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मी विचार करतो की, जर महापालिकेला पैसाच पाहिजे तर आम्ही सन्माननिय सदस्य आमचे मानधन देण्यास तयार आहेत. मी तर माझे मानधन देण्यास तयार आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>श्री. मोरे साहेबांना पाचही वर्षाचे मानधन देवु नका.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>आमचे सभागृह नेता म्हणतात की, कर्मचा–यांकडुन ही रक्कम वसुल केलीच पाहिजे हे त्यांचे म्हणणे बरोबर नाही.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>** हे जे दोन महिन्याचे अग्रिम वेतन देंण्यात आले होते ते शासन निर्णयानुसार देण्यात आले होते. आणि ते परत घेणे हे शासनाच्या आदेशानुसार आवश्यक आहे. त्यात सुट देता येणार नाही. प्रस्तावात सुधारणा सुचविल्याप्रमाणे प्रशासन सुध्दा १२ महिन्याऐवजी २४ महिन्यात ही रक्कम वसुल करण्यास तयार आहे.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>**आयुक्त साहेब, तुम्ही या महासभेत ठराव पारीत करुन तो शासनास पाठवा. शेतक—यांचा प्रश्न घशास लावला आहे, महामंडळाचे कर्ज देखिल माफ होते. मग उल्हासनगर महानगरपालिकेच्या कर्मचा—यांचे अग्रिम वेतन का माफ होत नाही?

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>**श्री. मोरे साहेबांचे मानधन दयायचे नाही त्यांचे मानधन महापालिकेत जमा करायचे?

**<u>महापालिका सचिव :—</u>**२४ हफ्त्यांमध्ये ही रक्कम परत घ्यायची ना? पास?

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ११:—** पुरग्रस्त महापालिका अधिकारी व कर्मचा—यांना दोंन महिन्याचे अग्रिम वेतनापोटी अदा करण्यांत आलेली रक्कम त्यांच्या पगारातून १२ हप्त्यांमध्ये वसुल करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहर हे उल्हास व वालधुनी नदी काठावर वसलेले असून शहराचे एकुण क्षेत्रफळ १३ चौ. कि.मी. इतके आहे. सदर शहराची लोकसंख्या ४.७२ लाख असून वालधुनी नदी शहराच्या माध्यमातुन वाहत आहे.

दिनांक २५ ते २६ जुलै, २००५ या दरम्यान मुसळधार अतिवृष्टीमुळे वालधुनी नदीवरील चिखलोली धरण व उल्हासनदी वरील बारवी धरणाच्या साठयात वाढ झाल्याने धरणातून सोडण्यात येणारे पाणी व अरबी समुद्रातील खाडीला येणारी भरतीची वेळ एक होवून उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील भाग जलमय होवून संपर्ण जगजीवन विस्कळीत झाले होते.

अशा परिस्थितीतील महाराष्ट्र शासन, साप्रवि, शासन परिपत्रक क्रमांक सीएमएफ/१००५/प्र.क्र. /५४/०५/१६—अ, मंत्रालय मुंबई, दिनांक २३ ऑगस्ट, २००५ अन्वये शासनाने राज्यातील शासकिय / निमशासकिय, जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपरिषद इत्यादी कर्मचारी की, ज्यांचे दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच पुरामूळे, भुख्खलनामूळे, मनुष्य व वित्ती व मालमत्तेचे नुकसान झाले आहे, अशा अधिकारी/ कर्मचा—यांना ३ महिन्याचे पुर्ण वेतनाची अग्रिम रक्कम बिनव्याजी देण्याचा निर्णय घेतला होता. सदर अग्रिम सप्टेंबर, २००५ अखेरपर्यंत देण्यात येवून त्याची वसुली जानेवारी, २००६ पासून समान ३६ सलग मासिक हप्त्यामध्ये करण्यात यावी असे आदेशीत करण्यात आले होते.

त्यानुषंगाने पुराने बाधित अधिकारी/कर्मचा—यांना मदत म्हणुन वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेच्या हेतुने उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र. ६०, दिनांक १९/९/२००५ अन्वये पारीत करुन ३ महिन्याचे अग्रिम वेतन बिनव्याजी देण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार पुराने बाधित असलेल्या उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/ कर्मचा—यांना एकुण तीन हप्त्यात रक्कम अदा करण्याचे ठरले व त्यानुसार पहिला व दुस—या हप्त्याची अंदाजे एकुण रक्कम रुपये १,५३,५७,७००/— (एक कोटी त्रेपन्न लाख सत्तावन हजार सातेशे फक्त) अधिकारी/कर्मचारी यांना अदा करण्यात आली.

उर्वरित तिस—या हप्त्याची रक्कम देणे प्रलंबित असून सदर घटनेस २ वर्ष उलटून गेलेले आहेत तसेच अंदाजपत्रकात करण्यात आलेली तरतूदही संपली आहे. शिवाय महापालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने तिस—या हप्त्याची रक्कम अदा करणे शक्य नाही. तसेच ज्या कारणासाठी अग्रिम दयायचे होते, ते प्रयोजन (पुरस्थिती) आता शिल्लक नाही.

सबब उपरोक्त आदेशान्वये अधिकारी/कर्मचारी यांना तीन महिन्याचे अग्रिम वेतनापोटी देण्यात आलेली दोन हप्त्याची रक्कम आता वसूल करणे आवश्यक असून महापालिका अधिकारी/कर्मचारी यांच्या दरमहा पगारातून सलग १२ हप्त्यांमध्ये रक्कम वसूल करणेची परवानगी मिळणेस मा. महासभेपुढे ठेवणेसाठी प्रस्तावित करीत आहे.

महासभा ठराव क्र: ७० दिनांक : १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता पुरग्रस्त महापालिका अधिकारी व कर्मचा—यांना दोंन महिन्याचे अग्रिम वेतनापोटी अदा करण्यांत आलेली रक्कम त्यांच्या पगारातून २४ हप्त्यांमध्ये वसुल करणेस मान्यता देत आहे.
ख्छ

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२** :— श्रीम. भगवंती रूपचंदानी सेवा सोसायटीस शहीद हेमु कालानी ग्रंथालय, वाचनालय चालविण्यास स्वामी शांतीप्रकाश गार्डन मधील रूम भाडयाने देणेस मान्यता देणे

---

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—थांबा, थांबा हा विषय पास नका करु. हे जे हेमु कालानी नावाचे कुठले वाचनालय आहे, त्या वाचनालयाला १०० रु. भाडे. साहेब, मी उल्हासनगर मध्ये पाहत आलो आहे गोल मैदान रोटरी क्लबला १०० रुपये भाडयाने दिले आहे. चहाची कॅटीन अडीचशे रुपये भाडे? तर काय १०० आणि २५० रुपयाचे वर भाडे नाहीच आहे काय? गोल मैदान रोटरी क्लबला १०० रु. भाडयाने दिले आहे. ते एवढे मोठे मैदान आहे, ते लोक स्वत: महिन्याला २५,०००/— रुपये कमवतात आणि ते फक्त आपणांस १०० रुपये भाडे देतात. भगवंती स्टेजच्या बाजुला एक मोठे गार्डन आहे ते भाडयानें दिले आहे ते सुध्दा १०० रुपये भाडयाने दिले आहे, हे काय चालले आहे साहेब? हेमु कालानी वाचनालय जे आहे ते फक्त १०० रुपये भाडयाने देणार काय? मग यापुढे जी काही उदयाने उरलेली आहेत ती आम्हांला सुध्दा १०० रुपये भाडयाने दया?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—साहेब, भाडयाविषयी विचार केला पाहिजे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—साहेब, १०० रुपये भाडे याबाबतीत विचार केला पाहिजे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—श्री. रविंद्र बागुल यांना माहित नसेल, शहीद दुनिचंद कालानी विद्यालय किती भाडयाने देण्यात आलेले आहे?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :— नाही.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—वर्षाला एक रुपया भाडयाने देण्यात आलेले आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—होय साहेब, याबाबतचा ही मुद्दा आपण उपस्थित करा.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—दुनिचंद कालानी विद्यालयासाठी वर्षाला एक रुपया भाडे निश्चित केले आहे त्याच्याबद्दल सुध्दा विचारणा केली जावी.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:—आता कुठे आम्हांला माहित पडले आहे की, त्या जागेचे भाडे १०० रुपये आहे म्हणुन त्यावर आम्ही विचारणा केली साहेब. त्या जागेची बाजारभावानुसारची किंमत किती आहे? प्रभात टॉकीजच्या बाजुला जे वाचनालय आहे त्या जागेची किंमत किती आहे? त्याप्रमाणे तर भाडे आकारा?

सदस्य श्री. लाल पंजाबी :—मी दोन मुद्दे स्पष्ट करत आहे. हेमु कालानी नावाने जे वाचनालय आहे ते काही फार मोठे वाचनालय नाही. दहा बाय दहा एकुण १०० चौरस फूटाची खोली आहे व ती सुध्दा त्या संस्थेने बांधली आहे. आणि ते वाचलनालय सिंधी साहित्याचे आहे. त्यामुळे भाडयाचा तर काही प्रश्नच उद्भवत नाही. नाममात्र भाडे आकारले आहे. दुनिचंद कालानी विद्यालयासाठी १ रु भाडयाने जी एवढी मोठी जागा दिली आहे, आणि ही तर फक्त एक लहानशी रुम आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आयुक्त साहेब, गोल मैदान रोटरी क्लब साठी फक्त १०० रुपये भाडयावर दिलेले आहे. फक्त १०० रुपये भाडयाने दिलेले आहे आज ती किती मोठी जागा आहे. बासुरी हॉटेलच्या समोर आणि त्यामध्ये मोठ मोठया लोकांनी पाळणे लावलेले आहेत आणि महिन्याला पंचवीस हजार रुपयाचे उत्पन्न ते घेत आहेत.

मा. सदस्य श्री. जनार्दन ढोके हे सभागृहातुन बाहेर गेले. 

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):— चालु बाजार किंमतीप्रमाणे भाडे आकारण्यात यावे असा प्रशासनामार्फत प्रस्ताव आहे निर्णय सभागृहाने घ्यावा.

सदस्य श्री. दिलिप गायकवाड:—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब वाचनालयाच्या रुपाने लोकांना शिकण्यासाठी काहीतरी मिळत आहे. आणि त्यासाठी सुध्दा १०० रुपये भाडे आकारण्यात आले आहे. मी तर असे म्हणेन की आपण कोणतेही भाडे आकारले नाही पाहिजे. परंतु दुनिचंद कालानी कॉलेजसाठी जी जागा देण्यात आलेली आहे तिचे वर्षाला १०० रुपये भाडे घेतले जाते या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांकडुन लाखो रुपये प्रवेश शुल्काच्या रुपाने घेतले जातात. अशा ठिकाणी तुम्ही जर जास्त भाडे आकारले तर काही हरकत नाही. शहरातील विदयार्थ्यांना व नागरीकांना नि:शुल्क वाचनालय महापालिकेकडुन उपलब्ध करुन देण्यात यावे. अशी मी आपणांस विनंती करतो, धन्यवाद।

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आयुक्त साहेब, त्या संस्थेमध्ये कोण कोण आहेत? ती संस्था कोण चालवते? तीचे अध्यक्ष वगैरे कोण आहेत त्याची माहिती पाहिजे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—बागुल साहेब, जावु दया ट्रस्ट आहे ती आणि लोकांसाठी नि:शुल्क असे वाचलनालय आहे. आपण त्यास सहकार्य केले तर बरे होईल.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—नाही,नाही उल्हासनगरमधील जेवढी काही मोकळी जागा आहे ती सगळीच १०० रुपये भाडयाने दया.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—नाही, ही ट्रस्ट आहे, वाचनालय आहे, आपले लोक वाचतील, शिकतील, पुढे येतील.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आपल्या येथिल कोणीही लोक तेथे जात नाहीत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—ठिक आहे, तुम्ही तरी शिका, वाचा.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—**अहो, तुम्ही तर म्हणतात की कर्मचा—यांकडुन अग्रिम रक्कम वसुल करा आणि वाचनालयास फुकट जागा दया असे म्हणतात? हे चुकीचे आहे, चुकीचे आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**हे एक छोटेसे वाचलनालय आहे, अनेक वर्षापासुन ते तिथे चालु आहे. एक लहानसा रुम आहे. सकाळी आणि संध्याकाळी तेथे बरेचसे लोक येतात. वर्तमानपत्रे, मासिके वाचतात. त्यांना काही त्यातुन उत्पन्न नाही. वर्तमानपत्रांचा खर्च ते स्वतः करतात. माझी इच्छा आहे की हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत करावा. सर्व संमतीने होत नसेल तर यावर मतदान घेतले जावे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**अहो, सभागृहनेता ऐकुन घ्या, त्यामध्ये आणखी काही व्यवसाय चालवत असतील तर ते तुम्हांला माहित आहे काय? आमचा या प्रस्तावास विरोध आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मतदान घ्या, मतदान घ्या.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**मतदान घ्या.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**अहो, श्री. मोरे साहेब हा प्रस्ताव पास करु दया. १० बाय १० ची खोली आहे.

**सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—**श्री. मोरे यांना मी एक दुसरा पर्याय देवु इच्छितो. या १० बाय १० च्या रुमचे जेवढे भाडे आपण निश्चित कराल त्याच प्रकारचे भाडे दुनिचंद कालानी कॉलेजची एकुण जेवढी जागा आहे त्यानुसार निश्चित केले जावे.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**श्री. मोरे साहेब आपल्याला एक विनंती करतो, परमपुज्य नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वाचण्याला, शिकण्याला फार महत्व दिलेले आहे. आणि त्या वाचनालयामध्ये सुध्दा असेच लोक जातात. तर त्यांना आपण प्राधान्य दिले पाहिजे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**त्या वाचनालयामध्ये कोणती पुस्तके ठेवली आहेत ते सांगीतले जावे.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**पुस्तके ठेवली जातील ना, का नाही ठेवणार?

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पुस्तके ठेवणार नाहीत?

**सदस्य श्री. प्रशांत धांडे :—**मी तर म्हणतो आपण विरोध केला नाही पाहिजे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**आमचा विरोध आहे, विरोध आहे.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मतदान घ्या.

**महापालिका सचिव :—**जे सन्माननिय सदस्य हा प्रस्ताव पारीत करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.



**प्रस्ताव पारीत करण्याच्या बाजुने २९ मते**

१ श्री. सुरेश मधुकर जाधव
२ श्री. ठाकूर विनोद लालसिंग
३ श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी
४ श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी
५ श्री. प्रशांत किशनराव धांडे
६ श्री. राम (चार्ली) फुंदुमल पारवानी
७ श्री. हरेश परमानंद जग्यासी
८ श्री. लाल देवनदास पंजाबी
९ श्री. बच्चाराम रूपचंदानी
१० श्री. सुखरामानी महेश पहलाजराय

११ कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल
१२ श्रीमती शकुंतला पाटील
१३ श्री. किशोर जग्यासी
१४ श्री. चव्हाण रमेश महादेव
१५ श्री. बोडारे धनंजय बाबूराव
१६ श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज)
१७ श्री. राजेश देवेंद्र वानखेडे
१८ श्री. रामसागर जनार्दन यादव
१९ श्री. गायकवाड दिलीप
२० श्रीमती मीना सोनेजी (सोंडे)
२१ श्री. मुकेश सोहन तेजी
२२ श्री. विजय खंडु सुपाळे
२३ श्री. शेखर केशव यादव
२४ श्री. पाटील प्रधान धर्मा
२५ श्री. मोहन साधवानी
२६ श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा
२७ श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास
२८ श्रीमती रजनी महाडिक
२९ श्री. लालबिहारी यादव

<u>महापालिका सचिव :–</u>जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात १६ मते</u>

१ श्री. मोरे भानजी भिकाजी
२ श्रीमती पंचशिला नाना पवार
३ श्रीमती लता शांताराम निकम
४ श्रीमती सुमन गजानन शेळके
५ श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील
६ श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे
७ श्री. राजू जग्यासी
८ श्रीमती वेलकर सुरेखा राजन
९ श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती
१० श्रीमती सुजाता रमेश रिझवानी
११ श्री. एडके गणपत गोविंद
१२ श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी
१३ श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री)
१४ श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी
१५ श्री. नीलु ठाकुर चांदवाणी
१६ श्री. रविंद्र दशरथ बागूल

<u>उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १२:—** श्रीम. भगवंती रूपचंदानी सेवा सोसायटीस शहीद हेमु कालानी ग्रंथालय, वाचनालय चालविण्यास स्वामी शांतीप्रकाश गार्डन मधील रूम भाडयाने देणेस मान्यता देणे

प्रस्तावना

श्री. संजय तलरेजा, सेक्रेटरी, श्रीम. भगवंती रुपचंदानी सेवा सोसायटीस ब्लॉक नं. ए—६९८/१३९६, नेताजी हायस्कुल मागे, उल्हासनगर—५ यांनी स्वामी शांतीप्रकाश गार्डन मधील रुम, प्रभात सिनेमा मागे, उल्हासनगर—५ येथे नागरीकांच्या सोयीकरीता शहीद हेमु कालानी ग्रंथालय व वाचनालय करीता प्रतिवर्षी नाममात्र रक्कम रु. १००/— प्रमाणे १० वर्षाकरीता मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये

ब) आयुक्तांस स्थायी समितीच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या जंगम मालमत्तेचे मुल्य पाच हजार रुपयांहुन अधिक असेल अशा कोणत्याही जंगम मालमत्तेच्या विनियोग विक्री करुन, भाडयाने देवून किंवा अन्य प्रकारे करता येईल आणि त्यास उपरोक्त असा कोणताही हक्क धरुन, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतेही हक्क धरुन महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षाहुन अधिक अशा कोणत्याही कालावधीसाठी, तशीच मंजुरी घेवून पट्टयाने देता येईल किंवा जिचे मुल्य किंवा अधिमुल्य पन्नास हजार रुपयांहुन अधिक नसेल अशी महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता विकता येईल किंवा कायमचा पट्टयाने देता येईल.

क) आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांरित करता येईल.

ड) जो मोबदला घेवुन, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल. पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला असे अधिमुल्य भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालु बाजार किंमतीपेक्षा कमी असता काम नये अशी स्पष्ट तरतुद आहे.

तरी नागरीकांच्या सोयीसाठी स्वामी शांती प्रकाश गार्डन मधील रुम, प्रभात सिनेमा मागे, उल्हासनगर—५ येथे शहिद हेमु कालानी गंथालय व वाचनालय करीता केलेल्या अर्जाचा विचार करुन सदरची जागा भाडयाने देणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभा पटलावर निर्णयासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ७१ दिनांक : १९/३/२००८

सुचकाचे नाव :— श्रीमती मिनाताई सोनेजी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे श्रीम. भगवंती रूपचंदानी सेवा सोसायटीस शहीद हेमु कालानी ग्रंथालय, वाचनालय चालविण्यास स्वामी शांतीप्रकाश गार्डन मधील रूम १० वर्षाच्या कालावधीसाठी प्रती वर्ष नाममात्र रु. १००/— भाडयाने देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :—** प्रभाग क्र. १३ व १४ मधील काही रस्त्यावर ''नो पॉर्कींग झोन'' म्हणून घोषित करणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—एक मिनिट, याबाबत मला बोलायचे आहे. या जागेची अधिका—याने पाहणी केली आहे काय? हा जो विषय सभा सूचनेवर ठेवला आहे, ४ तारखेला पत्र दिले जाते आणि त्याचा गोषवारा तयार होवुन ११ तारखेला त्याची सभा सूचना निघते की, या या ठिकाणी नो पार्किंग झोन घोषित केला जावा. प्रत्येक नगरसेवक पत्र देईल, नो पार्किंग झोन झाले पाहिजे. तर त्याप्रमाणे होईल काय? तुम्हांला हे मंजुर असेल तर आम्हांलाही मंजुर आहे. हा प्रस्ताव पारीत करतो. प्रत्येक नगरसेवक महासभेच्या आठ दिवस अगोदर पत्र देईल त्यानुसार नो पार्किंग झोन म्हणुन घोषित झाले पाहिजे. साहेब, मी आपल्या विरोधात बोलत नाही. अधिका—यांनी त्या जागेवर जावुन पाहणी केली आहे काय? एक जागा सोडुन कोठेही मारुती गाडी सुध्दा आयुष्यात कधी लागली नसेल आणि म्हणतात की नो पार्किंग झोन केले पाहिजे. त्याठिकाणी वाहतुकीची ये जा जास्त प्रमाणात होत असल्याने त्याठिकाणी पार्किंग केल्यांने वाहतुकीस अडथळा निर्माण होते. त्याठिकाणी अधिका—यांनी पाहणी केली आहे का उत्तर दिले जावे. त्यानंतरही हा विषय पारीत होत असेल तर प्रत्येक नगरसेवकाच्या पत्रानुसार, जो कुणी नगरसेवक पत्र देईल की अमुक या ठिकाणी नो पार्किंग झोन झाले पाहिजे. त्यानुसार त्याठिकाणी नो पार्किंग झोन झालेच पाहिजे. पुर्ण शहर नो पार्किंग झोन होईल.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—श्री. भुल्लर महाराज यांचे म्हणणे बरोबर आहे. नो पार्किंग झोन जाहिर करण्याची पध्दत काय आहे?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—वाहतुक पोलिसाचे पत्र वगैरे काही नाही. वाहतुक पोलिसवाले पत्र देतात की, अमुक या ठिकाणी नो पार्किंग झोन केले पाहिजे, त्याठिकाणी नो पार्किंग झोन केले जात नाही.

सदस्य श्री. राजेश वदारिया:—मा. महापौरजी, जसे भुल्लर महाराज यांनी सांगितले त्याप्रमाणे सर्व नगरसेवकांकडुन पत्र घेवुन सर्वांचा एकत्रित प्रस्ताव ठेवा. आणि एकत्रित प्रस्ताव पारीत करा.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—याबाबत संबंधीत अधिका—यांनी जागेची पाहणी केलेली आहे. ठराव करुन आपण वाहतुक पोलिसांना पाठवायचा असतो. वाहन अधिनियमातील ही तरतुद आहे परंतु सभागृहाची जर इच्छा असेल.....

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सभागृहाची इच्छा ही आहे की, आपणांस प्रत्येकाचा प्रस्ताव मंजुर करावा लागेल.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—महाराजजी, मलाही प्रश्न आहे. याबाबतची कार्यपध्दत काय आहे ती जरा संगितली जावी.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—पध्दत अशी आहे की सभागृहाने यावर निर्णय घेवुन आपण हा विषय अंतिम मंजुरीसाठी वाहतुक विभागाला पाठवायचा.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—प्रस्ताव आला त्याच्या अगोदरची कार्यपध्दती काय?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—संबंधीत अधिका—यांनी जागेची पाहणी केल्यानंतर हा विषय सभागृहापुढे येतो. सभागृहाने जर याला मंजुरी दिली तर हा विषय वाहतुक पोलिसाकडे पाठविला जाईल आणि त्यांच्या मंजुरी नंतर अंमलबजावणी केली जाईल. कारण की नो पार्किंगमध्ये गाडी पार्क केली तर त्यांच्याकडुन दंड घेतला जाईल.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—त्या जागेची पाहणी कधी केली?
आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—तारीख पाहिजे काय?

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—होय, तारीख पाहिजे ना.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—अहवालामध्ये तारीख लिहिलेली नाही परंतु त्यांनी जागेची पाहणी केलेली आहे.

सदस्य श्री. दिलीप जग्यासी :—मा. महापौरजी, व आयुक्त साहेब, प्रभाग क्र. १३ आणि १४ मध्ये नो पार्किंग झोन घोषित करण्याबाबतचा हा जो प्रस्ताव आलेला आहे त्याबाबत त्या विभागातील नागरीकांनी नगरसेवकांकडे

तक्रारी केल्या आहेत की, मोठया प्रमाणावरील वाहतुकीमुळे आमच्या विभागांमध्ये अपघात होत आहेत किंवा आणखी काही अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळेच नगरसेवकाने हा प्रस्ताव दिलेला आहे. त्यामुळे दुस—या नगरसेवकास काय माहित पडेल की तेथे काय अडचण आहे? व तो रहिवाशी विभाग असतांना सुध्दा तेथे ट्रान्सपोर्टेशन होत आहे. मालाची चढउतार होत आहे. तेथे दंड आकारणीचे काही बंधन नाही.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>संबंधीत अधिका—यांकडुन माहिती घेतली पाच तारखेला त्यांनी पाहणी केली आहे. याबाबतची कार्यवाही मी पुन्हा एकदा सांगत आहे. जी मागणी आली ती विचारार्थ आपल्यापुढे ठेवली आहे. जर सभागृहाने मंजुरी दिली तर हा विषय वाहतुक पोलिसांकडे पाठविला जातो. त्यांनी हे सूचित केल्यानंतर ............

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—</u>आयुक्त साहेब तो विषय वेगळा आहे. माझा प्रश्न असा होता की त्यांनी कोणत्या तारखेस स्थळ पाहणी केली?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>पाच तारखेला स्थळ पाहणी केल्याचा अहवाल दिलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>चार तारखेला संबंधीत नगरसेवकाचे पत्र येते. पाच तारखेला अधिकारी जागेची पाहणी करतात. सभा संपल्यानंतर मला ते प्रत्येक रस्ते दाखवा. ज्यांची यांनी पाहणी केली आहे. पाहिजे तर मी येथेच राजीनामा लिहुन देतो. तेथे कोठे गाडया उभ्या आहेत ते त्यांनी मला दाखवुन दयावे.

<u>सदस्य श्री. दिलीप जग्यासी :—</u> आयुक्त साहेब, कुण्या प्रभागात जनतेला काही अडचण असेल तर दुस—या नगरसेवकास हरकत का असली पाहिजे? तेथील जनता नगरसेवकाकडे जावुन जर सांगत असेल की आम्हांला अशी अशी अडचण आहे आणि त्यानुसार जर नगरसेवक हा प्रस्ताव देत असेल तर दुस—या नगरसेवकास त्याबाबतीत हरकत का असली पाहिजे? तेथिल नागरीकांसाठी करत आहोत ना?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>जनतेच्या हितात जर आहे तर माझा ठराव घ्या. नेहरु चौकापासुन गोल मैदान, नेहरु चौकापासुन सिरु चौक, नेहरु चौकापासून शिवाजी चौक, शांतीनगर पासुन राधास्वामी हॉलपर्यंत या सर्व रस्त्यांवर नो पार्किंग झोन घोषित करा.

<u>सदस्य श्री. दिलीप जग्यासी :—</u>दुस—या कुठल्या प्रभागातील नगरसेवकाने तसा प्रस्ताव दिला असेल तर महापालिकेने तो पाहिला पाहिजे. आपणांस जर कुठे काही त्रासाचे असेल तर आपण सुध्दा तसा प्रस्ताव दया की या या ठिकाणी ही ही अडचण आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—</u>मला हे सांगायचे आहे की आपल्या संबंधीत अधिका—याने जागेची पाहणी केलेली नाही. त्यांना मी विचारणार या प्रस्तावामध्ये ज्या ठिकाणांचा उल्लेख केलेला आहे ती ठिकाणे त्यांनी पाहिलेली आहेत काय?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>मा. महापौर साहेबांच्या परवानगीने या विषयाबाबत मला असे सांगायचे आहे की, संबंधित अधिका—याने स्थळ पाहणी करुन अहवाल दिलेला आहे. तो विषय मंजुर करायचा किंवा नाही हा निर्णय सभागृहाने घ्यायचा आहे. आपण निर्णय घ्या. मंजुर करायचा आहे की नाही?

<u>सदस्य श्री. दिलीप जग्यासी :—</u>मा. आयुक्त साहेब, जर दुस—या कुण्या नगरसेवकाची तक्रार मिळत असेल की, एखादया विभागातील जनतेस या प्रकारची अडचण आहे. तर काय मी दुस—या नगरसेवकाच्या प्रभागामध्ये हस्तक्षेप करु शकतो काय? माझ्याकडे जर का अशी तक्रार येत असेल की अमुक या नगरसेवकाच्या प्रभागात अमुक ही अडचण आहे तर काय मी तेथील तक्रार देवु शकतो?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>माझ्या प्रभागात जेवढया काही हरकती घ्यायच्या असतील त्या घ्या. आनंदाने नाचत नाचत प्रत्येकाकडे फिरा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आज या ठिकाणी प्रभाग क्र. १३ आणि प्रभाग क्र. १४ मधील काही रस्त्यांवर नो पार्किंग झोन घोषित करण्याचा विषय आलेला आहे, उल्हासनगर शहरामध्ये ७६ प्रभाग आहेत, त्यातुन या दोनच प्रभागांचा प्रस्ताव का आणला? याबरोबर इतर प्रभागातील सुध्दा प्रस्ताव

आला पाहिजे. आणि त्याबाबत पोलिसांनी काय चौकशी केली असेल तो अहवालही आला पाहिजे. म्हणुन मी सभागृहाला विनंती पुर्वक सांगु इच्छितो की हा विषय सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा. मंजुर करु नये अशी मी सभागृहास विनंती करतो.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>**सन्माननिय महापौरजी, हा विषय पारीत होता कामा नये. जर का हा विषय पारीत होत असेल तर महासभेने सर्व नगरसेवकांना एक असा अधिकार दिला पाहिजे की, पुढील महासभेच्या १० दिवस अगोदर पत्र दिले तर त्यात सुचविलेले ठिकाण हे नेहमीसाठी नो पार्किंग झोन म्हणुन जाहिर केले जावे.

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>**हा विषय सभेच्या कामाकाजातुन वगळण्यात यावा.

**<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>**हा विषय सभेच्या कामाकाजातुन वगळण्यात यावा.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>**हा विषय केवळ वगळु नये तर तो नाकारला जावा.

**<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**सभेचे कामकाज संपले.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**महापौर साहेब, एक मिनीट, महिला बालकल्याण समितीचे जे चार ठराव महासभेने कायम केले त्याबददल सर्व सन्माननिय सदस्यांचे मी आभार मानते परंतु विषय क्र. ४ मध्ये आम्ही १०० मुलींना प्रशिक्षण देण्यासाठी प्रस्ताव दिला होता. परंतु माझ्याकडे १३८ मुलींची नावे आलेली आहेत. याबाबातचा प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे आणावा लागेल. तो पुन्हा आणावा लागु नये म्हणुन मी विनंती करते की, दोनशे मुलींच्या प्रशिक्षणासाठी परवानगी मिळाली पाहिजे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास, पास.....

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**आभारी आहे. आणि आयुक्त साहेबांना दुसरी एक विनंती आहे की, महिला बाल कल्याण समितीच्या कामासाठी पुर्णवेळ अधिका—याची आवश्यकता आहे. दुस—या महानगरपालिकांमध्ये समाज विकास अधिकारी म्हणुन एक पद नियुक्त केले आहे. आपणाकडे सुध्दा जर असा अधिकारी असेल तर पुढच्या वेळेस महिला व बालकल्याण समितीची जी कोणी सभापती असेल तिला समितीच्या कामामध्ये मदत होईल. आभारी आहे.

<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषय सभेच्या कामकाजातुन वगळण्याबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. १३** :— प्रभाग क्र. १३ व १४ मधील काही रस्त्यावर ''नो पॉर्कीग झोन'' म्हणून घोषित करणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. राजु (जीवन) इदनानी नगरसेवक तथा गटनेता लोक भारती पक्ष (गंगाजल फ्रंट) उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक ४/३/२००८ च्या पत्रान्वये प्रभाग क्र. १३ व १४ मधील खालील दर्शविलेल्या ठिकाणी वाहतुकीची ये जा जास्त प्रमाणात होत असल्याने त्या ठिकाणी वाहने पार्किंग केल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होवून नागरीकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. काही वेळा इमारतीच्या खाली व इतर ठिकाणी वाहने पार्किंग केल्याने वाहन चालक व नागरीकांमध्ये भाडण होत असतात त्या परिसरातील नागरीकांनी सदर ठिकाणी नो पार्किंग झोन करण्याबाबत विनंती केलेली आहे.

१. सोनेसर अपार्टमेंट ते रॉयल रेसिडन्सी पर्यंत

२. दाभाडे चौक

३. दाभाडे चौक ते स्मशानघाट पर्यंत

४. दाभाडे चौक ते प्रकाश ऑटो

५. दाभाडे चौक ते आशा सोसायटी

६. दाभाडे चौक ते आंबेडकर चौका पर्यंत

तरी वरीलप्रमाणे क्षेत्र नो पार्किंग झोन घोंषित करणेकामी निर्णयासाठी मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७१ अ <u>दिनांक : १९/३/२००८</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मिनाताई सोनेजी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार प्रभाग क्र. १३ व १४ मधील १) सोनेसर अपार्टमेंट ते रॉयल रेसिडन्सी पर्यंत, २) दाभाडे चौक, ३) दाभाडे चौक ते स्मशानघाट पर्यंत, ४) दाभाडे चौक ते प्रकाश ऑटो, ५) दाभाडे चौक ते आशा सोसायटी, ६) दाभाडे चौक ते आंबेडकर चौका पर्यंत या रस्त्यांवर '' नो पार्कीग झोन'' घोषित करणे कामी सविस्तर माहिती अभावी सदरहु प्रस्ताव वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.५० वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१९/४/२००८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/४/२००८ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक १९/४/२००८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

५. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३१ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३२ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३३ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३४ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ६ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३५ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ७ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३६ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३७ | श्री. शेखर केशव यादव |
| ९ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ३८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १० | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ३९ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| ११ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४० | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १२ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४१ | श्री. किशोर जग्यासी |
| १३ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४२ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १४ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४३ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १५ | श्री. राजू जग्यासी | ४४ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १६ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ४५ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४६ | श्रीमती लता शांताराम निकम |
| १८ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ४७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १९ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ४८ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २० | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ४९ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २१ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ५० | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २२ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५१ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २३ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५२ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २४ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २५ | श्रीमती शकुंतला पाटील | ५४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २६ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ५५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २७ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ५६ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| २८ | श्री.एडके गणपत गोविंद | ५७ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| २९ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ५८ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३० | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ५९ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |

तर,

उप—महापौर—— श्री. चव्हाण रमेश महादेव

व

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्री. रविंद्र दशरथ बागूल, ३. श्री. दत्तात्रय नारायण पवार, ४. श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र, ५. श्री. विजय खंडु सुपाळे, ६. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ७. श्री. आयलानी कुमार उत्तमचंद, ८. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ९. श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा, १०. श्री. लाल पंजाबी, ११. श्री. सुखरामानी महेश पहलाजराय, १२. श्री. ढोके जनार्दन किसनराव, १३. श्रीमती पंचशिला नाना पवार, १४. श्रीमती करोतीया मालती राधाचरण, १५. श्री. बोडारे धनंजय बाबूराव, १६. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, १७. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, १८. श्री. मोहन साधवाणी, १९. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), २०. श्रीमती वनवारी मोना अशोक, २१. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), २२. श्री. राजेश नानीकराम वधारीया

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३४.श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
३५.श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
३६.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३७.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
३८.श्री. मिलिंद सावंत, उप–आयुक्त
३९.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
४०.डॉ. जी.टी. जिंदे , वैद्यकीय आरोग्य अधिकारी
४१.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
४२.श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
४३.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
४४.श्री. विशाल कदम, वरीष्ठ लिपिक, सामान्य प्रशासन

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्न क्र. ..................

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>मा. महापौरजी, उल्हासनगर महापालिकेचे नगरसेवक श्री. किशोर जग्यासी यांच्या वहिनी श्रीमती नितु प्रकाश जग्यासी यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले आहे. मी निवेदन करतो की, त्यांना सभागृहाच्यावतीने श्रध्दांजली अर्पित केली जावी.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>त्याचबरोबर आपल्या महापालिकेचे एक कर्मचारी श्री. गोटु पी. मेस्ट यांचे आज निधन झाले आहे. त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पित केली जावी.

---

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मिनाताई सोनेजी

<u>शोक प्रस्ताव</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ५८ मधुन निवडून आलेले सन्माननिय सदस्य श्री. किशोर जग्यासी यांच्या वहिनी श्रीमती निता प्रकाश जग्यासी यांचे दिनांक ११/४/२००८ रोजी निधन झाले तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या जकात विभागात नाका शिपाई म्हणुन कार्यरत असलेले श्री. गोटु मेस्ट यांचे आज दिनांक १९/४/०८ रोजी निधन झाले.

श्रीमती निता प्रकाश जग्यासी व श्री. गोटु मेस्ट यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १ दिनांक:–१९/४/२००८

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती निता प्रकाश जग्यासी व श्री. गोटु मेस्ट यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:**–सन्माननिय महापौरजी, उन्हाळाच्या दिवसामध्ये महासभा बोलाविली जाते. आणि या ठिकाणी लाईट नसल्यामुळे सभागृहात बसणे मुश्किलीचे होते. यासाठी सर्व सदस्यांना माझी अशी विनंती आहे की सर्वांनी मिळुन या महासभेमध्ये एक प्रस्ताव आणावा जेणेकरुन महासभेमध्ये जनरेटरची व्यवस्था होवु शकेल. महापालिका कार्यालयासाठी लाखो रुपये खर्च केले जातात. परंतु सभागृहात जनरेटरची व्यवस्था केली जात नाही. लाईट नसल्यामुळे माईक व्यवस्थाही कोळमडली आहे. हा माईक मला असा धरुन ठेवावा लागेल. यासाठी आयुक्त साहेबांना आणि सर्व सन्माननिय सदस्यांना माझी अशी विनंती असेल की पुढे अशी वेळ येवु नये म्हणुन जनरेटरची व्यवस्था करावी जेणेकरुन लाईट नसेल तेव्हा जनरेटरचा वापर करता येवु शकेल.

**महापालिका सचिव :**–विषय क्र. १ प्रश्नोत्तरे......
प्रश्न क्र. ४८२ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. यावेळेस व्यासपीठामागील भिंतीवरील घडयाळात सांयकाळचे ४ वाजुन ४५ मिनिटे झाली आहेत.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :**–मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, ठाणे लोकसभा मतदार संघाची पोटनिवडणूक जाहिर झाल्यामुळे आजच्या या सभेचे कामकाज स्थगित करावे लागेल असे मला वाटते. नाहीतर आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होईल.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :**–आचारसंहिता लागु झाल्यानंतर आपण धोरणात्मक निर्णय घेवु शकतो का? असे नाही की सर्वांवर केसेस दाखल व्हाव्यात?

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :**–त्यासाठी या सभेचे कामकाजच स्थगित केले जावे, पुढील सूचना देईपर्यंत. चालेल ना? सभा स्थगित करा.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :**–असे कुठे आहे, निर्णय घेवु शकत नाहीत?

**महापालिका सचिव :**–याबाबतीत आपण आपसामध्ये चर्चा करुन निर्णय घ्यावा.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:**–आम्ही सर्व राजकिय पक्षांनी निर्णय घेतलेला आहे. जर आचारसंहिता लागु आहे तर कोणताही निर्णय घेवु शकत नाही. अंमलबजावणी करु शकत नाहीत. मग नाहक वेळ का घालवायची? सभा स्थगित केली जावी.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :**–सभा स्थगित केली जावी.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:**–सभा स्थगित केली जावी.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :**–ठिक आहे, स्थगित करा.

महापालिका सचिव :—ठिक आहे? सर्वसंमतीने सभा स्थगित करायची? पुढील सूचना देईपर्यंत?

सदस्य श्री. बी.बी. मोरे:—पुढील सूचना देईपर्यंत.

महापालिका सचिव :—आपणांस आणखी एक सूचना दयायची आहे त्यासाठी आपण बसुन घ्यावे. मागील वेळेस मा. महापौरांनी श्रीमती निलम प्रेमसिंग रावत यांना अपक्ष गटनेता म्हणुन घोषित केले होते. आणि त्या निर्णयावर त्यांनी स्थगिती दिली होती आता त्यांनी आपली स्थगिती हटविली आहे श्रीमती निलम प्रेमसिंग रावत यांना अपक्ष गटनेता म्हणुन घोषित केले जात आहे. त्याबद्दल श्रीमती निलम रावत यांचे अभिनंदन ।

तसेच लोकभारती पक्षाचे गटनेता पदासाठी श्री. विनोद ठाकुर यांच्या नावाची सूचना आलेली आहे. त्यास मा. महापौरांनी मान्यता दिलेली आहे. श्री. विनोद ठाकुर यांचे अभिनंदन।

त्याचबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्यावतीने गटनेता पदासादी श्री. सतीश चहाळ यांच्या नावाची सूचना आलेली आहे. त्यास मा. महापौरांनी मान्यता दिलेली आहे. श्री. सतीश चहाळ यांचे सुध्दा हार्दिक अभिनंदन ।

त्याचबरोबर पोलिओ कार्यक्रमाबाबतीत आपले वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री. जिंदे साहेब आपणांस सूचना देवु इच्छितात.

श्री. जी.टी. जिंदे (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):—आदरणीय महापौर महोदया, सन्मानिय आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, येत्या २७ एप्रिलला पल्स पोलिओ कार्यक्रम आहे. हा पल्स पोलिओचा कार्यक्रम १९९४ पासुन सातत्याने चालु आहे. आणि आम्ही आता शेवटच्या टप्प्यामध्ये आहोत. पोलिओचे समुळ निर्मुलन करण्याच्या टप्प्यामध्ये आहोत. या १५ वर्षाच्या काळात जनतेमध्ये थोडी शिथीलता आली आहे. पुर्ण जगभरातील १५० केसेस केवळ भारतात आहेत. पैकी १३० केसेस उत्तर प्रदेशामध्ये आहेत. २० केसेस बिहारमध्ये आहेत. आणि संपुर्ण महाराष्ट्रामधुन नुकतीच मुंबईमध्ये एक केस आढळुन आली आहे. म्हणुन या १५ वर्षाच्या टप्प्यामध्ये जनतेमध्ये जी शिथीलता निर्माण झाली आहे. मला अशी खात्री आहे की आपल्या आवाहनामुळे जनतेच्या शिथीलतेमध्ये फरक पडेल. आणि शेवटच्या टप्प्यामध्ये पोलिओ निर्मुलनाचा आपला कार्यक्रम यशस्वी होणे अत्यावश्यक आहे. म्हणुन मी सभागृहातील सर्व सदस्यांना कळकळीची विनंती करतो की आपण जनतेस आवाहन करावे. जेणेकरुन ७० हजार मुलांना पल्स पोलिओचा डोस देता येवु शकेल.

म. महापौर:—आपणा सर्वानुमते आजच्या सभेचे कामकाज पूढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.५० वाजता महापौर श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१२/६/२००८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १२/६/२००८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## १—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक १९/४/२००८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा स्थगित झाल्याने ती सभा गुरुवार दिनांक १२/६/२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर—— श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

६. उप—महापौर—— श्री. आयलानी कुमार उत्तमचंद

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३९ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४० | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४१ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४२ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४३ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४४ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४५ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४६ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४७ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४८ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४९ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५० | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५१ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५४ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १९ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५५ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५६ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २१ | श्री. राजू जग्यासी | ५७ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २२ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २३ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५९ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २४ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ६० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ६१ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २६ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ६२ | श्री. मोहन साधवाणी |
| २७ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम | ६३ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २८ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६४ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| २९ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३० | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६६ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३१ | श्री. लाल पंजाबी | ६७ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३२ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६८ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३३ | श्रीमती शकुंतला पाटील | ६९ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३४ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ७० | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३५ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७१ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३६ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७२ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३७ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७३ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३८ | श्री.एडके गणपत गोविंद | ७४ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास, २. श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा, ३. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ४. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, ५. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), ६. श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी, ७. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई)

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
२. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
५. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
६. श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त
७. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
८. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
९. डॉ. जी.टी. जिंदे , वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१०.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
११.श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध.
१२.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१३.श्री. एस.टी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१४.श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
१५.श्री. रामसिंघानी,
१६.श्री. विशाल कदम, यु.डी.सी, साप्रवि

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.२५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........
यावेळेस दुपारचे ३ वाजुन २५ मिनिटे झाली आहेत.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र ८२ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र. ८२ :—</u>** तत्कालीन नगररचनाकार श्री. गुरगुळे यांनी गेल्या महासभेत पहिले दिल्या गेलेल्या दुरुस्ती बांधकाम परवानगी ८ दिवसात रिवोक (रद्दबातल) कारवाईची माहिती देणेबाबत स्पष्ट केले होते. याबाबत विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व सविस्तर माहिती मिळणेबाबत.

प्रश्न क्र. १ अ) पहिल्या दुरुस्ती बांधकाम परवानगी ८ दिवसात रिवोक (रद्दबातल) कारवाई करण्यात येणार होती त्या दुरुस्ती बांधकाम परवानगीच्या रिवोकचे काय झाले?

ब) दुरुस्ती बांधकाम परवानगी देणे सुरु केले आहे का? कधीपासुन? तारीख दयावी?

क) दुरुस्ती बांधकाम परवानगी देणे सुरु केले असल्यास अदयापपर्यंत किती जणांना दुरुस्ती बांधकाम परवानगी दिल्या आहेत?

ड) मुंबई प्रांतिक महानगरपालिका नियमानुसार दुरुस्ती बांधकाम परवानगी देण्याचे प्रावधान नसतानाही सदर दुरुस्ती बांधकाम परवानगी कोणत्या आधारे देण्यात आल्या आहेत? त्याबाबत योग्य खुलासा करावा ही नम्र विनंती.

<u>उत्तर :—</u> उल्हासनगर महानगरपालिकेतील तत्कालीन नगररचनाकार श्री. अ.पा. गुरगुळे यांची दिनांक १८/१/२००७ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेमधुन पुणे येथे बदली झालेली आहे. दिनांक ११/३/२००८ पासुन श्री. ह.रा. ठाकुर

नगररचनाकार, सहा. संचालक नगररचनाकार, ठाणे यांनी प्र. नगररचनाकार म्हणुन पदभार स्विकारलेला आहे. त्यामुळे सदरच्या प्र.क्र. ८२ मध्ये नमुद केलेल्या मुद्दयांबाबत फेरतपासणी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल हा पुढील महासभेत सादर करण्यात येईल.

**मा. सदस्या श्रीमती सरोजीनी टेकचंदानी, श्रीमती जया माखिजा, कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः— मा. महापौरजी ८२ क्रमांकाचा माझा हा प्रश्न मी डिसेंबर महिन्यामध्ये दिला होता. त्याचे उत्तर देण्यासाठी कुणी संबंधीत अधिकारी येथे उपस्थित आहे का?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—सन्माननिय महापौर महोदया, उप—महापौरजी, नगरसचिवजी व सर्व सन्माननिय सदस्य, नगररचना विभागात आलेला अधिकारी रजेवर गेल्यामुळे या प्रश्ना संदर्भातील तांत्रिक स्वरुपाची जी माहिती आहे त्या संदर्भात अदयापपर्यंत दुसरा कुणी अधिकारी या महापालिकेत उपलब्ध झाला नसल्यामुळे ही माहिती देण्यामध्ये थोडी मर्यादा निर्माण झाली आहे. उपलब्ध असलेली माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आलेली आहे. जे येथुन बदली होवून गेले आहेत त्या नगररचनाकारांना याबाबतीत पुन्हा तपासणी करुन उत्तर देण्यासाठी आम्ही सूचना दिल्या आहेत. त्या सूचना नुसार जे उत्तर येईल ते सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय आयुक्त साहेब, २७/७/२००७ रोजी मी ४२ क्रमांकाचा प्रश्न विचारला होता. त्यावेळेस जी चर्चा झाली होती त्यामध्ये स्पष्ट असे सांगण्यात आले होते की, बांधकाम दुरुस्ती परवानगी देण्याचा महापालिकेला कोणताही अधिकार नाही. बांधकाम दुरुस्ती परवानगी देणे हे आपल्या अधिकार क्षेत्रात येतच नाही. तरीदेखील आपण २३ परवानग्या दिल्या आहेत. प्रश्न क्र. ५५ व ५२ च्या उत्तरामध्ये अशा प्रकारच्या बांधकाम परवानग्या दिल्या असल्याचे नमुद आहे. परवानगी रद्द करण्यासाठी एक एक वर्ष लागत आहे. या प्रश्नाचे उत्तर देण्यामध्ये काय अडचण आहे ते सांगावे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):— या प्रश्नाच्या संदर्भात माझी आपणांस विनंती आहे, जे तांत्रिक अधिकारी होते ते ६ महिने सुट्टीवर होते. परत एक महिना सुट्टीवर होते. नविन अधिकारी आणण्यासाठी आम्ही प्रयत्न केला आहे. असा सुध्दा प्रस्ताव ठेवला आहे की नगरपालिकेचा अधिकारी ज्यास या पदाचा कार्यभार देंता येईल असा अधिकार सुध्दा आम्ही मागत आहोत. तांत्रिक छाननीची गरज असल्यामुळे व तसा अधिकारी नसल्यामुळे अडचण आहे परंतु असा अधिकारी आम्ही लवकरात लवकर उपलब्ध करुन घेवु. मी आपणांस विनंती करतो की, आपण आम्हांस वेळ दयावी.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—साहेब, अशीच उत्तरे दिली जातात याअगोदर ५५ क्रमांकाचा जो प्रश्न होता, हा प्रश्न आधींच्या महिन्याचा आहे, जी जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनी आहे त्या कंपनीने चांगल्या दर्जाचे काम केले नव्हते, मागीलवेळेस आपण उत्तर दिले होते की, उप—आयुक्त स्तरावरील अधिकारी त्याची छाननी ते करील. असा कोणता उप—आयुक्त आहे ज्यास तुम्ही छाननीसाठी कामाला लावले आहे? ते जरा सांगावे. अशी जर टालमटोलवाली उत्तरे असतील तर, प्रश्न क्र. ५५, हे असे उलटसुलट उत्तरे देता? त्यावेळेस आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, जयभारत कन्स्ट्रक्शन कंपनीने जे काम केले आहे त्याची छाननी उप—आयुक्त स्तरावरील अधिकारी करेल.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. तो सभागृहासमोर ठेवण्यात आला नव्हता. आपणांस त्याच्या प्रती उदया देण्यात येतील.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—तसेच हा जो ८२ व ५२ क्रमांकाचा प्रश्न आहे त्याचे उत्तर पुढील महासभेत मिळेल काय?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—मी प्रशासनाच्यावतीने दिलगीरी व्यक्त करतो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—ते ठिक आहे, पुढील महासभेत याचे उत्तर मिळेल?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—होय, नक्की मिळेल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— जर पुढील महासभेत उत्तर मिळाले नाही तर त्यापुढील महासभेत त्याचे उत्तर मिळाले पाहिजे. जर आपणांस बांधकाम दुरुस्ती परवानगी देण्याचा अधिकारच नाही तर मग उत्तर काय देणार?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—तांत्रिक बाबी तपासुन लवकरात लवकर उत्तर दिले जाईल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र ८३ हा श्री. विनोद ठाकुर यांचा आहे.

प्रश्न क्र. ८३ :— प्रश्न क्र. १) पदपथ निर्मुलन पथक उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत आहे का? असल्यास एकूण किती कर्मचारी कार्यरत असून त्यांना वाहने व साहित्य पुरविण्यात आले आहे का?

प्रश्न क्र. २) आजपर्यंत पदपथ निर्मुलनपथकांनी किती वाहने जमा केली आहे? त्यापैकी महापालिकेच्या महसूली उत्पन्नात किती भर पडली आहे? आजपर्यंत जमा करण्यात आलेल्या उत्पन्नाची दैनंदिन माहिती देण्यात यावी?

प्रश्न क्र. ३) उल्हासनगर शहराच्या मुख्य व अंतर्गत रस्त्यावर गॅरेजधारकांनी रस्त्यावरच गॅरेज उभे केली आहेत? याबाबत अनेक पत्र किंवा निदर्शनास आणू देखिल कार्यवाही का करण्यात येत नाही? अशा कर्मचा—यांवर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे?

उत्तर :— १) होय, एकुण १२ कर्मचा—यांपैकी ०१ कायमस्वरुपी गैरहजर, ०१ जिप्सी पुरविणेत आली आहे व डम्पर अनाधिकृत बांधकाम निष्कासन करावयाचे नसेल तेव्हा पदपथ अतिक्रमण निष्कासनासाठी वापरणेत येते.

२) वाहने जमा करणेसाठी टो मशिन तथा टोचन उपलब्ध नसल्यामुळे वाहनधारकांकडुन दंड वसुल करुन लेखा विभागाकडे जमा करणेत येतो. दिनांक १/४/२००७ ते ३१/१२/२००७ पर्यंत एकुण रुपये २,३०,४२०/— (दोन लाख तीस हजार चारशे वीस मात्र) दंडापोटी वसुल केलेली रक्कम लेखा विभागाकडे भरणा करणेत आली आहे.

३) रस्त्यावर गॅरेज उभ्या केलेल्या गॅरेजधारकांना नोटिसा बजावून दंडात्मक कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सदस्य श्री. विनोद ठाकुरः— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र ८४ हा श्री. विनोद ठाकुर यांचा आहे.

प्रश्न क्र. ८४ :— प्रश्न क्र. १) गेल्या दोन/तीन वर्षापासुन सतत गैरहजर राहणा—या सफाई कामगारांची संख्या किती? प्रश्न क्र. २) अशा गैरहजर राहणा—या सफाई कामगारांवर कार्यवाही केली आहे का? केली नसल्यास का करण्यात आली नाही? प्रश्न क्र. ३) एकूण सफाई मुकादमांची संख्या किती? त्यापैकी प्रभारी मुकादम म्हणून किती कार्यरत आहेत?

उत्तर :— १) दोन/तीन वर्षापासुन सतत गैरहजर राहणारे एकुण १६ सफाई कामगार आहेत. २) सतत गैरहजर होणा—या कामगारांना कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आलेल्या आहेत. ३) एकुण ५५ सफाई मुकादमांपैकी ३२ मुकादम कायम व २३ मुकादम प्रभारी आहेत.

सदस्य श्री. विनोद ठाकुरः— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र ८५ हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे. यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांच्या प्रश्न आणि उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ८५ :—प्र क्र. १) सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार गलिच्छ वस्तीसाठी किती निधी होता? तो कोणकोणत्या प्रभागात वापरण्यात आला याची यादी दयावी.

उत्तर :— सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार गलिच्छ वस्तीसाठी रु. ६०.०० लक्ष इतका निधी होता. सदर निधी अंतर्गत केलेल्या कामांची यादी सोबत जोडली आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र ८६ हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे. आता त्यांनी सभागृहात प्रवेश केला आहे.

**मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

प्रश्न क्र. ८६ :— प्र. क्र. २) सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार बांधकाम विभगाात किती निधीची तरतुद केली होती? त्यापैकी कोणकोणत्या प्रभागात निधी वापरला गेला. कामाच्या स्वरुपासहीत मंजुर झालेल्या प्रभागातील कामाची यादी दयावी.

उत्तर :— सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पिय तरतुदीअंतर्गत प्राप्त निधीबाबतच्या माहितीची यादी सोबत जोडली आहे.

सदस्य श्री. बी.बी.मोरे:— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र ८७ हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

प्रश्न क्र. ८७ :— प्र क्र. ३) सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाणी विभागासाठी किती निधीची तरतुद होती? त्यापैकी किती निधी खर्च केला? कोणकोणत्या प्रभागात निधी खर्च केला यादी दयावी?

<u>उत्तर :—</u> सन २००७—०८ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाणी विभागासाठी निधीची तरतुद व त्यापैकी किती निधी खर्च केला तसेच कोण कोणत्या प्रभागात निधी खर्च केला याबाबत स्वतंत्र विवरणपत्र व काणेकोणत्या प्रभागात निधी खर्च केला यांची यादी जोडण्यात आली आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :— </u>ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र ८८ हा श्री. विनोद ठाकुर यांचा असून तो प्रश्न त्यांनी मागे घेतला आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र ८९ हा श्री. रविंद्र बागुल यांचा आहे.

**सदस्य श्री. राजु इदनानी, श्री. किशोर जग्यासी, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. रामरख्यानी मोहनदास, श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>प्रश्न क्र. ८९ :—</u> महापालिका हद्दीतील नागरीकांचे आरोग्य अबाधित राखणे ही महापालिकेची

महत्वाची जबाबदारी असून आरोग्य विभागामार्फत शहरातील साफसफाईचे कामकाज पाहण्यात येत आहे. शहर स्वच्छ व सुंदर रहावे, जिवजंतुचा प्रार्दुभाव वाढू नये यासाठी साफसफाई करणेसाठी आरोग्य विभागामार्फत विविध प्रकारची जंतुनाशके, साहित्य, साधनसाम्रग्रीची खरेदी करण्यात येत असते त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, खरी सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र. १ (अ) उल्हासनगर महानगरपालिकेअंतर्गत येणा—या परिसराची साफसफाई करणेसाठी आरोग्य विभागामार्फत सन २००७—०८ मध्ये कोण कोणती जंतुनाशके, साहित्य, साधनसामग्री खरेदी करण्यात आली? त्यांचे वाटप कसे करण्यात आले? त्यांचा वापर कुठे, कसा व कधी करण्यात आला? प्रत्येकांची बिलांची एकुण रक्कम किती?

ब) महापालिका सफाई कामगारांना प्रशासनातर्फे कोणकोणत्या सुविधा व साहित्य, साधनसामुग्री पुरविण्यात येते? गणवेश, गमबुट, रेनकोट, हॅन्डग्लोज, इत्यादी कधी पुरविण्यात आले होते? त्यांची मुदत किती काळासाठी होती? सदरची मुदत संपली आहे का?

क) वार्ड क्रमांक ५ मध्ये वरील पैकी जंतुनाशके, साहित्य, साधनसामग्रीचे किती वाटप करण्यात आले?

कामगारांना पुरविण्यात येणा–या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत का?

उत्तर :– सफाई कामगारांना भांडार विभागामार्फत सन २००५ मध्ये गणवेष, चप्पल, छत्रया, रेनकोट पुरविण्यात आले आहे. सद्यस्थितीत महापालिका कर्मचा–यांना गणवेष देणेबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :– सन्माननिय महापौर महोदया, आणि आयुक्त साहेब, आरोग्य विभागाशी संबंधीत मी हा प्रश्न दिलेला आहे. तो मी वाचुन दाखवितो. उल्हासनगर महानगरपालिकेअंतर्गत येणा–या परिसराची साफसफाई करणेसाठी आरोग्य विभागामार्फत सन २००७–०८ मध्ये कोण कोणती जंतुनाशके, साहित्य, साधनसामग्री खरेदी करण्यात आली? त्यांचे वाटप कसे करण्यात आले? त्यांचा वापर कुठे, कसा व कधी करण्यात आला? प्रत्येकांची बिलांची एकुण रक्कम किती?

महासभेच्या एक दिवस अगोदर आम्हांला या सामानाची यादी दिली जाते.
महापालिका सफाई कामगारांना प्रशासनातर्फे कोणकोणत्या सुविधा व साहित्य, साधनसामुग्री पुरविण्यात येते? गणवेश, गमबुट, रेनकोट, हॅन्डग्लोज, इत्यादी कधी पुरविण्यात आले होते? त्यांची मुदत किती काळासाठी होती? सदरची मुदत संपली आहे का? किती वर्षाकरीता आहे? एक वर्षाकरीता, दोन वर्षाकरीता आहे? कारण की माझ्या प्रभाग क्र. ५ मध्ये १४ सफाई कामगार दिलेले आहेत. काही प्रभागांमध्ये १६ कामगार दिलेली आहेत. माझ्या प्रभागात नेमुन दिलेल्या १४ कामगारांपैकी फक्त ३ कामगार कामावर येतात. ४ महिन्यापासुन २ कामगार सलगपणे गैरहजर आहेत. हे कामगार ३–३, ४–४ महिन्यापासुन कामावर येतच नाहीत. आम्ही आमच्या प्रभागाची कामे कशी करायची? मुकादमाला सांगितले तर तो म्हणतो की, साहेबांना सांगा, याबाबत आयुक्त साहेबांना मी कितीतरी वेळा सांगितले की, माझ्या प्रभागात आपण १४ कामगार दिले आहेत. त्यातील ८ महिला आहेत. आणि ६ पुरुष आहेत. त्यातील फक्त ३ कामगार कामावर येतात. या तीन कामगारांकडुन माझ्या प्रभागातील साफ सफाई होतच नाही. माझ्या प्रभागात स्टेशन विभाग आहे, गलिच्छ वस्ती आहे, या गलिच्छ वस्त्यांमध्ये जंतुनाशक आणि किटकनाशक औषधे मिळतच नाहीत.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–आपला प्रश्न २० फेब्रुवारीचा होता. त्यानंतर प्रशासनाने त्या संदर्भात ज्या कार्यवाही केलेल्या आहेत त्याची माहिती या सभागृहाला आपल्या मार्फत देतो. प्रत्येक प्रभागामध्ये १०–१० हंगामी सफाई कामगार देण्यात येतील. त्यामुळे सध्याच्या कालावधीत कामगारामध्ये वाढ झाली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे जे कामगार कामावर येतच नाहीत त्यांच्यावर प्रशासनामार्फत कठोर कारवाई करण्यात येईले. जे अधिकारी, कर्मचारी कामात कसूर करतात त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे. आणि प्रामुख्याने जे गैरहजर सफाई कामगार आहेत व इतर जे कर्मचारी आहेत, त्यांच्यासाठी जे लोक गैरहजर असतील त्यांचा पुर्ण पगार कापण्यास व त्याच बरोबर २० रुपयाचा अतिरिक्त दंड आकारण्यात येईल. अशी एक उपाययोजना चालु केलेली असल्यामुळे जे पुर्वीचे प्रमाण आहे त्यात थोडीफार सुधारणा होत आहे. आणि तसेच आपल्या प्रभागातील जे कर्मचारी आहेत त्यांच्याबाबत काही तक्रार असेल त्यांची शहनिशा करुन आपणांस ते कर्मचारी बदली करुन देण्यात येतील.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:–साहेब, दुसरी गोष्ट अशी की, रेनकोटच्या बाबत. जे कर्मचारी पावसात भिजत कामे करतात त्यांना रेनकोट, छत्री, गमबुट, प्लॅस्टीक वगैरे काहीना काही त्यांना देणे भाग आहे. आम्ही गेल्यावर्षीच्या पावसाळयापासुन बोलत आलो आहोत. गेल्या पावसाळयात देखील मी हा प्रश्न दिला होता. परंतु हया पावसाळयापर्यंत अजुन कुठल्याही कर्मचा–यास रेनकोट दिलेला नाही. आम्ही त्यास बोलण्यास गेलो तर ते म्हणतात की साहेब, पाऊस येत आहे काय काम करणार? असे त्यांचे सारखे उत्तर असते. आज आम्हांला ही जी यादी देण्यात आली आहे, या सामानापैकी फिनेल नाही, अमुक एक सामान नाही अशीच दर वेळेस आम्हांस बातमी येते. ही जी सामग्री आहे ती आपण किती महिन्यापुरती देता? एक महिन्याकरीता, दोन महिन्याकरीता, वर्षभराकरीता? याबाबत आम्हांला माहिती मिळाली पाहिजे. किती लिटर फिनेल दिले जाते किंवा इतर किटकनाशके दिली जातात याची माहिती दिली जावी.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–याबाबतची प्रभागनिहाय माहिती आपणांस देण्यासाठी संबंधीत आरोग्य निरिक्षकांना मी निर्देश देतो. आणि असे आपणांस अश्वस्त करु इच्छितो की, कोणतेही साहित्य कमी पडु दिले जाणार नाही. हे जे साहित्य आहे ते एक–दोन महिन्यासाठी असे काही नसते. आपण जो या साहित्याचा

साठा करत असतो तो संपुर्ण वर्षभरासाठी असतो आणि जर ते कमी पडले तर ते तात्काळ उपलब्ध करुन दिले जाईल असी मी संबंधीतांना सूचना देतो.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:—मा. मिनाताई सोंडे यांनी एक प्रश्न दिलेला आहे, हातगाडयांविषयीचा तो प्रश्न आहे, नव्यानेच हातगाडया पुरविण्यात आलेल्या आहेत त्यांना चाके व्यवस्थित नाहीत. कामगार या गाडयांमध्ये जेव्हा कचरा भरतात आणि गाडी ओढतात त्यावेळेस ती ओढली जात नाही. प्रत्येक महिन्यात मी हातगाडयांची दुरुस्ती करुन घेत असतो आणि त्याबाबतचे देयक आता सुध्दा येथे आहे. आता मा. मिनाताईंनी मला सांगितले की हातगाडयांविषयी प्रश्न विचारा, ज्या ठेकेदाराने या हातगाडया दिल्या आहेत हातगाडयांची काही हमी कालावधी असेल की, सहा महिन्याकरीता किंवा एक वर्षाकरीता वगैरे तर त्यांनी त्या हमी कालावधीत त्यांची दुरुस्ती केली पाहिजे. गाडीची चाके कमकुवत आहेत परंतु गाडी मजबुत आहे, गाडीबद्दल मी डॉ. सावंत साहेबांना धन्यवाद देतो. ती गाडी मजबुत आहे ती गाडी दोन माणसांनी पण पुढे जात नाही. परंतु चाके कमकुवत आहेत. ते कामगार मला सांगतात की, श्री. बागुल साहेब, गाडी चांगली आहे परंतु तीची चाके पुढे चालतच नाहीत. जर गाडी चालणारच नाही तर काय फायदा? आम्ही कचरा उचलुन कोठे ठेवणार?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—जे काही साहित्य लागाणार आहे, जी अवजारे लागणार आहेत ती उपलब्ध करुन देण्याची सूचना मी देतो. आपण त्यागाडयांविषयी जे सांगत आहात ज्या गाडया नादुरुस्त आहेत त्या गाडयांसाठी आम्ही स्वच्छता निरिक्षक व सहा. आयुक्त यांना निधी उपलब्ध करुन देवु. आणि या गाडया ज्या आहेत त्या जर चांगल्या दर्जाच्या नसतील तर संबंधीत ठेकेदारावर कार्यवाही करु. आणि त्या दुरुस्त करण्यासाठीचा निधी सहा. आयुक्तांना देवु.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—साहेब, आता एकच प्रश्न उरलेला आहे. तो असा की, माझ्या प्रभागातील सफाई कामगार चार चार महिने कामावर येत नाहीत. त्यांच्यावर काहीतरी कठोर कारवाई करण्यात यावी तसेच सर्व प्रभागांमध्ये १४—१४ च कामगार पाहिजे. कुणाकडे १५ कुणाकडे १६ कुणाकडे १८ असे असता कामा नयेत. नाहीतर सर्वांना आपापल्या प्रभागात १८—१८ कामगार दया., मी तर असेही म्हणतो की कामगार वाढवुन दया, आमच्या प्रभागात कामगारच नाहीत.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—जे सफाई कामगार प्रदिर्घ कालावधीपासुन कामावर येत नाहीत त्यांच्यावर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव सभागृहापुढे प्रशासनाने दिलेला आहे. त्याच्यावर जो निर्णय सभागृह घेईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—मा. महापौर, उप—महापौर आणि आयुक्त साहेब, या प्रश्नाला अनुसरुन मी सांगु इच्छितो की, ६ महिन्यापुर्वी सन्माननिय सदस्या श्रीमती मिनाताई सोंडे यांनी खाडाबदली सफाई कामगार भरती सदंर्भात एक प्रश्न दिला होता. ते कामगार भरती न केल्यामुळे प्रत्येकाच्या प्रभागामध्ये साफ सफाईची गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. म्हणुन त्याबद्दल मी आपणांस विचारु इच्छितो की, खाडाबदली सफाई कामगार भरतीची प्रक्रिया कुठपर्यंत आलेली आहे? ते कामगार आपण कधी कामावर घेणार आहात? याबद्दल जरासा खुलासा केला तर बरे होईल धन्यवाद।

महापालिका सचिव :— प्रश्न क्र ९० हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—सचिव साहेब, खाडाबदली सफाई कामगार भरतीबाबत आयुक्त साहेब खुलासा करत आहेत.

**मा. सदस्या श्रीमती संगिता कंडारे व श्रीमती लता निकम हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**



आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—सध्या पावसाळयापूर्वीच्या कामांसाठी साडेसातशे हंगामी सफाई कामगार २ महिन्याच्या कालावधीसाठी आपण घेतलेले आहेत आणि त्यापुढे कामगारांची जी संख्या आवश्यक आहे त्या संदर्भात न्यायालयामध्ये आपली एक केस प्रलंबित आहे. त्यामधील साडेतीनशे कर्मचा—यांचा प्रश्न निर्माण झाला होता. त्याची आम्ही विधी तज्ञांच्यामार्फत छाननी करुन घेत आहोत. आणि त्यांचा अभिप्राय मिळाल्यास खाडाबदली सफाई कामगार नेमण्याची प्रक्रिया पुर्ण करु. कुठलीही पदे निर्माण करायची असतील तर, नुसती खाडाबदली सफाई कामगारांची यादी जरी तयार करायची असली तरी अडचण निर्माण होते. न्यायालयामध्ये जुन्या साडेचार हजार कर्मचा—यांचा जो प्रश्न प्रलंबित आहे त्या संदर्भात सध्या कोर्ट कमिशन बसलेले आहे. त्यांची जी यादी येईल त्या अनुषंगाने खाडाबदली सफाई कामगार भरतीचा प्रस्ताव ठेवायचा असल्याने विधी तज्ञांचा अभिप्राय घेवुन त्याबाबतीत आम्ही लवकरात लवकर कार्यवाही करु.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र ९० हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्री. महेश सुखरामानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**प्रश्न क्र. ९० :—** उल्हासनगर शहरात लावल्या जाणा—या सिनेमा पोस्टर व अश्लिल/बिभित्स पोस्टर बाबत विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व सविस्तर माहिती मिळणेबाबत.

प्र.क्र. १ अ) सार्वजनिक ठिकाणी सिनेमा पोस्टर किंवा फलक लावण्यासाठी महापालिकेची परवानगी घेतली जाते का? परवानगी घेत नसल्यास त्या पोस्टर लावणा—या विरोधात कोणतीकारवाई केली जाते? कोणकोणत्या ठिकाणी अशी सिनेमा पोस्टर लावण्यात आली आहेत? त्याची यादी दयावी?

ब) अश्लिल/बिभित्स पोस्टर लावण्यासाठी महानगरपालिकेची परवानगी घेतली जाते का? परवानगी घेतली नसल्यास अशी पोस्टर लावणा—या विरोधात कोणती कारवाई करणे बंधनकारक आहे? अदयापपर्यंत किती पोस्टर लावणा—यांवर कारवाई करण्यात आली आहे?

क) शाळा / महाविद्यालयाजवळ सिनेमाची व अन्य अशिलल/बिभित्स पोस्टर लावण्यात येतात का? येत असल्यास कोणत्या शाळा व महाविद्यालयाजवळ लावण्यात येतात? त्यांची नावे दयावी?

उत्तर :— नाही.

पोस्टर लावणा—यांच्या विरोधात शहर विरुपण प्रतिबंधक कायदया अंतर्गत कार्यवाही करता येते. ठिकठिकाणची माहिती संकलित करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

नाही.

पोस्टर लावणा—याच्या विरोधात शहर विरुपण प्रतिबंधक कायदयाअंतर्गत कार्यवाही करता येते.

होय.

ठिकाणाची माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी व आयुक्त साहेब, या प्रश्नासंदर्भात आपल्या अधिका—यांनी काय कारवाई केली आहे ती सांगाना. हा प्रश्न देवुन तीन महिने झाले आहेत. तीन महिन्यामध्ये त्यांनी काय कारवाई केली आहे?

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—** जे पोस्टर्स सार्वजनिक ठिकाणी लावलेले आहेत, ते काढुन टाकण्यासाठीची सूचना संबंधीत विभागाला मी दिलेल्या आहेत. साधारणत: आचारसंहितेच्या कालावधीमध्ये तीनशे पेक्षा जास्त पोस्टर्स काढण्यात आले होते. दर पंधरा दिवसामध्ये मोहिमा घेवुन शहरात लावलेले असे पोस्टर्स आणि बॅनर्स काढत असतो. सार्वजनिक ठिकाणी चित्रपटांचे जे पोस्टर लावण्यात आलेले आहेत ते काढुन टाकण्याचे आणि संबंधीतांवर कारवाई करण्याचे आदेश मी संबंधीत अधिका—यास देत आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** साहेब, आचारसंहितेच्या कालावधीत आपण जे पोस्टर्स काढले होते ते राजकीय पक्षांचे पोस्टर्स काढले होते. चित्रपटांचे पोस्टर्स काढण्यात आलेले नव्हते आणि काढण्यात आले होते असे जर आपले म्हणणे असेल तर आपल्या संबंधीत अधिका—याने व्यासपीठावर येवुन तसे सांगावे की अमुक या ठिकाणचे चित्रपटाचे पोस्टर्स काढले आहेत. नाहीतर मी याच ठिकाणी माझा राजीनामा देतो. तीनशे पोस्टर्स काढल्याची आपल्या अधिका—याने जी माहिती दिली आहे ती चुकीची माहिती आहे त्याबद्दल आपण त्यांच्यावर कारवाई करावी.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—** ठिक आहे तशी अंमलबजावणी केली जाईल.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र ९१ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

**प्रश्न क्र. ९१ :—** उल्हासनगर शहरात लावल्या जाणा—या व्यवसायिक जाहीराती बाबत विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व सविस्तर माहिती मिळणेबाबत.

प्र.क्र. १ अ) उल्हासनगर शहराच्या हद्दीत लावले जाणारे व्यावसायिक जाहिरातीचे फलक (हार्डिंग) महापालिकेच्या कोणत्या विभागामार्फत परवानगी दिली जाते? कोणाकोणाला सदर जाहिरात फलक लावण्याचा ठेका दिला आहे? त्या एजन्सी/कंपनी/संस्थेचे नांवे पत्त्यासह द्यावीत?

ब) सदर जाहिरातील फलक लावण्याचा ठेकाची विहित मुदत किती? तारीख द्यावी? परवानगीची प्रक्रिया कोणती? होर्डिंगचे फ्रेम कोणत्या प्रकारची असावी लागते?

क) महापालिकेच्या नियमानुसार सदर जाहिराती फलकाच्या क्षेत्रफळानुसार दर आकारणी कशी केली जाते व त्याचा प्रत्येकी दर किती? आकारणी चौमीमी/चौसेमी/चौमी मध्ये करतात का?

ड) प्रत्येक जाहिरात फलक (होर्डिंग) लावण्याचा कालावधी नियमाधित केला आहे का? शहरात किती जाहिराती फलक (होडिंग) लावण्याची परवानगी देण्यात आली आहे? त्या प्रत्येक जाहिरातीच्या फलकाचा (होडींग) आकार किती असावा? सदर फलक कोठे लावावेत जागा निश्चिती कोण करतो?

प) सध्या महापालिका हद्दीत सध्यस्थितीत कोणकोणत्या ठिकाणी जाहिराती फलक लावण्यात आले आहेत? त्या प्रत्येक जाहिरात फलक कोठे लावला आहे त्याचा पत्ता व आकार द्यावा? त्या ठिकाणी जाहिरात फलक लावण्याची परवानगी घेतली आहे का? त्या परवानगी पत्रकाची छायांकित प्रताची यादी दयावी कोणत्या ठेकेदाराने लावले आहेत? त्याची यादी दयावी?

थ) महापालिका नियमानुसार दोन जाहिरात फलका (होर्डिंग) मध्ये किती अंतर असावे लागते? सदर जाहिरात फलक (होडिंग) जास्तीत जास्त किती आकाराचे लावण्याची परवानगी दिली जाते? आकाराबाबत मर्यादा आहे का?

फ) सार्वजनिक ठिकाणे (शाळा, कॉलेज, उदयाने व इतर) जाहिराती फलक लावण्याचीपरवानगी देण्यात येते का? सदर सार्वजनिक ठिकाणी कमीत कमी किती फलक लावले पाहिजेत? त्या सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या फलकांमध्ये किती अंतर असावे लागते?

<u>उत्तर :—</u> उल्हासनगर शहरात जाहिरात प्रसिध्द करणेकामी महानगरपालिका कर विभागाकडुन परवानगी देण्यात येते. सदर कामी महानगरपालिकेकडुन खालीलप्रमाणे अभिकर्ता नियुक्त करण्यात आलेला आहे.

कॅम्प नं. १,२,३ करीता मे. लक्ष्मी ॲडव्हटायझिंग एजन्सी, १०२, टिलसन शौपिंग सेंटर, उल्हासनगर—३

कॅम्प नं. ४,५ करीता मे. किंग्ज एंटरप्रयझेस, सोना महल सोसायटी प्लॅट नं. बी. ०८, प्रकाश ऑटो, शांतीनगर, उल्हासनगर—३.

सदर ठेक्याची मुदत खालीलप्रमाणे आहे.

मे. लक्ष्मी ॲडव्हटायझिंग एजन्सी ऑगस्ट २०१० पर्यंत

मे. किंग्ज एंटरप्रायझेस, मे २०१० पर्यंत

सदर कामी निविदा मागविण्यात आलेल्या असुन त्यानुसार ठेका देण्यात आलेला आहे. होर्डिंग्ज प्रदर्शित करणेसाठी माईल्ड स्ठटीलचा १ मी.मी. जाडीचा लोखंडी पत्र्याचा वापर करणे आवश्यक आहे. व त्याला लोखंडी ॲगलच्या आधारे सपोर्ट देणे. सदरकामी लाकुड, वायडिंग वायर, नट बोल्ड व स्क्रुचा सपोर्ट देण्यात येवु नये.

मे. लक्ष्मी ॲडव्हटायझिंग एजन्सी :— रु. ७५/— प्रति चौ.मी. प्रति माह (किमान १२०० चौ.मी.)

मे. किंग्ज एंटरप्रायझेस :— रु. ४५/— प्रति चौ.मी. प्रति माह (किमान ४०० चौ.मी.)

नाही. कॅम्प नं. १,२,३ करीता ४५ ठिकाणी (परिशिष्ट क)

तसेच कॅम्प नं. ४ व ५ करीता १२ ठिकाणी (परिशिष्ट क)

जाहिरात फलक लावण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

स्टॅंडर्ड साईज आफ द होर्डींग्ज बोर्ड शॉल बी अज फालो.

अ ३.०५ मिटर्स (१० फिट) X ६.१० मिटर्स (२० फिटस्)

ब ६.१० मिटर्स (२० फिट) X ६.१० मिटर्स (२० फिटस्)

क ९.१५ मिटर्स (३० फिट) X ४.५७५ मिटर्स (१५ फिटस्)

ड ९.१५ मिटर्स (३० फिट) X ६.१० मिटर्स (२० फिटस्)

इ १२.२ मिटर्स (४० फिट) X ३.०५ मिटर्स (१० फिटस्)

फ १२.२ मिटर्स (४० फिट) X ६.१० मिटर्स (२० फिटस्)

शहरात जाहिरात फलक लावणेकरीता जागा निश्चिती महानगरपालिकेकडुन करण्यात येते.

शहरात जाहिरात फलक प्रसिध्द करण्यात आलेली ठिकाणांचा तपशिल/आकाराची माहिती सोबत जोडत आहे. सदर ठिकाणी जाहिरात फलक लावणेबाबत परवानगी घेतलेली आहे. परवानगी पत्राची प्रत सोबत जोडत आहे. त्यामध्ये अभिकर्त्याचे नाव नमुद करण्यात आलेले आहे.

करारात दोन जाहिरात फलका (होर्डींग) मध्ये असलेल्या अंतराबाबत तरतुद आढळुन येत नाही. वरील ड प्रमाणे परवानगी दिली जाते. सार्वजनिक ठिकाणे (शाळा, कॉलेज, उदयाने व इतर) आतील परिसरात जाहिराती फलक लावण्याची परवानगी देण्यात येत नाही.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>** सन्माननिय महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, हा जो ठेका आपण मे. लक्ष्मी ॲडव्हटायझिंग एजन्सी यांना दिला आहे त्यांना १२०० मिटर पोस्टर्स लावण्याची परवानगी दिली असतांना त्यांनी ५००० मिटरपेक्षा जास्त पोस्टर लावलेली आहेत. एवढया दिवसापासुन आपण त्यांच्यावर काय कारवाई केली? आपण जी यादी दिली आहे तीच्यात उल्लेख केलेल्या संख्येपेक्षा दहा पट शहरामध्ये पोस्टर्स लावलेले आहेत. गोल मैदानमध्ये चारही बाजुने पोस्टर्स लावलेले आहेत. शहाड येथे जे पोस्टर्स लावलेले आहेत त्याची एकाची सुध्दा परवानगी घेतलेली नाही. पवई येथिल पुलाजवळ काही पोस्टर्स लावले आहे. तेथे पोस्टर्स लावण्याची परवानगी नसतांना सुध्दा तेथे पोस्टर्स लावले आहेत. उल्हास स्टेशन येथे सुध्दा जेथे जेथे पोस्टर्स लावण्यास परवानगी नाही तेथे तेथे पोस्टर्स लावले आहेत. १२०० मिटर जागेमध्ये पोस्टर लावण्याची परवानगी असतांना जवळ जवळ ५००० मिटर जागेवर पोस्टर्स लावले आहेत. आपले अधिकारी केवळ खिशा गरम करण्यासाठी पोस्टर हटविण्याची कारवाई करत नाहीत. असा माझा उघड उघड त्यांच्यावर आरोप आहे.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>**शहरात जी अतिरिक्त पोस्टर्स होर्डिंग्ज लावण्यात आलेली आहेत त्यांच्या परवानगी बाबतची संचिका माझ्याकडे आलेली आहे. पोस्टर्स होर्डिंग्जंना परवानगी देण्याचे अधिकार उप–आयुक्तांना देत आहोत. व परवानगी व्यतिरिक्त जे अतिरिक्त पोस्टर्स होर्डिंग्ज लावण्यात आलेले आहेत त्यांच्याकडुन रक्कम वसुल करण्याची प्रक्रिया या वर्षापासुन चालु करु.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>**साहेब, ५ वर्षापासुन तो परवानगीच्या दुप्पट जागा होर्डिंग्ज लावण्यासाठी वापरात असतांना त्याच्यावर आपण काय कारवाई केली आहे? गोल मैदानच्या चारही बाजुने पोस्टर्स लावल्यामुळे संपुर्ण हिरवळ झाकुन टाकली आहे. जेथुन सुर्य उगवतो आणि मावळतो त्याठिकाणी पोस्टर्स लावण्याची परवानगी नसते. याने तेथे सुध्दा पोस्टर्स लावलेले आहेत. म्हणुन त्यांच्यावर आपण काय कारवाई केली? गोल मैदान येथे जी पोस्टर्स लावलेली आहेत, ज्या दिशेला सुर्य उगवतो आणि ज्या दिशेला सुर्य मावळतो त्याठिकाणी सुध्दा त्यांनी पोस्टर्स लावलेली आहेत. सर्व हिरवळ त्यांनी झाकुन टाकली आहे. हिरवळ झाकुन टाकण्याचे त्यांना आपण अधिकार दिले आहेत काय? व पाच वर्षापासुन १२०० मिटरपेक्षा जास्त जो अतिरिक्त जागा जाहिरातीसाठी वापरत आहे त्याबाबतीत त्याच्यावर काय कारवाई करणार? त्यास वाचविण्यासाठी आता आपण परवानगी वाढवुन देत आहात. परंतु पाच वर्षापासुन परवानगी व्यतिरिक्तची जी अतिरिक्त जागा तो वापरत आला आहे त्याचे काय करणार?

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>**जी अतिरिक्त होर्डिंग्ज लावण्यात आलेली आहेत व जेथे होर्डिंग्ज लावण्यास परवानगी दिली जावु शकत नाही ती होर्डिंग काढुन टाकली जातील. व जेथे होर्डिंग्ज लावण्यास परवानगी दिली जावु शकते तेथे परवानगी देवुन त्याबाबतची वसुली ते होर्डिंग्ज जेव्हापासुन लागलेली आहे तेव्हापासुन वसुल करण्याची प्रक्रिया चालु केली जाईल.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>**परंतु त्वरीत आपल्या अधिका–यांना सांगा की, जेथुन सुर्य उगवतो आणि जेथे मावळतो त्याचबरोबर ज्या ज्या ठिकाणी त्यांनी हिरवळ झाकली आहे अशा ठिकाणची पोस्टर्स त्वरीत काढण्याबाबत आपण त्यांना आदेश दया. व परवानगी व्यतिरिक्त जी अतिरिक्त पोस्टर्स लावलेली आहेत त्यांच्यावर काय दंड आकारणार? तो पाच वर्षापासुनचा दंड आकारुन वसुल केला जावा.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:–</u>**सन्माननिय आयुक्त साहेब, श्री. भुल्लर महाराज यांनी जो प्रश्न विचारला तो अतिशय महत्वाचा आहे. शहाड स्टेशनजवळ पुलाखाली चित्रपटांची अश्लिल पोस्टर्स लावली जातात. ती त्वरीत हटविली जावीत कारण की, तेथुनच जवळच्या अंतरावर बिर्ला कॉलेज आणि बिर्ला मंदिर आहे. म्हणुन पोस्टर्स हटवुन त्याठिकाणी स्वच्छ उल्हासनगर, हरित उल्हासनगर अशा प्रकारची घोषवाक्ये लिहिली जावीत अशी माझी विनंती आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याकडे मी आपले लक्ष वेधु इच्छितो, त्यांनी सांगितले की आपल्या अधिका–यांच्या हातमिळवणीमुळे एवढा मोठा भ्रष्टाचार होत आहे. मी आपणांस सांगु इच्छितो की, हे प्रकरण जर आपण सुरुवातीपासुन पाहिले तर असे दिसुन येईल की, जेव्हा ही निविदा निघाली तेव्हापासुन जर आपण चौकशी केली तर आपणांस असे दिसुन येईल की, ती जी निविदा दिली आहे ती पुर्णपणे चुकीच्या पध्दतीने दिली आहे. आपणांस अधिकाधिक रक्कम देण्यासाठी ज्या ठेकेदाराने निविदा भरली होती त्याने भरलेली इएमडीची रक्कम सोडुन दिली आहे व ज्याने कमी रक्कमेची निविदा भरली होती त्यास निविदा देण्यात आली. निविदा

नियमानुसार पुन्हा निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु या सर्व बाबी बाजुला सारुन अधिका–यांनी ठेकेदाराशी हातमिळवणी करुन चुकीच्या पध्दतीने ठेका दिला. म्हणुन सुरुवातीपासुन या निविदेची चौकशी केली जावी.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र ९२ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा असून तो प्रश्न मा. महापौरांकडुन नाकारण्यांत आला आहे.

**<u>महापालिका सचिव :–</u>** प्रश्न क्र ९३ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

? **<u>प्रश्न क्र. ९३ :–</u>** मनपा सनियंत्रणा खालील खाजगी अनुदानित व विना अनुदानित शाळांबाबत विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व सविस्तर माहिती मिळणेबाबत व सखोल चर्चा करण्यात यावी ही विनंती.

प्र.क्र. १ अ) मनपा सनियंत्रणा खालील खाजगी अनुदानित मान्यताप्राप्त व विना अनुदानित मान्यताप्राप्त किती प्राथमिक शाळा आहेत? त्या शाळांची नावे व पत्ते द्यावीत?

ब) प्रशासन अधिकारी श्री. गायकवाड यांची उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात नियुक्तीपासुन त्यांनी अशा किती खाजगी अनुदानित मान्यताप्राप्त व विना अनुदानित मान्यताप्राप्त शाळांना भेटी दिल्या आहेत? त्या शाळांची नावे व पत्ते द्यावीत.

क) प्रशासन अधिकारी श्री. गायकवाड यांनी सदर शाळांना भेटी पाहणी अंती मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील नियम १०६ बी १०७ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची किती शाळांनी पुर्तता केली आहे?

प) मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील नियम १०६ बी १०७ मध्ये विहित केलेल्या त्या अटी व शर्ती कोणत्या?

ड) दिल्ली उच्च न्यायालयाने विदयार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना पाल्य/पालकांची मुलाखत न घेण्याबाबत निर्णय दिला आहे, त्यानुसार सदरचा निर्णय देशभरात सर्वत्र लागु होतो तर मनपा सनियंत्रणाखालील अनुदानित मान्यता प्राप्त व विना अनुदानित मान्यता प्राप्त शाळांना मुलाखत न घेण्याबाबतचे परिपत्रक काढले आहे का? असल्यास त्याची प्रत दयावी? परिपत्रक नसल्यास परिपत्रक का काढले नाही?

ध) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील किती शाळा बेकायदेशीर/अनाधिकृत आहेत? त्या शाळांची नावे / पत्ते द्यावीत? त्या शाळांवर प्रशासनाने कोणती कारवाई केली आहे?

<u>उत्तर :–</u> अ) मनपा सनियंत्रणा खाजगी अनुदानित, विना अनुदानित, कायम बिना अनुदानित शाळांची संख्या १०४ आहे. सोबत यादी सादर करीत आहे.

ब) एकुण १०४ शाळांपैकी कायम विना अनुदानित शाळा वगळुन एकुण ६५ शाळांना भेटी देण्यात आलेल्या आहेत. सोबत शाळांची नावे व पत्ते देत आहेत.

क) मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील प्रकरण ७ मधील ए प्रारंभीक नुसार व बी–खाजगी शाळांना मान्यता व सहाय्यक अनुदान देणे त्यामघील नियम क्र. १०६ चा १ ते ४ परिच्छेद व नियम क्र. १०७ खाजगी शाळेस मान्यता देणे. परिच्छेद १,२ चा अ,ब,क,ड,ई व परिच्छेउ ३ चा ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच,आय,के अखेर व त्यामधील पुढील परिच्छेद क्र. ४,५,६,७ मध्ये शिक्षण मडळ, शिक्षण समिती जिल्हास्तर सदर शाळेच्या मान्यतेबाबत तुकडयांच्या प्रस्तावाच्या मान्यतेबाबत आवश्यक ती शिफारस मा. शिक्षण उपसंचालक, संबंधित विभाग यांना पत्रव्यवहार करण्याच्या कार्यवाहीचा उल्लेख विवरण आहे. तसेच त्यामध्ये शासन स्तरांवरुन तुकडयांच्या मान्यता, अनुदान, शाळांचे प्रस्ताव त्यांचे अनुदान मंजुरी याबाबत परित्रकांनुसार वेळोवेळी सुधारीत आदेश देण्यात आलेले आहे. श्री. एस.बी. गायकवाड हे दिनांक १४/६/२००६ रोजी हजर झाले आहेत. त्यापुर्वीच सर्व शाळांना तसेच संबंधित तुकडयांना मान्यता शासनाच्या विविध स्तरावरुन देण्यात आलेल्या आहेत.

प) सोबत मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील नियम १०६ बी, १०७ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीच्या साक्षंकित विवरण पत्र जोडत आहे.

ड) मा. सर्वोच्च न्यायालयाचा सदर आदेशाबाबत मनपा सनियंत्रणाखालील सर्व शाळा प्रमुखांना सुचित करण्यात आले आहे.

ध) उल्हासनगर म.न.पा. कार्यक्षेत्रात एकही शाळा अनधिकृत नाही तसा अहवाल शासनास सादर केलेला आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** या प्रश्नाचे उत्तर कोण देईल? शिक्षण मंडळाशी संबंधीत हा प्रश्न आहे.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**सन्माननिय सदस्यांचा जो प्रश्न आहे तो शिक्षण मंडळाच्या कामकाजाशी संबंधीत आहे. सूचना देवुन सुध्दा प्रशासन अधिकारी येथे उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस आम्ही शिक्षण मंडळ व उपसंचालक शिक्षण विभाग यांना करु.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र ९४ हा श्रीमती मिनाताई सोनेजी यांचा आहे.

**प्रश्न क्र. ९४ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध विभागातून कर्मचारी व अधिकारी यांच्या नियुक्त्या

तात्पुरत्या/कंत्राटी पध्दतीने/ मानधनावर करण्यात येत असतात. महापालिकेच्या विविध विभागातून करण्यात आलेल्या अश्या नियुक्त्या बाबत खालील प्रश्नांची माहिती मिळणे विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) महापालिकेच्या कोणकोणत्या विभागातून तात्पुरत्या/कंत्राटी पध्दतीने/मानधनावर कर्मचा—यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत? कोणकोणत्या पदावर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत? सदरच्या नियुक्त्या किती कालावधीसाठी करण्यात आल्या आहेत? सदर नियुक्तांची विहित मुदत संपली आहे का? संपली असल्यास संबंधितांना मुदत वाढ दिली आहे का? मुदतवाढ देतांना कोणते निकष वापरण्यात आले आहेत? सदरचे निकष सर्व कर्मचा—यांना लागु आहेत का? सुवर्ण जयंती विभागातील प्रकल्प अधिकारी यांची नियुक्ती कशी करण्यात आली आहे? किती कालावधीसाठी करण्यात आली आहे? त्यांची मुदत संपृष्टात आली आहे का? संपली असल्यास त्यांना मुदतवाढ दिली आहे का? कधी पर्यंत मुदतवाढ दिली आहे? सदरचा कालावधी कधी संपृष्टात येत आहे? याबाबत महासभेत चर्चा होवून सुचक समाधानकारक सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

**उत्तर :—** १९९७ पासून केंद्र पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सुरु करण्यात आली आहे. सु.ज.श.रो. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या विचारात घेवून शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. सुजयो/२००१/६९०/प्र.क्र. २८/नवि—३३, दिनांक १० मे, २००२ अन्वये महापालिकासाठी समुहसंघटक / प्रकल्प अधिकारी यांची पदे तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर निर्माण करण्यात आली आहे. महापालिका सुजशरोयो अंतर्गत प्रकल्प अधिकारी/समुहसंघटक यांची तात्पुरत्या स्वरुपात १ वर्षासाठी नेमणूक केली जाते. मा. आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार सहा महिने/ एक वर्षाकरीता मुदत वाढ देण्यात आलेली आहे. पैकी तीन समुहसंघटकाची मुदतवाढ दिनांक ३१/१२/२००७ व दोन समुहसंघटकाची मुदतवाढ दिनांक १४/७/२००७ व दिनांक ७/११/२००७ ला संपली असुन मुदतवाढ प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवलेला आहे. प्रकल्प अधिकारी व एक समुहसंघटक (कु. संजीवनी अमृतसागर) यांना मुदतवाढ दिनांक १७/६/२००८ पर्यंत देण्यात आलेली आहे. नेमणुक अटी व शर्ती व कामाचा अहवाल तपासून केली जाते. सोबत अहवाल जोडत आहे.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>** या प्रश्नांच्या उत्तरात दोन शंका आहेत. कृपया संबंधीत अधिका–यास व्यासपिठावर बोलविण्यात यावे. आयुक्त साहेबांना एक प्रश्न विचारायचा आहे. हा प्रश्न सुवर्ण जयंती विभागाशी संबंधित आहे. काय त्या प्रश्नाचे उत्तर प्रकल्प अधिकारी देवु शकतात का?

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>**सन्माननिय नगरसेविकेचा जो प्रश्न आहे, त्या संदर्भात सांगु इच्छितो की, महानगरपालिकेमध्ये आपण मानधनावर दोन ठिकाणी नियुक्त केलेले कर्मचारी दिलेले आहेत. एक सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना ही एक केंद्र शासन पुरस्कुत योजना आहे. या ठिकाणी नियुक्त केलेल्या कर्मचा–यांना आपण एक–एक वर्षाची मुंदतवाढ देत असतो. काही ठिकाणी कंत्राटी कामगार जसे नाले सफाईसाठी ७६० हंगामी सफाई कामगार आपण घेतलेले आहेत. आणि तिसरे असे की, विशेष कार्य अधिकारी म्हणुन अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभागामध्ये श्री. पाटील हे सेवानिवृत्त पोलिस निरिक्षक आपणाकडे कार्यरत आहेत. दुसरे म्हणजे सामान्य प्रशासन विभागामध्ये एक अधिकारी आपण नेमतो. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमध्ये आपण ज्या नियुक्त्या दिल्या होत्या त्या जिल्हाधिकारी कार्यालयामधील जिल्हा प्रकल्प अधिकारी आणि जिल्हा नागरी विकास यंत्रणा यांच्यामार्फत दिल्या. त्यांनी जर चांगले काम केले तर आपण त्यांना मुदतवाढ देत असतो. चांगले काम केले नाही तर आपण त्यांना कामावरुन काढुन टाकत असतो. त्यातील तीन चार कर्मचा–यांना कामावरुन काढुन टाकण्याचे आदेश प्रशासनाने दिले होते परंतु त्यांनी विनंती केली की सहा महिन्यासाठी आम्हांला मुदतवाढ देण्यात यावी. तशी संधी आपण त्यांना दिली आहे. चांगले काम केले तर आपण त्यांना सेवेत सलग ठेवु नाहीतर कामावरुन काढुन टाकु.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>**साहेब, चांगले काम म्हणजे किती टक्के काम व्हायला पाहिजे तेवढे जरा स्पष्ट करा.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>**तसे म्हटले तर ८० टक्के पेक्षा कमी हे चांगले काम असु शकणार नाही. परंतु मागील वर्षीच्याही मागील वर्षी जे १७ लाख रुपयाचे काम झाले होते त्यापेक्षा या आर्थिक वर्षामध्ये ५५ लाखाचे काम झाले आहे. सुधारणा झाली होती परंतु ती ३० टक्के ते ३५ टक्के होती त्यांना कामावरुन कमी केले होते. तथापी चांगले काम करण्याच्या हमीवर त्या सर्वांना सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांनी चांगले काम केले तर सलगसेवेत ठेवण्यात येईल.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>**साहेब, उत्तर चांगले आहे परंतु मला असे म्हणायचे आहे की या प्रश्नाचे उत्तर प्रकल्प अधिकारी देवु शकतो की अन्य कुणी देवु शकतो? प्रकल्प अधिका–याने उत्तर दिलेले आहे. असे चालते का? त्यांच्याशीच संबंधीत हा प्रश्न आहे.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>**यापुढे सर्व उत्तरे पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणुन संबंधीत उप–आयुक्त किंवा अतिरिक्त आयुक्त यांनी दिली पाहिजेत. अशा सूचना मी देतो. विभागप्रमुखाने प्रश्नांची उत्तरे दयायची नाहीत. अशा स्पष्ट सूचना मी देतो.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>**आभारी आहे साहेब.

**<u>महापालिका सचिव :–</u>** प्रश्न क्र ९५ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र. ९५ :–</u>** केंद्र शासनाने महापालिका हद्दीत मूलभुत नागरी सुखसुविधा व विकास कामे करण्यासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाचे माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदर विषयावर महापालिकेच्या सभागृहात यापुर्वी चर्चा करुन कारवाई करणेच्या सूचना देण्यात आल्या आअेत. त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाचा निधी उपलब्ध करणेसाठी महापालिका प्रशासनाने आजतागायत कोणकोणती कारवाई केली? जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियानाचा निधी उपलब्ध होणेसाठी आवश्यक असणा–या बाबींची पुर्तता महापालिका प्रशासनाने केली आहे का? कोणकोणत्या कामासाठी किती निधी उपलब्ध होणार आहे? जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानाचा निधी मिळविणे बाबत अन्य महापालिकांचा विचार करता उल्हासनगर महानगरपालिकेची सद्यस्थिती काय आहे?

**<u>उत्तर :–</u>** सदर प्रश्नाबाबत सविस्तर माहिती सी.डी. च्या स्वरूपात यापुर्वी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—** जेएनएनयुआरएमशी संबंधीत प्रश्न आहे. याविषयी आपली चर्चाही झालेली आहे. आणि महापौर व आयुक्त कार्यालयही याबाबत माहिती देणार होते. यावर विस्तृतपणे चर्चा झालेली आहे. तरीपण सर्व सन्माननिय सदस्यांना कळण्यासाठी. हा प्रश्न साधारणतः मार्च महिन्यामध्ये आला होता. या प्रश्नाचे जे उत्तर दिलेले आहे त्याच्या शेवटच्या वाक्यामध्ये लिहिले आहे की, दोन महिन्याच्या आत आपण जे १५९९ कोटीचे प्रकल्प पाठविले आहेत त्यापैकी १५०० पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवर २४.३९ कोटी आणि रस्ते सुधारणा यावर १५४.७८ कोटी यापैकी बीएसयुपी, पाणी पुरवठा व मलनिस्सारण या कामीची रक्कम मंजुर केलेली आहे असे सांगितले आहे. आता त्याची सध्यस्थिती काय? त्याचा पाठपुरावा झाला आहे काय? कारण शेवटुन दुस—या परिच्छेदामध्ये असे लिहिले आहे की, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान या योजनेअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेने पाठविलेल्या शहर विकास आराखडयाप्रमाणे रुपये १५९९ कोटीच्या योजना प्रस्तावित आहेत. केंद्र शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार पाणी पुरवठा मलनिस्सारण व बीएसयुपी या योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता सल्लागाराची नेमणुक होवुन कामास सुरुवात होत आहे. आगामी दोन महिन्यामध्ये डीपीआर तयार झाल्यास महाराष्ट्र शासनाकडुन मंजुरी घेवुन केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर योजनांची कार्यवाही होणार आहे. आता हा दोन महिन्याचा कालावधी त्यावेळचा आहे. त्यास आता तीन महिने झाले आहेत. डीपीआर मंजुर झाला का? कारण की हा विषय कसा आहे की, डीपीआर आणि सीडीपी या दोन विषयामध्येच आपण अडकतो आहोत. श्री. कांबळे साहेब असतांना सुध्दा हेच झाले त्यामुळे निधी मिळाला नाही आणि आता संपुर्ण वर्ष यामध्येच चालले आहेत. म्हणुन आता नेमकी स्थिती काय आहे?

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निमाण अभियानाबाबत मागच्या एप्रिल महिन्यामध्ये सर्व गटनेत्यांची आपण बैठक घेतली होती. आणि आता १६ जुनला दुसरी आढावा बैठक घेत आहोत. डिपीआर तयार करण्यापुर्वी जे इन्स्फेक्शन रिपोर्ट असतात ते दोन्ही संस्थांनी दिलेले असतात त्याची चर्चा आपण १६ जुन रोजी करणार आहोत आणि इतर जी कामे आपण जेएनएनयुआरएम योजनेमध्ये घेतली होती त्यातील रेल्वे उड्डानपुलाचा (पादचारी पुल) जो विषय होता तो मंजुर होवुन त्याचा निधी देखील आपण वितरीत केला आहे. आणि वालधुनी नाला विकास आणि खेमाणी नाला वळविण्याचे जे प्रकल्प होते ते तयार करुन आपण एमएमआरडीए मार्फत सादर केलेले आहेत. आणि रस्त्यांच्या संदर्भातील आपली कार्यवाही अदयाप झालेली नाही. परंतु पाणी पुरवठा आणि मलनिसारणचे इन्स्फेक्शन रिपोर्ट डीपीआर ३० जुनपर्यंत ते आपणांस तयार करुन देतील असे त्यांनी आश्वासन दिलेले आहे. सल्लागार नेमण्याबाबत आपण तीनचार वेळेस निविदा काढल्या होत्या परंतु त्यास फारसा प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे एमएमआरडीएच्या पॅनलवर जे सल्लागार आहेत त्यांना नेमणुक देण्याची प्रक्रिया आपण करत आहोत. येणा—या स्थायी समितीमध्ये त्यांच्या मंजुरीस मान्यता देण्याचे प्रस्ताव ठेवले जातील, मला असे मान्य करायला लागेल की, जेएनएनयुआरएम योजना जितक्या वेगाने जायला हवी.तितक्या वेगाने ती जात नाही. त्यासाठी अतिरिक्त अधिकारी व अभियंत्यांची मागणी आपण करत आहोत. त्यासाठी सातत्याने दर सात आठ दिवसांनी या योजनेचा आढावा घेवुन आपणां सर्वांच्या सहकार्याने लवकरात लवकर डीपीआर तयार करुन पाठविण्याची आम्ही कार्यवाही करु.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एक निश्चित तारीख ठरवा. या महिन्याच्या अखेर आपण काहीही करुनं......

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**३० जुन पर्यतची मुदत आपण दिलेली आहे. एप्रिल महिन्यामध्ये जी बैठक झाली होती त्यावेळेस ३० मे पर्यतची तारीख दिलेली होती. मसुदा जो असतो तो आपण दिलेला आहे आणि १६ जुनला आपण सर्वांना बोलाविले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—**या प्रश्नाच्या शेवटी मी प्रश्न विचारला होता. इतर महापालिकेच्या तुलनेत उल्हासनगर महापालिकेची स्थिती नेमकी काय आहे? ही महापालिका कुठे आहे? जसे तुम्ही सांगितले की, कर्मचा—यांनी ८० टक्के काम करावे. तसे या योजनेबाबतीत तुम्ही किती टक्केपर्यंत पोहचला आहात? कल्याण महानगरपालिकेला निधी मिळाला का? ठाणे महानगरपालिकेला निधी मिळाला का? मिरा—भाईंदर महानगरपालिकेला निधी मिळाला का? डीपीआर तयार झाले, मंजुर झाले, सीडीपी तयार होवुन, मंजुर होवुन एमएमआरडीएला देवुन दिल्लीच्या कमेटीनेही मंजुरी देवुन कामही सुरु झाले. आणि आपला सीडीपी आणि डीपीआर तयार नाही.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**इतर महानगरपालिकांमध्ये, कल्याण महानगरपालिकेस बीएसयुपीचा एक हप्ता मिळाला आहे. इतर महानगरपालिकांची माहिती सध्या माझ्याकडे नाही. १६ जुन रोजी होणा—या बैठकीपुर्वी ती माहिती गोळा करुन घेवु.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र ९६ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**प्रश्न क्र. ९६ :—** महासभा ठराव क्र. १९, दिनांक २०/९/२००६ व महासभा ठराव क्र. ३१, दिनांक २९/६/२००७ रोजीच्या महासभेत वरील ठराव पास झालेले असुन त्याची अंमलबजावणी अदयापपर्यंत झालेली नाही याचे कारण काय? याचे उत्तर महासभेत मिळावे.

**उत्तर :—** महासभा ठराव क्र. १९, दिनांक २०/९/२००६ रोजीच्या ठरावास अनुसरुन सदर प्रकरणाबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

तसेच महासभा ठराव क्र. ३१, दि. २९/६/२००७ अनुसरुन १२३ कर्मचा—यांना निवृत्ती वेतन व अंशदाने इ. लाभ देण्यात यावेत किंवा कसे? याबाबत इकडील दिनांक ९/१०/२००७ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडून मार्गदर्शन मिळणेस विनंती केली आहे. परंतु अदयापपर्यंत शासनाकडुन मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

**सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:—** ठिक आहे.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र ९७ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**प्रश्न क्र. ९७ :—** बांधकाम परवानगी क्रमांक युएमसी/टीपीडी/बीपी/९४/९७, ९०/९७ नुसार खालील प्रश्नापर महासभेत चर्चा होवून माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) मंजुरी प्राप्त जागेवर जुना मंजुर डीपी नुसार कोणता झोन होता? तसेच सदरचा भुखंड कश्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे का?ब) नविन प्रपोजड डीपीनुसार कोणता झोन आहे? तसेच कोणते रिझर्व्हेशन आहे काय? क) विकासकाम कोणत्या प्रकारचे बांधकाम रेसीडेशियल/कमर्शियल बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे? परवानगीची व मंजुर नकाश्याची सत्यप्रत मिळावी? सदर बांधकाम परवानगी देतांना विकास काम कोणती विशेष सवलत, अटी शर्ती घेतलेल्या आहेत का? त्यामागील कारणांची सविस्तर माहिती मिळावी? ड) जुन्या/नविन, कोणत्या डीपीनुसार बांधकाम परवानगी महापालिकेकडून दिली जाते? सदर प्रकरणी त्याच पध्दतीने बांधकाम परवानगी दिली काय? यापुर्वी महापालिकेने दिलेल्या बांधकाम परवानग्या व या बांधकाम परवानगीत काही तफावत आहे का? तसेच अश्या प्रकारे अन्य प्रकरणात बांधकाम परवानग्या दिल्या आहेत का? असल्यास बांधकाम परवानग्याची माहिती व क्रमांक मिळावेत? सदर प्रकरणात मालकास सनद मिळाली आहे का? सनद किती क्षेत्रफळाची आहे? त्यावर नियमानुसार किती एफएसआय नुसार आहे? सनद प्राप्त झाल्यानंतर सीटी सर्व्हे कार्यालयाकडून सदर भुखंडाचे हद्दी व सिमा मोजणी करुन निश्चित करुन प्लान मंजुरीसाठी दिला आहे का? सविस्तर माहिती मिळावी.

**उत्तर :—** मंजूर विकास आराखडयानुसार रहिवासी विभागामध्ये समाविष्ट असून त्यावर कुठल्याही प्रकारचे आरक्षण नाही.

प्रारुप विकास आराखडयानुसार वाणिज्य वापर यासाठी आरक्षित आहे. वाणिज्य व हिवासी वापर यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याची प्रत नियमाप्रमाणे शासकिय शुल्क भरलयानंतर उपलब्ध करुन देण्यात येईल. सदरची बांधकाम परवानगी शासन निर्णय टीपीएस.१०९४/सी आर १४९४/नवि—९, उिपसंक ७/४/९४ च्या निर्णयानुसार समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून जर एखादे आरक्षण महानगरपालिका विकसित करु शकत नसेल आणि त्या जागेची मालकी हक्क विकासकाकडे असेल तर महानगरपालिकेस त्या जागेचा २५ टक्के बाधीत क्षेत्र विकसित करुन विनामुल्य हस्तांतरीत करावयाच्या अटीवर सदर जागेवर बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आलेली आहे.मंजुर व प्रारुप विकास योजनेतील कठोरतम तरतुदीनुसार बांधकाम परवानगी मंजुर करण्यात येते व सदर प्रकरणी कठोरतम तरतुदीनुसार नकाशा मंजुर करण्यात आलेला आहे. अशा प्रकारच्या आतापर्यंत १४ बांधकाम परवाग्या मंजुर करण्यात आलेल्या असून त्यात त्याचा भउुखंडाचे क्षेत्र नमुद केलेले व त्यांना नियमानुसार १ चटई क्षेत्र निर्देशांक आणिक महानगरपालिकेस दयावयाचे २५ टक्के क्षेत्र मिळुन एकुण १.२५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. बांधकाम चालु करण्यापुर्वी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रामधील अट क्र. १२ नुसार नगरभुमापन अधिकारी कार्यालय यांचेकडुन जागेच्या चत:सीमा हउुउ निश्चित करुन घेणेची जबाबदारी विकासकाची आहे.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:— ठिक आहे.

महापालिका सचिव :— पहिल्या सभेचा प्रश्नोत्तर काळ समाप्त झाला आहे. दुस—या सभेची प्रश्नोत्तरे सलग चालु करायची काय? सभेचा प्रश्नोत्तर काळ येथेच समाप्त करायचा? प्रश्नोत्तर काळ समाप्त. सभेचे पुढील कामकाज सुरु करण्यापुर्वी आपल्या महापालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणुन आलेले श्री. अशोक रणखांब हे सभागृहात उपस्थित आहेत. ते व्यासपीठावर येवुन सभागृहात आपला परिचय करुन देतील. मा. महापौरांच्या आदेशानुसार त्यांनी व्यासपीठावर यावे.

अतिरिक्त आयुक्त (श्री. अशोककुमार रणखांब):—मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त, मा. सचिव, मी अशोककुमार रणखांब अतिरिक्त आयुक्त या पदावर २८ मे रोजी हजर झालेलो आहे. सहा जुन रोजी काही विभागांचा कार्यभार माझ्याकडे सोपविण्यात आलेला आहे. ६ तारखेपासुन मी कामकाजाला सुरुवात केली आहे. या महापालिकेत येण्यापुर्वी मी महाराष्ट्राच्या पाच—सहा जिल्हयात काम केलेले आहे. धुळे, जळगाव, अहमदनगर, नाशिक, रायगड आणि त्यापुर्वी विरार, मिरा—भाईंदर महापालिकेत उप—आयुक्त म्हणुन, ठाणे परिवहन सेवेत महाव्यवस्थापक म्हणुन आणि आता आपल्या या महापालिकेत हजर झालेलो आहे. मला अशी अपेक्षा आहे की आपणाकडुन मला सहकार्य मिळेल आणि ज्या विभागाचे कामकाज माझ्याकडे दिलेले आहे त्या विभागाला न्याय देण्याचा मी प्रयत्न करेन. नागरीकांची आणि लोकप्रतिनिधींची सर्व कामे चांगल्या रितीने होतील याकडे माझे लक्ष राहिल. आभारी आहे.

महापालिका सचिव :—अतिरिक्त आयुक्तांचे स्वागत आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. २ :— मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १९/३/२००८, तसेच दिनांक २६/३/२००८ व दिनांक २९/३/२००८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— मागील सभेचे दिनांक १९/३/२००८, तसेच दिनांक २६/३/२००८ व दिनांक २९/३/२००८ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २** :— मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १९/३/२००८, तसेच दिनांक २६/३/२००८ व दिनांक २९/३/२००८ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव श्री. रामसागर यादव:
अनुमोदकाचे नाव :श्री. बी.बी. मोरे

महासभा ठराव क्र. १ अ — दिनांक : १२/६/२००८

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक १९/३/२००८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र.१ ते ६६ पर्यंतचे इतिवृत्त, तसेच दिनांक २६/३/२००८ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र.१ ते ६ पर्यंतचे इतिवृत्त व दिनांक २९/३/२००८ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र.१ ते २३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

एकमताने

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:–** १३ उमेदवारांना विविध संवर्गात अनुकंपा तत्वावर उल्हासनगर महापालिकेत नियुक्तीस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. जीवन इदनानी:–जुन्या शासन निर्णयानुसार आपणाकडे प्रस्ताव, गोषवारा आलेला आहे. त्यानंतर नविन शासन निर्णय आलेला आहे. त्यानुसार १३ उमेदवारांऐवजी १५ उमेदवारांना काम मिळु शकते. प्रतिक्षा सुचीवर जे दोन उमेदवार आहेत त्यांना सुध्दा आपण सेवेत सामावुन घेवु शकतो. माझ्या मते शासन निर्णयाची प्रत सामान्य प्रशासन विभागात आलेली आहे. यास्तव माझी अशी विनंती आहे की, सभागृहाची जर संमती असेल तर जे कुणी दोन उमेदवार प्रतिक्षा सुचीवर आहेत त्यांना काम मिळु शकेल. त्यांची नावे समाविष्ट करुन १३ ऐवजी १५ उमेदवारांना सेवेत सामावुन घ्यावे.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–उल्हासनगर महानगरपालिकेत जेवढया काही कामगार संघटना आहेत त्यांच्याबरोबर एप्रिल महिन्यामध्ये मी एक बैठक घेतली होती त्यावेळेस नविन सुधारीत शासन निर्णय जो आला आहे २२ ऑगस्ट २००५ पुर्वी जेवढया काही नेमणुका प्रलंबित आहेत त्यांच्या ५० टक्के लोकांना अनुकंपा तत्वावर सामावुन घेण्याची शासन निर्णयामध्ये तरतुद आहे. त्यानुसार सुधारीत गोषवारा सचिव कार्यालयात दिलेला आहे. तो महासभेपुढे येण्यास थोडा विलंब झाला आहे. सुधारीत शासन निर्णयानुसार १५ लोकांना आपण कामावर घेवु शकतो. जर सभागृहाची परवानगी असेल तर त्यानुसार कार्यवाही करु शकतो.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–जी यादी तयार करण्यात आलेली आहे ती प्रामाणिकपणे जेष्ठतेनुसार तयार करण्यात आलेली आहे? कुणावर अन्याय तर होत नाही ना?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–यादी जी आहे ती जेष्ठतेनुसारच तयार करण्यात आलेली आहे. व त्याबाबतीत या तीन चार महिन्यामध्ये आजपर्यंत कोणतीही तक्रार आलेली नाही.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–तक्रारीचा विषय वेगळा आहे. प्रशासनाने ती यादी प्रमाणीकपणे तयार केली आहे का?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–जे काम होते ते बहुतेक प्रामाणिकपणे होते.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:–हे आपले मिळतेजुळते उत्तर आहे. उत्तर तर आपण प्रामाणीकपणे दया जी यादी तयार करण्यात आली आहे ती यादी बरोबर आहे की नाही? कारण की उदया जर तक्रार आली तर महासभेसमोर आपण जे बोलत आहात त्याचा आम्ही संदर्भ देवु.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–जे काही बोलले जाते त्याचे रेकॉर्डींग तर होतेच परंतु माझ्या माहितीप्रमाणे ती बरोबर तयार केलेले आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–ती माहिती परिपुर्ण असली पाहिजे.

सदस्य श्री. मोहन साधवानी:–आयुक्त साहेब, मध्यंतरी १५ एप्रिलला हिंदुस्तान टाईम्स मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेतील भरती प्रक्रियेतील अनियमिततांबाबत एक वृत्त आले होते, त्याबाबत औरंगाबाद

महानगरपालिकेचे आयुक्त तपासणी करावयास आले होते तर असे होवु नये की, आपण हे जे १५ कर्मचारी घेत आहोत त्यांच्या भरतीमध्येपण काही अनियमीतता व्हावी? तसे काही झाले तर यास पुर्णपणे अधिकारी जबाबदार राहतील. आम्ही जनप्रतिनिधी जबाबदार राहणार नाहीत.

<u>**महापालिका सचिव :–**</u>विषय कशाप्रकारे पारीत करायचा आहे? १३ की १५ कर्मचा–यांचा?

<u>**काही सदस्य :–**</u> १५ कर्मचा–यांचा प्रस्ताव पारीत करावा.

<u>**महापालिका सचिव :–**</u>१५ कर्मचा–यांबाबतीत प्रस्ताव कुठे आहे?

<u>**काही सदस्य :–**</u>सुधारीत शासन निर्णयानुसार आणखी दोन कर्मचारी समाविष्ट करुन १५ कर्मचा–यांबाबतीत ठराव पारीत करावा.

<u>**महापौर :–**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 👍

---

☑

**विषय क्र. ३ :–** १३ उमेदवारांना विविध संवर्गात अनुकंपा तत्वावर उल्हासनगर महापालिकेत नियुक्तीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासनाने अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याच्या योजनेत सुधारणा करून सुधारीत योजना दिनांक २६/१०/१९९४ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित केलेली आहे. त्यानंतर शासनाने योजनेच्या वेगवेगळया तरतुदीत सुधारणा केलेली आहे. या सर्व शासन निर्णयातील तरतुदीं अन्वये यापुर्वी तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षायादीतील व माहे जानेवारी, २००७ पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांचे वर्गीकरण करून प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली आहे. जे कर्मचारी आधी निधन पावले आहे त्यांच्या पाल्याचा प्रथम विचार प्रतिक्षा यादीत केला आहे.

१) गट 'क' व 'ड' पदावर नियुक्ती देणेसाठी विहित अटी व शर्ती पूर्ण करणा–या उमेद्वारांची प्रतिक्षायादी त्यांच्या अर्जाच्या जेष्ठतेच्या दिनांका नुसार (कार्यालयास प्राप्त झालेला दिनांक गृहित धरून) गट 'क' व 'ड' ची स्वतंत्र प्रतिक्षायादी तयार केली आहे.

२) अनुकंपातत्वावर प्राथम्य क्रमानुसार कार्यवाही करण्यासाठी गट–क व गट–ड ची एकत्रित यादी तयार केली आहे.

३) शासन निर्णय साप्रवि क्र. अकंपा–१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दिनांक २२/०८/२००५ अन्वये सदरहु योजनेच्या प्रचलीत कार्यपध्दतीमध्ये व योजनेच्या तरतुदीत सुधारणा केलेली आहे.

४) उपरोक्त शासन निर्णय दि.२२/०८/२००५ मधील परिच्छेद १ (इ) अन्वये गट 'क' व 'ड' मधील पदांवरील नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपलब्ध गट 'क' व 'ड' च्या रिक्त पदांवर, पदासाठी विहीत अटी व शर्ती पूर्ण करणा–या उमेद्वारांना वरील यादीच्या क्रमानुसार नियुक्ती करू शकतील अशी तरतुद आहे.

या तरतुदी नुसार महानगरपालिका ही, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती प्राधिकरण असल्याने प्रतिक्षा यादीतील कर्मचा–यांची नियुक्ती करण्यास महापालिका सक्षम आहे.

०५) उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद १ (ओ) अन्वये नियुक्तीसाठी गट–क व गट–ड मध्ये प्रतीवर्षी रिक्त होणा–या पदांपैकी ५ टक्के पदांची मर्यादा विहित केली आहे.

०६) महानगरपालिकेच्या आस्थापनेवर गट 'क' ची एकूण ११३ रिक्त पदे आहेत व गट – 'ड' ची एकूण ११७ पदे रिक्त आहेत. शिवाय सफाई कामगारांची एकूण २९५ पदे रिक्त असुन २७५ पदे न्यायालयीन प्रकरणासाठी रिक्त ठेवून उर्वरीत २० पदे अशी मिळून २५० पदे (११३ . ११७ . २०) रिक्त आहेत. या २५० रिक्त पदांच्या ५ टक्के म्हणजे १३ पदांवर गट 'क' व 'ड' च्या एकत्रित यादीमधील अनु. क्रमांक १ ते १३ उमेदवारांना खालिल पदावर अनुकंपातत्वावर नियुक्ती देण्यासाठी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | एकत्रित यादी तील क्रमांक | उमेदवाराचे नांव | नेमणूकीचे पदनाम | पदाची विहित केलेली शैक्षणीक पात्रता | उमेदवाराची शैक्षणीक अर्हता | पदाची वेतनश्रेणी | उमेदवारा चा प्रवर्ग | २ वर्षात प्राप्त करावयाचे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | १/क | कु. वृंदा रविंद्र जोशी | संगणक चालक | १२ वी (विज्ञान) + सरकारमान्य संस्थेचा संगणक चालकाचे प्रमाणपत्र | बी.ई. (इलेक्ट्रॉनिक) | ३२००—४९०० | खुला | सरकार मान्य संस्थेचा संगणक चालकाचे प्रमाणपत्र |
| २ | २/ड | कु. अंजू बाबू दिनकर | सफाई कामगार | शारिरीक दृष्टया सक्षम | ६ वी | २५५०—३२०० | अनु.जाती | |
| ३ | ३/ड | कु. मिनाक्षी मोकाशी | सफाई कामगार | शारिरीक दृष्टया सक्षम | ८ वी | २५५०—३२०० | अनु.जाती | |
| ४ | ४/ड | श्री. संजय पाटील | वाहन मदततनीस | ४ थी | ९ वी | २५५०—३२०० | इमाव | |
| ५ | ५/ड | कु. माया बाविस्कर | सफाई कामगार | शारिरीक दृष्टया सक्षम | ३ री | २५५०—३२०० | अनु.जाती | |
| ६ | ६/क | कु. सुनिता वलेचा | संगणक चालक | १२ वी (विज्ञान) + सरकारमान्य संस्थेचा संगणक चालकाचे प्रमाणपत्र | १२ वी | ३२००—४९०० | खुला | सरकारमान्य संस्थेचा संगणक चालकाचे प्रमाणपत्र |
| ७ | ७/ड | श्री. नामदेव कृष्णा साळुंखे | विद्युत मदतनीस | ४ थी | १० वी | २५५०—३२०० | इमाव | |
| ८ | ८/ड | श्री. किरण दामोदरे | विद्युत मदतनीस | ४ थी | ११ वी | २५५०—३२०० | खुला | |
| ९ | ९/ड | श्री. पोपट ना. सोनवणे | विद्युत मदतनीस | ४ थी | ६ वी | २५५०—३२०० | अनु.जाती | |
| १० | १०/क | श्री. सचिन वानखेडे | लिपीक | १२ वी, मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि., एम.एस.सी.आय.टी. | १२ वी, | ३०५०—४५९० | अनु.जाती | मराठी टंकलेखन३० श.प्र.मि व इंग्रजी टंकलेखन ४०श.प्र.मि., एम.एस.सी. आय.टी. |
| ११ | ११/ड | श्री. संदिप म. खैरे | विद्युत मदतनीस | ४ थी | ७ वी | २५५०—३२०० | अनु.जाती | |
| १२ | १२/ड | श्री. देविदास ससाणे | सफाई कामगार | शारिरीक दृष्टया सक्षम | ८ वी | २५५०—३२०० | अनु.जाती | |
| १३ | १३/ड | श्री. बाजीराव प. पवार | सफाई कामगार | शारिरीक दृष्टया सक्षम | २ री | २५५०—३२०० | अनु.जाती | |

उपरोक्त शासन निर्णय दि. २३/४/२००८ मधील शासन निर्णय (ब) अन्वये गट दिनांक २२/८/२००५ पूर्वीच्या प्रतिक्षायादीतील ५० टक्के उमेदवारांची नियुक्ती प्रथमवर्षी २५ उमेदवारांची नियुक्ती दुस—या वर्षी व उर्वरीत २५ उमेदवारांची नियुक्ती तिस—या वर्षी करण्यात यावी असे नमुद केले आहे. सदर एकत्रित प्रतिक्षासुचीमध्ये अ.क्र. १ ते ३० पर्यंतची यादी ही दि. २२/८/२००५ पुर्वीच्या उमेदवारांच्या आहे. शासनाच्या सुधारीत निर्णयानुसार पहिल्यावर्षी ५० टक्के उमेदवारांना नियुक्ती द्यावयाची आहे. त्यानुसार एकुण १५ उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार करावयाचा आहे. आता क्र. १४ व १५ येथिल खालील उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नेमणूक देण्यासाठी प्रस्तावित करण्यांत येते.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १४ | श्री. मच्छिंद्र रामजी | सफाई | ४ थी | १० वी | २५५०—३२०० | खुला | — |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जडयाळ | कामगार | | | | | |
| १५ | १५ | श्री. गणेश परशुराम राजांगळे | सफाई कामगार | शारीरीक दृष्टया सक्षम | ८ वी | २५५०—३२०० | अनु. जाती | — |

शासन निर्णय क्र. साप्रवि क्र.— अकंपा—१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दिनांक २३/४/२००८ अन्वये सदरहु योजनेच्या प्रचलित कार्यपध्दतीमध्ये व योजनेच्या तरतुदीत सुधारणा केलेली आहे. त्यानुसार व सभेतील चर्चेअंती १३ ऐवजी १५ उमेदवारांना विविध संवर्गात अनुकंपा तत्वावर महापालिकेत नियुक्ती देणेस महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र</u>: २ <u>दिनांक:—१२/६/२००८</u>

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १५ उमेदवारांना विविध संवर्गात अनुकंपा तत्वावर उल्हासनगर महापालिकेत नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ४ :—१)श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले २) श्री. अशोक सखाराम वायले ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले ४)श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना महापालिका सेवेत मजुर/वालमन या पदावर नियुक्तीचे पूढील सहा महिन्याकरीता नविनीकरण करणेस मान्यता देत आहे.

---

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**आयुक्त साहेब, हा विषय गेल्या चार महिन्यांपासुन तसाच ऐरनीवर पडलेला आहे. ज्या लोकांनी या उल्हासनगर महानगरपालिकेसाठी योगदान दिलेले आहे त्यांच्या शेतांमधुन पाईपलाईन गेली आहे म्हणुन आपण त्यांना आश्वासन दिले होते की, कामावर घेवु म्हणुन. दर सहा महिन्यांनी आपण त्यांना मुदवाढ देतो. त्यामुळे गेल्या चार महिन्यापासुन त्यांना मुदतवाढ दिलेली नाही परंतु त्यांना पगार नाही. तर असा प्रकार पुन्हा यावयास नको, कारण त्यांचे हातावरचे पोट आहे. ते चतुर्थ श्रेणी कर्मचारी आहेत आणि त्यांनी चार चार महिने पगाराची वाट पाहायची हे बरोबर नाही प्रशासनाने त्याची दखल घेतली पाहिजे की मुदत संपण्याअगोदर प्रस्ताव सादर केला पाहिजे. यापुढे तरी असे आता सारखे होवु नये.

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>**आयुक्त साहेब, या कर्मचा—यांचा सेवाकालावधी फेब्रुवारी मध्ये संपृष्टात आला होता. फेब्रुवारीपासुन आता जुन चालु झाला आहे. चार महिने पुर्ण होत आले आहे. सहा महिन्याची मुदत लवकरच संपणार आहे. त्यामुळे आतापासुनच पूढील सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात यावी किंवा या प्रस्तावांन्वये एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात यावी असे केले जावु शकते काय? पुन्हा पुढील महिन्यामध्ये जर प्रस्ताव आला नाही तर पुन्हा यांना पगार मिळणार नाही.

**<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>**या कर्मचा–यांना अडचणींना तोड दयावे लागु नये म्हणुन त्यांचा सेवा कालावधी संपृष्टात येण्याअगोदरच मुदतवाढीचा प्रस्ताव ठेवु. एक वर्षाची मुदतवाढ देण्याबाबतीत कायदेशीर तरतुदी पहाण्या लागतील. आणि तसे करुन पुढील वेळेस आम्ही त्यांचा प्रस्ताव आपणापुढे ठेवु.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावांतर्गतचा निर्णय आंमलात आणुन त्यांना पगार देण्यात यावा.

**<u>महापालिका सचिव :–</u>**पास? सर्वसंमतीने?

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>महापौर :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** ४:–१)श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले २) श्री. अशोक सखाराम वायले ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले ४)श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना महापालिका सेवेत मजुर/वालमन या पदावर नियुक्तीचे पूढील सहा महिन्याकरीता नविनीकरण करणेस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

महासभा ठराव क्र. २५, दिनांक २०/११/२००६ अन्वये पाले ते गायकवाडपाडा दरम्यान सुधारीत पाणीपुरवठा योजना अंतर्गत जलवाहिनीचे काम पूर्ण करावयाच्या दृष्टीने बाधित होणाऱ्या चार प्रतिनिधींना १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले २) श्री. अशोक सखाराम वायले ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले व ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना पाणी पुरवठा विभागामधिल मजुर वॉलमन पदी कार्यरत कर्मचारी उल्हासनगर महापालिकेच्या सेवेत तात्पुरत्या स्वरूपात अस्थायी पदावर (वर्ग–४) सामावून घेण्यास मान्यता दिली होती.

त्यास अनुसरून सामान्य प्रशासन विभागातील दिनांक १५/२/२००७ रोजीच्या आदेशानुसार ०६ महिन्यांसाठी नियुक्ती देण्यात आली होती. तद्नंतर दिनांक ०६/९/०७ रोजीच्या आदेशानुसार दिनांक १६/२/०८ रोजी सेवेत खंड देवून पुढील ०६ महिन्यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

तरी १) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले २) श्री. अशोक सखाराम वायले ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले व ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना महापालिका सेवेत मजुर–वॉलमन या पदावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्तीचे सहा महिन्यांकरीता नवीकरणासाठी नियुक्ती प्राधिकारी तथा सक्षम प्राधिकारी म्हणून मा. महासभेपुढे सदर प्रस्ताव सादर करीत आहे.

महासभा ठराव क्र: ३ दिनांक:—१२/६/२००८

सुचकाचे नाव :— श्री. हरेश जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १)श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले २) श्री. अशोक सखाराम वायले ३) श्री. चंद्रकांत गुरुनाथ वायले ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांचे महापालिका सेवेतील मजुर/वालमन या पदावर नियुक्तीचे पूढील सहा महिन्याकरीता नविनीकरण करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिका अपंग अनुशेष भरती अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ लिपिक या संवर्गातील अनुसूचीत जाती या प्रवर्गाचे (अंध, अल्पदृष्टी) या प्रवर्गातील लिपिक रिक्तपदी श्री. सिकंदर शंकर हिवाळे यांच्या नियुक्तीस मान्यता देणे.

---

महापालिका सचिव :—पास? सर्वसंमतीने?

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:—** उल्हासनगर महानगरपालिका अपंग अनुशेष भरती अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ लिपिक या संवर्गातील अनुसूचीत जाती या प्रवर्गाचे (अंध, अल्पदृष्टी) या प्रवर्गातील लिपिक रिक्तपदी श्री. सिकंदर शंकर हिवाळे यांच्या नियुक्तीस मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका अपंग अनुशेष भरती अंतर्गत उल्हासनगर महापालिका आस्थापनेवर कनिष्ट लिपीक या संवर्गातील अनु.जाती या प्रवर्गाचे (अंध अल्पदृष्टी (०१)) अनु.जमाती या प्रवर्गाचे (अंध अल्पदृष्टी (०१) व कर्णबधीर (०१) ) असे एकुण ०३ रिक्त पदांसाठी दिनांक २०/०३/२००७ रोजी विविध राज्यस्तरीय व ग्रामीण वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द् करून आणि सेवायोजन कार्यालय, ठाणे व एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांचेकडून मागणी केलेले अर्हता प्राप्त १२ उमेदवारांना(अनु.जाती—अंध अल्पदृष्टी (११) व अनु.जमाती — अंध अल्पदृष्टी (०१)) दिनांक १९/०७/२००७ रोजी मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. सदर दिवशी मुलाखतीत अनु.जमाती (अंध अल्पदृष्टी) या प्रवर्गाचे उमेदवार अनुपस्थित होते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये गठीत निवडसमितीने मुलाखत घेवून गुणवत्तेनुसार अनु.जाती (अंध अल्पदृष्टी) या प्रवर्गातील श्री. गोवंदे जीवन नागुराव यांची निवड यादीवर व श्री.सिकंदर शंकर हिवाळे यांची प्रतिक्षा यादीवर निवड केली होती. तसेच मा.महासभा ठराव क्र ४२ दिनांक २७/०९/०७ अन्वये सदर नियुक्तीस मान्यता देण्यात आली आहे. मात्र सदर प्रतिक्षा यादीतील अनुसूचीत जाती (अंध अल्पदृष्टी) या प्रवर्गातील उमेदवार श्री. सिकंदर हिवाळे यांनी शासनाकडील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून दिनांक २० एप्रिल,२००७ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार अनुसूचीत जमाती (अंध अल्पदृष्टी) व कर्णबधीर मधील लिपिक ०२ या संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्ती मिळावी अशी मागणी केली होती. त्यास अनुसरून श्री. सिकंदर हिवाळे अनु जाती. (अंध अल्पदृष्टी) यांना लिपीक संवर्गातील अ.जमाती (अंध अल्पदृष्टी ०१ व कर्णबधीर ०१) या रिक्त पदी नियुक्ती द्यावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागविले असता शासनाने पत्र क्र. उमपा/२३२७/प्र.क्र.१५/०७/नवि २१ दिनांक १५/०३/२००८ रोजीच्या पत्रान्वये पुढील प्रमाणे मार्गदर्शन केले आहे. '' दिनांक १९ ऑक्टोंबर ,२००७ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार अपंगांची आरक्षित पदे सरळ सेवेने भरतांना ती सामाजिक प्रवर्गात न दर्शविता ती स्वतंत्रपणे दर्शवावी असे आदेश निर्गमित केले आहेत. तसेच श्री.सिकंदर हिवाळे यांना क.लिपिक या पदावर नियुक्ती देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी'' असे नमुद केले आहे.

तरी, दिनांक १९ ऑक्टोंबर, २००७ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासननिर्णयातील तरतुद व शासनाकडील पत्र क्र. उमपा/२३२७/प्र.क्र.१५/०७/नवि २१ दिनांक १५/०३/२००८ रोजीचे मार्गदर्शनास अनुसरून श्री.सिकंदर शंकर हिवाळे (अंध अल्पदृष्टी) यांची उल्हासनगर महानगरपालिका अस्थापनेवरील अंध अल्पदृष्टी ०१ या प्रवर्गातील लिपिक रिक्त पदी नियुक्तीस मान्यता मिळणेसाठी सादर.

<u>महासभा ठराव क्रः</u> ४ <u>दिनांकः—१२/६/२००८</u>

सुचकाचे नाव :— श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका अपंग अनुशेष भरती अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ लिपिक या संवर्गातील अनुसूचीत जाती (अंध, अल्पदृष्टी) या प्रवर्गातील लिपिक या रिक्तपदी श्री. सिकंदर शंकर हिवाळे यांच्या नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ राबविणे कामी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून रु. १५ कोटी कर्ज उभारणीस मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u>पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :—</u>२० कोटी करा, २० कोटी.....

<u>महापालिका सचिव :—</u>तेवढे कर्ज मिळाले सुध्दा पाहिजे ना? २० कोटी? ठिक आहे? सर्व संमतीने

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६:—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ राबविणे कामी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून रु. १५ कोटी कर्ज उभारणीस मान्यता देणे

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील पाणी वितरण व्यवस्था जूनी झालेली असल्यामुळे व शहरात पुरेशा प्रमाणात जलकुंभ नसल्यामुळे सन १९९६ मध्ये किर्लोसकर कंन्सल्टन्ट मार्फत रुपये ५१ कोटी रक्कमेची सुधारीत पाणी पुरवठा योजना आखण्यात आली. या योजनेत शहरात विविध ठिकाणी जलकुंभ बांधणे, मुख्य जलवाहिण्या टाकणे व वितरण व्यवस्थेच्या कामांचा समावेश होतो. परंतु निधी अभावी संपूर्ण योजना राबविणे शक्य नसल्यामुळे रुपये १८.८० रक्कमेच्या योजनेस शासनाकडून प्रशासकिय मंजुरी मिळवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत शहरात १६ कि.मी. लांबीच्या जलवाहिण्या टाकणे, ७ उंच जलकुंभ बांधणे, १ भूस्तर जलकुंभ बांधणे, ६ संप व पंप गृह बांधणे व १६ कि.मी. लांबीच्या जलवाहिण्या टाकण्याची कामे सन २००३ पर्यंत पूर्ण करण्यात आली.

परंतु पुरेशा निधी अभावी टप्पा २ योजना राबविता आली नाही. त्यामुळे उल्हासनगर शहराच्या पाणी पुरवठा योजनेचा समावेश केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु शहरी भागाच्या विकास आराखडया अंतर्गत समावेश करण्यात आला. या कामाचे डीपीआर बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. परंतु डीपीआर बनविणे त्याची केंद्र शासनाकडून मंजूरी मिळविणे या कामास विलंब लागणार असल्यामुळे काही महत्वाची कामे मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध करुन घेता येणे शक्य आहे. त्या अनुषंगाने शहरात विविध ठिकाणी जलकुंभ बांधणे, संप व पंपगृह बांधणे व मुख्य जलवाहिण्या टाकणे तसेच पंप सामुग्री उभारण्याच्या कामाचा रुपये १५ कोटी रक्कमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. सदरचा प्रस्ताव मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी आवश्यक असलेली रक्कम कर्ज स्वरुपात मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून उपलब्ध होणार असल्यामुळे सदर कामासाठी रुपये १५ कोटी कर्जाची उभारणी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून करावी किंवा कसे? याबाबत सदरचा प्रस्ताव मा. महासभेसमोर विचारार्थ सादर.

महासभा ठराव क्र: ५ दिनांक:—१२/६/२००८

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. २ राबविणे कामी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून रु. १५ कोटी ऐवजी २० कोटी कर्ज उभारणीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** उल्हासनगरचे मंजुर विकास योजनेमधील प्लॉट १२९, चालता क्र. ३ शिट १७ उल्हासनगर—४ या जागेवरील सार्वजनिक उपयोगासाठीचे आरक्षण वगळून रहिवास विभागात वर्ग करण्याबाबतच्या फेरबदलाचा प्रस्ताव मान्य करणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, या विषयावर खुलासा करण्यासाठी कुणी जबाबदार अधिकारी येथे उपस्थित आहे काय? हे जे आरक्षण आहे ते कश्यासाठी आहे?याबाबत अगोदर कुणी माहिती दिली नाही. माझ्याकडे याबाबतची सर्व कागदपत्रे आहेत. मी सर्व माहिती देत आहे. एखादया

जबाबदार अधिका–याने सांगावे की हे आरक्षण कशासाठी आहे? त्याबाबतचे सर्व कागदपत्र माझ्याकडे आहेत त्याचे पुरावे मी आपणांस देतो. हे आरक्षण कशासाठी आहे हे आपण जबाबदारीपुर्वक सांगावे. शिट क्र. १७ रुग्णालयासाठी आरक्षित आहे. आपण येथे दाखविले आहे, १८० ट्रेचिंग ग्राउंड, शिट क्र. १७ व त्याचे प्रॉपर्टी कार्डही सोबत आहे. हे सर्व मी आपणांस देत आहे. एक एक अनुक्रमांक आपण वाचत जा. आपल्या अधिका–यांनी काय काय काळाबाजार केला आहे ते मी आपणांस सांगत जातो.. या प्रकरणामध्ये जे अधिकारी सामिल होते त्यांच्यावर आपणांस कारवाई करावी लागेल. शिट नं. १७ चे प्रॉपर्टी कार्ड आणि इतर कागदपत्रे मी आपणांस सादर करत आहे. ही संचिका आपण उघडुन पहा पहिल्या पृष्ठावर अनु.क्र. ७ लिहिलेला आहे. जेव्हा एखादी व्यक्ती बांधकाम परवानगीसाठी शिट क्र. १७ मधील जागेवर बांधकाम करण्यासाठी बांधकाम परवानगी मिळण्यासाठी अर्ज सादर करते. आपले अधिकारी त्या व्यक्तीस बांधकाम परवानगी न देण्यासाठी शिट नं. १७ आणि २७ असा उल्लेख करतात. २७ क्रमांकाचा हा शिट नंबर कुठे आहे तो मला दाखवा. जेव्हा एखादा आर्किटेक्ट बांधकाम परवानगीसाठी महापालिकेकडे प्लान सादर करतो त्यावेळेस त्या प्लानवर प्लॉट नं. लिहितो, चालता नं. लिहतो, शिट नं. लिहित नाही. ही पुर्ण संचिका वाचल्यानंतर आपणांस हे काय आहे ते सर्व लक्षात येईल. जो आर्किटेक्ट या प्रकरणामध्ये सहभागी असेल त्याचा परवाना रद्द झाला पाहिजे. जे अधिकारी यामध्ये सहभागी असतील आणि त्यांची जर येथुन बदली झाली असेल तर चौकशीसाठी त्यांना बोलावले पाहिजे. त्यांचे भविष्य निर्वाह निधी आणि इत्यादी देय रक्कमा थांबविल्या पाहिजे. त्यांनी एवढे मोठ मोठे घोटाळे केले आहेत त्यातील हा एक घोटाळा पुढे आला आहे. आणखी कितीतरी घोटाळे केले असतील? दुस–या सनदचे आणखी कितीतरी बांधकाम नकाशे मंजुर केले असतील ? अधिका–यांनी जेवढी काही उत्तरे दिली आहेत त्या प्रत्येक उत्तरामध्ये शिट नं. १७ व २७ असे लिहिले आहे. शिट नं. २७ ची कागदपत्रेच नाहीत. आपण शिट नं. २७ प्रमाणे त्यास उत्तर देता आणि तो कोर्टात याचिका दाखल करतो ती सुध्दा शिट क्र. २७ च्या संदर्भात आणि तो न्यायालयात कागदपत्रे सुध्दा शिट नं. २७ चीच दाखल करतो. शिट नं. १७ ची कागदपत्रे लावत नाहीत. आपले जे अधिकारी आहेत त्यांनी उल्हासनगरचे जे भुमापन अधिकारी त्यांचेकडुन दस्तऐवज मागविली पाहिजेत. आपले अधिकारी ट्रेचिंग ग्राउंड असल्याचे दर्शवितात. मागविली असतील तर ती गायब केली असतील व हे टेचिंग ग्राउंड दाखवत आहेत?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>सभागृहासमोर हा जो प्रस्ताव दिलेला आहे तो उच्च न्यायालयाचा जो आदेश होता त्यानुसार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार हा विषय कलम ३७ नुसार फेरबदल करण्यासाठी दिला गेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>दिले गेले आहे? दिला कसा गेला आहे? आपल्या अधिका–यांनी तशी कागदपत्रे तयार करुन दिली आहेत. आपल्या अधिका–यांनी जर सांगितले असते की हे आरक्षण रुग्णालयासाठी आहे किंवा हा भुखंड रुग्णालयासाठी आरक्षित आहे जर हे आरक्षण रुग्णालयासाठी आहे तर ते ट्रेचिंग ग्राउंडसाठी असल्याचे का दर्शवत आहेत? ते रुग्णालयासाठी आरक्षित असल्याचे स्पष्टपणे नमुद आहे. आपल्या अधिका–यांनी एवढा मोठा घोटाळा केला आहे. कुणी न्यायालयात गेले तर महापालिका बरखास्त होईल.

**मा. सदस्य श्री. राजु इदनानी, श्री. राजेश वधारीया, श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.** 

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>संबंधीत जो अधिकारी आहे त्यांनी ही चुक केल्याचे निष्पन्न होत असेल तर त्याच्यावर निश्चित कार्यवाही करण्याचा प्रस्ताव त्या संबंधीत विभागाकडे पाठवु. दुसरे असे की, शिट नं. १७ व २७ चा जो मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे हा प्रस्ताव मुंबई महानगर विकास प्राधिकरण अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीनुसार अपिलमध्ये राज्यशासनाकडे गेले होते त्यानंतर संचालक नगररचना विभाग यांचे याबाबतीत आदेश झालेले आहेत. त्यानंतर उच्च न्यायालयात याबाबतीत निर्णय झालेला आहे. आणि त्यानंतर शासनाने याबाबतीत आदेश दिला आहे की, कलम ३७ मधील तरतुदीनुसार याबाबतीत अंमलबजावणी करा. सभागृहाने यास परवानगी दयायची किंवा नाही हे एक, दुसरे असे की, .......

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>साहेब, सभागृहाचे असे मत आहे की हा प्रस्ताव येथुन नाकारला जावा. कारण की आम्हां सर्वांना जेलमध्ये जायचे नाही. शिट नं. १७ चे कागदपत्र असतांना ती शिट नं. २७ ची आहे असे दर्शवुन आम्हांस काय तुरुंगात जायचे आहे काय?

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—श्री. भुल्लर महाराजजी, मी केवळ एक सेकंद बोलतो. आयुक्त साहेब, या प्रकरणाबाबतीत श्री. भुल्लर महाराज यांनी सविस्तर अभ्यास केला. त्यांना माहिती मिळविली. नाहीतर सभागृहाची दिशाभुल होवुन सभागृहाने जर या प्रस्तावास मंजुरी दिली असती. सभागृहा अगोदर येथिल आमच्या कुण्या अधिका—याने शासनाकडे जेथे हे प्रकरण याचिकेच्या स्वरुपात गेले किंवा उच्च न्यायालयात गेले तेथे महानगरपालिकेची बाजु काय आहे? ती आपल्या कुण्या अधिका—याने मांडली काय? ही कोणती शिट आहे किंवा काय आहे?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—महानगरपालिकेने सर्व ठिकाणी शिट क्र. २७ असे लिहिले आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—कारण की कोर्टास माहित नसते ही कोणती शिट आहे? कोणते गार्डन आहे? महानगरपालिकेने माहिती दयायची असते जर महानगरपालिकेने कोर्टाला चुकीची माहिती दिली असेल तर कोर्टाला चुकीची माहिती दिल्याचा आरोप आम्ही त्यांच्यावर लावु शकतो. कारण की ते अधिकारी या महापालिकेत येवुन आमच्या शहरातील आरक्षित भुखंड वैयक्तीक कारणामुळे जर काही लोकांना देवु इच्छित असतील तर ते न्यायालयाबरोबर संपुर्ण शासनाची दिशाभुल करू इच्छित आहेत. त्याचबरोबर आम्हां सर्व सदस्यांची दिशाभुल करुन ठराव पारीत करु इच्छितात. त्यामुळे हा फार मोठा गंभीर विषय आहे. या गंभीरतेस कोणत्याही प्रकारे कमी केले जावु नये. सध्या शहरात फारच थोडे भुखंड वाचले आहेत.

सदस्य श्री. राजेंद्रसिह भुल्लर :—हा विषय नाकारला जावा तसेच ज्या अधिका—याने शिट नं. १७ ही शिट नं. २७ अशी दर्शविली आहे. त्या अधिका—यावर कारवाई झाली पाहिजे. सध्या जे सेवेमध्ये आहेत त्यांना तात्काळ निलंबित केले जावे. व त्याच्या विरोधात खातेनिहाय चौकशी बसविली जावी.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—संबंधीत जे अधिकारी, कर्मचारी असतील त्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावुन पुढील कारवाई केली जाईल.

महापालिका सचिव :—हा प्रस्ताव नाकारायचा आहे काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—होय.

महापालिका सचिव :—या अगोदर आरक्षणात बदल करण्याचा आपण एक ठराव पारीत केलेला आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—त्यावेळी याबाबतची आम्हांला सविस्तर माहिती नव्हती. ती माहिती संबंधीत विभागाने महासभेस दयावयास पाहिजे होती. त्यावेळी जे आयुक्त व नगररचनाकार होते त्यांनी याबाबतची संचिका दयावयास पाहिजे होती. व सांगावयास पाहिजे होते की या संचिकेनुसार हे काम होत आहे. परंतु त्यांनी तशी माहिती दिली नाही. आता आम्ही चौकशी करुन ही माहिती मिळविली आहे.

महापालिका सचिव :—तर मग हा प्रस्ताव नाकारायचा काय? सर्वसंमतीने?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—होय.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—मागील वेळेस जेव्हा आम्ही विरोधी पक्षात होतो त्यावेळेस आम्ही या प्रस्तावास विरोध केला होता. त्यावेळेस याबाबतचा प्रस्ताव बहुमताने पारीत झाला होता. यासाठी आता माझे असे मत आहे की हा प्रस्ताव नाकारला जावा. त्याचबरोबर संबंधीतांची चौकशी सुध्दा झाली पाहिजे. चौकशीत आढळुन आलेले निष्कर्ष जाहिर केले पाहिजेत, तसेच दोषी व्यक्तींवर कारवाई झाली पाहिजे. या सर्व बाबी ठरावामध्ये आल्या पाहिजेत.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—ज्यावेळी याबाबतचा प्रस्ताव बहुमताने पारीत झाला होता त्यावेळेस आरक्षण काय दर्शविले होते?

महापालिका सचिव:—तो ठराव आरक्षण बदली करण्यासंदर्भातील होता.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—तो ठरावच चुकीचा तयार करण्यात आला होता ना? म्हणजेच सभागृहाची सुध्दा दिशाभुल करण्यात आली होती.?

**महापालिका सचिव :–**याबरोबर अगोदरचा ठराव रद्द होईल. ठिक आहे?

**महापौर :–** सदर प्रस्ताव नाकारण्यां बाबतीत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र.** ७:– उल्हासनगरचे मंजुर विकास योजनेमधील प्लॉट १२९, चालता क्र. ३ शिट क्र. १७ उल्हासनगर–४ या जागेवरील सार्वजनिक उपयोगासाठीचे आरक्षण वगळून रहिवास विभागात वर्ग करण्याबाबतच्या फेरबदलाचा प्रस्ताव मान्य करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगरमधील प्लॉट १२९, चालता क्र. ३ शिट क्र. १७ उल्हासनगर–४ या जागेवरील सार्वजनिक उपयोगासाठीची आरक्षण वगळून रहिवास विभागात वर्ग करणेबाबतचा एम आर टी पी ॲक्ट कलम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव या कार्यालयाकडून शासनास कलम ३१ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलाचा परिपुर्ण प्रस्ताव शासनास सादर करणेस कळविले आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

अर्जदार श्री. भिमा बाबु कडू यांनी प्लॉट नं. १२९, चालता क्र. ३ शिट क्र. १७ उल्हासनगर–४ या जागेमधील त्यांचे मालकीचे एकूण क्षेत्र ७४९.०/९ चौ.वार (६२६ चौ.मि.) या जागेत बांधकाम करणेसाठी अर्ज या कार्यालयास दिनांक २६/१/२००१ व दिनांक २१/१/२००१ रोजी सादर केला होता. सदर प्रकरणामधील सर्व कागदपत्रांची तत्कालीन अधिकारी यांनी पडताळणी करतांना असे नमुद केले आहे की, उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास योजनेत सदर जागा आरक्षण क्र. १८० ट्रेंचिंग ग्राउंडसाठी आरक्षीत या आरक्षणात समाविष्ट असल्याने व प्रारुप विकास आराखडयामध्ये रहिवास विभागात समाविष्ट असल्याने कठोरतम तरतुदीनुसार आरक्षण बाबी विचारात घेवून सदर बांधकाम परवानगी अर्ज या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/सा/१५९/०१, दिनांक २२/१/२००३ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम परवानगी नाकारण्यात आली. त्याविरुध्द अर्जदाराने मा. उच्च न्यायालय, याचिका क्र. ९३९/२००३ दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. न्यायालयाने दिनांक ३/६/२००३ रोजी निर्णय देण्यामध्ये अर्जदारास एम आर टी पी ॲक्ट १९६६ कलम ४७ अन्वये अपील दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले होते. अर्जदाराने एम आर टी पी ॲक्ट १९६६ चे कलम ४७ अन्वये शासनास दिनांक १/७/२००३ रोजी अपील दाखल केल्यानंतर सदरहू अपीलाची सुनावणी मा. राज्यमंत्री यांचे दालनात दिनांक २९/१/२००४ रोजी झाली. त्यामध्ये त्यास अनुसरुन अर्जदाराने दाखल केलेले अपील अंशतः मंजूर केले त्यानुसार खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले.

मुंजूर विकास योजना उल्हासनगरमधील सदर जागेवरील सार्वजनिक उपयोगासाठीचे आरक्षण वगळून रहिवास विभागास वर्ग करणेबाबतचा फेरबदलाचा प्रस्ताव उल्हासनगर महानगरपलिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनास पुढील कार्यवाहीसाठी त्वरीत सादर करण्यात यावा.

शासनाचे आदेश विचारात घेवून याबाबतचा ठराव क्र. ५२ महासभेने मंजुर करण्यात आलेले आहे व तशी अधिसूचना राजपत्रात तसेच वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली होती याबाबत हरकती व सूचना यासाठी प्रसिध्दी केल्याप्रमाणे कोणत्याही हरकती व सूचना या विभागात प्राप्त झाले नसल्याने त्याप्रमाणे पत्र क्र. उमपा/नरवि/जीआर/१०४, दिनांक २८/२/२००६ अन्वये आवश्यक अहवाल शासनास सादर करण्यात आलेले आहे.

शासनाकडील दिनांक २४/५/२००७ रोजीच्या पत्रानुसार खालील बाबी पुण करणेबाबत निर्देश दिले आहेत.

१. भुखंडाचा मजकुर व अपील आदेशाचा योग्य दिनांक
२. फेरबदलाची नोटिस शासन राजपत्रात व मराठी व इंग्रजी अशा दोन स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे.
३. अंतिम ठराव पारीत करणे.

शासनाचे दिनांक २४/५/२००७ च्या पत्राने कळविलेल्या मुद्दयाबाबत पुन्हा पडताळणी केली असता प्रस्तावाखालील विषयांकित जमिन ही मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र. १८० ट्रेंचिंग ग्राउंड या आरक्षणाने बाधीत नसुन ती जमीन मंजुर विकास योजनेप्रमाणे सार्वजनिक निम सार्वजनिक वापर विभागात समाविष्ट आहे. तसेच पुर्वी राजपत्र व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करतांना त्यामध्ये भुखंडाचे क्षेत्र नमुद केले गेले नाही व तसेच एका इंग्रजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द केली गेली नाही.

तरी वर नमुद केलेल्या त्रुटींची योग्य ती पुर्तता करुन कलम ३७ खाली फेरबदल प्रस्ताव शासनास पुन्हा सादर करणे आवश्यक आहे.

उक्त प्रकरणांत मा. उच्च न्यायालय यांनी दिनांक २९/२/२००८ रोजी आदेश पारीत केले असून त्यानुसार शासनाने दिनांक १७ मार्च, २००८ रोजी आदेश पारीत केले असून त्यानुसार शासनाने दिनांक १७ मार्च, २००८ व दिनांक १०/४/२००८ ने कळविल्याप्रमाणे कलम ३७ खालील वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेने पुर्ण करावयाची असून दिनांक २४/५/२००७ च्या शासनाच्या कळविलेल्या पत्रानुसार कलम ३७ खालील वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन परिपुर्ण प्रस्ताव शासनाकडे पुन्हा सादर करण्याचे आदेश आहेत.

वरील सर्व बाबी विचारात घेवून शासनाच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सुधारित उचित कार्यवाही होणेकामी मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्यात येत आहे.
कलम ३७ खाली वृत्तपत्र व राजपत्रात सुधारित प्रसिध्दीकरण झालेनंतर मुदतीत सूचना व हरकती प्राप्त न झाल्यास उक्त सुधारीत प्रस्ताव शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेस महासभेची अंतिम मंजुरी याकरीता सुध्दा प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६ दिनांक:—१२/६/२००८

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगरचे मंजुर विकास योजनेमधील प्लॉट १२९, चालता क्र. ३ शिट क्र. १७ उल्हासनगर—४ या जागेवरील सार्वजनिक उपयोगासाठीचे आरक्षण वगळून रहिवास विभागात वर्ग करण्याबाबतच्या फेरबदलाबाबत शासन आदेशानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये महानगरपालिकेने वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनाकडे पुन्हा परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेस मान्यता देत नाही. व यापुर्वीचा दिनांक १९/११/२००४ रोजीच्या ठराव क्र. ५२ द्वारे घेतलेला निर्णय रद्दबादल करण्यास मान्यता देत आहे.

कारण——
सदरहु आरक्षण बदल करण्याचा प्रस्ताव जनहिताचा नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

⇨ विषय क्र. ८ :— उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, नामकरणाचा विषय जेव्हा महासभेत मंजुरीस येतो या अगोदर या महासभेत अशा ब—याच तक्रारी आल्या आहेत की, एका ठिकाणी एक नाव दिलेले असतांना दुस—या ठिकाणी दुसरे नाव देण्याचा प्रस्ताव पारीत केला होता. स्वर्गीय तेजुमल यांच्या नावाने एका ठिकाणी नाव देण्यात आलेले होते. व त्याठिकाणी दुसरेच कुठलेतरी नाव देण्यात आले होते. त्यानंतर ठराव पारीत करुन त्या जागेचे नाव बदली करण्यात आले. व आज सुध्दा या महासभेमध्ये नामकरणाचे जे प्रस्ताव आले आहेत ते पहाता सार्वजनिक बांधकाम विभागाने योग्य त्या प्रकारे पडताळणी केल्याचे दिसुन येत नाही. अगोदरपासुन ब—याचठिकाणी रस्त्यांना/ चौकांना नावे दिलेली आहेत. व आता कोणतीही चौकशी न करता हे प्रस्ताव महासभेपुढे आणले आहेत व आता असे सांगितले जाते की तेथे कोणताही बोर्ड लावलेला नाही. यासाठी माझे असे मत आहे की, हा विषय पारीत न करता संपुर्ण शहरात रस्ते, चौकांना जी नावे दिली आहेत त्यांच्याबाबतीत सर्व्हे केला जावा. व ज्याठिकाणी एखादया रस्त्यास व चौकास पहिल्यापासुन एखादया महापुरुषाचे नाव दिलेले असेल आणि त्यानंतर पुन्हा येथे जर नाव दिले जात असेल तर बरोबर होणार नाही. व यामध्ये सुधारणा करणे खुप कठिण होईल. यासाठी योग्य प्रकारे चौकशी करुन नावे प्रस्तावित केली पाहिजेत.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—जेथपर्यंत शहरातील रस्ते व चौकांचे नामकरण करण्याचा प्रस्ताव आहे, तसे तर मला येथे मतदान करण्याचा अधिकार नाही. परंतु मत व्यक्त करण्याचा अधिकार जरुर आहे. त्यानुसार सर्व नगरसेवक सहका—यांना मी हे सांगु इच्छितो की, जेव्हा एखादया रस्त्याला किंवा चौकाला एखादया व्यक्तीचे नाव देण्याचा प्रस्ताव महासभेपुढे येतो तेव्हा त्या व्यक्तीबाबतचे उदाहरण लोकांच्या नजरेसमोर आले पाहिजे. आमच्या नविन पिढीतील मुलं/मुली जेव्हा एखादया रस्त्याचे किंवा चौकाचे नाव वाचतील व म्हणतील की ही व्यक्ती कोण होती? या व्यक्तीने आमच्या शहरासाठी काय काम केले? मी मान्य करतो की सर्व

नगरसेवकांचे नातेवाईक अतिशय आदरणीय आहेत. त्या कुणाचाही मी अनादर करु इच्छित नाही. त्यांनी आमच्यासारख्या, आपल्यासारख्या नगरसेवकांना जन्म दिला परंतु माझे असे म्हणणे आहे की ज्या व्यक्तीने या देशासाठी या शहरासाठी चांगले काम केले असेल त्यांचीच शहरातील रस्ते/ चौकांना नावे दिली पाहिजेत. त्याव्यतिरिक्त जर आपण आपल्या नातेवाईकांची जर रस्ते/चौकांना नावे देत असू तर ते बरोबर होणार नाही. इथे अशी कित्येक उदाहरणे आहेत, लोक विचारतात की, रस्त्याला नाव दिलेले अमुक अमुक हा कोण होता? ही डिंगरीबाई कोण होती? तर त्यांना आम्ही सांगु शकत नाही. हे प्रकार येणा—या पिढीला कोणती प्रेरणा देवु इच्छित आहेत. कोणता रस्ता दाखवु इच्छितात. जर आम्ही या प्रस्तावानुसार नामकरणास मान्यता दिली आणि पुढे येणा—या महासभेने हीच प्रथा जर पुढे चालु ठेवली तर या शहरामध्ये रस्ते, चौकांना अशा लोकांची नावे असतील की ज्यांना कुणी ओळखत नाही. रस्ते व चौकांवरील नावे पाहुन नविन पिढीला प्रोत्साहन येते की मी नेताजी सुभाषचंद्रांचे नाव पाहत आहे. मी महात्मा गांधीचे नाव पाहत आहे. मी वीर सावकरांचे नाव पाहत आहे. मी छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव पाहत आहे. मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव पाहत आहे. हे सर्व सोडुन आम्ही कोणती नावे पाहण्यास जात आहोत? महापौरजी, उप—महापौरजी आपण याबाबतीत जरुर जरुर लक्ष दयावे. सभागृहात आता ज्या काही हालचाली चालु आहेत त्या हा ठराव पारीत करण्याच्या बाजुने चाललेल्या आहेत. मी पुन्हा सांगत आहे की मला मत देण्याचा अधिकार नाही परंतु माझ्या मतानुसार येथे सर्वांनी अशा पध्दतीने उभे ठाकले पाहिजे की, शहरातील रस्ते चौकांना माझ्या कुटुंबियांचे नाव नाही आले, तर काय फरक पडतो? मला जर कुणाचे मत पाहिजे असेल, श्री. मोरेजी, आपणांस जे करायचे असेल ते करा परंतु कमीत कमी माझे ऐकुन तर घ्या. मला मत पाहिजे, कुणाच्या कुटुंबामध्ये १०० मते आहेत. त्यांना खुश करण्यासाठी त्यांच्या कुटुंबातील कुण्या व्यक्तीचे शहरातील एखादा रस्ता किंवा चौकास नाव देतो, आपली १०० च्या १०० मते येणा—या निवडणुकीपर्यंत माझ्या खिश्यात राहतील. या आधारावर राजकरण करण्यामुळे कदाचित आपणांस मते मिळतील, आपण निवडणुकीत जिंकुन येवु किंवा हारु परंतु या शहराशी आपण निश्चितपणे अन्याय करत आहोत. यासाठी मी माझ्या सर्व सहकार्यांना विनंती करतो, मग ते सत्ताधारी पक्षातील असोत किंवा विरोधी पक्षातील असोत त्यांनी या विषयाकडे लक्ष दयावे व त्या विरोधात मतदान करावे.

<u>महापालिका सचिव :—</u>या प्रस्तावाबाबतीत काय करायचे?

<u>काही सदस्य :—</u>हा विषय वगळण्यात यावा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u>सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब आणि सर्व सन्माननिय सदस्यांना माझी विनंती आहे. आजच्या महासभेत रस्ते व चौकांच्या नामकरणाचा प्रस्ताव आला आहे त्याबाबत काही सदस्यांनी सांगितले की ज्या व्यक्तींनी देशासाठी किंवा शहरासाठी चांगले काम केले असेल त्यांचे तुम्ही शहरातील रस्ते/चौकांना नाव दिले पाहिजे. त्यासाठी आपण पुर्वीच महासभेत ठराव पारीत केला पाहिजे आणि सांगितले पाहिजे की, अशा पध्दतीने तुम्ही नामकरणाचा प्रस्ताव मांडा. आणि त्यावेळेस सार्वजनिक बांधकाम विभागास सुध्दा असे सांगितले पाहिजे की, ज्या ज्या ठिकाणी नामकरणाचा प्रस्ताव येतो त्या ठिकाणी तुम्ही चौकशी व सर्व्हे करुन एकमत तयार केले पाहिजे. परंतु तसे काही होत नाही. त्यामुळे आमचे सर्व सन्माननिय सदस्य एक दुस—याशी भांडत राहतात, परंतु कृपया असे होवु नये याच्यासाठी सर्व सन्माननिय सदस्यांना मी विनंती करतो की, ज्यांचे प्रस्तावाबाबतीत कुठलीही हरकत नसेल अडकाठी नसेल म्हणजेच एकाच ठिकाणी दोन दोन नावे होत नसतील तर असे जे काही प्रस्ताव आहेत ते पारीत केले जावेत. आणि जे काही वादग्रस्त प्रस्ताव असतील ते वगळण्यात येवुन ते पुढील सभेत घेण्यात यावेत. त्यावेळेस पारीत करु. व सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती आहे की, अशा प्रकारे तो ठराव बहुमताने पारीत करावा.

**सदस्य श्री. जीवन इदनानी, श्री. राजेश वदारिया, श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौर आणि आयुक्त साहेब, मा. बी.बी. मोरे यांनी जे म्हटले त्यानुसार मी सांगु इच्छितो की, नामकरणासाठी ७७ प्रस्ताव येथे आणलेले आहेत. कुठे दोनदा नावे आली आहेत कुठे अगोदरच नाव देण्यात आलेले आहे याबाबत माहिती कोण देईल? आज एका विषयाची मी येथे माहिती दिली तसेच श्री. भुल्लर महाराजांनी एका विषयाबाबत येथे माहिती दिली. त्याप्रमाणे एखादया चौकाबाबत मी येथे असे सांगितले की, या चौकास या अगोदर नाव दिलेले आहे तर असे होईल की, एका बाबीविषयी किंवा एका प्रस्तावाविषयी माहिती दिली परंतु ७७ नावांबाबत मला माहिती असेलच असे नाही. यासाठी ज्या रस्ते,

चौकांना या अगोदरच नावे दिलेली आहेत असे जे काही प्रस्ताव असतील ते सोडुन इतर प्रस्ताव पारीत केले जावेत असे म्हणणे पुर्णपणे चुकीचे आहे. ७७ च्या ७७ प्रस्तावांचा सर्व्हे झाला पाहिजे त्यांची चौकशी होवुन अहवाल आला पाहिजे. ही काही लहानशी गोष्ट नाही. एखादया रस्त्यास किंवा चौकास आपण एखादे नाव देणार आणि त्यामध्ये जर काही चुक झाली आणि ती दुरुस्त करण्यासाठी महासभेत ठराव आणाल व दुरुस्त कराल? ज्या व्यक्तीचे नाव दिले जाणार आहे त्या व्यक्तीचा किंवा महापुरुषाचा फार मोठा अपमान झाल्यासारखे होईल. असा अपमान करुन ही संपुर्ण महापालिका आणि आपण सर्वजण दोषी ठरु. यासाठी मी आपणांस असे निवेदन करेन की, असे चुकीचे काम करु नये. ज्या महापुरुषांची नावे आपण रस्ते व चौकांना देत आहोत त्यांचा अनादर करण्याचा अधिकार कुण्याही नगरसेवकास नाही. जर आपण असे करत असाल तर आपण त्या महापुरुषाची सभागृहात बेईज्जत करत आहात असे होईल. यासाठी मी आपणांस निवेदन करेल की असे चुकीचे काम करु नये.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी आणि आयुक्त साहेब, मला असे वाटते की, श्री. जमनादास पुरस्वानी सोडुन इतर कुण्याही नगरसेवकांस काहीही हरकत नाही. जर श्री. जमनादास पुरस्वानी यांना एखादया रस्त्याच्या नामकरणाबाबत जर काही अडचण असेल तर त्या रस्त्याच्या नामकरणाचा प्रस्ताव बाजुला सारुन इतर प्रस्ताव पारीत केले जावेत.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>श्री. नरेंद्र राजानी साहेबांची सुध्दा हरकत आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>श्री. मोहन साधवानीजी आपण एवढे मोठे नेते आहात, आपण सभागृहनेते सुध्दा होतात, आपण म्हणता की माझी हरकत एका प्रस्तावास हरकत आहे, माझी ७७ च्या ७७ प्रस्तावांबाबत हरकत आहे. कारण की मी स्वत: सर्व ७७ प्रस्तावांबाबत सर्व्हे केलेला नाही. एका प्रस्तावाची जर मी माहिती देत असेल तर ती काही चुकीची नाही. काय आपण या गोष्टीची हमी दयाल की, माझ्या प्रभागातील प्रस्ताव सोडुन उर्वरीत ७६ प्रस्ताव योग्य आहेत म्हणुन? काय आपण संपुर्ण शहर कधी फिरला आहात? आपण जर या प्रस्तावाची जबाबदारी घेत असाल तर मी हा प्रस्ताव पारीत करु इच्छितो.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर व आयुक्त साहेब, नामकरण समितीने विचारविनिमय करुन ही नावे ठरविलेली आहेत आणि ही नावे याअगोदर दिली गेलेली आहेत किंवा नाही याची शहानिशा करण्यासाठी समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाला निर्देश दिलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कुणी संबंधीत अधिकारी येथे उपस्थित असतील तर खुलासा करण्यासाठी त्यांना व्यासपीठावर बोलवा आणि त्यांना विचारा की, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी आता जी हरकत घेतलेली आहे, त्याठिकाणी अगोदर नाव दिलेले होते किंवा नव्हते. आपण सार्वजनिक बांधकाम विभागाला स्पष्टपणे आदेश दिले होते की त्यांनी सर्व्हे करावा आणि त्यानंतरच प्रस्ताव स्पष्ट करावा. त्यानुसार समितीने प्रस्ताव तयार केलेला आहे. नामकरणाचे प्रस्ताव कितीतरी वेळेपासुन प्रलंबित आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक असे एक नाव आहे. डॉ. बाबासाहेब मार्ग असे एक नाव आहे. अशा थोर राष्ट्र पुरुषांची नावे दयायची आहेत. त्यामुळे हे प्रस्ताव असे प्रलंबित राहणार आहेत काय? आणि परत एखादा नगसेवक उभा राहिल आणि विरोध करत राहील. तर त्यांना विरोध तुमच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन झाला पाहिजे. ही नावे ठरविण्यासाठी आम्ही कितीतरी नगरसेवक बैठक घेवुन बैठकीत ही नावे कायम केली तेव्हा श्री. जमनादास पुरस्वानी यांना आमंत्रण नव्हते परंतु त्यांच्या पक्षाचे कुणी न कुणी तेथे होते. त्यांनी तेथे हरकत घ्यावयास पाहिजे होती. किंवा विरोध करावयास पाहिजे होता. ही तर लांबची गोष्ट होती. परंतु त्यानंतर आपण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका—यांना आदेश दिलेले होते की आम्ही जी नावे सुचविली आहेत त्याबाबत तुम्ही जागेवर जावुन सर्व्हे करा. त्यांनी आपला अहवाल दिल्यानंतर नामकरणाचा हा प्रस्ताव कायम झाला आहे. यासाठी त्या अधिका—यांना तुम्ही व्यासपीठावर बोलवा. वर्ष दिडवर्षापासुन नामकरणाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. या प्रस्तावामध्ये काही संतांची नावे आहेत. महापुरुषांची नावे आहेत. त्या सर्वांचा तुम्ही अपमान करत आहात.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:— </u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब आणि सन्माननिय सदस्य श्री. रमेश चव्हाण व माजी उपमहापौर यांनी सभागृहात जी परिस्थिती सांगितली ती सत्यपरिस्थिती आहे. मा. महापौरांच्या दालनामध्ये बैठक घेण्यात आली त्या बैठकीत समिती सदस्य, गटनेते व श्री. जमनादास पुरस्वानी हे सुध्दा तेथे उपस्थित होते आणि त्यावेळेला सन्माननिय सदस्यांनी प्रस्ताव पास पास केला. श्री. जमनादास पुरस्वानी हे हजर असतांना नामकरणाच्या या प्रस्तावामधील काही प्रस्ताव पुढच्या महासभेला आणण्यापेक्षा ज्या प्रस्तावांबाबतीत हरकती नसतील ते प्रस्ताव पारीत केले जावेत. एखाद दोन प्रस्तावांबाबत जी काही अडचण असेल, जर काही दुमत

असेल तर ते प्रस्ताव पुढील सभेत घेवुन आपण निर्णयीत काढु या. किंवा समिती सदस्य आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी एकत्रित बसुन त्यावर तोडगा काढावा.

सदस्य श्री. रमेश चव्हाणः—मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका—यांनी कृपया उत्तर दयावे. ७६ नगरसेवकांपैकी कुणी दोन—चार नगरसेवक उठुन जर बोलत असतील की हा प्रस्ताव पुढे ढकला तर हा आपला अपमान आहे. व ज्यांची नावे दयायची आहेत त्या राष्ट्र पुरुषांचा आणि महात्मांचा अपमान आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—सन्माननिय आयुक्त साहेब, या प्रस्तावांमध्ये असे काही प्रस्ताव आहेत, सन्माननिय आयुक्त साहेब, दोन मिनिटे, माझा हा प्रश्न ऐकुन घ्या. श्री. रमेश चव्हाण साहेबांनी खुप चांगला मुद्दा मांडला. आम्हांला त्यांनी जागृती दिली. या प्रस्तावांमध्ये अनु.क्र. १४ वर श्री शेठ आनंद उदाराम लुल्ला मार्ग हा कुठला मार्ग आहे? आता ही अशी जर नावे ठेवली तर मला असे वाटते की उदया सकाळ दाऊदचे सुध्दा नाव दयावे लागेल, दाऊद मार्ग, कुठे हुसेन मार्ग किंवा दुसरा आणखी कुठला मार्ग? महापुरुषांची नावे ठेवण्यामध्ये काही हरकत नाही. परंतु अशी जी नावे आहेत शेठ आनंद उदाराम मार्ग वगैरे, शिवदास पी.सोनावणे.....

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. रविंद्र बागुल यांच्याशी मी सहमत आहे. आपण शहरात सर्वत्र रस्त्यांना, चौकांना राष्ट्र पुरुषांची, महापुरुषांची नावे देतो, महापुरुषांच्या नावांना आमचा विरोध नाही. परंतु त्यांच्या नावासोबत अशा या लोकांची नावे दिली तर तो महापुरुषांचा अपमान आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुलः—होय. अपमान आहे साहेब, शेठ आनंद उदाराम हा कुठला शेठ असेल तर त्याने आपले नाव घरी कुठेतरी चांगल्या पोस्टरवर लावावे.

सदस्य श्री. प्रशांत धांडेः—मला कुणाच्या भावना किंवा नगरसेवकांच्या भावना दुखवायच्या नाहीत. कुणाच्या आई—वडिलांची, नातेवाईकांची, मित्रमंडळींची नावे देण्यात आली तर त्या नावांची राष्ट्र पुरुषांच्या नावांशी तुलना करु नये.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आमच्याकडे गुलशन नगर आहे त्यातील रस्त्यास दाऊद मार्ग असे काहीतरी नाव देवु?

काही सदस्य :—बागुल मार्ग दया.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—बागुल मार्ग नको आहे, बागुल मार्ग नाव देण्यास वेळ आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मला कुण्याच्याही नावास विरोध नाही. दयायची असतील तर महापुरुषांची नावे दयायची. त्यांच्या सोबत अन्य दुस—या कुणाची नावे देण्यात येत असतील तर त्यास आमचा विरोध आहे. कारण की तो अपमान त्या महापुरुषांचा असणार आहे.

सदस्य श्री. रविंद्र बागुलः— सुल्फि कंपाउंड मार्ग, सुल्फि कंपाउंड म्हणजे काय आहे साहेब?

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—माझी आणखी एक सूचना राहिल की, या महासभेने असा एक ठराव पारीत करावा की यापुढे कोणत्याही महासभेत कोणत्याही नगरसेवकाने आपल्या नातेवाईकांच्या नावाने नामकरणाचा प्रस्ताव आणुच नये. तसेच एक सुधारीत प्रस्ताव आणला जावा त्यामध्ये जसे श्री. रमेश चव्हाण यांनी म्हटले त्यामध्ये केवळ राष्ट्र पुरुषांची नावे असतील असा प्रस्ताव आणावा. जो सर्व संमतीने पारीत केला जावु शकेल.

सदस्य श्री. रविंद्र बागुलः—तर या अगोदर कुणी आपल्या आई—वडिलांची, भावांची रस्ते चौकांना नावे दिली आहेत ती यादी सुध्दा मागवुन घ्यावी. मी असेही ऐकले आहे की काहींनी आपल्या मेहुण्यांच्या नावाने रस्ते, चौकांना नावे दिली आहेत ती सुध्दा यादी मागवुन घ्या, आणि ती नावे काढुन टाका. उल्हासनगरमध्ये चांगली प्रगती व्हावी यासाठी चांगल्या महापुरुषांची नावे दिली जावीत.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—माझे असे म्हणणे आहे की, संत, महापुरुष, व ज्याचे देशासाठी किंवा शहरासाठी योगदान आहे अशा व्यक्ती स्वातंत्र्य सेनानी अशा लोकांची नावे दिली जावीत. पाहिजे तर त्यासाठी मतदान घ्या. मी मतदान करण्यास तयार आहे. यासाठी या प्रस्तावास माझा विरोध आहे आपण मतदान घ्या.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:—श्री. रमेश चव्हाण साहेब कृपया मतदानाचा प्रस्ताव देवु नका. कारण की महापुरुषांच्या नावाचा प्रश्न आहे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण:—महापुरुष, संत, देवाची काही नावे असतील त्यांच्या नावास माझा विरोध नाही. बाकी...

सदस्य श्री. गणपत एडके:—मा. महापौर, आयुक्त साहेब, या प्रस्तावास माझा विरोध नाही. नामकरणासाठी महापुरुष आणि संतांची जी नावे आलेली आहेत ती नावे कायम करावीत. अन्य जी नावे आहेत ती कायम करु नयेत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, याठिकाणी नावांची बरीच मोठी यादी आहे. त्याबद्दल माझी आपणांस विनंती राहील की, येथे डॉ.बाबासाहेब मार्ग असा एक प्रस्ताव आहे, त्याचबरोबर काही संतांच्या नावाचे प्रस्ताव आहेत, काही नेत्यांची नावे देण्याचे प्रस्ताव आहेत. अशा या महापुरुषांची नावे वगळुन बाकी ज्यांच्या ज्यांच्या घरातील व्यक्तींची काही नावे दयायची असतील ती त्यांनी दयावीत कारण की आम्ही राष्ट्र पुरुषांचा अपमान सहन करणार नाहीत. राष्ट्र पुरुषांच्या, महापुरुषांच्या नावाबरोबर अशा या व्यक्तींचे नावाचे प्रस्ताव असु नयेत अशी मी विनंती करतो.

महापालिका सचिव :—काय केले जावे? पास की काय करायचे आहे?

काही सदस्य :— पास, पास......

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—संतांची आणि महापुरुषांची नावे वगळुन बाकी पास करा.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. महापौर व आयुक्त साहेब, नामकरणाच्या प्रस्तावामध्ये माझ्या प्रभागातील एक प्रस्ताव आहे की तेथे आझादनगर असा उल्लेख केला आहे. कृपया त्याठिकाणी ''आझादनगर प्रवेशद्वार'' असे लिहावे अशी माझी विनंती आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—साधासा, छोटासा एक मुद्दा मांडु इच्छितो की, काही लोकांचे असे म्हणणे आहे की, महापुरुषांची नावे सोडुन संत महापुरुष ज्यांनी राष्ट्रासाठी भरीव कार्य केले आहे अशा व्यक्तीस, स्वतंत्र्य सेनानी व बाकी दुसरे आपले प्रभागांमध्ये राहणारे नगरसेवकांचे नातेवाईक किंवा प्रभागात राहणारे जे आपले आदरणीय, पुजनीय पुर्वज असतील त्या सर्वांची नावे असे दोन वेगवेगळे प्रस्ताव ठेवावे. सध्या ज्यांचा एकाच यादीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. येथे एकत्रीत प्रस्ताव असल्यामुळे एकतर तो पुर्ण पारीत करावा लागणार आहे किंवा पुर्णपणे नाकारावा लागणार आहे. या प्रस्तावातील काही नावांना तांत्रिकदृष्टया मंजुरी, काही नावांना नामंजुरी असे केले जावु शकत नाही. यासाठी या प्रस्तावामध्ये सुधारणा करुन महापुरुषांची नावे असलेला एक वेगळा प्रस्ताव व बाकीची नावे असेलेला अलग प्रस्ताव असे दोन वेगवेगळे प्रस्ताव महासभेत आणले जावेत. व लोकशाही पध्दतीने ज्याचे जे जे काही मत असेल तो त्यावर आपले मत देवु शकेल. माझे जे विचार आहेत ते मी येथे व्यक्त केले आहेत.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:—महापुरुषांची नावे त्यामध्ये का? महापुरुषांचे कार्य ऐवढे मोठे आहे त्यांच्या नावांबरोबर प्रभागातील व्यक्तींचे नावांचा प्रस्ताव ठेवुन आपण महापुरुषांचा अपमान करत नाहीत काय? आपण हा मुद्दा गंभीर करत नाही काय?

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आता एवढी जी चर्चा चालली आहे, प्रत्यक्षात आपणांस लाज वाटायला पाहिजे, महापुरुषांच्या नावाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यास तुम्हांला वेळ का लागत आहे? जे काही असेल ते आपण नंतर बघु या ना? महापुरुषांची नावे देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यास तुम्ही एवढा वेळ लावत आहात? आपसामध्ये गोंधळ करत आहात? सत्तेत बसुन तुम्हांला हे कळत नाही की

कोणता ठराव पारीत करावा आणि कोणता करु नये. किती गोंधळ घालत आहात. सामान्य व्यक्तींबरोबर महापुरुषांना जोडत आहात?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—ज्या व्यक्तींची नावे देण्याचे प्रस्तावित केले आहे त्या व्यक्तींचा काय त्याग आहे?

सदस्य श्रीमती सुरेखा वेलकर :—महापुरुषांची नावे देण्याचा जो प्रस्ताव आहे तो पारीत करण्यामागे काय हरकत आहे? महापुरुषांची नावे देण्याच्या प्रस्तावांना तुम्ही आज मंजुरी दया.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका—यास तुम्ही व्यासपीठावर बोलवा. त्यांनी सर्व्हे का नाही केला? एकाठिकाणी दोन नावे झाली आहेत. त्याबाबत त्यांना तुम्ही विचारा, तुम्ही त्यांना विचारत का नाही?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—याच्या अगोदर सुध्दा चौकांची नावे दिलेली आहेत?

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—आता सभागृहामध्ये सन्माननिय सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर यांनी जे वाक्य वापरले ते वाक्य गैरवर्तवणुकीचे आहे.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:—काही गैरवर्तवणुकीचे नाही. महापुरुषांची नावे देण्याच्या प्रस्तावास काय हरकत आहे? त्यांच्या नावांना संमती देण्यास उशिर करता कामा नये. माझे भाषण कोणत्याही प्रकारे गैरवर्तवणुकीचे नाही. मी फक्त यासाठीच बोलले की, महासभेपुढे हा काय गोंधळ चाललेला आहे?

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—असे शब्द मी सभागृहात सहन करुन घेणार नाही.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—ज्याला सहन करायचे आहे तो करील, ज्याला नाही करायचे तो नाही करणार? मी बोलले ते योग्य बोलले आहे. मी काही महापौरांना किंवा तुम्हांला वैयक्तीक बोललेले नाही.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—महापुरुषांचा जो अपमान करेल त्यास शिक्षा मिळेल परंतु लाजा वाटत नाही हा गैरशब्द आहे. या शब्दाबद्दल त्यांनी माफी मागावी.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:—तुम्ही महापुरुषांचा अपमान करत आहात. सर्वसामान्य व्यक्तींच्या नावांच्या प्रस्तावांसाठी महापुरुषांची नावे असलेला प्रस्ताव मागे टाकत आहात हा तुम्हांला राष्ट्रपुरुषांचा अपमान वाटत नाही का?

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—श्रीमती वेलकरजी तुम्ही महासभेचा अपमान करत आहात. तुम्ही पहिल्यापासुन ऐकले नाहीत.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—मी काही अपमान करत नाही.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :— चर्चा काय चालली आहे? श्री. प्रशांत धांडे, श्री. रविंद्र बागुल, श्री. रमेश चव्हाण यांनी काय सांगितले? त्यांनी काय सांगितले ते तुम्ही ऐकलेत काय? महापुरुषांचा अपमान होता कामा नये?

महापौर:—अहो, एकेकानेच बोला, तुम्ही. बसुंन घ्या, किती वेळ बोलत आहात तुम्ही?

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—महापुरुषांचा अपमान होवु नये म्हणुन प्रस्तावामध्ये एकत्रितपणे जी इतर लोकांची नावे जोडण्यात आलेली आहेत ती नावे आणि राष्ट्र पुरुषांची नावे वेगवेगळी करण्याबाबत श्री. नरेंद्र राजानी, श्री. जमनादास पुरस्वानी हे चर्चा करत आहेत. या सर्वांचे एकच मत आहे की महापुरुषांचा अपमान होता कामा नये. आणि त्यावर चर्चा चालु आहे.

सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—माझ्या म्हणण्याचा उद्देश काय होता? महापुरुषांची नावे देण्याच्या प्रस्तावास तुम्ही का विलंब लावत आहात? आता श्री. रमेश चव्हाण जे बोलले ते सुध्दा योग्यच बोलले. मी काय

त्यांना वाईट बोलले नाही. आम्ही सुध्दा आमच्या आई–वडिलांचा मान सन्मान करतो, आईवडिलच देव असतात ही गोष्ट खरी आहे. परंतु काही लोकांनी तेवढयासाठी विलंब लावला आणि महापुरुषांची नावे असलेला प्रस्ताव पारीत करण्याबाबत एकाच्याही तोंडुन शब्द निघालेला नाही, की ठिक आहे प्रथम महापुरुषांची नावे असलेला प्रस्ताव पारीत करु या. बाकी जे काही राहतील ते आपण नंतर बघु या. श्री. बी.बी. मोरे मी तुम्हांला बोललेली नाही. आणि जर का माझ्या शब्दामध्ये काही चुक वाटत असेल तर मी सभागृहाची माफी मागते.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–श्रीमती वेलकरताई हा प्रस्ताव एकच आहे.

सदस्य श्री. लाल पंजाबी :–श्री. मोरे साहेब, माझी एक सूचना आहे, जास्त वादीविवाद न करता, कारण की हा एक असा विषय आहे की ज्यावर जास्त वाद विवाद करता कामा नये. व कोणतीही गंभीर परिणाम होता कामा नये, श्री. जमनादास पुरस्वानी सांगु इच्छित नाहीत. ती गोष्ट ही आहे की, काही ठिकाणी काही रस्त्यांना दोन दोन नावे आहेत त्या नावांचा उल्लेख ते यासाठी करु इच्छित नाहीत की कुणाच्या भावनांचा त्यावर परिणाम होवु नये. कुणास असे वाटु नये की, आम्ही या नावास विरोध करत आहोत. त्यांची अशी सूचना आहे की, एक कालबध्द असा कार्यक्रम असला पाहिजे. कार्यकारी अभियंता श्री. शिर्के आहेत यांनी या सर्व प्रस्तावांबाबत चौकशी करुन असे प्रमाणीत करावे किंवा ही जी नावे प्रमाणीत केली आहेत ती सर्व बरोबर आहेत. व कोणत्याही रस्त्याला किंवा चौकाला या अगोदर हे नाव देण्यात आलेले नाही. याबाबत पाच दिवसाच्या आत त्यांनी अहवाल दयावा. २९ तारखेपर्यंत आम्हांला विषय समित्यांच्या बाबतीत दुसरी एक महासभा ठेवायची आहे. त्यासभेत हा प्रस्ताव आणावा. त्यासाठी माझी अशी विनंती आहे की हा विषय आज पुढे ढकलुन, कार्यकारी अभियंत्यांनी याबाबतीत सर्व्हे करुन प्रमाणपत्र दयावे की या रस्त्याला या अगोदर कोणतेही नाव दिलेले नाही असे प्रमाणत्र जर त्यांनी दिले तर आम्ही हे प्रस्ताव पारीत करण्यास तयार आहोत. फक्त एक आठवडयाची गोष्ट आहे. यासाठी महापौर आणि उपमहापौरजी आपण आदेश दया की एक आठवडयाच्या आत या सर्व प्रस्तावांबाबत सर्व्हे करुन अहवाल दिला जावा.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–मा. महापौरजी, आणि उप–महापौरजी, यामध्ये ही एक सूचना समाविष्ट करावी की, या प्रस्तावांच्या दोन वेगवेगळया यादया तयार करण्यात याव्यात. एक महापुरुषांच्या नावाची यादी, जसे की महासभेस प्रत्येक सदस्यास आपल्या मतानुसार मतदान करण्याची संधी मिळावी. ज्यांनी राष्ट्रीय स्तरावर किंवा प्रादेशिक स्तरावर विशेष अशी कामगीरी केली आहे अशा राष्ट्रीय पुरुषांची एक यादी तयार करावी.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाच्या प्रस्तावाबरोबर या लोकांची नावे जोडली आहेत ती बरोबर नाहीत.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–आपण मला येथे बोलु दया. माझे बोलणे संपल्यानंतर आपण बोलु शकता. येथे वैयक्तीक वाद विवादाची काही आवश्यकता नाही. आपले जे काही मत असेल त्याची इतिवृत्तामध्ये नोंद करा. त्याबाबतीत माझी काही हरकत नाही. आपले जे विचार आहेत ते मी शांततापुर्वक ऐकेन.

महापौर:–एकएकेकानेच बोलावे, किती वेळ बोलत आहात तुम्ही. एकाने एकाच वेळी बोलले पाहिजे. वारंवार बोलता कामा नये. तुम्हांला जे काही बोलायचे आहे, अर्धातास एक तास.......एकदाच बोला.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:–महापौरजी, मी काय म्हटले? काय म्हटले मी?

महापौर:–किती वेळ बोलत आहात? आता या प्रस्तावावर मतदान घेतले जाईल.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी:– मी हात वर करुन, बोलण्यास परवानगी घेवुन, नंतर, उभे राहुन नंतर बोललो. आणि मी काय सांगितले ते आपण ऐकले काय? ते मी आपणांस विचारत आहे. मी विचारतो ना मी काय सांगितले ते? मी फक्त हे सांगत आहे की नामकरणाच्या प्रस्तावाची दोन प्रकारे यादी तयार केली पाहिजे. एक यादी अशी असली पाहिजे की ज्यामध्ये फक्त महापुरुषांची नावे असली पाहिजेत त्यासाठी वेगळे मतदान आणि दूसरी यादी ज्यामध्ये स्थानिक लोकांची नावे मग ते नगरसेवकांचे नातेवाईक असतील किंवा प्रभागात राहणारे लोक असतील त्यांची नावे असलेली यादी, अशा प्रकारे दोन प्रकारच्या यादया तुम्ही तयार करा. आता तुम्ही सांगा महापौरजी? एवढेच मला सांगायचे होते. माझ्या विचारांची नोंद घ्या.

**<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>**डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे नाव देखील याठिकाणी प्रस्तावित केलेले आहे मी आपणांस विनंती करेन की एवढया मोठया महापुरुषाचे नाव कुणी जर सुचविले असेल तर त्यांच्या भावना दुखावल्या जातील परंतु मी माझ्या भावनेने, विचाराने बोलत आहे की, एवढया मोठया महापुरुषाचे नाव, ज्याने भारताची राज्यघटना लिहिली, त्याला एवढे मानाचे स्थान आहे अशा आमच्या आदरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे नाव देवु नये कुणी पण. या तुलनेमध्ये त्यांचे नाव नका घेवु. जर आपण त्यांचे नाव घेतले, तर हे जे स्थानिक लोकांचे नाव देत आहात, त्यांच्याबरोबर त्यांची तुलना करु नये एवढीच मी आपणाला विनंती करतो की आपण ते नाव तेथे देवु नये.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>**डॉ.बाबासाहेबांचे नाव जेथे प्रस्तावित केले आहे त्यास आताच मंजुरी दिली जावी.

**<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u>**डॉ. बाबासाहेबांची विचारसरणी, विचारधारा फार मोठी आहे. त्यामुळे ज्याकुण्या नगरसेवकाने त्यांच्या नावाची शिफारस केली असेल त्यांनी ते कमी करावे. त्याठिकाणी दुसरे नाव दयावे. कारण की या नावांबरोबर त्यांच्या नावाची तुलना केली तर तो त्यांचा अपमान होईल.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>**मा. महापौरजी, विषय येथेच समाप्त झाला. केवळ आपणांस विनंती आहे की, कोणत्याही महासभेत प्रस्ताव येण्याअगोदर आपण सत्ताधारी पक्षातील सर्व गटांना विश्वासात घ्या. आपले सदस्यच एक दुस—याच्या मताशी सहमत नाहीत. त्यामुळे सभागृहाची वेळ व्यर्थ जात आहे. यास्तव माझी आपणांस विनंती आहे की, आपण जो कोणताही मुद्दा सभागृहासमोर आणता मी आपणांस विनंती करेन की आपण सत्ताधारी आणि विरोधी पक्षास विश्वासात घेतले तर आपणांस धन्यवाद दयावे लागतील आणि तसे सर्वांना विश्वासात घेत नसाल तर कमीत कमी सत्ताधारी पक्षातील गटांना विश्वासात घ्यावे जेणेकरुन महासभेचा वेळ व्यर्थ जावु नये.

**<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, हा नामकरणाचा मुद्दा कित्येक महिन्यापासुन चालत आलेला आहे. प्रत्येकवेळा सभा होते आणि हा मुद्दा पुढे पुढे होत आहे. ज्या रस्त्याचे, चौकाचे चुकीने दोन—दोन वेळा नाव देण्यात आलेले आहे किंवा ज्यांच्या बाबतीत हरकती आहेत अशा रस्ते किंवा चौकांचे प्रस्ताव सोडुन इतर जे नामकरणाचे प्रस्ताव आहेत ते पारीत केले जावेत. वारंवार हा मुद्दा सभेत आणु नका. वारंवार हा मुद्दा सभेत आणुन प्रलंबित ठेवल्याने संबंधीताच्या भावनांना ठेच पोहचत आहे. यास्तव मा. महापौरांना व सर्व सभागृहाला माझी विनंती आहे की, ज्या प्रस्तावांबाबतीत हरकती आहेत ते प्रस्ताव सोडुन उर्वरीत प्रस्ताव पारीत केले जावे.

**<u>महापौर :—</u>**ते प्रस्ताव नंतरच्या महासभेत पास करण्यात येतील.

**<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, नामकरण तदर्थ समितीमध्ये ठरविण्यात आले होते की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जावुन सर्व्हे करतील त्याचे काय झाले? आता या प्रस्तावांमध्ये काही रस्ते व चौकांना दोन—दोन नावे होत आहेत. तर ते अधिकारी काय झोपले होते काय? आपण त्यांना सांगितलेले की, तुम्ही जावुन सर्व्हे करा. आजपर्यंत दुबार नावांचे प्रस्ताव आलेले आहेत. म्हणुन संबंधीत अधिका—यांवर तुम्ही काय कारवाई करतात ते सांगा. एका वर्षापेक्षा जास्त कालावधी पासुन हा मुद्दा प्रलंबित आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**मा. महापौरांनी मला आपणांस सूचना देण्यास सांगितले आहे. हा विषय दोन वर्षापासुन कित्येक वेळा सभेपुढे आलेला आहे. मागील वेळेस या विषयाबाबत सभागृहात वाद निर्माण झाला होता. त्यावेळी या सभागृहाने असा निर्णय घेतला होता की, एक तद्र्थ समिती नेमली जावी. मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. त्या समितीमध्ये सर्व पक्षांचे गटनेते, सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता, व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता हे त्या समितीवर सदस्य सचिव म्हणुन काम पाहतील.ही समिती यासाठी तयार करण्यात आली होती की, नामकरणाचे प्रस्ताव महासभेपुढे येण्याअगोदर प्रारंभीक स्वरुपाची जी काही चौकशी आहे जसे की, एका रस्त्यास, चौकास दोन वेळा दोन—दोन नावे तर नाहीत, किंवा योग्य व्यक्तीची नावे आहेत किंवा नाहीत. त्याची छाननी करुन एक संक्षिप्त यादी तयार करुन या समितीमार्फत योग्य ते प्रस्ताव महासभेपुढे आले पाहिजेत. मा. महापौरांचे म्हणणे आहे की, जेव्हा हे विषय तद्र्थ समितीपुढे येतात तेव्हा सर्वांनी त्यात भाग घेतला पाहिजे व सखोल चर्चा करुन अशा विवादांबाबत काहीना काही योग्य निर्णय घेतला पाहिजे. यास्तव मा. महापौरांचे म्हणणे आहे की, आताचा जो विषय आहे त्याबाबतीत तीन वेगवेगळे प्रस्ताव आहेत. कित्येकांचे असे म्हणणे आहे की, साधारण व्यक्तींचे नाव देण्याचा

जो प्रस्ताव येत असेल तर महापुरुषांच्या नावाची वेगळी यादी तयार केली जावी. कित्येकांचे म्हणणे आहे की, महापुरुषांची नावे सोडुन इतर नावे काढुन टाकली जावीत. अशा प्रकारे तीन वेगवेगळे प्रस्ताव आहेत. यासाठी यावर निर्णय घेणे सहज शक्य नाही. यासाठी मा. महापौरांचे म्हणणे आहे की, कार्यकारी अभियंता, सार्व.बांध. विभाग हे तीन दिवसांच्या आत पुर्णपणे छाननी करुन जर कुठे एखादे नाव दुस—यांदा आले असेल तर व काही ठिकाणी योग्य नाव नसेल तर त्याबाबतचा अहवाल देतील. त्यानंतर मा. महापौर एक बैठक निश्चित करतील. त्यामध्ये संबंधीत सर्व सदस्यांचा सहभाग राहिल. त्यामध्ये चर्चा करुन याबाबतीत निर्णय घ्याल तर फार योग्य राहिल अशी त्यांची सूचना आहे. आपणांस ती मान्य असेल तर हा विषय आजच्या सभेच्या कार्यसूचवरुन वगळला जाईल.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>मा. महापौरांना माझी विनंती आहे, जेव्हा हे शहर वसले होते आणि नव्यानेच नगरपालिका स्थापन झाली होती, त्यावेळेस शहरामध्ये कित्येक ठिकाणी महापुरुषांचे पुतळे बसविण्यात आले होते. ते पुतळे जेथे बसविण्यात आले होते त्या चौकास पुतळयाच्या नावाने ओळखले जात होते. तसा स्वतंत्रपणे फलक लावण्यात आलेला नव्हता. तर मेहरबानी करुन आपल्या अधिका—यांना सांगण्यात यावे की ज्या चौकामध्ये पुतळा बसविण्यात आला आहे त्या चौकास तेथे असलेल्या पुतळयाच्याच नावाने नाव देण्यात आले आहे. याचा योग्य तो विचार करुन प्रस्ताव आणला जावा.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे? हा प्रस्ताव आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यांत यावा? सर्व संमतीने?

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८:—** उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेल्या रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव आलेले आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावकाचे नाव | नामकरण करावयाचे ठिकाण रस्ता/चौक | प्रस्तावित नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर रेल्वे स्टेशनपासून ते शिवनगर शाखा ते गुरुद्वारा मेथडिस्टचर्च व्हाया, आंबेडकर चौक ते भरतनगर पर्यंतच्या रस्त्यास | ''प.पूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर'' |
| २ | आदर्श क्लब, रहिवासी संघ | उल्हासनगर—१ बसस्टॉप चौकास | ''माता सविताबाई आंबेडकर चौक'' |
| ३ | श्री.रमेश म.चव्हाण | दत्तगुरु सोसायटी ते संतोषी माता कॉलनी ते स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्यास | ''संत तुकाराम मार्ग'' |
| ४ | श्री.रमेश म.चव्हाण | रामरक्षा हॉस्पीटल समोरील चौकास तसेच व्हिनस कारंजा ते मार्यानगर पर्यंतच्या रस्त्यास | ''संत नामदेव मार्ग'' |
| ५ | श्री.गोविंदराम लुंड | पॅनेल क्र.१३ ए नाथा घरापासून ते पाण्याच्या टाकीपर्यंत व सभोवतालच्या परिसरास | ''महात्मा फुले नगर'' |
| ६ | श्री.मोहन साधवानी | हरिओम अपार्टमेंट ते बॅ.नं.१८४१ पर्यंत रस्त्यास | ''कपिलेश्वर मंदीर रोड'' |
| ७ | श्री.मोहन साधवानी | बॅ.नं.१८२२ ते मात्रा आशिष अपार्टमेंट, ते बॅ.नं. १८१३, आनंदपुरी दरबारपर्यंत रस्त्यास | ''हुंडलदास होटचंद मेलवानी मार्ग'' |
| ८ | डॉ.निना प्रकाश नाथानी | डॉ.नाथानी दवाखाना ते रामदर्शन अपार्टमेंट, आणि डॉ.नाथानी ते बॅ.नं.६३, बसंतराम चौकपर्यंत रस्त्यास | ''श्रीमती अवंतिका घनश्यामदास नाथानी मार्ग'' |
| ९ | श्री.राजेंद्रसिंह वी.भुल्लर (महाराज) | वार्ड क्र.१५ मध्ये कोमल पार्क इमारती मागे गोल मैदान, उल्हासनगर—१ | ''हरेकृष्णा उद्यान'' |
| १० | श्री.जमनु पुरस्वानी | राम चहा दुकान ते नेताजी रोड, उल्हासनगर—२ येथील चौकास | ''भाऊ शेवकराम आहुजा चौक'' |

| | | | |
|---|---|---|---|
| | | येथील चौकास | |
| ११ | श्री.गोविंदराम लुंड | वार्ड नं.१३ कालानी सोसायटी ते ब्लॉक क्र.६७९ पर्यंत ते दिपक दरबार दिपक ते डॉ.मुंद्रा हॉस्पी., डॉ.मुंद्रा हॉस्पी ते कालानी सोसा. ते विनोद अपार्टमेंट या परिसरास | ''साई वसणशाह बंगला नगर'' |
| १२ | श्री.गोविंदराम लुंड | वार्ड नं.६० शिवमंदीरच्या बाजूला सी–६३७ समोर येथील रस्त्यास | ''शिवसागर कॉलनी'' |
| १३ | श्रीम.कविता सिरवानी | वार्ड क्र.४४ मध्ये गुरुराज आश्रम जवळ, ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर–३ | ''गुरु गुलराज चौक'' |
| १४ | श्री.मोहन रामरख्यानी | बॅ.नं.५५४,५५५ ते दुनिचंद कालानी हॉल, उल्हासनगर–२ | ''श्री शेठ आनंद उदाराम लुल्ला मार्ग'' |
| १५ | श्री.मोहन रामरख्यानी | बॅ.नं.५४६ शोभराज भठिजा यांच्या घरापासून लाल चक्कीवाला, भाग्यलक्ष्मी अपार्टमेंट ते झुलेलाल शाळापर्यंत | ''श्री सतरामदास केवलराम तलरेजा'' |
| १६ | श्री.मोहन रामरख्यानी | बॅ.नं.५३० लविना अपार्टमेंट व बाशाराम अपार्टमेंट चौकास | ''हरेश राधाकिसन भारद्वाज चौक'' |
| १७ | श्री.मोहन रामरख्यानी | राम ऑप्टीशियन ते हनुमान मंदीर पुलापर्यंतच्या रस्त्यास प्रस्तावित नामकरण करणे आहे. | ''शिवदास पी.सोनावणे'' |
| १८ | श्री.मोहन रामरख्यानी | उल्हासनगर–३ हरीजन कॉलनी येथे प्रवेशद्वार बांधून त्यास | ''कै.बिहारी कचरु भगत प्रवेशद्वार'' |
| १९ | श्री.मोहन रामरख्यानी | बॅ.नं.५२१ ते शिवसेना कार्यालयापर्यंत | ''स्वर्गीय श्री मेघराजमल लुल्ला मार्ग'' |
| २० | श्रीम.लिलाबाई आशान | औ.टी.चौक ते पंचायत हॉल, स्टेशन रोड करिश्मा सोसायटी पर्यंत | ''लक्ष्मण किसन आशान मार्ग'' |
| २१ | श्रीम.लिलाबाई आशान | वार्ड नं.४७, ओ.टी.सेक्शन ते भिम कॉलनी शिवशक्ती कॉलनी उ.नगर–४ | ''डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार'' |
| २२ | श्रीम.लिलाबाई आशान | राज फोटो स्टुडीयोच्या मागील वसाहतीला | ''संत रोहिदास नगर'' |
| २३ | श्रीम.लिलाबाई आशान | नागमंदिर १४ नं.शाळा, जागृती कॉलनी ते ओ. टी.चौक, उ.नगर–४ | ''धर्मविर आनंद दिघे प्रवेशद्वार'' |
| २४ | श्रीम.लिलाबाई आशान | पंचायत हॉल या चौकास | ''गोप रुपचंदाणी चौक'' |
| २५ | श्रीम.लिलाबाई आशान | सिंध नॅशनल जवळ, उल्हासनगर–४ | ''संत गाडगेबाबा मार्ग'' |
| २६ | श्री.मोहन साधवानी | महाराजा हॉल समोर ते श्रीमती राधाबाई क्रिष्णानी चौक व्हाया माता मंदीर सेक्शन–२३ रस्त्याला | ''डॉ.जमनादास हरिशरनदास उदासी मार्ग'' |
| २७ | श्री.मोहन साधवानी व श्री. गोधूमल किशनानी | दसरा मैदान येथील गार्डनला | ''कै.मोहनदास वरियलदास बेहरानी गार्डन'' |
| २८ | श्री.रविंद्र बागुल व श्रीम. संगिता राजेश कंडारे | बॅ.क्र.३१ बी समोरील भिमनगर, उल्हासनगर–१ येथील उद्यान व चौकास | ''हिम्मत जेठानी उद्यान व चौक'' |
| २९ | श्रीम.निलम प्रेमसिंग रावत | वार्ड क्र.७ मध्ये सी ब्लॉक चौकास | ''गुरुद्वारा सचखंड दरबार चौक'' |
| ३० | श्रीम.निलम प्रेमसिंग रावत | वार्ड क्र.७ मध्ये डॉल्फिन क्लब ते साकव पर्यंत उल्हासनगर–३ | ''कै.विवेक त्रिभुवन मिश्रा'' |
| ३१ | श्रीम.निलम प्रेमसिंग रावत | वार्ड क्र.७ मध्ये इंदीरानगर, उल्हासनगर–३ | ''सुल्फि कंपाउंड मार्ग'' |
| ३२ | श्री.राम (चार्ली) पारवानी | वार्ड क्र.३६, बॅरेक नं.५७० जळ, ओ.टी.सेक्शन, उल्हासनगर–२ | ''श्री गुरुनानक नगर मार्ग'' |
| ३३ | श्रीम.सुरेखा राजन वेलकर | वार्ड क्र.४०, महात्मागांधी नगर, शिवसेना शाखेसमोर, उल्हासनगर–३ | ''साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे प्रवेशद्वार'' |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | श्री.प्रभुनाथ गुप्ता | वार्ड क्र.७ मध्ये प्रेस बाजार, युनियन बॅकेच्या मागील परिसरास | ''साईबाबा नगर'' |
| ३५ | श्री.अंकुश म्हस्के | गजानननगर, महाराज मंदीर मार्ग, शांतीनगर, उल्हासनगर–३ | ''साईबाबा नगर प्रवेशद्वार'' |
| ३६ | श्रीम.ज्योती रमेश चैनानी | पुज्य पंचायत, नवजीवन बॅक जवळील रस्त्याला | ''भाई साहेब भोजराज उदासी मार्ग' |
| ३७ | श्रीम.ज्योती रमेश चैनानी | नवजीवन को.बॅकेंच्या समोर कालानी सोसायटीजवळ फॅन्ट सेक्शन–२५, उल्हासनगर–४ | ''स्व.देवीबाई सेठ कुडणमल रोहडा चौक' |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | श्रीम.ज्योती रमेश चैनानी | बॅ.नं.१६७९ जवळ, सिंग सभासमोर, सेक्शन–२५, उल्हासनगर–४ | ''श्री साजनदास चैनानी मार्ग'' |
| ३९ | श्रीम.ज्योती रमेश चैनानी | सेक्शन–२६, उल्हासनगर–४ | ''गुरुद्वार गुरुसंगत दरबार'' |
| ४० | श्री.भरत गंगोत्री | वार्ड क्र.६७, महाराजा टॉवर, कमल बेकरी, सेक्शन ३९, उल्हासनगर–५ | ''श्री बाबा अमलोकदास नगर'' |
| ४१ | श्री.भरत गंगोत्री | स्वामी नारायण पॅलेस, भाटिया हॉस्पीटल, उल्हासनगर–५ | ''सेठ देवीचंद एच.वलेचा मार्ग'' |
| ४२ | श्री.दत्तात्रय ना.पवार | वार्ड क्र.९ मध्ये चोपडा शिवसेना शाखा ते विठ्ठल–रुख्माई मंदिर, ब्राम्हणपाडा या मार्गास | ''गावदेवी मंदीर मार्ग' |
| ४३ | श्री.दत्तात्रय ना.पवार | वार्ड क्र.९, मध्ये साईबाबा मंदीर ते साकव पर्यंत | ''साईबाबा मंदीर मार्ग'' |
| ४४ | श्री.दिलीप जग्यासी | वार्ड नं.१४ चोपडा कोर्ट, बॅ.क्र.७२३ ते मॉडल स्कूल पर्यंत | ''सरदार संतसिंग ओचानी मार्ग'' |
| ४५ | श्री.दिलीप जग्यासी | वार्ड नं.१४ हॉलीवूड ते प्लॉवर व्हॅली सोसायटी पर्यंत | ''डॉ.उदाराम सिधवानी मार्ग'' |
| ४६ | श्री.दिलीप जग्यासी | वार्ड नं.४८ मामा सोसायटी ते सोनेसर अपा. ,पर्यंत | ''खुशालदास होतचंदानी मार्ग'' |
| ४७ | श्री.राजू (जिवन) इदनानी | वार्ड नं.१३ एसबीआय बॅक ते सिल्व्हर अपार्टमेंट | ''अर्जुनदास गोविंदराम आरतानी मार्ग'' |
| ४८ | श्री.राजू (जिवन) इदनानी | वार्ड नं.१३, गुरुद्वारा ते त्रिलोकनाथ महादेव मंदीर | ''डॉ.हेमनदास इदनानी मार्ग'' |
| ४९ | श्री.राजू (जिवन) इदनानी | वार्ड नं.१३, अमर फास्टफूड ते मधूसुदन अपार्टमेंट पर्यंत | ''सेठ नेवलमल व्ही.मेघवानी मार्ग'' |
| ५० | श्री.राजू (जिवन) इदनानी | वार्ड नं.१३ रानी मॉ सोसायटी ते त्रिलोक व्हिला | ''इंदरलाल अहूजा मार्ग'' |
| ५१ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर–४ प्रभाग क्र.१४ येथील ब्लॉक सी ६४५ पासून सी–६५९ पर्यंतच्या रस्त्यास (डॉ. चैनानी हॉस्पीटल समोर) | ''श्री लदाराम गिधूमल भक्तियानी मार्ग'' |
| ५२ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर–४ प्रभाग क्र.१४ येथील ब्लॉक नं. २५५ च्या जवळील चौकास | ''श्री सुगनामल लिलाराम चादवानी चौक'' |
| ५३ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर–४ प्रभाग क्र.१४ मधील ब्लॉक नं. ए–२०३ च्या जवळील चौकास | ''महंत महादेव गीर श्री.महंत वीर गीर चौक'' |
| ५४ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर–४, प्र.क्र.१४ मधील महादेव अपा. च्या जवळील चौकास | ''स्वर्गीय श्री.नारायणदास एम. खेमचंदाणी चौक'' |
| ५५ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर–४ प्र.क्र.१४ येथील महादेव अपा. पासून दहाचाळपर्यंतच्या रस्त्यास | ''बाबा केशवदास मार्ग'' |
| ५६ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर–४ प्र.क्र.१४ येथील नेताजी चौ ते व्हिनस चौ मेघदूत अपार्टमेंटसमोरुन, स्मशानभुमी ते ब्लॉक ए–२४० समोर ते कुर्ला कॅम्प रस्त्यावर साईलिला अपार्टमेंट ते नेताजी | ''समर्थ देव बाबा नामनदास नगर'' |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चौकापर्यंतच्या परिसरातील | |
| ५७ | १) श्री.रमेश म.चव्हाण २) दलित क्रांती लहूजी सेना, उल्हासनगर—५ | उल्हासनगर—२ येथील भाजी मार्केट चौकास | ''साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे चौक'' |
| ५८ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर—३ येथील पवई चौक ते विठ्ठलवाडी स्टेशन या रस्त्यास | ''साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे मार्ग'' |
| ५९ | श्री.रमेश म.चव्हाण | उल्हासनगर—५ येथील मारुती मंदीरापासून ते श्री. एकनाथ पाटील यांच्या घरापर्यंतच्या परिसराला | ''श्री शिव समर्थ कॉलनी'' |

| | | | |
|---|---|---|---|
| ६० | श्री.रमेश म.चव्हाण | गुरुद्वारासमोर, लालचक्की, शिवनगर, उल्हासनगर—४ | ''गुरु गोविंदसिंग चौक'' |
| ६१ | श्रीम.सुरेखा राजन वेलकर | प्र.क्र.४० मधील रुहानी सत्संग, कॅनरा बॅकेजवळ, उल्हासनगर—२ याठिकाणी प्रवेशद्वार बांधून त्यास | ''चंद्रशेखर आझादनगर प्रवेशद्वार'' |
| ६२ | श्रीम.बेबी (नेहा) नंदु भोईर | १) शहाड गावठाण ते सेंच्युरी रेयॉन स्टाफ गेट पासून ते राम मंदीर पर्यंतच्या रस्त्यास २) शहाड गावठाण ते सेंच्युरी हॉस्पीटल ते बिर्ला मंदीर पर्यंतच्या रस्त्यास | १) ''राम मंदीर मार्ग'' २) ''विठ्ठल मंदीर मार्ग'' |
| ६३ | श्री.राजू (जिवन) इदनानी | वार्ड क्र.१३ मधील उल्हासनगर महानगरपालिका रस्ता ते स्टेट बॅकजवळ, उल्हासनगर—३ या रस्त्यास व प्रवेशद्वारास | ''गुरुबक्शराय के.हजारी'' |
| ६४ | १) श्री.राजू (जिवन) इदनानी २) श्री.मोहन (गाडो) रामरख्यानी | प्र.क्र.३४ मध्ये शिवसेना कार्यालयामागे बॅरक क्र.५२१ जवळ, डा.शाम किंगर दवाखान्याजवळ, उल्हासनगर—२ याठिकाणी विकसित करण्यात येणा—या उद्यान व बांधलेले स्टेज | ''स्वर्गीय नारायणदास रामरख्यानी'' |
| ६५ | श्री.गणपत ऐडके | उल्हासनगर—२ येथील रमाबाई आंबेडकर नगर येथील आईस फॅक्टरी जवळील चौकास | ''श्री संत रोहीदास चौक'' |
| ६६ | श्री.राम (चार्ली) पारवानी | उल्हासनगर—१ येथील फक्कड मंडळी ते कमला नेहरु नगर व धोबीघाट मार्गे सेंच्युरी रेयॉन शाळेपर्यंत मुरबाड रोड या रस्त्यास | ''कै.श्री.प्रमोद महाजन मार्ग'' |
| ६७ | श्री.बच्चाराम रुपचंदानी | उल्हासनगर—५ स्वामी त्रिलोकदास उद्यान येथील वाचनालयास | ''श्रीम.भगवंती बी.रुपचंदानी वाचनालय'' |
| ६८ | श्री.नरेंद्र के.ठाकूर (कुमारी) | उल्हासनगर—३ वार्ड क्र.२६ येथील राजीवगांधी उद्यानातील वाचनालयास | ''श्रीम.कमलाबाई केवलराम ठाकूर'' |
| ६९ | श्री.नरेंद्र के.ठाकूर (कुमारी) | उल्हासनगर—३ वार्ड क्र.२६ येथील बॅरेक क्र. ५०७ जवळील समाजमंदीरास | ''श्री ओमी लासी' |
| ७० | श्री.सुरेश जाधव | लालचक्की चौक, उल्हासनगर—४ शेजारील विभागास | '' आझाद नगर प्रवेशद्वार '' |
| ७१ | मा.श्री.हरेश जग्यासी | प्रभाग क्र.७३ बॅरेक क्र.१९८४, स्वामी सर्वानंद हॉस्पीटल समोर, उल्हासनगर—५ येथील रहदाराच्या मार्गाला | ''माधवदास उधाराम गोकलानी मार्ग'' |
| ७२ | मा.श्री.बी.बी.मोरे | प्र.क्र.८ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, चोपडा उल्हासनगर—३ येथे हजेरीशेडच्या बाजूला महानगरपालिकेच्या राखीव भूखंडास | ''क्रांतिसुर्य म.ज्योतिबा फुले'' |
| ७३ | राजू (जिवन) इदनानी | वार्ड क्र.१३ मध्ये दाभाडे यांच्या घरासमोरील चौकास | ''शिवकॉलनी चौक'' |
| ७४ | मा.श्री.मोहन रामरख्यानी | उल्हासनगर—१ वार्ड क्र.१९ येथील महेश सोसायटी ते तेजूमल चक्की, बॅरेक क्र.१२५, | ''श्री स्वर्गीय पिंजोमल हुंदोमल गोपलानी प्रवेशद्वार'' |

| | | | |
|---|---|---|---|
| | | साधूबेला गर्ल हायस्कूल प्रवेशद्वार | |
| ७५ | मा.श्री.मोहन रामरख्यानी | उल्हासनगर–२ वार्ड क्र.३४ येथील डॉ. शामकिंगर यांचे दवाखान्यापासून सुंदरीहॉल ते बॅरेक क्र.५२९ सिरु चौक येथील रस्त्यास | ''स्वर्गीय पेसूमल ओचानी मार्ग व प्रवेशद्वार'' |
| ७६ | मा.श्री.लाल पंजाबी | उल्हासनगर–३ प्र.क्र.३० मधील संतू बिल्डिंग येथील चौकास | ''स्व.श्रीमती जसोताबाई देवनदास पंजाबी चौक'' |
| ७७ | मा.श्री. दिलीप जग्यासी, मा.श्री. सुनिल गंगवाणी, व मा.श्री.राजू (जिवन) इदनानी | रिजन्सी हॉटेल ते साईबाबा सोसायटीपर्यंत रतन गार्डनमागे रस्ता | ''इच्छापूर्णी उषा माताजी मार्ग'' |

उक्त रस्त्यांचे / चौकांचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाला कोणताही नांवाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. तदर्थ नामकरण समिती **ठराव क्रमांक. २ दिनांक. १४/३/२००७** अन्वये उपरोक्त दर्शविलेले ७७ नामकरण प्रस्ताव मान्य केलेले आहेत. सदरहू तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीस मा.महापौर/अध्यक्ष व इतर सहा सदस्य व सदस्य सचिव उपस्थित होते.

तदर्थ नामकरण समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त एकूण ७७ नामकरण प्रस्तावास अंतिम मंजूरी देणेस मा.महासभेसमोर प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ७ दिनांक:–१२/६/२००८

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रशांत धांडे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करण्याच्या एकूण ७७ प्रस्तावास सद्यस्थितीत मान्यता देत नाही.

कारण––

१. प्रस्तावातील काही रस्त्यांचे/चौकांचे यापुर्वीच नामकरण झालेले असल्याने एका रस्त्यास/चौकास दोन–दोन नावे होत आहेत.

२. काही रस्ते/चौकांना साधारण व्यक्तींची नावे देण्यात आलेली आहेत. या व्यक्तींनी देशासाठी/ शहरासाठी कोणतेही महत्वपुर्ण किंवा भरीव कार्य केलेले नाही.

३. वरील कारणांमुळे महासभेपुढे प्रस्तावित केलेल्या यादीतील रस्ते /चौकांचे नामकरणांचे ७७ प्रस्ताव वादग्रस्त होवु नयेत म्हणुन कार्यकारी अभियंता (साबांवि) हे सर्व प्रस्तावांची छाननी करुन ३ दिवसात अहवाल सादर करतील. व तद्नंतर मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या तदर्थ समितीमध्ये योग्य तो निर्णय घेतल्यानंतर महासभेपुढे फेरप्रस्ताव आणता येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर शहरातील हिराघाट जवळ, सीटीएस क्रमांक १३०२२ शिट नं. २८ अन्वये नोंद असलेली रिकामी जागा बांधा, वापरा व हस्तांतरण पध्दतीने विकसीत करणे कामी मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. लाल पंजाबी :—**माझी विनंती आहे की या प्रस्तावावर चर्चा करायची असल्याने हा प्रस्ताव आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यात यावा.

**महापालिका सचिव :—**हा प्रस्ताव सर्व संमतीने, पुढे ढकलायचा काय?

**काही सदस्य :—**सदरचा प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा.

✂ **महापौर :—** सदरच प्रस्ताव आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्याकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

⌧ **विषय क्र. ९:—** उल्हासनगर शहरातील हिराघाट जवळ, सीटीएस क्रमांक १३०२२ शिट नं. २८ अन्वये नोंद असलेली रिकामी जागा बांधा, वापरा व हस्तांतरण पध्दतीने विकसीत करणे कामी मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहराच्या हद्दीतील कॅम्प नं. २ मध्ये हिराघाट मंदिराजवळ सीटीएस क्रमांक : १३०२२ शीट नं. २८ अन्वये नोंद असलेली रिकामी जागा विकसीत करावयाची आहे. अंदाजे २० वर्षापुर्वी सदर जागेच सुशोभिकरण करणेच्या दृश्टीने तेथे तलाव तयार करुन बोंटींगची व्यवस्था करण्यात आली होती. त्यावेळी बोटींग व उदयानातील सौदर्याचा जनतेस लाभ होत होता . गेल्या काही वर्षापासून सदरचे बोटींग तलाव बंद अवस्थेत पडले असून सदर जागेचा दैनंदिन देखभाल व्यवस्थित होत नसल्याचे सध्या सदर जागेचा लाभ जनतेस होत नाही.

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता, सदर जागेचे सुशोभिकरण , बांधा , वापरा व हस्तांतरण करा या पध्दतीने करणेसाठी महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १९/५/२००३ अन्वये प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. सदर प्रस्तावात विकासधारकाने करावयाची विकास कामे, देखभाल दुरुस्ती तेच विकासधारकाने केलेली गुंतवणूक परत मिळणेसाठी अनुज्ञेय प्रयोजन या बाबींचा समावेश करण्यात आला होता, परंतु ठरावाची अंमलबजावणी करण्यात आल्याचे दिसत नाही.

सबब उपरोक्त जागेत निधी, वापर व हस्तांतरण करा (FBT) तत्वावर विकास करणेचा सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्याची संक्षिप्त माहिती पुढील प्रमाणे आहे.

: जागेचा तपशिल :

| तपशिल | आरक्षण | प्रस्तावीत विकास आराखडयानुसार अनुज्ञेय वापर | क्षेत्रफळ | अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक |
|---|---|---|---|---|
| सी.टी. एस. क्रमांक १३०२२ | खेळाचे मैदान, सार्वजनिक उदयाने, व बगिचे, क्लब, क्रिडा संकूल , जलतरण तलाव, गौल्फलिंक व्यायामशाळा | खेळाचे मैदान, सार्वजनिक उदयाने, व बगिचे, क्लब, क्रिडा संकूल , जलतरण तलाव, गौल्फलिंक व्यायामशाळा | १५७९६ चौरस मीटरा | ०.१० |

१.	निविदा सुचने संबंधी प्रमुख अटी व शर्ती :

अ)	जागेच्या विकाससंबंधी को—या निविदा फॉर्मची किंमत रुपये २०,०००/— (अक्षरी वीस हजार)निश्चित करणेस प्रस्तावीत आहे.

ब)	इसारा रक्कम रुपये ९०,९८,४९६/— ( अक्षरी रू नव्वद लाख अठ्ठयानव हजार चारशे श्यानव फक्त ) (एकुण किमान देकार रकमाचे पाच टक्के ) निश्चित करणेस प्रस्तावीत आहे.

क)	सुरक्षा अनामत रक्कम रुपये २,९१,१५,१८७/— ( अक्षरी रू दोन कोटी एक्यानव लाख पंधरा हजार एकशे सत्याऐंशी फक्त ) (एकुण किमान देकार रकमाचे सोळा टक्के ) चार समान बॅक गॅरंटीच्या स्वरुपात निश्चित करणेस प्रस्तावीत आहे . सदरची सुरक्षा अनामत रक्कम कराराचा एकूण कालावधी पुर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल .

ड)	जागेचा विकास करणेचा कालावधी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राच्या दिनांकापासून २ वर्ष

इ)	कराराचा कालावधी भोगवटा प्रमाणपत्राचे दिनांकापासून ६० वर्ष

फ)	सदर जागेकरिता प्रत्येक महिन्यासाठी भाडे म्हणून रुपये ३०,३२,८३२/— (रुपये तीस लाख बत्तीस हजार आठशे बत्तीस फकत ) किमान देयक आकार निश्चित करणेचे प्रस्तावीत आहे. जे निविदाधारक स्वखर्चाने संपुर्ण १५७९६ चौ.मी क्षेत्राचा विहित पध्द्तीने विकास व उद्यानासमोरी रस्त्याच्या मध्येभागात कारंजे बनवुन त्यांची कराराच्या संपुर्ण कालावधीत देखभाल व दुरूस्ती करण्याची संमती दर्शवितील तसेच जास्तीत जास्त भाडे देण्यास तयार असतील अशा निविदा धारकांची निविदा मंजुर करण्याचे प्रस्तावीत आहे.

निविदेत भाग घेणेसाठी पात्रता अट :

अ)	निविदाधारक संस्था अधिनियम १९५६ (Compnies Act 1956) अंतर्गत सार्वजनिक किंवा खाजगी या दोन्हींपैकी नोंदणीकृत असावी.

ब)	विकासधारकाने पुर्ण झालेल्या लगतच्या मागील ३ वर्षात म्हणजे २००५—२००६, २००६—२००७ व २००७—२००८ मध्ये प्रत्येक वर्षी ५० कोटी रक्कमेची उलाढाल (Turn Over) केलेली असावी व त्यासाठी ३ वर्शाचे लेखा परिखण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

क)	विकासधारकाची निविदा सादर करण्याच्या दिनांक रोजी भांडवली स्थिती १० कोटी एवढी असावी व त्यासाठी लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक असावे .

ड)	लगतच्या पुर्ण झालेल्या मागील वित्तीय वर्षासाठी आयकर भरण केल्याचा तपशिल / ना देय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे .

२.	निविदा सादर करण्याची पध्दत :

निविदा ३ लिफाफयात मागविण्यात याव्यात.

लिफाफा क्रमांक १ :

अ)	इसारा रक्कम भरणा केल्याची पावती.

ब)	पात्रता अटी पुर्ण केल्यासंबंधीचे सर्व कागदपत्र .

लिफाफा क्रमांक २ :

विकासधारकाने जमिनीच्या विकासासाठी नमूद करावयाची निविदा रक्कम .

लिफाफा क्रमांक ३ :

विकासधारकाचा तांत्रिक प्रस्ताव (विकासधारकाने सदर जागेत करावयाच्या विकासाचा तपशिल उदा. नकाशे इ.)

३.	निविदा उघडण्याची पध्दत :

अ)	सर्व प्रथम विकासधारकामार्फत सादर करण्यात आलेला लिफाफा क्रमांक १ उघडण्यात येईल .

ब) ज्या विकासधारकानी लिफाफा क्रमांक करिता विहित सर्व अटी व शर्तीची पुर्तता केली असेल त्याचा लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येईल .

क) ज्या विकासधारकाने लिफाफा क्रमांक २ मध्ये सर्वात जास्त रक्कम नमूद केली असेल त्याचा लिॅफाफा क्रमांक ३ उघडण्यात येईल .

ड) सर्वात जास्त रक्कम नमूद केलेल्या निविदाधारकानी सादर केलेल्या विकाससंबंधीचा तांत्रिक प्रस्तावाचा अभ्यास आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येईल. मा.आयुक्त यांनी आवश्यकता प्रमाणे प्रकल्पाच्या हिताच्या दृष्टीने सुचविलेल्या काही महत्वपुर्ण बाबींची अंमलबजावणी किंवा फेरफार करणेस निविदा धारकाने संमती दर्शविल्यास प्रस्ताव स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी सादर करण्यात येईल

इ) सर्वात जास्त रक्कम नमूद केलेल्या विकासधारकाचा तांत्रिक प्रस्ताव आयुक्तांनी नामंजूर केल्यास क्रमवारीनुसार पुढील क्रमांकावरील निविदाधारकाचे लिफाफा क्रमांक ३ उघडण्यात येईल.

४. <u>जमिनीचा विकास :</u>

अ) जागेत उपलब्ध एकूण १५७९६ चौरस मीटर क्षेत्रफळाचा विकास विकासधारकाने स्वच्छेने व स्वखर्चाने करणे अनुज्ञेय राहील .

ब) विकासधारक अनुज्ञेय वापरांपैकी कोणत्याही वापरासाठी विकास करुन सदर जागेचा वाणिजय वापर करुन शकेल.

क) विकासधारक उपरोक्त अनुज्ञेय वापरानुसार मंजूर विकास नियंत्रन नियमावली व प्रारुप विकास नियंत्रन नियमावली या दोन्हीपैकी जे कठोरतम (जतपदहमदज) असेल त्यानुसार जागेचा विकास करु शकेल .

ड) विकासधारक अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकानुसार विकास करु शकेल .

६. <u>विकासधारकाचे दायित्व :</u>

अ) विकासधारकास आवश्यकता वाटल्यास तो वित्तीय संस्थांकडून कर्जाची उभारणी करु शकतो मात्र विकासधारकास महापालिका मालमत्ता गहाण ठेवण्याची परवानगी देता येणार नाही.

ब) मंजूर निविदाकारास भाडे करार नोंदणी खर्च व मुद्रांक शुल्क इत्यादीचा खर्च स्वत: करावा लागेल .

७. <u>मालमत्ता कर , पाणी पट्टी व इतर कर</u> :

अ) विकासधारकास मालमत्ता कर, विदयूत, टेलिफोन, कर्मचारी व त्यांचा पगार , विमा, सुशोभिकरण, आयकर, सेवा शुल्क, (Service tax) वॅट, विकास अधिभार शुल्क, छाननी फी, रस्तेवर बांधकाम साहित्य ठेवण्याची फी तसेच वर्तमान व भविष्यात लावता येणरे सर्व प्रकारचे कर आणि देखभाल व दुरुस्ती इत्यादी दैनंदिन खर्च स्वत: करणे बंधनकारक राहील .

ब) कराराच्या कालावधीत पाणीपट्टी कर बिगर घरघुती दराने करता येईल .

८. <u>विकासधारकाने केलेली गुंतवणूक परत मिळणेसाठी अनूज्ञेय असलेल्या बाबी :</u>

अ) विकासधारकास सदर जागेत पुरविलेल्या सुविधांसाठी त्याने निश्चित केलेली प्रवेश फी, भाडे, अनामत रक्कम इत्यादी आकारणी करणेस परवानगी राहील.

ब)	विकास धारक सदर जागेचा उपयोग कायद्यातील तरतुदीला आधीन राहुन विकास आराखडयातील अनुज्ञेय वापरासाठी करु शकेल .

क)	विकासधारक विकसीत केलेली जागा किंवा त्याचा भाग कराराच्या कालावधीपर्यंत स्वाइच्छेने वेळोवेळी भाडे तत्वावर देवू शकतो व त्यासाठी विकासधारक व भोगवटाधारक यांच्यात करण्यात आलेला कराराची एक प्रत महापालिकेच्या मालमत्ता विभागात जमा करणे विकास धारकावर बंधनकारक राहील .

९.	<u>महापालिका दायित्व :</u>

अ)	विकासधारकास जागेच्या वापरासाठी आवश्यक ती जागा व आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र लवकरात लवकर देण्यात येईल .

१०.	<u>भाडयाची रक्कम भरणेबाबत :</u>

विकासधारकास प्रत्येक वर्षाच्या पहिलया तारखेस निश्चिम करण्यात आलेली भाडयाची रक्कम भरावी लागेल . सदरची रक्कम भरणेस विकासधारकाने दिरंगाई केल्यास २० टक्के दराने व्याजाची आकारणी करता येईल .

११.	<u>बांधकामाची गुणवत्ता</u> :

विकास धारकास विहित पध्दतीनुसार जमिनीचा विकास करणे बंधनकारक राहील . बांधकाम पुर्ण झाल्यानंतर २ वर्षाच्या कालावधीत जर काही त्रुटी निर्दशनास आल्यास सदर त्रुटींचा निपटारा विकास धारकास स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील .

१२.	<u>विमा :</u>

विकासधारकास कराराच्या कालावधीत स्वखर्चाने विमा काढावा लागेल व सदर विम्याच्या या महापालिकेस जमा कराव्या लागतील .

१३.	<u>देखभाल व दुरुस्ती व कर्मचारी वर्गावरील खर्च :</u>

कराराच्या कालावधीत सदर प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती व या कामासाठी लावण्यात आलेला कर्मचारी वर्ग या सर्व बाबींची जबाबदारी विकासधारकावर राहील .

१४.	<u>योजना हस्तांतरण :</u>

अ)	६० वर्षाच्या कालावधी पुर्ण झाल्यानंतर मालमत्ता, मशिनरी व इतर साधन सामुग्रीसह सुस्थितीत संपूर्ण योजन रुपये १/— या नाममात्र दराने महापालिकेकडे हस्तांतरित करणे विकासधारकांवर बंधनकारक राहील .

१५.	<u>वादविवाद</u> :

अ)	योजना राबविलयानंतर जर विकासधारक भाडे देण्यास दिरंगाई करीत असतील किंवा विहित केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करीत असेल तर त्याचा करार रद्द करण्यात येवून तयार करण्यात आलेल्या सर्व साधनसामुग्री महापालिका ताब्यात घेईल .

ब)	विकासधारक व महापालिका यांचेत वाद निर्माण झाल्यास सदर वादविवाद मिटविणे संबंधीचा निर्णय भारतीय वादविवाद अधिनियम १९९६ ( Indian Arbitration Act 1996 ) अंतर्गत घेता येईल .

१६.	<u>इतर बाबी :</u>

अ) सदर योजनेसाठी सवरील प्रमाणे उल्लेख करण्यात आलेल्या मुख्य अटी व शर्ती व्यतिरिक्त योजनेचा उद्देश लक्षात घेता, वित्तीय , तांत्रिक व कायदेशीर बाबींसाठी व अन्य काही अटी करारात समाविष्ट किंवा फेरफार करण्याचे अधिकार आयुक्त यांना रहातील .

<u>जमिनीचे हस्तांतरण :</u>

सीटीएस क्रमांक : १३०२२ शीट नं. २८ अन्वये नोंद असलेली रिकामी जागा महानगरपालिका स्थापनेपासून महापालिकेच्या ताब्यात असून त्याचा वापर उदयान व मनोरंजन केंद्र म्हणून करण्यात येतो परंतु ती महानगरपालिकेस हस्तांतरण करणेस आवश्यक असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव मंजुर करून शासनास कळविणेसाठी प्रस्तावित आहे.

सबब मुंबई प्रांतिक महानगरपाकि अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार सदर प्रस्ताव महासभेसमोर ठेवणेसाठी प्रस्तावीत करीत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ७ अ <u>दिनांकः—१२/६/२००८</u>

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांप्रमाणे महापालिकेच्या ताब्यात असलेल्या शहरातील हिराघाट जवळील सीटीएस क्रमांक १३०२२ शिट नं. २८ अन्वये नोंद असलेली रिकामी जागा बांधा, वापरा व हस्तांतरण करा या पध्दतीने विकसीत करणे कामीच्या प्रस्तावा सविस्तर माहिती अभावी वगळण्यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १०** :— प्रभाग क्र.१३ व १४ मधील काही रस्त्यावर ''नो पॉर्कींग झोन'' म्हणून घोषित करणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u>पास? सर्वसंमतीने?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी आणि आयुक्त साहेब, अशा प्रकारे नो पार्किंग झोन घोषित करणे हे महापालिकेच्या अधिकारक्षेत्रात येत नाही. ९८ क्रमांकाचा माझा जो प्रश्न आहे त्याच्या उत्तरानुसार ही बाब महापालिकेच्या अधिकारक्षेत्रात येत नाही. तर मग हा ठराव कसा आणला आहात? येथे बेकायदेशीर ठराव पारीत करत आहात काय? हे वाहतुक पोलिसांच्या नियमांशी संबंधीत आहे, महापालिकेचा नियम येथे येतो कोठे? ते मला सांगा? महापालिकेच्या अधिकारक्षेत्रात हे येत नाही. ९८ क्रमांकाचा प्रश्न आणि उत्तर वाचा.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>कुठे लिहिले आहे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>प्रश्न क्र. ९८ च्या उत्तरामध्ये, हे पहा, हे वाचा. यामधुन आपणांस पुर्ण माहिती मिळेल. संपुर्ण उत्तर वाचण्याची काही आवश्यकता वाटणार नाही. आपल्या अधिकार क्षेत्रात जर येत नाही तर बेकायदेशीर ठराव पास करणार काय?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>नो पार्किंग झोन घोषित करणे महापालिकेच्या अधिकार क्षेत्रात येत नसले तरी महापालिका या कामी शिफारस तर करु शकते ना?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>महापालिकेच्या अधिकार क्षेत्रात कसे येत नाही त्याचा आधी खुलासा करावा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>प्रश्न क्र. ९८ चे उत्तर वाचा.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>उत्तर दिले आहे ते ठिक आहे. परंतु ते उत्तर आम्हांला पण समजावुन सांगा ना?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u> ९८ क्रमांकाचा प्रश्न आणि त्याचे दिलेले उत्तर हे त्यांना दया.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>इथे काय लिहिले आहे ते वाचा, बाकी सर्व वाहतुकीचे नियम आहेत. महापालिकेच्या अधिकार क्षेत्रात ही बाब येतच नाही.

<u>आयुक्त (समीर उन्हाळे):—</u>पार्किंग नो पार्किंगबाबत जी चर्चा चालु आहे त्याबाबत सांगु इच्छितो की शहराचे पालकत्व करणारी आपली ही सभा आहे. तिला जर आपले काही मत दयायचे असेल की, अमुक एक ठिकाणी अमुक एक अशी अडचण आहे आणि त्याठिकाणी अमुक एक झाले पाहिजे तर ती शिफारस डेप्युटी आरटीओ आणि वाहतुक पोलिसांची जी एक समिती असते त्यांच्याकडे देवु शकतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>परंतु ती बेकायदेशीर राहिल ना? जी बाब आपल्या अधिकार क्षेत्रात येत नाही त्यास महासभेच्या ठरावाची काय आवश्यकता आहे? आपण असेच एक पत्र पाठवा ना?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>महासभेची शिफारस आवश्यक आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>का आवश्यक आहे ते तर सांगितले नाही ना? आपण शिफारास करण्यासाठी सांगत आहात परंतु ती का करत आहात आपण? ते सांगा ना? आयुक्त म्हणुन आपण वैयक्तीपणे मला सांगा की तुम्ही का शिफारस करत आहात? काय काय अडचण आहे? कुणाला काय त्रास आहे ते मला सांगा.

<u>आयुक्त (समीर उन्हाळे):—</u>नो पार्किंग करण्याची जर सभागृहाची इच्छा असेल तर शिफारस करण्याची.............

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>माझा तर विरोध आहे, ही बाब आपल्या अधिकार क्षेत्रातच येत नाही तर आपण बेकायदेशीर ठराव कसा पास करणार? बेकायदेशीर काम करणार काय? शिफारस करण्यासाठी आपण पत्र सुध्दा लिहुन पाठवू शकतो. आयुक्त म्हणुन आपण वाहतुक पोलिसांना पत्र लिहु शकता की अमुक या ठिकाणी अमुक ही अडचण आहे. खरं म्हणजे जेथे अडचणी आहेत तेथे आपण काही करत नाहीत.

<u>आयुक्त (समीर उन्हाळे):—</u>सभागृहाच्या इच्छेनुसार आम्ही कार्यवाही करु.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आमचा यास विरोध आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>या विषयाबाबत काय निर्णय घेतला जात आहे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>ही बाब महापालिकेच्या अधिकार क्षेत्रात येत नाही, आयुक्त वाहतुक पोलिसांना पत्र लिहुन कळवु शकतात की अमुक या ठिकाणी अमुक ही अडचण आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—महासभेचे जे विचार आहेत ते शिफारस म्हणुन करु शकतात ना? याबाबतीत तर आयुक्त साहेबांनी सांगितलेच आहे ना?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—जर करायचे असेल तर महासभेला यामध्ये सहभागी केले जावु नये. आयुक्त साहेब काही करत असतील तर...........

सदस्य श्री. जीवन इदनानी :—महासभेला का नाही सामील करुन घेतले जावे?. महासभा शिफारस तर करु शकते ना? त्यात काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—बेकायदेशीर ठराव करण्यास आमचा विरोध आहे. हा जो ठराव होईल तो बेकायदेशीर होईल. कायदेशीर होईल काय ते आपण सांगा. कायदेशीर सल्लागार कोण आहेत त्यांनी येवुन याबाबतीत खुलासा करावा. विधी विभागाचे कोण अधिकारी येथे आहेत त्यांनी खुलासा करावा.

महापालिका सचिव :—काय करायचे?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—जर कायदेशीर मत देणारा कुणी नसेल तर हा प्रस्ताव नाकारला जावा.

आयुक्त (समीर उन्हाळे):—सभागृहास जो निर्णय घ्यायचा आहे त्याचा सन्मान राहिल. जर सभागृहाने शिफारस केली तर ठराव बेकायदेशीर होणार नाही असे मी अश्वस्त करतो. आपणांस जर कोणत्याही प्रकरणामध्ये जर सभागृहास शिफारस करायची असेल तर तो ठराव बेकायदेशीर होवू शकणार नाही असे मी आश्वासन देतो.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—कायदेशीर, बेकायदेशीर ही काही गोष्टच नाही. परंतु जी बाब आमच्या अधिकार क्षेत्रात येत नाही ती आम्ही का करावी? असे तर यापुढे पोलिसांकडे शिफारस करण्यासाठी लोकांची घटस्फोटाची प्रकरणे सुध्दा सभागृहात येतील तर मग काय आपण तशी शिफारस कराल काय? ती तर बेकायदेशीर होणार नाही ना? मग तशी शिफारस आपण कराल काय? महापालिकेने पोलिसांच्या कामामध्ये हस्तक्षेप करण्याचा विडा उचलला आहे आता आपणांस कोणतीही काळजी करण्याची आवश्यकता नाही. आपण कृपया या बाबत महापालिका आयुक्तांशी संपर्क करु शकता? अशी एक जाहिरात आता वर्तमानपत्रामध्ये दया.

महापालिका सचिव :—काय करायचे?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—आयुक्त साहेब, हा अधिकार कोणाला आहे?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हा विषय यापुर्वी एकदा कार्यसुचीवरुन वगळलेला आहे तो पुन्हा पुन्हा कार्यसुचीवर कसा येत आहे. हा विषय १० वेळा कार्यसुचीवर येत आहे काय? या कामी आपणांस अधिकार नसेल तर हा प्रस्ताव नाकारला जावा.

महापालिका सचिव :—आपण या प्रस्तावाबाबत काय निर्णय घेता?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हा प्रस्ताव नाकारला जावा असे माझे मत आहे. पाहिजे तर या प्रस्तावावर मतदान घ्या.

महापालिका सचिव :—बाकी सदस्यांचे काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—या प्रस्तावावर पाहिजे तर मतदान घेतले जावे. ज्यांचे जे मत असेल ते मतदानाद्वारे ते व्यक्त करतील. बेकायदेशीर ठराव आम्ही होवु देणार नाही. बेकायदेशीर एखादे जरी काम झाले तरी उदया आम्ही जनतेस महापालिकेकडे अर्ज करण्यास सांगु की आम्हांस अमुक ही अडचण आहे याकामी आपण पोलिस विभागाकडे शिफारस करावी.

महापालिका सचिव :—हा विषय आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळायचा काय?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—श्री. भुल्लर महाराज यांनी सांगितले की, नो पार्किंग झोन घोषित करण्याकामी महापालिकेला अधिकार नाही मग तो अधिकार नेमका कोणाला आहे? महापालिकेला नाही, वाहतुक पोलिसांना नाही मग आहे कोणाला? साहेब, याचे आम्हांला उत्तर मिळावे.

आयुक्त (समीर उन्हाळे):—यापुर्वी पार्किंग, नो पार्किंग संदर्भामध्ये सभागृहाला सांगण्यात आलेले आहे की, असा शिफारशीचा ठराव जर सभागृहाने केला तर तो बेकायदेशीर होत नाही. हे घोषित करण्याचे जे संबंधीत प्राधिकारी आहेत ती पोलिस, वाहतुक पोलिस व आरटीओ त्यामध्ये महापालिकेचेही अधिकारी असतात. सभागृहाचे जे मत आहे ते या समितीपुढे ठेवुन आवश्यक त्या मंजुरीची कार्यवाही जर सभागृहाची इच्छा असेल तर करता येईल.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—जे होत आहे ते चुकीचे चालले आहे. तुमचा प्रस्ताव वेगळा आहे आणि प्रशासनाच्या वतीने तुम्ही जो प्रस्ताव आणला आहे तोही चुकीचा आहे. प्रस्तावाबाबत संपुर्ण शहानिशा करुन कायदा काय म्हणतो, याची चौकशी करणे प्रशासनाचे काम होते. याबाबतीत तुम्हांला अधिकार आहेत का? अधिकार नसतांना तुम्ही असे प्रस्ताव आणता म्हणुन ही सर्व गडबड चालली आहे. नामकरणाच्या विषयाबाबत सुध्दा असेच झाले आहे. संपुर्ण संभ्रम अवस्था ही प्रशासन करत आहे. त्यांना कायदाच काय हे कळत नाही असे मला वाटते. आणि त्यामुळे ही सर्व गडबड झाली आहे. एक ठाम भुमिका प्रशासनाने घेतली पाहिजे ती न घेतल्याने आणि चर्चा झाल्यानंतर सुध्दा प्रशासनाच्या वतीने वेगवेगळी विसंगतीदर्शक उत्तर प्रशासनाकडुन येत आहेत. तुमच्या अधिकारात नसतांना सुध्दा तुम्ही प्रस्ताव आणता तो कसा आणता? मुळात आणलाच का? जेव्हा कुणी शिफारस केली तेव्हा तुम्ही चौकशी करावयास पाहिजे होती. याबाबत आपणांस अधिकार आहे काय? तुम्ही काय चालविले आहे ते समजत नाही. सदस्यांनी काय येथे आपसात मारामा—या करत बसायचे? प्रत्येकाच्या भावनेचा विषय आहे. तुम्ही भावनाशी खेळत आहात. मग ते नामकरणाच्या बाबतीत असो किंवा नो पार्किंगच्या बाबतीत असो. चाललयं ते बरोबर नाही. नंतर तुम्ही सांगणार की याबाबतीत आम्ही हे करु ते करु. याबाबतीत सुध्दा असेच झालेले आहे.

महापालिका सचिवः—मा. महापौरांची सूचना आहे, हा विषय पुढे ढकलला जावा.

सदस्य श्री. धनंजय बोडारेः—हा विषय पुढे ढकला आणि तोपर्यंत कार्यवाहीची प्रक्रिया पुर्ण करा.

महापालिका सचिवः—हा विषय पुढे ढकलला जावा? ठिक आहे? सर्वसंमतीने?

सदस्य श्री. अंकुश म्हस्केः—मतदान घ्या, मतदान घ्या. पुढे कशाला ढकलता?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—परंतु येथे ही दादागीरी कसली? जे आमच्या अधिकार क्षेत्रात येतच नाही तर, ही कसली दादागीरी ? सभा समाप्त झाली आहे. काय करायचे ते सांगा?

महापौर :— सदरचा विषय आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन पुढे ढकलण्याकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. १०:— प्रभाग क्र.१३ व १४ मधील काही रस्त्यावर ''नो पॉर्कीग झोन'' म्हणून घोषित करणे.

प्रस्तावना

श्री. राजु (जीवन) इदनानी नगरसेवक तथा गटनेता लोक भारती पक्ष (गंगाजल फ्रंट) उल्हासनगर महानगरपालिका यांनी दिनांक ४/३/२००८ च्या पत्रान्वये प्रभाग क्र. १३ व १४ मधील खालील दर्शविलेल्या ठिकाणी वाहतुकीची ये जा जास्त प्रमाणात होत असल्याने त्या ठिकाणी वाहने पार्किंग केल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होवून नागरीकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. काही वेळा इमारतीच्या खाली व इतर ठिकाणी वाहने पार्किंग केल्याने वाहन चालक व नागरीकांमध्ये भांडणे होत असतात त्या परिसरातील नागरीकांनी सदर ठिकाणी नो पार्किंग झोन करण्याबाबत विनंती केलेली आहे.

७. सोनेसर अपार्टमेंट ते रॉयल रेसिडन्सी पर्यंत

८. दाभाडे चौक
९. दाभाडे चौक ते स्मशानघाट पर्यंत
१०. दाभाडे चौक ते प्रकाश ऑटो
११. दाभाडे चौक ते आशा सोसायटी
१२. दाभाडे चौक ते आंबेडकर चौका पर्यंत

तरी वरीलप्रमाणे क्षेत्र नो पार्किंग झोन घोषित करणेकामी निर्णयासाठी मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ७ ब दिनांक:—१२/६/२००८

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्रभाग क्र. १३ व १४ मधील ५ रस्त्यांवर व एका चौकात ''नो पॉर्कींग झोन'' घोषित करण्याचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी वगळण्यांस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— पहिली सभा समाप्त. दुसरी सभा सुरु करण्यांत येत आहे.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका